# ऐतिहासिक-लेख-संग्रह.

## भाग आठवा.

ाई रावसाहेब पेशवे यांची कारकीर्द.

( मे १७८४ ते फेब्रुवारी १७९१. )

हें पुस्तक

**वासुदेव वामन खरे,**

यांनीं तयार केलें.

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत नटेश अप्पाजी द्रविड यांनीं छापिलें
व
वासुदेव वामन खरे यांनीं प्रसिद्ध केलें.

V2315,K.M18
E2.8
194431

१८३७. सन १९१५

किंमत २ रुपये.

# निजामअल्लीची भेट वगैरे.

स. १७८४ फेब्रुवारी ते सालअखेर.

सन १७८३ त इंग्रज व मराठे यांजमध्यें सालबाईचा तह पक्का ठरला त्या दिवसापासून नाना फडनवीस यांच्या कारस्थानीस निराळें वळण लागतें. आजपर्यंत कितीही राज्य गेलें तरी राघोबादादांस म्हणून पेशवाई मिळूं द्यावयाची नाहीं एवढाच त्यांचा उद्देश होता. तो उद्देश सिद्धीस गेल्यावर आतां गेल्या नऊ वर्षांच्या झगडा-झगडींत गमावलेलें राज्य पुनः परत घेण्याकडे त्यानीं बुद्धिसर्वस्व खर्च केलें. नारायणराव पेशवे यांस मारून राघोबादादानीं अन्यायानें पेशवाईचा अधिकार मिळविला तो अधिकार त्यांजकडून हिसकून घेऊन नारायणराव यांच्याच वंशाकडे चालवावा अशी प्रतिज्ञा करून नाना फडनवीस यांनीं राज्यकारभार हातीं घेतला; त्या वेळीं त्यांचे जोडीदार व सोबती होते त्यांपैकीं कांहीं मेले, गेले, व कांहीं फितूर करून कैदेंत पडले. प्रतिज्ञात कार्यावर एकनिष्ठ अढळ वृत्ति एकट्या नानांचीच मात्र राहिली. राघोबादादानीं इंग्रजांचा आश्रय केला त्यामुळे वारंवार देशचे देश उध्वस्त करणाऱ्या स्वाऱ्या उद्भवल्या, बंड-खोरांची पोळी पिकली, फितुरी लोकांचीं शिडें उभारिलीं, व राज्यांत पराकाष्ठेचा अंतःक्षोभ झाला. इतकें झालें तरी नानानीं आपलें राजकीय ध्येय नजरेसमोरून ढळूं दिलें नाहीं. कितीही खर्च पडला, कितीही हानि झाली, कशींही संकटें आलीं, तरी महाराष्ट्र-राज्य-नौकेच्या या कुशल सुकर्णधारानें कधीं धैर्य सोडिलें नाहीं. हे आमचें लिहिणें अक्ष-

( १८३९ )

## नानाची कारस्थानी.

रशः खरें आहे याबद्दल या पुस्तकाचे पांचवा व सहावा हे भाग ज्यांनीं लक्षपूर्वक वाचिले असतील त्यांची खात्री झालीच असेल.

सन १७७५ त बारभाईंचें कारस्थान उभारलें तेव्हांपासून राघोबादादांस पेशवाई न मिळूं देण्याचा बंदोबस्त करण्यास नानांस नऊ वर्षे लागलीं. नानानीं इंग्रजांशीं सालबाईचा तह केला तेव्हां हा बंदोबस्त पक्का झाला. या अवधींत राघोबाच्या तर्फेनें ज्यांनीं अनेक युद्धें केलीं व नुकसानें सोशिलीं त्या इंग्रजांस लाभ थोडाच झाला. त्यांस फक्त साष्टीचा टापू मात्र मिळाला. त्याचा वसूल तीन लक्ष रुपयांच्या आंत बाहेरच होता. पण ज्यानीं राघोबाच्या तर्फे लढाईही केली नाहीं किंवा राघोबा व इंग्रज यांशीं लढण्यास पुणे दरबारास कधीं मदतही दिली नाहीं, त्या निजामअल्लीनीं उगीच्या उगीच तीस लक्ष उत्पन्नाचें राज्य पुणे दरबाराकडून उपटलें होतें! हा कावा निजामअल्लीनीं कसा साधला, आणि नाना व सखारामबापू यांस भेडसावून त्यांजकडून आपलें म्हणणें कसें मान्य करविलें, हा सारा मजकूर पांचव्या भागांत आलाच आहे. त्या गर्दींत निजामअल्लीनींच राज्याचा एवढा मोठा लचका तोडिला होता असें नव्हे. हैदरअल्लीनेंसुद्धां धारवाड, कोपळ, बदामी वगैरे पंचवीस तीस लक्षांचा मुलूख मराठी राज्यापैकीं घेतला होता. खरें पाहिलें तर हैदरअल्लीस ज्या शर्तीवर नानांनीं मुलूख दिला ती म्हणजे इंग्रजांशीं लढण्याची शर्त त्यानें पराक्रमानें पार पाडिली होती; त्यामुळ त्यास दिलेल्या मुलखाचें नुकसान नानांस सह्य व्हावें; आणि ज्या शर्तीवर निजामअल्लीस मुलूख दिला ती शर्त म्हणजे मराठी फौजांस मदत करण्याची शर्त निजामअल्लीनें मुळींच पार पाडिली नाहीं, याकरितां त्यास दिलेल्या मुलखाचें नुकसान नानांस असह्य व्हावें; पण वस्तुस्थिति तशी नव्हती. हैदरअल्लीचा मुलगा टिपू सुलतान हा पराकाष्ठेचा गर्विष्ठ व बलाढ्य राजा असल्यामुळें निजाम-

अल्लीच्या साहाय्यानें त्याचा पराजय करून त्यानें घेतलेला सर्व मुलूख परत घ्यावा, तें कार्य झाल्यावर मागून निजामअल्लीवर स्वारी करून त्यानें घेतलेलें राज्यही सोडवावें, अशी नानांची मसलत होती. टिपूकडे गुंतलेलें राज्य जरी निजामअल्लीचें साहाय्य घेऊनसुद्धां नानांस १७८६।८७ च्या स्वारींत सोडवितां आलें नाहीं, तरी तें १७९१।९२ च्या स्वारींत त्यानीं आणखी भरतीस इंग्रजांची कुमक मिळवून सर्व सोडवून घेतलेंच. नंतर निजामअल्लीनें घेतलेलें राज्यही त्यानीं खर्ड्याची स्वारी करून परत मिळविलें. तात्पर्य, राघोबादादास पदच्युत करण्यासाठीं नऊ वर्षांत म्हणजे सालबाईचा तह होईपर्यंत नानानीं जितकें राज्य गमाविलें तितकें पुनः मिळावयास त्यांस पुढें आणखी बारा वर्षें घालवावीं लागलीं !

असो. नानांची तूर्त काळाची मसलत निजामअल्लीस सामील करून घेऊन टिपूवर स्वारी करण्याची होती. निजामअल्लींचा मुलूखही टिपूनें घेतला होता, यामुळें अशी स्वारी करणें त्यांसही इष्ट होतेंच. शिवाय गेल्या नऊ वर्षांत मराठ्यांचा चौथ सरदेशमुखीचा वसूल मोगलाईतून यावयाचा राहिला होता तो विषय बराच भानगडीचा असल्यामुळें त्याबद्दल दोन्ही दरबारांतील मुत्सद्यांचीं समक्ष बोलणीं होऊन निकाल होणें जरूर होतें. टिपूवर स्वारी करण्याची मसलत ठरविण्याकरितां व उभय दरबारांमधले वादग्रस्त मुद्दे होते त्यांचा निकाल लावण्यासाठीं नाना व निजामअल्ली यांची भेट व्हावी असें गुप्तपणें ठरलें. अशा प्रसिद्ध मनुष्यांच्या भेटी व्हावयाच्या त्याला कांहीं तरी बहाणा पाहिजे, याकरितां तुम्हांकडे खंडणीची बाकी चार वर्षांची तुंबली आहे तिचा निकाल करा, असा नानानीं टिपूस प्रथम तगादा लाविला. त्याचें उत्तर टिपूकडून आलें तें नरमपणाचेंच होतें. त्यांत त्यानें तुमची खंडणी सवडीसवडीनें लौकरच चुकती करितों असें कळविलें

होतें. नंतर टिपूप्रमाणेंच निजामअल्लीसही नानानीं चौथ सरदेशमुखी-विषयीं सक्तीचा तगादा केला; पण ही सक्ती व हा तगादा सारा वरपांगी होता. आंतून या दोन्ही दरबारांचा पक्का मिलाफ होता. नानांची व आमची गांठ पडून बोलणें झाल्याखेरीज चौथ सरदेश-मुखीच्या देण्याचा आम्हांस निकाल करितां येत नाहीं असें निजाम-अल्लीकडून उत्तर आलें तेंही अर्थात् पूर्वी ठरलेल्या संकेतास अनुस-रूनच होतें. एवंच उभयतांच्या भेटी कृष्णा व भीमा यांच्या संगमावर यादगिरी येथें व्हाव्या असें ठरून त्याप्रमाणें मोठें सैन्य बरोबर घेऊन निजामअल्ली भागानगराहून निघाले. इकडे पुण्याहून आधीं हरीपंत-तात्या व मागाहून नाना फडनवीस व तुकोजी होळकर फौज बरोबर घेऊन निघाले ते पंढरपूरच्या सुमारें सारे एकत्र होऊन पुढें चालले. तों त्रिवर्ग पटवर्धन सरदार म्हणजे गंगाधरराव, परशुरामभाऊ व रघु-नाथराव हेही आपापल्या फौजांनिशीं येऊन लष्करास मिळाले. यादगीर येथें निजामअल्लीची भेट होऊन उभय पक्षीं मेजवान्या व वस्त्रें, जवाहीर वगैरे बहुमान देणें घेणें झालें. बोलणींही पुष्कळ झालीं; परंतु हा ज्यासाठीं भेटीचा खटाटोप करण्यांत आला ती टिपूवर स्वारी करण्याची मसलत कांहींच सिद्ध झाली नाहीं. याचें कारण, मराठे व मोगल या दोघांचीही त्या वेळीं टिपूवर स्वारी करण्यासारखी तयारी नव्हती. याकरितां ती मसलत पुढच्या वर्षी पक्की करण्याचें उभय पक्षीं ठरलें. मोंगलाईत मराठ्यांचीं ठाणीं पूर्वीपासून होतीं तीं गेल्या नऊ वर्षांत निजामअल्लीनें उठवून लाविलीं होतीं. पुणें दरबारचें लक्ष महत्वाच्या मसलतींकडे वेधलें असल्यामुळें या गोष्टीकडे त्या दरबारानें कानाडोळा केला होता; परंतु उठवून लाविलेलीं ठाणीं पुनः बसवूं देण्याचें आतां निजामअल्लीनीं या भेटींत कबूल केलें. चौथ सर-देशमुखीचे हक्क शाहूमहाराजानीं दक्षिणच्या सहा सुभ्यांवर

## निजामअल्लीची भेट वगैरे.

खुद्द बादशहाकडूनच मिळविलेले असल्यामुळें या हक्कांची मराठे लोक स्वराज्यांत गणना करीत असत. हा स्वराज्याचा पैका निजामअल्लींकडे सालोसालचा येणें होता त्यापैकीं गेल्या दोन सालचा तत्काळ चुकता करून देण्याचें निजामअल्लीनीं मान्य केलें. त्या मागच्या वर्षांचा पैकाही देणें होता, परंतु त्यांत कांहीं लढे होते. याकरितां त्या देण्याचे स्वस्थपणानें हिशेब आकारावे, जेथें संशय येईल तेथें माधवराव बल्लाळ पेशवे यांच्या कारकीर्दीची वहिवाट प्रमाण मानावी, त्यावरूनही संशयनिवृत्ति न होईल तर खुद्द निजाम-उल्मुलुक यांच्या कारकीर्दीची वहिवाट उभय पक्षांनीं प्रमाण मानावी असें ठरलें. नंतर सुरापूरच्या संस्थानिकापासून खंडणी घेऊन मराठे व मोगल यांच्या फौजा परत फिरून आपापल्या ठिकाणांस गेल्या.

नाना व निजामअल्ली यांच्या या खेपेच्या भेटीपासून तरी मराठी राज्याचा कांहीं म्हणण्यासारखा फायदा झाला नाहीं. सैन्याच्या पायमल्लीमुळें ठिकठिकाणची बिचारी रयत मात्र नागवली गेली हें या प्रकरणांत पुष्कळ पत्रें त्यासंबंधाचींच छापिलीं आहेत त्यावरून दिसून येईल. या दोघांच्या भेटी झाल्यामुळें शिवशाई व मोंगलाई या दोन्ही राज्यांचा पूर्ण एकोपा आहे असें टिपूच्या दृष्टोत्पत्तीस यावें, व त्या योगानें त्याच्या मनावर जरब बसावी, हा जर या भेटीची मसलत ठरविणारांचा उद्देश असला तर तो कांहींच सफळ झाला नाहीं हें पुढच्या नरगुंद प्रकरणावरून वाचकांस कळणारच आहे.

करवीरकरांशीं पेशव्यांचा तह झाल्याचें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. तो तह झाल्यावर सटवोजी भोंसल्यास करवीरच्या राज्यांत रहाण्याचें प्रयोजन राहिलें नाहीं. सबब तो परत आपल्या ठिकाणास जाण्यासाठीं निघाला. परशुरामभाऊ व गंगाधरराव यां-

( ३८४३ )

## नाना व नबाब परत फिरतात.

पासून त्यानें इमानप्रमाण व बेलभंडार घेतला होता, तथापि मागच्या-प्रमाणें याही खेपेस आपण लुटले जाऊं ही भीति त्यास होतीच. ती भीति निरर्थक होती. तो पटवर्धनी मुलखांतून सुखरूपपणें पार झाला. मान्‍जी फांकड्याची यापूर्वींच पेशव्यानीं समजूत काढिली होती व तो करवीराहून निघून गेला होता. येसाजी शिंदा आदल्या वर्षींच वारला होता. तात्पर्य, आतां करवीरच्या राज्यांत कोणी उपद्व्याप करणारा राहिला नसल्यामुळें त्या राज्यांतल्या व सभोंवतीं पेशवाईंतल्या रयतेस कांहीं वर्षें तरी स्वस्थतेचा व सुखाचा उपभोग घेतां आला.

# निजामअलीची भेट वगैरे.

नं. २७७७. श्री. ( पौष व० ९—१६ जाने० )

पैवस्ती. छ० २६ सफर. आर्बा समानीन. पौषमास.

सेवेसीं बाळाजी विष्णु व विसाजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २२ सफरपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर लिहावया आज्ञा जाहली पाहिजे. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस[1] लिहिलें आहे त्याजवरून सविस्तर कळेल. राजश्री हरिपंततात्या मुहूर्तें डेरे दाखल जाहल्याचें पेशजी लिहिलेंच होतें. हल्लीं वानवडीवरून कूच करून लोणीवर गेले. तेथें एक दोन मुक्काम आहेत. तेथून कूच करून मजल दरमजल पंढरपूरचे सुमारें जाणार. श्रीमंत राजश्री नाना पौष वद्य पंचमी सोमवारीं आवशीचे दोन घटिका रात्रीस मुहूर्तें डेरेदाखल जाहले. तूर्त मुक्काम पुण्यानजीक गारपिरावर आहे. येथून कूच जाहलें म्हणजे कोणीकडे जातात हें सविस्तर लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७७८. श्री. ( माघ शु० १४–५ फेब्रुवारी. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामीचे सेवेशीं—

पोष्य हरी बल्लाळ. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरि येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपणाकडून प्रस्तुत पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तर सविस्तर लिहावें. आपण कोठें आहां, फौज किती जमा जाहली, कोल्हापुराकडील[2] मजकूर काय, त्यांचा उपद्रव बाहेर होतो म्हणोन ऐकितों,

१ मिरजेस गंगाधरराव गोविंद यांस पत्र पुण्याहून. २ करवीरकरांचा.

## हरिपंततात्यांचें कूच.

त्यास राजश्री रघुनाथरावदादा अद्याप करून कोठें आहेत, तिकडील बंदोबस्त कसकसा आहे, ( हें लिहावें. ) आम्हाकडील वर्तमान तरी आम्ही सिद्धटेंकास आलों. तेथें आठ मुक्काम जाले. फौज जमा होत चालली. एक जागां राहणें ठीक नव्हे, याजकरितां पंढरपूरचे सुमारें जावें म्हणून श्रीमंत राजश्री नानानीं लिहिलें. त्यावरून भीमा उत्तर-तीरानें पंढरपूरचे सुमारें जात असों. मुलखाची रखवाली करितों, परंतु वैरणीस विलाज नाहीं. तत्रापि बंदोबस्ती करीतच आहों. आपण कोल्हापुरचे मसलतीपासून मोकळे होतां म्हणजे पुढील मनसब्यास ठीक पडतें. आमचा मुक्काम निरानरसिंगपुरचे अलीकडे दहा कोस आहे. येथून पुढें जात असों. तुम्हांकडील अलीकडे वर्तमान कळत नाहीं, याजकरितां मुजरद सुतरस्वार पाठविला आहे. लिहून पाठवावें. पंढरपुराजवळ नेहमीं मुक्काम करून राहणें, त्यास वैरणीचा पेंचच आहे. घडेल तें खरें. रवाना छ० १३ रबिलावल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

नं. २७७९. श्रीगणराज. ( माघ व० २–८ फेब्रु. )

पैवस्ती छ० १७ रबिलावल. सन आर्बा समानीन.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस. आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री हरिपंततात्यांचें लष्कर श्रीक्षेत्र पंढ-रीस आलें. गांवखेड्यांची रखवाली जाहली पाहिजे. तरी चिरंजीव राजश्री जनोबा भाऊस......... रवानगी करूं म्हणून लिहिलें...... ... कारभार एक प्रकारचा......... तेथें चिरंजीवास पाठ-विल्यावरी रखवाली होणार नाहीं. मी तात्यासमीप गेलों तरी भिडेनें रखवाली जाहल्यास होईल. यास्तव आज सोमवारीं एकसंब्यास जाऊन

१ कुरुंदवाडकर २ सभोंवतीं तुमचा मुलुख आहे त्यांतून वैरण आणावी लागेल असा भाव. ३ मेघश्यामराव कृष्ण यांचें पत्र मिरजेस. हें टिंबें दिलेल्या ठिकाणीं फाटलें आहे.

उदईक मंगळवारीं संध्याकाळीं आपलेजवळ येतों. उपरांत मर्जीस येईल तसें कर्तव्य करूं. कळावें. मंगळवेढ्यास शिवार आटपावयाविसीं व रखवालीविसीं लिहून पाठविलें. कळावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २७८०. ( माघ व० १३–११ फेब्रु० )

शिवराव निळकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र छ० ११ जमादिलाखरचें.

" ती॥ रा॥ भाऊसाहेबांकडून छ० ६ जमादिलाखरचीं पत्रें आलीं त्यांतील मजकूर " सात हजार फौज व गाडद दोन हजार इतलाख ठेवावे. त्याकरितां कारभारी याणीं वडिलांस दरमहा लाख रुपये फौजेच्या खर्चास द्यावे. मागील कर्जाचे ऐवजीं सात लाख रुपये द्यावे. " याप्रमाणें लिहिलें आहे म्हणून लिहिलें तें कळलें. "

नं. २७८१. श्री. ( माघ व० १२—१८ फे० )

पैवस्ती छ० २९ रबिलावल सन आर्बा समानीन. फाल्गुन मास शु॥ १.

विज्ञापना. राजश्री तुकोजी होळकर यांचा मुकाम भौमवारीं मौजे करोली पिराची येथें होता. आज कूच करून येणार. भेटी आजच दोन प्रहरीं होतील. रास्तेही आजच येणार. काल सडे एकादशीस देवदर्शनास आले होते. क्षेत्राहून चार पांच दिवस कूच होत नाहीं. राजश्री तात्या काल संध्याकाळीं बोलिले जे, पुण्याहून पत्रें आलियाशिवाय कूच होत नाहीं. राजश्री हरिपंततात्यानीं दशमीस महापूजा देवाची केली. रात्रीस राजश्री नारायणराव फलटण-

---

१ हें कारकुनाचें पंढरपुराहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. हें टिंबें दिलेल्या ठिकाणीं फाटून अक्षरें गेलीं आहेत. तसेंच पुढच्या पत्रांतून.

कर यांची कथा महाद्वारीं जाहली. आज ब्राह्मणभोजन होणार लष्करांत धारणें जोरी बारूलें १६ पायली, हरभरे पावणेसात पायली याप्रमाणें आहे. स्वामींनीं पत्र छ० २१ रबिलावलचें पाठविलें तें छ० २३ रबिलावलीं पावलें. राजश्री बाळाजीपंत येथेंच आहेत. श्रीमंत राजश्री बापू इंदुवारीं आले. राजश्री तात्याकडेस दरबारास जातात राजश्री शिवाजीपंत आले होते. आज फिरोन मंगळवेढेस गेले. उदईक श्राद्ध आहे, सबब लष्करचें कूच क्षेत्राहून दोन मजली गेलियांवर ........ सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७८२. श्री. ( माघ व० १२—१८ फेब्रु० )

पैवस्ती. छ० २९ रबिलावल. सन आर्बा समानींन. फाल्गुन शु॥ १

सेवेसीं बाबाजी विश्वनाथ चाफेकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ रबिलावल सौम्यवासर पावेतों मुक्काम श्रीक्षेत्र पंढरपूर येथें सुखरूप असों. विशेष. स्वामींची आज्ञा घेऊन निघालों तो संध्याकाळीं तासगांवास आलों. भौमवारीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांनीं भोजन करून पत्रें श्रीमंत राजश्री हरीपंततात्यांस लिहून दिलीं; आणि आज्ञा घेऊन निघालों तो भृगुवारीं मौजें अष्टीचे मुक्कामास आलों. तेच दिवशीं राजश्री तात्यांकडे जाऊन पत्रें प्रविष्ट केलीं. मंदवारीं लष्करचा मुक्काम वैरणी होत्या सबब जाहला. रविवारीं लष्करचें कूच होऊन श्रीक्षेत्रास आले. बरोबर राजश्री शहाजी भोसले यांचें पथक व राजश्री आनंदराव गोपाळ व तीस बत्तीस पागा व दोन अडीच हजार गाडद व तोफा बारा येणेंप्रमाणें सरंजाम आहे. शिलेदारांचा भरणा.............पतराव विश्वनाथ आहेत. क्षेत्राहून

---

१ चाफेकर कारकून यांचें बाळासाहेबांस मिरजेस पत्र.

( ३८४८ )

## निजामअल्लीची भेट वगैरे.

कूच होणेंविषयीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचीं पत्रें यावीं. येथून कूच जाहलियावर पुढें कोठपावेतों बरोबर जावें ते आज्ञा करावी. त्याप्रमाणें जाऊन माघारा येईन. भीमा दक्षिणतीरीं मंगळवेढें परगणेचे गांवानीं बिनीवाले यांचे राऊत व आपले असे ठेविले आहेत. सविस्तर मजकूर श्रीमंत राजश्री बापूनीं लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. राजश्री तात्यांकडे भाजी व ऊस नित्य देत असतों. उंसावर प्रीति फार आहे. ऊस करकंबकरांनीं आणिले आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७८३. श्री. ( २३ फेब्रु० )

पैवस्ती छ० ४ रबिलाखर. सन आर्बा समानीन. फाल्गुनमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेसीं.

विनंती सेवक बाळाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल तागायत फाल्गुन शु॥ ३ पावेतों मुक्काम क्षेत्र पंढरपूर येथें आपले कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री हरीपंत.........यांचें लष्कर करकंब परगणीयांतून क्षेत्रास आलें. आल्या तागायत आज पावेतों नऊ मुक्काम जहाले. आद्यापि कूच होऊन जावें हा सिद्धांत नाहीं. करकंब परगणीयाचे गांव क्षेत्राजवळ. रखवालीस स्वार बिनीवाल्याचे व राजश्री बाबाजीपंताकडील गांवगन्ना ठेविले असतां अनिवार लष्करचे कहीचे लोक; त्यानीं रोपळें बुद्रुक व येवती खंडाळी व पन्नूर कोनेरीचे गांवच्या रानांतील खळीं कणसाळे कडबे लुटून नेले. तात्या-पाशीं हें वर्तमान नित्य उठोन निवेदन करितों. वरचेवर ताकीद करितात; परंतु बंदोबस्त न जाहला. चार पांच गांवची बाकी ठेविली नाहीं. आजपावेतों नव मुक्काम जहाले. येथून लवकर कूच जहालें तरीच राहिल्या गांवास उपसर्ग लागणार नाहीं. नाहीं तर आणखी

उपसर्ग लागेल. याप्रमाणें वर्तमान आहे. श्रीमंत राजश्री बापूसाहेबः-समागमें नित्य दरबारास जातों. बोभाट होतो त्याप्रमाण निवेदन करितों. साखरेसारखें गोड भाषण मात्र करितात, परंतु कहीचा बंदोबस्त होत नाहीं! पांच गांव अगदीं बुडाले. कुरोली वाटेनें... ...व मेंढापुरीस थोडा थोडा उपसर्ग लागला. अष्टीवरील मुक्कामानेंहि उ.........पुढें मुक्काम किती होता......कही मोहोळ परगणीयांत .........ताकीद करवितात. कहीवाले पंचवीस हजार किंवा तीस हजार याचा सुमार सांपडत नाहीं! कही मनस्वी जाती. रखवालीच्या राउतांचें कांहीं चालत नाहीं. लूट शिवाराची होत आहे. मोहोळ परगण्याचे सरदीचीं खेडीं रोपळें बुद्रुक येवती पेनूर कोनरी खंडाळीं हे गांव फार खराब जाहले. शिवारांत एक पेंढी राहिली नाहीं. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २७८४. श्री. (फाल्गुन शु. ६–१३ माच.)

सेवेशीं बाबाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ. २० रबिलाखर मंदवासर पावेतों मुक्काम मौजे भंडारकवठें येथें सुखरूप असों विशेष. श्रीक्षेत्राहून लष्करचें कच इंदुवारीं जाहलें ते मौजे चिंचोली भीमा उत्तरतीरास मुक्काम जाहला. मंगळवार, बुधवार तेथेंच मुक्काम होता, गुरुवारीं कूच करून मौजे कुसूर नजीक सिदापूर येथें मुक्काम केला. भृगुवारीं भंडारकवठें येथील मुक्कामास आले. सादेपुराचा मुक्काम करावा, याप्रमाणें गुरुवारचे रात्रीं मंगळवेढें व बरडोल परगणे सरद पार व्हावी, या अर्थें राजश्री तात्यानीं बिनीवाले यांस समक्ष सांगितलें असतां भंडारकवठें येथें बिनीवाले यांचें कर्ज गांवाकडे येणें म्हणोन मुक्काम आणिला. ते दिवशीं भृगुवारीं भीमा दक्षिणतीरास कही येऊन मौजे उंबरज व निवरगी

# निजामअलीची भेट वगैरे.

व रेवतगांव या तिहीं गांवची वैरण बांधोन नेली. संध्याकाळीं तात्यां-कडे जाऊन अलीकडे कही उतरूं नये येविसीं विनंती करून बंदो-बस्त केला. त्या दिवसापासून अलीकडे कही येत नाहीं. भृगुवारीं चोर राऊत मौजे अरली व नंदूर व बेराल परगणे मंगळवेढें या तिहीं......... बहुत खराबी केली. ती...............अलीकडे उ............ पंचमी करून कूच करावें असा इत्यर्थ होता. त्यास श्रीमंत राजश्री तात्यांस वद्य तृतीयेस बुधवारीं अजीर्णाचे योगेंकरून रात्रीं ज्वर आला. वमन जाहलें आणि ढाळही जाहले. गुरुवारीं वाखा फारच जाहला. भृगुवारीं काहिली होऊन पोटांत आग जाहली, सबब मौजे भंडारकवठें येथें शिनापा कुलकर्णी याचें घर रिकामें करून गांवांत गेले. दिवस अस्तमान होईजे पावेतों तेथेंच होते. सूर्यास्त जाहल्यावर गोटांत आले. निक्षून आरोग्य होइजेपर्यंत कूच होतां दिसत नाहीं. वाख्याचे पूर्वीं भृगुवारीं कूच करितों असा निश्चय केला होता; परंतु दुखण्यामुळें मुक्काम जाहला. राजश्री तात्यानीं आपले लष्करचे कहीचा बंदोबस्त केला; परंतु होळकराचे कहीचा बंदोबस्त होत नाहीं ! ( तात्या ) नित्य संध्याकाळीं सुभेदार यांस चिठ्यां लिहून पाठवितात. परंतु कैदेचा प्रकार होत नाहीं. तुटून कोसावर राहिले आहेत. जवळ लगते गांव बरडोल परगणेचे आहेत त्यांस उप-द्रव भारी होतो. गांवावर शेंपन्नास राऊत जाऊन कजीया करून माणसें तोडतात; पेवें काढून आणितात ! याप्रमाणें सुभेदार यांचे लष्करचें वर्तमान आहे. काल राजश्री तात्यांकडे गेलों होतों. वाखा भारी आहे, अजीर्णाचे योगेंकरून जाहलें आहे. एक दोन दिवशीं आरोग्य होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

( ३८९१ )

## नानांचें कूच.

नं. ३७८५. श्री. ( चैत्र व० ८—१३ एप्रिल. )

पै॥ छ० २५ जमादिलावल. सन आर्बा समानीन. चैत्रमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पो॥ बाळाजी जनार्दन. सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. तुम्हांकडे येण्याविशीं पेशजी दोन पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून निघालांच असाल. त्यास तुम्ही आपला चौघडा बमय सरंजाम बराबर घेऊन सत्वर यावें. आम्ही उदईक पंढरपुरास मुक्काम करूं. तुम्ही लौकर यावें. रा॥ छ० २३ ज॥ वल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती. तपशील लिहूं नये. लौकर यावें. हे विनंती.

नं. २७८६. श्रीगणराज. ( वैशाख शु० १—२० एप्रिल. )

पैवस्ती. छ० १ जमादिलाखर. सन आर्बा समानीन. वैशाख. श्रियासह चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस प्रति मेघःशाम कृष्ण आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २९ जमादिलावल मुक्काम क्षेत्र पंढरपूर यथास्थित जाणोन कुशल लेखन करावें. विशेष. राजश्री नानाफडणीस यांची स्वारी क्षेत्रास आल्याचें वर्तमान लिहिलेंच आहे........गणेची फरमास आजपर्यंत........णें प्रविष्ट जाहली. कही कवाडाचा उपद्रव जाहला नाहीं. मुक्काम आणखी कांहीं होतील. चतुर्थीस कूच व्हावें असेंही बोलतात; परंतु घडणार नाहींसें दिसतें. नबाब दर कूच आलेखेरीज हे क्षेत्र सोडीत नाहींत असेंही आहे. यांत श्री-सत्तेनें घडेल तें प्रमाण ! यानंतर आपण राजश्री बाबाजीपंत व बाळाजीपंत गोडबोले पाठविले ते स्वारसुद्धां येऊन परवां पावले.

## निजामअल्लीची भेट वगैरे.

दोहों वकिलांत समागमें कोणी नाहीं. मर्जी[1] फारच नाजूक. यांत घडेल तें प्रमाण ! बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे आशीर्वाद.

नं. २७८७. श्री. ( वैशाख शु० ७—२६ एप्रिल. )

विनंती सेवक सखो रुद्र. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ० ५ जमादिलाखरपर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष......स्वामींची स्वारी कित्तूर तालुक्यांत गेली आहे, हें वर्तमान ऐकोन चिंता लागली आहे...... इकडील वर्तमान तर राजश्री हरीपंततात्या फौजसुद्धां मैंदरगीपासून चार कोसांवर उतरले आहेत. तालुक्यांत कहीचा वगैरे उपद्रव कोठवर लिहावा ? राउत पन्नास होळकराचे व सरकारचे आणिले आहेत. शिवाय पागा व शिलेदार दहा वीस ठेवून सरदेस खेडियांची रखवाली करितों. लष्करचा उपद्रव कांहीं लिहितां येत नाहीं. खटलेखोर लष्करांत मिळाले आहेत. गैरवाका समजावून चिठ्या आणितात........ लष्कर भारी. आज दीड महिना तालुक्यापासोन चार कोसांवर उतरले आहेत. किती आंच सोसावी ? तालुका जुजबी, यास्तव स्वामींनीं हरिपंततात्यांस पत्रें निक्षून लिहून याउपर तरी उपद्रव न होय तें करावें. अद्यापि दोन महिने लष्कर या प्रांतीं राहणार असें लोक सांगतात. श्रीमंत राजश्री नाना श्रीक्षेत्रावर आहेत. हरीपंत बोरी संगमावर भीमातीरीं आहेत. मैंदरगीपासून पांच कोसांवर आहेत. नबाब दोन मजली शहर सोडून आला आहे. राजश्री गोविंदराव पिंगळे शहराहून येऊन श्रीमंत नानाशीं बोलोन आणखी माघारे नबाबाकडे गेले आहेत. याउपरी काय मनसबा करितात पहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नानाफडनवीस यांची मर्जी. २ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस.

## फौजेचा उपद्रव.

नं. २७८८. श्री. ( १३ मे. )

तीर्थस्वरूप मातुश्री आका व लक्ष्मीबाई वहिनी वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत वैशाख वा॥ ९ गुरुवार प्रातःकालपर्यंत यथास्थित असे. विशेष. आम्ही मिरजेहून निघाल्यातागायत वरचेवर पत्रें एक दुसरी मजल आड करून पाठविलीं आहेत; पावलींच असतील. तालिकोटाकडून परवां सुरापूर तालुक्यांत आलों. सप्तमी भौमवारीं तीर्थस्वरूप राजश्री भाऊ-साहेब यांची भेट मुदनूर तालुके सुरापूर येथें जाहली. काल पांच सहा कोस आलों. आतां झाडून तालुका सुरापूरकरांचाच आहे. मुलूख उजाड आहे. परवांपासून वस्ती आढळत नाहीं. कालच राजश्री नाना-कडून पत्र आलें. 'फेरोजाबाद येथें कूच करून गेलों. तेथून नबाबास व आपल्यास विसा कोसांची तफावत राहते. लवकर यावें.' असें लिहिलें आहे. यास्तव आज लांब मजल दहा कोसांची नेमिली आहे. एक दोहों मजलींनें राजश्री नानांची गांठ पडेल. काल नबाबाचे लष्करांतून वकिलांचीं पत्रें छ० १८ जमादिलाखर मुक्काम निरडगुंब परगणे कडेचूर येथील मुक्कामचीं आलीं. त्यांतील मजकूर कारभारी व नबाब यांचे भेटीचें स्थल आजूर भीमातीर येथें नेमिलें आहे. तेथून सगर आठ कोस आहे. तेरखेचा मात्र अद्याप निश्चय ठरला नाहीं. याउपर लवकरच भेटी होतील. राजश्री नानाच्या लष्करास जाऊन मिळाल्यानंतर फिरोन पत्रें रवाना होतील. तीर्थस्वरूप राजश्री भाऊ-साहेब यानीं आम्ही यावयाचेपूर्वीं राधनपालें सुरापूरकरांचा गांव, तेथें चिरंजीव राजश्री दादांस पाठविलें होतें. गांव लुटून माघारे आले. ते

---

१ पत्र लिहिणाराची अनुक्रमें थोरली बहीण साळूआका व थोरली भावजय लक्ष्मीबाई ( पांडुरंगराव यांची स्त्री. )

दिवशीं चिरंजीव राजश्री दादास उजवे कानाजवळ ( गोळी ) धक्का लागोन किंचित् टेंगूळ आलें आहे; शेकीत असतात, खैर आहे. विशेष कांहीं नाहीं. स्नानहीं करितात. ईश्वरें मोठी खैर केली. आज निनगी मानेहाळ भीमातीर येथें गेलों. तेथून भीमातीरानेंच पुढें जाणार. मागाहून सविस्तर लिहितों. चिरंजीव राजश्री बापूस निःशेष आरोग्य जाहलियाचें लिहावयास आज्ञा करावी. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

पैवस्ती. छ० २७ जमादिलाखर. सन आर्बा समानीन. वैशाख मास. जासुदाबरोबर पत्र आलें.

नं. २७८९. श्रीगणराज. (ज्येष्ठ शु० २–२१ मे.)

पैवस्ती छ० ९ रज्जब. सन आर्बा समानीन. ज्येष्ठमास.

चिरंजीव राजश्री दाजी व आपा यांसीं.[1]

प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १ रज्जब मुक्काम नजीक यातागिरी तीन कोस भीमा दक्षिणतीर. यथास्थित असे. विशेष. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांच्या भेटी जाहलियानंतर तुम्हांकडे पत्रे रवाना मुजरद जोडीबरोबर केलीं आहेत तीं प्रविष्ट जाहलींच असतील. राजश्री नानाच्या भेटी वैशाख वद्य १२ स जाहल्या. आमच्या डेऱ्यासच आले होते. वीस घटका दिवसास भेट जाहली. ते व आम्ही मिळून तेच दिवशीं नबाबाचे भेटीस गेलों. रात्रौ भेटी जाहल्या. आज नबाबास...........विस्तर तीर्थस्वरूप मातुश्री उभयतांस लिहीत आहे त्यावरून कळेल, हें पत्र लिहून तयार केलें तोंच तुमचें पत्र छ० १७ जमादिलाखरचें आलें तें आजच भृगुवारीं प्रथम प्रहर दिवसास पावोन

१ थोरला पुत्र केशवराव दाजी व पुतण्या चिंतामणराव आपा यांस हें लष्करांतून मिरजेस पत्र.

संतोष जाहला. करडी घोडी पावल्याचें लिहिलें तें कळलें. 'चिरंजीव राजश्री बापूची प्रकृत बरी आहे, खपल्या पडल्या,' म्हणून लिहिलें, उत्तम आहे. वरचेवर पत्र पाठवीत जावें. येथून कूच व्हावयाचें ठरलें तर आणखी पत्रें जलद पाठवून देतों. लिहीत जावें. पढत जावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

चिरंजीव राजश्री बापू व नारायणराव व माधवराव यांस आशीर्वाद.

नं. २७९०. श्रीगणराज. (ज्येष्ठ शु० २–२१ मे.)

तीर्थस्वरूप मातुश्री साळूआका व लक्ष्मीवहिनी वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत ज्येष्ठ शु॥ द्वितीया भृगुवासर मुक्काम नजीक यातागिरी तीन कोस भीमा दक्षिणतीर. यथास्थित असे. विशेष. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांची भेट जाहल्यानंतर वडिलांकडे पत्रें रवाना केलीं आहेत. पावलींच असतील. राजश्री नानाचे लष्कराजवळ वैशाख व॥ ११ स आलों. द्वादशीस वीस घटका दिवसास राजश्री नाना आमचे डेऱ्यास येऊन भेटले. तेच दिवशीं रात्रौ नबाबाचे भेटीचा निश्चय ठरला होता............स आले. तसेच परभारें नबाबाचे भेटीस गेले होत. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब व आम्ही व चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा व श्रीपतराव व गणपतराव याप्रमाणें गेलों. अगोदर त्यांचे गोटाबाहेर नबाबांचे पुत्र पोलादजंग गुदस्तां पुण्यास श्रीमंतांचे लग्नास आले होते त्यांची भेट जाहली. त्यांस कारभारी याणीं

१ विठ्ठलराव बापू हा पुतण्या व नारायणराव व माधवराव हे दोघे पुत्र.

२ नानांबरोबर आम्ही नबाब निजामअली यांचे भेटीस गेलों.

## निजामअल्लीची भेट वगैरे.

जवाहीर व वस्त्रें व हत्ती एक व घोडा एक याप्रमाणें दिलें. तदोत्तर नबाबांची भेट त्यांचे डेऱ्यांतच जाहली. भेट प्रथम प्रहर रात्रीस जाहली. माघारे गोटास आलों तेव्हां पहाटेची सहा घटका रात्र राहिली ! ते दिवशीं रात्रीं संध्या देखील नाहीं. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांस प्रदोष होता. अपरात्र गोटास यावयास जाहली, यामुळें उपोषण जाहलें. नबाबाचे लष्करास व आमचे लष्करास अंतर दीड कोसाचें आहे. तीर्थस्वरूप अंताजीपंत तात्या देवाधीन जाहलियाचें वर्तमान आलें. सातवे दिवशीं कळलें. आज अकरावा दिवस. सूतकानिवृत्ति जाहली. नबाब आज सरकारचे डेऱ्यास येणार यास्तव परवांपासोन नवे डेरे व मंडप उभे होत आहेत. कारंजीं वगैरे साहित्य सर्व समागमें आहे. आज नबाब सरकारचे डेऱ्यास येऊन गेल्यानंतर एक दोन बैठका होऊन बोलणें चालणें होईल. तदोत्तर माघारे फिरावयाचा निश्चय ठरेल. ठरल्यानंतर मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. आज पाऊण महिना पत्र तिकडलें येत नाहीं, याजमुळें चिंता लागली होती. पत्रें लिहून तयार केलीं तों आजच पत्रें राजश्री नारापंत यांचीं आलीं त्यावरून सविस्तर कळलें. संतोष जाहला. 'चिरंजीव राजश्री बापूची प्रकृति बरी आहे, खपल्या पडल्या,' म्हणून चिरंजीव राजश्री दाजी व आपा याणीं लिहिलें होतें. पायास गुरू जाहला म्हणून ऐकेलें; निःशेष आरोग्य जाहलियाचें वृत्त लिहावयास आज्ञा केली पाहिजे..............सामोरे आले म्हणून लिहिलें, परंतु नबाबाचे धाकटे पुत्र......इ......जामुदौला बहादर मिरसूनअल्लीखान बहादर जंग सामोरे आले होते. भेटीस गेलों ते दिवशीं येयून दान कोस पीश्चमेस होतों. मंगळवारीं येथें मुकामीं आलों. आज नबाब सरकारचे डेरेस आले नाहींत. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब व राजश्री हरिपंततात्या यांची व नबाबाची भेट व्हावयाची आहे. उदइक होणार

आहे. नबाब सरकारचे डेरेस व कारभारी नबाबाचे डेरेस एक एक दोन दोन वेळ जातील. बोलणें होईल. याच समारंभास दहा दिवस लागतील असें आहे. नंतर देशाचे रोखें कूच व्हावयाचें ठरेल तेव्हां सेवेसीं लिहून पाठवितों. नबाबांचे भेटीचे दिवशीं नबाबांचे डेरेस गेलों. आंत गेलेनंतर पाठीमागें दुसरा डेरा होता तेथून नबाब आले. उभे राहून सर्वांची भेट जाहली. नंतर बसोन राजश्री नानाशीं, " तुम्ही आलां, बहुत उत्तम जाहलें. आमचाही इरादा तुमची भेट व्हावी असा होता; " म्हणून ( नबाब ) बोलले. यांणींही उत्तर करावयाचे रीतीनें केलें. उपरांतीक सर्वांस विडे देविले. पानदानें आणून आपले हातें खासे मडळीस विडे व अत्तर दिलें. लागलेच उठोन नबाब गेले. आम्हीही आपले डेऱ्यास आलों. अतःपर होईल वर्तमान तें मागाहून लिहितों. नबाबाची फौज व श्रीमंतांची मिळून भीमातीरानें पांच कोस उतरली आहे. नदी म्हणून पाणी पुरलें आहे। दाणे महाग. हरभरे दोन पावणेदोन पायली. जोंधळे पांच पायली अशी महागाई जाहली आहे. भीमेच्या उत्तरतीरास नबाबाचा मुलूख, तिकडे कही जात नाहीं. सुरापूरचे प्रांतीं कही जाते. पांच सहा गांवें वैरण नाहीं. दोन मजलीनें कही येते. पुढें काय होईल पहावें. राजश्री बाळाजी नाईक भिडेही राजश्री नानांबरोबर आले आहेत. उदईक आम्ही भेटीस जातों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २७९९. श्रीगणराज. ( २८ जून. )

पैवस्ती. छ० १३ साबान. सन खमस समानीन. आषाढमास.

तीर्थस्वरूप मातुश्री साळूआका व लक्ष्मीवहिनी वडिलांचे सेवेसीं.

( ३८५८ )

## निजामअलीची भेट वगैरे.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत आषाढ शु॥ १० इंदुवासर मुक्काम काचापूर प्रांत सुरापूर यथास्थित असे. विशेष. येतगिरीनजीक येथील मुक्कामाहून कूच करून सात कोस अलीकडे हचनाळ तालुके मजकूर येथें मुक्कामास आल्यावर चंदा सांढणी स्वार याजबरोबर पत्रें रवाना केलीं आहेत; आजपर्यंत पावलींच असतील. हचनाळाहून कूच करून चवदा कोस मुक्काम मजकुरास शनिवारीं आलों. सुरापूरकर संस्थानिक भेटीस येणार याजकरितां काल व आज दोन मुक्काम येथें जाहले. आज संध्याकाळपर्यंत संस्थानिक येथें येणार. उद्यांचाही येथें मुक्कामच होईल. घरास यावयाचा मुहूर्त वद्य द्वितीया रविवारीं नेमिला आहे. दिवस थोडे राहिले; पंथ लांब. चार पांच गांवचीं[1] मजल रोज पडेल. समागमें बुणगें निभावणार नाहीं. यास्तव आजच राजश्री आपाजी गोविंद यांजबरोबर बुणगें व डेरे वगैरे खटला पुढें रवाना केला आहे. आम्ही सडे राहिलों आहों. द्वादशी बुधवारीं येथून मजली लांब लांब करून वद्य द्वितीया रविवारीं घरास येत आहों. नगारखाना, हत्ती, जामदारखाना, आदीकरून रवानगी केली. सडे राहिलों. वाटेस डांकेस स्वारही ठेवण्याची नेमणूक केली आहे. तीं॥ राजश्री भाऊसाहेबांनींही जडभारी बुणगें रवाना केले. मध्येंच संस्थानिकाकरितां मुक्काम जाहले. मुख्य गोष्ट भोग सबळ आहे! या मुक्कामीं आल्यावर घोड्यांस वैरण मिळों लागली. एकादशीस पंढरीस कारभारी जाणार होते ते राहिले. आतां पंढरीस जाणार नाहींतसें वाटतें. मग श्रीसत्ता प्रमाण. आम्ही याच मुक्कामीं निरोप घेऊन येत आहों. रविवारीं मिरजेअलीकडे बुणग्यास येऊन गांठतों. सत्यसंकल्प ईश्वर आहे. काल पाऊसही थोडासा पडला. परंतु इकडे पाऊस कमी आहे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

---

१ गांव म्हणजे चार कोस.

( १८५९ )

## लष्करें परत फिरतात.

नं. २७९२. श्रीगणराज. ( आषाढ व० ९-११ जुलई. )

पैवस्ती. छ० २५ साबान. सन खमस समानीन. आषाढमास.

श्रियासह चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांप्रती मेघश्याम कृष्ण आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २२ रविवार दोन प्रहरपर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपलीं पत्रें यातगिरीनजीकचीं व स्वारी माघारी फिरल्यावरील आलीं तीं पावलीं. सविस्तर कळलें. आपलें व चिरंजीव राजश्री भाऊसाहेबांचें जाणें परभारें स्वस्थळास जाहलें. राजश्री नाना फडणीस सरकारची फौजसुद्धां करजगी परगण्यांतून मंगळवेढें परगणेंत मौजे कुपसंगीवर छ० १४ मिनहूस आले. तेथून श्रीक्षेत्रास न जातां परभारें सोळा कोसांची मजल करून गेले. मी भेटीस जाऊन आलों. सरकारच्या फौजेच्या रस्त्यास गांव लागले त्यांच्या वैरणी व आऊतकाठी गेली. बैल बिगारीस दो ती खेड्यांचे गेले ते चाळीसपर्यंत अद्याप आले नाहींत. होळकराचा तोफखाना पुढें रवाना जाहला होता तो नीट कसबेवर आला. दोन मुक्काम करून कडब लुटले. मोट नाड आदीकरून नेलें. बैल नेले त्यांत कांहीं आले. कांहीं आले नाहींत. आणावया कसबेचा चौगुला पाठविला तो-गुडगुडी रुपेची मुसलमान अधिकारी आहे त्याचे राहुटींतील गेली. तिचे दीडशें रुपये देणें म्हणून वाफगांवास घेऊन गेले आहेत ! मरवडें वगैरे जागीं पैका घेतला. कसबेसही खर्च पडला. मागाहून खासा होळकर कसबेवरून क्षेत्रास गेले. त्यानीं खेडीं मार्गाची व कसब्याची वैरण नेली. खर्च पाडला. देगांव व मलेवाडीचा चिंधीचोळा करून गांव लुटला. त्यापैकीं कारकून पत्रें पाठविल्या कांहीं गुरें सोडून दिलीं; बाकी गेलें तें गेलें ! त्या मागून कृष्णराव बल्लाळ बोटेकराचें पथक आलें त्यानीं कसबेचीं

## निजामअलीची भेट वगैरे.

मेंढरें चाळीस पन्नास लुटलीं. माणसें पाणी आल्यामुळें तटले होते. शिवारांतील कडबे नेले. याप्रमाणें तोफखाना व पथकें गेलीं त्यानीं भीमातीरचे गांव व इकडील बाकी ठेविली नाहीं. जातेसमयीं बचाव जाहला त्या भरवंशावर रयत होती. त्यांच्या भोगानुसार घडलें! आपण शंभर स्वारांचें पथक पाठविलें असतें तरी कांहीं रखवाली होती तेंहि न केलें. वसूल लावणीच्या हंगामांत वैरण आऊतकाठी जाऊन गांव खर्चोखालीं आले; उपाय नाहीं. सविस्तर कळावें यास्तव लिहिलें असे. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे आशीर्वाद.

नं. २७९३. श्री.

+तहनामा सो॥ राजश्री फत्तेसिंग भोंसले. सुमा सीत अर्बैन मय्या व अल्लफ. चौथाईचा मामला राजश्री बाळाजी नारायण व गोविंदराव भगवंत यांस सांगून पाठविलें त्याचा तह नेमणूक येणेंप्रमाणें घ्यावें नेमणूक—

| | |
|---|---|
| परगणे हवेली परांडें कुल-आकार देखील जकाती दरोबस्त चौथाईपकीं नेमणूक. | परगणे आवसें येथील आकार दरोबस्त चौथाईचा होईल देखील जकाती त्यापैकीं हुजूर ऐवज तिजाई देऊन राहील ता॥ यासीं नेमणूक. |

---

+ ही याद स० १७४५ सालीं झालेली असून ती येथें छापण्याचा उपयोग मराठी सरदारांची मोंगलाई मुलखाच्या उत्पन्नांत वांटणी कोणच्या स्वरूपाची होती हें दाखविण्यापुरताच आहे. यांत जमाबंदीचे पारिभाषिक शब्द आले आहेत त्यांचा अर्थ समजण्याकरितां मोंगलाईंतील एक गांव १३२० रु० उत्पन्नाचा आहे असें समजूं; या उत्पन्नाची वांटणी पुढें दिल्याप्रमाणें होईल.

१३२० ऐन उत्पन्न.

यांतून वजा. १२० सरदेशमुखी—महाराज छत्रपतीचें वतन.

१२००

( पृष्ठ ३८६१ पहा. )

## लष्करें परत फिरतात.

| | | | |
|---|---|---|---|
| ८००० मुकाशी. | | १ | मुकासी. |
| | ६००० जाधवराव. | १ | बाबती. |
| | २००० फूटमुकाशी. | | |
| | ८००० | ४ | कित्ता महाल. |
| ४४०० बाबती. | | १ | मोहोळ. |
| ३२०० हुजूर पो. | | १ | उंदीरगांव. |
| ४०० साहोत्रा. | | १ | तंगी. |
| १६००० | | १ | टेंभुरणी. |
| | | ४ | |

( पृष्ठ ३८६० वरून पुढें चालू. )

१०० मोंगलाई. (मोंगलांचा हिस्सा.)

१०० फौजदारी.
६०० जहागीर.

९००

३०० चौथ. (स्वराज्य अथवा मराठ्यांचा हिस्सा.)

७५ बाबती ( महाराजांचा हिस्सा. )
१८ साहोत्रा. (पंतसचिवांचा हिस्सा.)
९ नाडगौडा. ( निरनिराळ्या लोकांस छत्रपतींनीं इनाम दिला. )
१९८ मोकासा. ( मराठी राज्यांतल्या सरदारांत फौजेच्या खर्चाकरितां छत्रपतींनीं वांटून दिला. )

३००

१२००

( पृष्ठ ३८६२ पहा. )

# निजामअल्लीची भेट वगैरे.

सोळा हजार घेऊन बाकी ऐवज सुभ्याकडे द्यावा. कलम १.

चार महालच्या चौथाईचा आकार होईल देखील जकाती त्यापैकीं हुजूरचा पैका फेडून बाकी तीन ता।। त्यास—

१ मुकासी निमे.

१ बाबती व हुजूरचा पैका व साहोत्रा.

२

कलम.

---

( पृष्ठ ३८६१ वरून पुढें चालू. )

दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या उत्पन्नावर सरदेशमुखी व बाबती हे अंश महाराजांचे असून ते त्यांनीं आपणाकडे ठेविले होते, व बाकीचे अंश वर सांगितल्याप्रमाणें वांटून टाकिले होते. गांवचें मूळचें उत्पन्न बाराशें रुपयांचें सरें, परंतु शेंकडा दहा टक्केप्रमाणें सरदेशमुखीचा बोजा मराठ्यांनीं अधिक बसविल्यामुळें हें उत्पन्न वाढवावें लागलेलें आहे. मोंगलाई मुलखांत दर गांवीं मराठ्यांचे याप्रमाणें हक्क असल्यामुळें तो मुलूख मोंगलांचे ताब्यांत असून नसून सारखाच होता. कारण कीं त्या मुलखांत बाबती वगैरे हक्क वसूल करण्याकरितां महाराजानीं स्वतंत्र अंमलदार नेमिले होते त्यांजवळ स्वार, पायदळ वगैरे हत्यारबंद माणसें असून शिवाय त्यांचीं परगण्यापरगण्यानीं स्वतंत्र ठाणीं होतीं. ते मोंगल अधिकाऱ्यांस न विचारतां आपापले हक्काचा रयतेपासून परभारें सक्तीनें वसूल करून घेत. शिवाय हक्काचा वसूल कमाल बेरजेवर घ्यावा कीं खरोखर झालेल्या वसुलावर घ्यावा हें ठरलेलें नसल्यामुळें हक्कदार हात फावेल तसा वसूल घेत. त्यांपुढें मोंगल अधिकाऱ्यांचें कांहीं चालत नसे. जर त्यांनीं कांहीं गडबड करून मराठ्यांचा एखादा हक्क बुडविण्याचा प्रयत्न करावा तर सारे मराठे एकत्र होऊन आपणावर तुटून पडतील हें त्यांस भय असे. कारण कीं मोंगलांनीं आज अमक्याचा हक्क बुडविला तर उद्यां

( पृष्ठ ३८६३ पहा. )

( १८६३ )

लष्करें परत फिरतात.

एकूण कलमें ४ सदरहूप्रमाणें करार केलीं असत. ता० ६ माहे जिल्काद.

नं. २७९४. श्री. (आषाढ व० १०–१२ जुलई.)

पैवस्ती. छ० २६ साबान. खमस समानीन. आषाढ मास. श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक आपाजी हरि. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २३ साबान जाणून स्वामीच्या कृपेंकरून

---

( पृष्ठ १८६२ वरून समाप्त. )

आपलाही बुडवितील ही प्रत्येक मराठी सरदाराला काळजी होतीच। चौथ सरदेशमुखीची मूळ कल्पना बाळाजी विश्वनाथ यांची नव्हे हें खरें, पण त्या हक्कांच्या सनदा बादशहाकडून मिळवून आणून त्यांस 'राष्ट्रीय मालमत्ते'चें स्वरूप देऊन त्यांची वांटणी करण्याचें अचाट बुद्धिवैभवाचें काम त्यांनीं केलें, याबद्दल मराठी इतिहासांत त्यांची कीर्ति अजरामर राहील. त्यांनीं मोंगलाईस जखडण्याकरितां कारस्थानांचे विळखे असे जबरदस्त घालून ठेविले होते कीं, निजाम उल्मुल्क व निजामअली या दोन बुद्धिवान् नबाबांनीं किती धडपड केली तरी ते त्यांस जवळ जवळ शंभर वर्षेपर्यंत सोडवितां आले नाहींत। ते विळखे ब्रिटिश सरकारच्या तलवारीशिवाय कोणास तुटले नाहींत। बाळाजीपंत नाना पेशव्यांचे दोन नातू नानासाहेब व भाऊसाहेब पराक्रमी निघाले, त्यांनीं आजावरही ताण केली। त्यांनीं औरंगाबाद सुभ्यापैकीं मोंगलाईच्या हिश्शांतलें 'जहागीर' सदराखालचें उत्पन्न होतें त्यापैकीं ६२ लक्षांचें उत्पन्न उदगीरची लढाई मारून काबीज केलें। म्हणजे पूर्वीं सांगतलेल्या उदाहरणांतले १२० सरदेशमुखी व ३०० चौथ मिळून ४२० रुपये आजानें आगाऊच घेतले होते. राहिलेल्या उत्पन्नांतला आणखी सहाशें रुपयांचा मला मोठा लचका नातवांनीं तोडून घेतला! फौज बाळगून दक्षिणच्या सहा सुभ्यांचा बंदोबस्त ठेवावा, या शर्तीवर दिल्लीच्या बादशहाकडून हें 'जहागिरी'चें उत्पन्न हैदराबादच्या नबाबाकडे चालत होतें. पेशव्यांचें म्हणणें कीं, ही जहागीर एकटा नबाबच खाणार कोण। आम्हीही बादशहाचे नोकरच आहों व फौज बाळगून मुलूख संभाळण्याचें काम आम्ही करीतच आहों। याकरितां जहागिरीचा हिस्सा आम्हांसही मिळाला पाहिजे।

## निजामअलीची भेट वगैरे.

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० १० साबान व छ० ११ साबानचीं पत्रें काचापूर तालुका सुरापूर येथील मुकामींचीं पाठविलीं तीं छ० १३ साबानीं पावलीं. पत्रीं आज्ञा जे, "लष्कर बरडोल पो व मंगळवेढें पो दोनी चुकावून जावें, याप्रमाणें बेत केला आहे. वांचवूनच जातील असें केलें आहे. मग श्रीसत्ता प्रमाण," श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा यांचें पत्र देवरायास शिबंदी तगादा न करणेंविसीं पाठविलें तें पावलें. राहिल्या गांवांची रुजुवात करून लिहून पाठविणें. आम्ही आज द्वादशी बुधवारीं मिरजेस जावयास निरोप घेऊन गेलों." म्हणोन आज्ञा; त्यास सरकारची फौज व होळकराची फौज या प्रांतांतून आली. कसब्यावर होळकरांचे फौजेचा मुकाम जाहला. कैद नाहीं. घरेंदारें लुटलीं गेलीं. गांवास शेंसवाशें रुपये बकरीं घेतलीं, सरकारच्या फौजेचा मुक्काम चडचण शिंद्यांची येथें होता. रानांतील कडबा वगैरे गांवची फार खराबी जाहली. सरकारची फौज डुलजितीवरून मंगळवेढेंस उजवें टाकून कुपसंगीच्या मुक्कामीं गेले. तेथें सर्वांस निरोप देऊन ( नाना फडनवीस ) आपण लांब लांब मजलींनें पुण्यास गेले. पहिला होळकराचा तोफखाना आला, त्याणें गांव पाहून दाणादुणा, कांहीं नक्त असें घेतलें. होळकराची खासा स्वारी आली त्याणीं तों बरडोल तसेंच शिरढोण या दोन गांवची फार खराबी केली. मागाहून कैलासवासी श्रीमंत दादासाहेबांकडील तोफखाना राजश्री बाळाजीपंत नि॥ पलटणवाले हे घेऊन मौजे जिरें अंकलगीस, बरडोलावरूनच आले. बरडोलचे चार बैल तोफेस नेले. तसेंच जिरे अंकलगीचे बैल १५ नेले. मुक्काम मजलीस जातांच सोडून देवितों म्हणून सांगून गेले. गांवच्या रयता ( मीं बरोबर दिल्या. ) मजलीस जातांच रयतांस धुडावून लावून दिलें ! बैल सोडले नाहींत ! पुण्यास घेऊन जातों म्हणून सांगोन गेले. याप्रमाणें खराबी जाहली. "राहिली

१ म्हणजे बकरेंपट्टी. 'भेट बकरें' ही गांवाकडून मेजवानी म्हणून लष्करचे लोक वसूल करीत !

रुजुवात कुळारग करून लिहून पाठविणें, " म्हणून (आपण लिहिलें,) त्यास बाकी गांवांकडे त्या गांवच्या रुजुवातीस राजवाडे याणीं व देवरायांनीं फार निकड करून रुजुवात करून घेऊन बाकी काढिली. बाकी गांव राहिले त्यांच्या रुजुवातीस अनमान करितात. जे राहिले गांव त्यांजवर फार करून फाजील गांवचें राजवाडे यांजकडे आहे. त्याणीं जमा वसूल करून दिल्हे त्यास बेहड्याच्या अन्वयें फाजील निघतें. त्यास दोन गांव फाजीलाचे हिशेब रुजू जाहले. फाजील निघालें. तेव्हां पुढेंही फाजील निघणार हें समजोन आजचें उद्यांवर घालोन रुजुवात निखालसपणें करीत नाहींत! राजश्री देवरायाहि त्यांच्या संमतेंच बोलतात! श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादाचीं पत्रें मजला आलीं (कीं,) "सन खमस व आर्बा पावेतों माहिजा आकारून राहिल्या गांवची रुजुवात करून जमीदाराच्या हातची याद लिहून देवरायाची रवानगी करून देणें" म्हणोन पत्रें. तशींच देवरायासही पत्रें श्रीमंत राजश्री दादांचीं आलीं. परंतु ( देवराव ) केवळ मन घालीत नाहींत. बरें असोत. आम्ही तांतड त्यांस करीत नाहीं. मुख्य ठाणीं हातास आलीं, लावणी फार करून उरकून घेतली, त्यांच्या चित्तास येईल तेव्हां रुजुवात करून घेऊन देवरावही जाऊं म्हणतात. रुजुवात केल्याखेरीज जात असल्यास आमचा उपाय नाहीं. आम्ही जमीदारांस घेऊन बसलों. निमित्यास पात्र कशास व्हावें ! त्यांकडूनच काय होईल तें होऊ. परंतु आतां आपल्या वायद्यास येतीलसें दिसतें. राजश्री धोंडोपंताच्या बोलण्यांत " आमचा माहिजा सहा सालें यावयाचा आहे. त्याच्या चिठ्या आम्ही गांवावर परभारें करितों." याप्रमाणें खटला करावा हें मानस, 'चवथाईच्या अन्वयें चढ परगण्यावर घालोन कळेल त्या रीतीनें रुपया वसूल करून घेऊं. आम्ही कोणाचें ऐकत नाहीं.' याप्रमाणें बोलोन काल छ० २१ साबानीं निंबरगीस देवास

समाराधना करावयाकरितां आले. तेव्हां बोलोन गेलेप्रमाणें खटला करतील कीं काय पहावें. गांवची रुजुवात जाहली. बाकी निघाली त्याची याद अलाहिदा पाठविली आहे त्यावरून विदित होईल. यादीचा ठराव देवराव, आम्ही, जमीदार, राजवाडे, यांच्या रुजुवातीनें यादी ठरल्या त्यावरून याद लिहिली आहे. पाहतां विदित होईल. शिरढोणच्या रुपयांविषयीं श्रीमंत राजश्री बापूस पत्र स्वामींनीं पाठविलें होतें. त्यास तें पत्र मंगळवेढयास पाठविलें आहे. उत्तर आल्यावर निवेदन करीन. लावणीचा मजकूर रयतानीं फाट घेऊन फार बोलणें बोलत होते. सर्व प्रकारें त्यांची खातरजमा करून वचनाची बळकटी करून घेतली, तेव्हां लावणीस उभे राहून लावणी करविली. लावणी जाहली. जिरे अंकलगीचे व वरडोलचे बैल तोफखान्यांत बाळाजीपंतानीं नेले येविशीं पत्र आपणाकडील वकिलास दिलें तर इकडून पुण्यास कोणास पाठवून यत्न करून पहावयास येईल. बैल तो गेलेच आहेत. यत्न करून सुटल्यास सुटोत. नच आल्यास तशीच समजाविसी रयतांची करावयास येईल. याजकरितां विनंती जे, पत्राची आज्ञा व्हावी. मुख्य सारांश राजवाडे लबाडींत आहेत. खाऱ्या शिकाऱ्या करून बखेडा करावयाच्या मजकुरांत आहेत. आढळलें वर्तमान विनंती लिहिली आहे. येविशींची जशी आज्ञा येईल तशी वर्तणूक त्यांच्या मनसब्याप्रमाणें करूं. विदित होय हे विज्ञापना.

नं. २७९५. **श्रीगणराज.** (आषाढ व० १३–१९ जुलई.)

अपत्यें रघुनाथरावानें साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० २६ साबान पावेतों यथास्थित असे विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. प्रतिष्ठाहेमाद्रीचें पुस्तक पाठविलें तें अशुद्ध आहे, प्रत लिहिण्याचे उपयोगी नाहीं, यास्तव माघारें पाठविलें आहे. पावल्याचें उत्तर पाठवावें. आणि सिद्धांतभाष्य

व त्रिविक्रमी हीं दोन पुस्तकें पाठवावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें. आषाढ वद्य त्रयोदशी, गुरुवार, प्रातःकाळ, तीन घटका दिवस. क्रोधीनाम संवत्सरे. हे विज्ञापना.

नं. १७९६. श्री. ( श्रावण शु० ९–२६ जुलई. )

पैवस्ती. छ० ९ रमजान सन खमस समानीन. श्रावण मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक रामाजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ८ रमजान इंदुवार पावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. " देसाई यास आणावयास गाडदी पाठविले आहेत; घेऊन येतील. कृष्णापा कासार याजकडे ऐवज येणें, त्यास बरोबर माणसें देऊन हुजूर पाठवून देणें. पंचरसीबद्दल व देशपांडे याजकडील एकसालीचा ऐवज येणें व परगणे मजकूरपैकीं वसूल काय असेल तो जलदीनें पाठविणें " म्हणोन आज्ञा, त्यास देसाई आज पहांटेस निघोन सेवेसीं आले. गाडद्यांची व त्यांची गांठ खेमलापुराजवळच पडली. सेवेसीं येऊन पावलेच असतील. तोफेबाबत व देशपांडे याजकडील एकसालीचा ऐवज आजच रवाना करून दिल्हा आहे. सेवेसीं येऊन पोंचेल. कृष्णापा कासार याचें घर तेरदाळांत नाहीं. मौजे येलहट्टी परगणे जमखिंडी येथें राहतो. त्याजकडे माणसें पाठविलीं आहेत. आणवून सेवेसीं पाठवितों. बाकीचा ऐवज चार रोजांत तरतूद करून पाठवितों. बहुत काय लिहिणें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र तेरदाळाहून.

## निजामअलीची भेट वगैरे.

नं. २७१७. श्रीगणपति. (श्रावण शु० ११-२८ जुलई.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० १० रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोंव्याहून आंबे आणविले त्यांपैकीं आंबे सुमार ३६ पाठविले आहेत. त्यांतील आपण १५ घेऊन बाकींचे द्यावे. येणेंप्रमाणें बितपशील.

| | |
|---|---|
| ५ श्रीपतराव. | १० भास्करपंत आपा. |
| २ लक्ष्मणपंत पाटणकर. | २ तात्या फडणीस. |
| २ मोरभट वाटवे. | ० लंग. |
| ९ | १२ |

येणेंप्रमाणें ज्यांचे त्यांस प्रविष्ट करून उत्तर पाठवावें. येविशीं त्यांस पत्रें लिहिलीं आहेत तींही पावतीं करावीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २७१८. श्री. ( १ ऑगस्ट. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रघुनाथ राऊ दादा स्वामीचे सेवेसीं.

पोष्य व्यंकटराव भास्कर. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील श्रावण शु॥ १५ पर्यंत यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनें संतोषवीत असलें पाहिजे. विशेष. फार दिवस आपणाकडून पत्र येऊन वर्तमान न कळतां चित्त सापेक्षितसमयीं आपण स्थलास येऊन पत्र पाठविलें तें पावलें. संतोष जाहला. ऐसें सदैव पत्रद्वारें आपणाकडील स्वकीय राजकीय वृत्त लिहून संतोषवावें. यानंतर दक्षिणेस ( टिपूसुलतान ) पट्टणास येऊन दीड महिना जाहला. इंग्रजानें कोडि-

१ कुरुंदवाडकर. २ नरगुंदकर भावे. ३ कुरुंदवाडास.

साळचें ठाणें घेतलें; तह मोडला. विस्तिम वर्तमान आलेलें आपणास कळावें यास्तव लिहिलें असे. "राजश्री नाना फडणिसांची व निजामअलीखानांची भेट जाहली. उभयपक्षीं सौरस्य जाहलें. मेजवान्या होऊन आपआपाले स्थळास गेले" हें ऐकिलें. आपण कांहींच भाव दर्शविला नाहीं. पुढें तरी दक्षिणेकडे मोहिमेचा मजकूर आपणास आढळलाच असेल. सविस्तर कळवावें. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

सेवक बाळाजी वामन. साष्टांग नमस्कार विनंती. आम्हास आपण गुदस्तां वचन दिलें आहे तें खचित असावें. आम्ही भेटीस येतों. लोभ निरंतर असावा हे विनंती.

नं. २७९९. श्री. ( २३ ऑगस्ट. )

जबानी बाळाजी आपाजी दातार पोंभुर्लेकर. हल्लीं वा। कसबा कवठें एकंद. सु॥ खमस समानीन मय्या व अल्लफ. तीर्थस्वरूप राजश्री बाबूराव अण्णा आमचे चुलते सहा सात वर्षें हिंदुस्थानांत होते. बहुत दिवस जाले, देशास न आले, सबब ती॥ राजश्री गोपाळराव, आमचे सापत्न बंधु आबा बर्वे यांजकडून स्वारांची बोली करून हिंदुस्थानांत गेले. तों मार्गीं वडिलांची व चिरंजीवाची भेट जाहली. ती॥ राजश्री अण्णा देशास आले. सर्व सरंजाम मार्गाहून घरास रवाना करून दिला आणि आपण श्रीमंत मातुश्री बाई घोरपडी यांस भेटून निरोप घेऊन घरास यावें या निमित्त पुण्यास गेले. तों बाईमध्यें व कार्यभागी विसाजी नारायण व हरीराम यांमधें वैमनस्य आलें होतें. हे आलेले पाहून विजयादशमीचे दिवशीं यांस बाई म्हणूं लागली जे,

---

१ अनूबाई. २ जोशी हुपरीकर. ३ हेरवाडकर.

तुला दिवाणगिरीचीं वस्त्रें देविलें[1]. त्यास हे संग्रहणीचे वेथेकरून अशक्त जाले होते. त्यास ' माझे हातून न होय. मी घरास जातों. ' असें म्हटल्यास निरोप देईनाशी झाली. घरास न येतां कन्यागतीं श्रीमंत राजश्री दादासाहेब पेशवे यांचें लग्न गलगल्यावरी जालें ते वर्षी स्वारीसमागमें साहुनूरपर्यंत होते. तों बहुत अशक्त जाले असें पाहून यांस सरकारांतून मिश्रीकोट व कलघटगी वगैरे येथील मामलत पाल-खीचा सरंजामसुद्धां नेमणूक करून देऊन तेथें ठेविलें. घोरपडे यांची दिवाणगिरी विसाजीपंत व हरीपंत यांस सांगितली. हे मिश्रीकोट येथें चातुर्मास पर्जन्यकाळपर्यंत होते. तेथें संग्रहणीचे वेथेनें बहुत जेर जाले म्हणून मामलतीवरी ती॥ राजश्री गणेश बल्लाळ, आमचे आतेचे लेक, यांसीं ठेऊन आपण करवीरास आले. गोडबोले यांचेच घरीं होते. औषधी व देवी व मानवी उपाय करीत होते. तों कोणी सांगि-तलें कीं, पोंभुर्लेच्या वृत्तीच्या देवाचा उपद्रव आहे. यास्तव ती॥ राजश्री आपा कोकणांत गेले. तों मागें यांचा काल जाहला. समीप कोणीच नव्हतें. आमचे चुलत चुलते गोविंदपंतकाका तेथें राहत होते ते मात्र जवळ होते. त्यांणींच प्रथम दिवसापासून कार्य चालविलें. तों कोक-णांतून ती॥ राजश्री आपा व ती॥ राजश्री गोपाळराव आबा हिंदु-स्थानांतून उभयतां दशाहामधें आले. तों ती॥ राजश्री बाबूराव यांचे पोटीं पुत्र नाहीं, त्यांचें नक्कल, म्हणोन विसाजीपंत व हरीराम सर-कारांत गैरवाका समजावितील; आणि असामी चालणार नाहीं; यास्तव ती॥ गोपाळराव यांणींच सपिंडी देखील वर्षश्राद्ध करून गोपाळ बाबू-राव असें कागदीं पत्रीं लिहूं लागले. श्राद्ध पक्षही करीत होते. उपरांत माझा जन्म जाहला. हे मिश्रीकोट वगैरे मामलतीकडे सहकुटुंब

---

१ ' आमची दिवाणगिरी तुम्हांस पेशव्यांकडून देविलें. ' इंचलकरंजीकर घोर-पड्यांचे दिवाण त्या वेळीं पेशव्यांच्या नेमणुकीचे असत. २ निर्वंश.

होते. हें वर्तमान आमचे सौ॥ मातुश्रीस दखल आहे. या वर्तमानास साक्षीस कैलासवासी ती॥ मातुश्री आकाबाई पुरी माहीत व ती॥ सौ॥ आत्याबाई माहीत व हल्लीं सांप्रत तीर्थस्वरूप रा॥ महादेवभट तात्या गडबोले विद्यमान आहेत यांसी ही माहितगारी आहे. परंतु ते अशक्त जाले. त्यांस स्मरण असेल किंवा नसेल हें न कळे. ती॥ रा॥ अण्णानीं अंतकालसमयीं आपले बायकोच्या ह्या मोहोरा म्हणोन कांहीं मातुश्री आकाबाईजवळ ठेवण्यास दिल्या होत्या. त्या मोहोरा ती॥ रा॥ गोपाळराव आबा याणीं कलह करून मातुश्रीजवळून घेतल्या. आजतागायत आम्ही एकत्रच होतों. माझे जन्मास सव्वीस सत्तावीस वर्षें जालीं. त्यांतील स्मरण आमचे वडील ती॥ रा॥ आपा याणीं सोळा सतरा वर्षें संसार केला. उपरांत आज दहा अकरा वर्षें गोपाळराव आबा संसार करूं लागले त्यातागायत कजियेस प्रारंभ जाहला; तो आम्ही चित्तांत न आणितां आजवरी पाठीवरी टाकीतच आलों. गुदस्तां चिरंजीव सौ॥वती आवडीचें लग्न जाहलें ते समईं कजिया उत्पन्न करून मी पुण्यास जाण्याकरितां वे॥ दादंभट जोशी यांचे घरीं प्रस्थानास गेलों असतां तेथें रा॥ गोविंदपंत नातू यांजबरोबर निरोप सांगोन पाठविला कीं, ' तुम्ही आपले संसाराचा बंदोबस्त केलेविना निघोन जाल तरी तुमचे मातुश्रीची शपथ व वडिलांचे पायाची शफत असे. ' तेव्हां माघारे घरास आलों. ती॥ रा॥ महादाजीपंत दातार यांचीं दोन चार पत्रें आलीं कीं ' तुम्ही जाऊन घरीं कजिया सांगत बसलां. माझी पागा पुण्यांत आहे तीस धणी ना गोसावी. मीं जावें तरी माझेही शरीरीं स्वस्थ नाहीं. याजकरितां येत असलां जावयासीं तरी येणें, नाहीं तरी मी जाईन. अगर दुसरा कारकून पाठवितों. ' म्हणोन लिहिलें; तेव्हां मीं उत्तर पाठविलें कीं, दोन चार दिवसांत येतों तों वाट पहावी. नाहीं तरी मग कळेल त्याप्रमाणें करावें. तेव्हां चार

दिवस वाट पाहून आपलें घर बुडतें असें समजून तसेंच दुखणाईत निघोन गेले आणि आम्हांस निरोप पाठविला कीं, तुम्हीं यंदां न येणें. तेव्हां चालतें अन्न राहिलें. तों एके दिवशीं ( आम्हीं ) उभयतानीं उपोषणें केलीं. तेव्हां सिद्धांत ठरला कीं चौघे सांगतील तें ऐकावें. त्याप्रमाणें ती॥ राजश्री सदाशिवपंत नाना व त्यांचे चिरंजीव पंडितराव या उभयतांचे वि॥ ठरलें कीं, राजीनामे पंचांस देऊन कजिया विल्हे लाऊन घ्यावा. ते समयीं उभयपक्षीं मान्य पंचास होऊन राजीनामे देऊन मिरजेस बोलावूं पाठविलें. ते समयीं ती॥ राजश्री गोपाळराव याणीं मला हातीं धरून एकीकडे बसवून सांगितलें कीं, वडील असतां अशा गोष्टी घडूं नये. आणि जनविरुद्ध दिसतें. आणि माझे पोटीं पुत्र नाहीं तेव्हां मला वेगळें राहावें हें ठीक दिसत नाहीं. असें बोलून कष्टी होऊं लागले. तेव्हां मीं उत्तर केलें का, नित्य उठोन कटकट होती ती बरी नव्हे. तुमचे पोटीं पुत्र नाहीं तरी चिरंजीव राघोबा माझा मूल आहे तो तुम्हीं दत्तविधानें घेऊन खुशाल रहावें. तेसमयीं ( त्यानीं ) उत्तर केलें कीं, तोही मूल माझाच व तुम्हीही भाऊ माझेच व लेंकमित्र सर्व तुम्हीच आहां. तुम्हांवेगळें मला दुसरा कोण आहे ? असें कितेक प्रकारचें बोलणें बोलून बहुत कष्टी होऊन मला मायेंत गुंतवून ‘ आजपर्यंत चालत आलें त्याप्रमाणेंच पुढेंही वडीलांचा जीवात्मा आहे तो चालवूं. पुढें ऋणाणबंध !’ म्हणोन जाबसाल पूर्ववतप्रमाणें चालावें याप्रमाणें ठरवुन वेगळे व्हावयाचें राहविलें. वडील गोडबोलेचे घरीं रुसून जाऊन बसले होते. त्यांस हा मजकूर समजाविला नव्हता. तों एके दिवशीं वडील प्रातःकाळीं उठोन वासंब्याच्या देवळांत जाऊन बसले. हें वर्तमान उभयतां समजतांच गेलों. आणि वडिलांस विनंती केली कीं, आम्ही उभयतां समजलों. तुम्ही घरास चला. तेव्हां वडील

म्हणाले कीं, कसे समजलां तें मला सांगा. तेव्हां वडिलांनीं सांगितलें कीं, पेशजी चालत आलों त्याप्रमाणेंच पुढें चालावें. तेव्हां वडील म्हणाले कीं, ही गोष्ट खरी तरी देवाचा अंगारा उभयतांनीं लावून माझे हातावरी देणें. तेव्हां अंगारा उभयतांनीं देऊन वडिलांस घरीं घेऊन आलों. उपरांत चार दिवशीं कोठें तरी रोजगारास जावें, रिकामे घरीं बसून काल कसा चालेल, तेव्हां रोजगारास जावें, म्हणून पुण्यास निघोन गेलों. तों महादाजीपंतांची भेट घेतली. तेव्हां थोडासा आश्रय बोलण्यांत दृष्टीस पडला. तेव्हां तिथेंच राहिलों तो आजपर्यंत त्यांजवळच होतों. तों माझे मागें श्री॥ सौ॥ मातुश्री बाई यांसी आषाढ शु॥ एकादशीस कटकट करून दोन चुली केल्या. हें वर्तमान मी पुन्हां घरास आलों तेव्हां कळलें व दृष्टीस पडलें व सौ॥ मातुश्रीनींही सविस्तर कचें सांगितलें. उपरांत मी तासगांवास वडिलांचे भेटीस गेलों तेव्हां वडिलानीं कचें वर्तमान सांगितलें. तेव्हां उभयतांचें बोलणें बहुतेक प्रकारचें जाहलें. तेव्हां निश्चय कीं, झाल्या गोष्टी त्या उत्तम जाल्या. परंतु आतां चवघांस न कळतां तुम्ही पंच येऊन परस्परांस समजावून सांगावें म्हणजे मी ऐकेन. याप्रमाणें ठरावांत येऊन मीं निरोप घेतला. आणि इचलकरंजीहून आल्यावरी सूचना करावी म्हणजे मी येऊन जाबसाल करून टाकूं. तों पावतों तुम्हास जे लागेल तें दाणादुणा घेणें म्हणोन सांगितलें. त्याप्रमाणें मी इचलकरंजीस जाऊन आल्याउपरांत चिठी पाठविली कीं, मी आलों. तरी आपण यावें. आणि बंदोबस्त करून जावें. नाहीं तरी आम्हास कळेल तसें करूं. तेव्हां उत्तर आलें कीं, मी उद्यां येतों. तुमचे चित्तानुरूप गोष्टी होतील. तेव्हां दुसरे दिवशीं वाट पाहिली तों आले नाहींत आणि घरामध्यें बंदोबस्त किल्ली कुलुपें दारास घालून केला. एक दिवस माझी घोडी दाणेविना व वैरणीविना उपाशीं मेली. हें सर्व वर्तमान ठाऊक आहे.

## निजामअलीची भेट वगैरे.

ती॥ राजश्री गोपाळराव जरी संसार करीत होते तेव्हां त्याचा प्राहुणा त्यांणीं समजावा. अधिकउणा खर्च लागला तरी ज्याचा त्यांणीं करावा. अन्नाचा भंडारा मात्र एका जागां बरा वाईट होत होता. चिरगूट पांघरूण मोजलेलें वर्षाचे कांठीं एक दुसरें देत होते. याप्रमाणें वर्तणूक माझे स्मरणांत आहे व माझे जन्मापूर्वील कथा ती॥ सौ॥ मातुश्रीचे तोंडांतून ऐकिल्या व ती॥ मातुश्री ताईचे तोंडांतून व बाहेरून थोड्या थोडया लोक बोलत होते ते ध्यानांत आणून लिहिलें आहे. त्यांत एखादी चुकली असली तरी असेल. याजउपरी आम्हास माहीतगारी तिलभर नाहीं. आम्ही गर्भांध आहों. हे लिहून दिल्ही जबानी सही. तारीख छ० ५ सवाल भा॥ शु॥ ८ सोमवार शके १७०६ क्रोधीनाम संवत्सरे.

नं. २८०७. श्रीदुर्गा विजयातेतरां. ( २४ ऑगस्ट. )

करीणा बे॥ गोपाळराव दातार सु॥ खमस समानीन मय्या व अल्लफ.

आमची सौ॥ मातुश्री कैलासवासी होतेसमयीं आमची आत सौ॥ जिऊबाई यांचे स्वाधीन आम्हांस व आमची बहीण वडील साळूबाई या दोघांस करून उपरांतीक आमचे मातुश्रीनें प्राण सोडिला. ते समयीं आम्ही तीन वर्षांचे होतों. आमचे मातुश्रीचें उत्तरकार्य आमच्या तीर्थरूपानीं आपानींच केलें. उपरांतीक आमची आत कैलासवासी सौ॥ जिऊबाई आम्हां दोघां बहीण भावांस घेऊन कोल्हापुरास आली. उपरांतीक आमचे तीर्थरूपानीं दुसरा संबंध करावयाचा उद्योग करून करवीरास उभयतां बंधु आले. आमचे आतेस व सर्वांस समागमें

१ म्हणजे जबानींतल्या कांहीं गोष्टी आम्हांस प्रत्यक्ष माहीत नाहीत. कारण कीं त्या आमचें जन्म होण्यापूर्वी घडलेल्या आहेत.

घेऊन अणस्कुऱ्यास लग्नास चालिले. ते समयीं आमची आत आम्हां दोघां बहीण भावांस घेऊन समागमें लग्नास गेली. वेदशास्त्रसंपन्न नारायणभट्ट गाडगीळ यांची कन्या आमचे तीर्थरूपानीं करून घेतली. लग्न करून येतेसमयीं आमचे मातामह वेदसंपन्न कृष्णंभट रानडे राजापूरकर यांचे घरास आले. तेथें आम्हां दोघांस ठेऊन घेऊं लागले. ते समयीं आमची बहीण साळूबाई राजापुरास राहिली. आपण आतेसमागमें अवघें लग्न आलें त्याजबरोबर करवीरास आलों. उपरांतीक आमचा व्रतबंध तासगांवीं आणून केला. त्याजवरी आमची आत आम्हांस घेऊन करवीरास आली. त्याजउपरी आमचे तीर्थरूप व आमचे पितृव्य बाबूराव उभयतां मिळून चव्हाण व शिंदे यांजसमागमें तासगांवींच होते. त्याजवरी कांहीं दिवसानीं आमचे तीर्थरूपानीं द्वितीय संबंध यमुनाबाई केली होती तिजला अतिसाराची व्यथा करवीरीं लागून देवआज्ञा जाहली. तिचें उत्तरकार्य करावें याकरितां आमचे पितृव्य ती॥ बाबूराव करवीरास आले. तों आम्ही लहान म्हणोन आम्हांस साक्षीभूत ठेऊन उत्तरकार्य बाबूराव यानीं केलें. याजउपरी तासगांवास गेले. त्यानंतर तासगांवींच होते. उपरांत तृतीय संबंध करावयाची योजना करून आमचे तीर्थरूप करवीरास आले. आमचे तीर्थरूप व तीर्थस्वरूप रा॥ महादेवभट तात्या उभयतां जाऊन रामभट तिवरेकर—कृषीवितरिक्त अन्य व्यवहार ते जाणतच नव्हते—त्यांची कन्या तीर्थरूप सौ॥ मातुश्री कमलजाबाई केली. उपरांतीक आमचे तीर्थरूप उभयतां बंधु चव्हाण व शिंदे तासगांव श्रीमंत पंतप्रधान यानीं घेतल्यावर मोगलाईंत गेले त्यांजबरोबर हेही उभयतां गेले. आमची बहीण व आम्ही आतेच्या घरीं होतों. व तीर्थरूप सौ॥ मातुश्री कमळजाबाई आपल्या बापाचे घरीं होती. आल्या गेल्याच्या हातून सांगावे आमच्या आतेस येत असत जे, ' आम्हीं किती दिवस पोसावी ? आपली भाव-

जईस घेऊन जाणें. ' त्यास आमचे आतेनें तिजला आणिली नाहीं. तशीच ती॥ मातुश्री ताईही पोंभुर्ल्यास माहेरींच होती. परंतु त्यानीं कांहीं निरोप-न्यावयाविशीं आमचे आतेस पाठविले नाहींत. याजउपरी आम्ही दहा अकरा वर्षांचे जाहलों तों वधू सांगून येऊं लागल्या. आमच्या आतेनें उभयतां तीर्थरूपांस चितापुरास कागदपत्र पाठविले. त्यावरून आमचे पितृव्य ती॥ बाबूराव[1] करवीरास येऊन पृथक् घर कडेकराचें भाडेनें केलें. मग आम्हांस आमचे आतेपासून मागून घरास घेऊन गेले. पुढें आमचे तीर्थरूपही मागून पिराजी चव्हाणाकडे होते तेही घरास आले. पुढें आमचे तीर्थरूप कोंकणांत जाऊन आमचे चुलत चुलते ती॥ गोविंदपंत व ती॥ सौ॥ मातुश्री कमलजाबाई व त्यांची आत चिमाबाई म्हणून होती त्यांसही समागमें घेऊन आले. पुढें आमचें लग्न जाहलें. उभयतां बंधु एकत्रच करवीरीं होते. आमचे तीर्थरूप मनेराजुरीस होते. राव कांहीं दिवस श्रीमंत त्रिंबकपंते[2] आपाकडे व घोरपड्यांकडे[3] होते. पुढें ती॥ सौ॥ कमलजाबाईस रजोदर्शन प्राप्त जाहलें. गर्भाधान करवीरींच जाहलें. उपरांतीक तीर्थरूप सौ॥ मातुश्रीस करवीराहून मनेराजुरीस घेऊन गेले. आम्ही सर्वत्र करवीरींच होतों. राव हिंदुस्थानांत शिंद्यांकडे गेले. त्यापासून गोपाळराव बर्वे याजबरोबर काशी प्रांतीं गेले. आम्ही करवीरींच घरीं लिहून होतों. त्याजवरी कांहीं दिवसानीं आम्ही मनेराजुरीस गेलों. घरचा खर्चवेंच झाडून ती॥ रा॥ सदाशिवपंत नाना चालवीत होते. आम्ही मनेराजुरींत तीर्थरूपांपाशीं कांहीं दिवस होतों. त्याजउपरी भीमराव जिवाजी व वडील उभयतां मिळून पुण्यास जाऊं लागले, ते समयीं आम्हांस घरीं मनेराजुरींत ठेऊन गेले. त्यांच्यामागें आम्ही मिरजप्रांतीं स्वारी

---

१ जबानी लिहून देणाऱ्याचे चुलते बाबूराव. २ त्र्यंबक हरि पटवर्धन कुरुंदवाडकर. ३ व्यंकटराव नारायण घोरपडे इचलकरंजीकर.

शिकारी करीत होतों. व जमावसुद्धां येऊन कवठें एकंद हें ठाणेंही घेतलें. उपरांत श्रीमंत[1] नारायणराव तात्या व त्यांसमागमें आमचे तीर्थरूपही आले. आमचे वडिलांस देशमुखीची मामलत सांगितली. कवठें त्रिंबकराव तुकदेव यांजकडे दिल्हें. आम्हास वडिलानीं मिरजेंत नेऊन देशमुखीवगैरे भीमराव जिवाजी याचे घरीं नेऊन ठेविलें. सहा चार महिन्यानीं देशमुखीची मामलत भिकाजी नरहर यांजकडे जाहली. आम्ही घरीं मनेराजुरीस होतों. तों श्रीमंत पंतप्रधान व भाऊसाहेब मिरज घ्यावयासीं आले. त्यांजबरोबर मातुश्री बाईही होती. आमचे तीर्थरूपानीं आम्हांस घोडीं माणसें देऊन लष्करास बाईकडे पाठविलें. बाईपाशींच लष्करांत आम्ही होतों. आम्हीं बाईस धंद्याविशीं विनंती केली. इचलकरंजीस आलियावरी येणें म्हणून आज्ञा केली. त्याजवरी इचलकरंजीस गेलों. वडील व सौ॥ मातुश्री मनेराजुरींत होतीं व तीं॥ मातुश्री ताई व भीमा करवीरींच होतीं. आम्ही इचलकरंजीस होतों तों हिंदुस्थानांतून गोपाळराव बर्वे पुण्यास आले. त्यांनीं तीर्थरूपांस पत्रें पाठविलीं जे, ' फिरून आम्ही हिंदुस्थानांत जाणार; गोपाळरावास पाठवून देणें. ' त्याजवरून तीर्थरूपानीं आम्हांस सरंजाम घोडीं माणसें भावजी गुंड यास समागमें देऊन आग्रापा व सुभानराव पवार यांचे सोबतीनें पुण्यास पाठवून दिलें. ती॥ राव काशी प्रांतीं राहिले. जिवाजी घोडीं पिडीं घेऊन मनेराजुरीस आला होता. आम्हीं पुण्यास जाऊन गोपाळराव यांचीं भेट घेऊन त्यानीं नालबंदीचा ऐवज दिला तो घेऊन मनेराजुरीस आलों. तीर्थरूपांस सर्व मजकूर निवेदन केला व ऐवजही आणिला होता तो वडिलांस निवेदन केला. लोकांस नालबंदी देऊन तयारी केली. आम्ही कोल्हापुरास गेलों. ताईस मनेराजुरीस घेऊन

---

१ नारायणराव घोरपडे. २ अनूबाई घोरपडे इचलकरंजीकर.

## निजामअलीची भेट वगैरे.

येणार हातों तीं आलीं नाहींत. त्याजउपरी आम्ही मनेराजुरीस आलों. पुढें महिन्या दोन महिन्यानीं आम्हांस तीर्थरूपानीं सरंजाम करून देऊन हिंदुस्थानांत पाठविलें. आम्ही गोपाळरायांस जाऊन आहीरवाड्यांत गढ्यांवरी जाऊन मिळालों. पुष्कर प्रांतीं व जयनगर प्रांताकडून लष्कर फिरत ग्वालेरीस येऊन छावणीस राहिलों. तों ती॥ रावही अयोध्येहून तेथें आले. आम्हास शीतज्वराचा उपद्रव जाहला होता. ती॥ राव तेथें महिना दोन महिने राहून आम्हास औषध उपाय करून बरें केलें. आम्हास बरोबर देशास आणूं लागले. ते समयीं मी येत नाहीं म्हणून सांगितल्यावरी गोपाळराव यांचे हातीं आम्हांस देऊन आपण देशास निघून आले. आम्ही गोपाळराव यांबरोबर अंतर्वेदींत कोरा जाहानाबादेस होतों. तेथें कुसुंब करालीवरी रामापतबुंदेला याज समागमें आम्हास त्यास लढाई जाहली. युद्धांत त्यास मोडून नौबत निशाण पाडाव करून आणिलें. ती॥ राव देशास आलियावरी नारायणराव तात्यांची दिवाणगिरी त्यांस सांगितली होती. त्यांचे शरीरीं अतिसाराची व्यथा प्राप्त जाहली म्हणून श्रीमंतानीं मिश्रीकोटची मामलत सांगून मिश्रीकोटास ठेविले होते. शरीर बहुत क्षीण जाहलें म्हणून आमचे तीर्थरूप मिश्रीकोटास जाऊन त्यांस घेऊन करवीरास आले, आणि आपण कोकणांत श्रीदेवास गेले, म्हणून परभारें कागदींपत्रीं आम्ही ऐकत होतों. तों गोपाळरावही हिंदुस्थानांतून पुण्यास आले. आम्ही समागमें आलों. तों ती॥ राव यांचीं बहुतच समाधान नाहीं म्हणून ऐकून गोपाळराव याजपाशीं निरोप मागितला. त्यानीं खर्चास तीनशें रुपये दिले ते घेऊन करवीरास आलों. तो पंचनदीवरी सर्वेश्वरापाशीं ती॥ गोविंदपंतांस पाहिलें, तोंच आमचे चित्तीं संशय प्राप्त जाहला.

---

१ घोरपडे इचलकरंजीकर. २ पंचगंगेवर.

## किरकोळ बाबी.

नदीवरून स्नान करून घरास आलों तों तीर्थरूपही कोकणांतून शरीरीं ज्वरसहित तेच दिवशीं करवीरीं घरास आले. ती॥ गोविंदपंतानीं नऊ दिवस उत्तर कार्य केलें. पुढें थंडीचे दिवस, त्यांचे हातून कापरें शरीर याजमुळें कर्म होईनासारिखें जाहलें, तेव्हां वडिलांचे हातून करवावें तरी शरीरीं ज्वर येतो, ते समयीं गोविंद दीक्षित आपस्तंभ व ती॥ रा॥ तात्या गडबोले यानीं विचार केला जे, 'याची मातुश्री वारली आहे तेव्हां अर्धा अधिकार यासीं जाहला आहे. याचे हातून पुढें कर्म करावें.' त्याजवरून पुढें उर्वरित कर्म आमच्या हातून करविलें. उपरांतीक आम्ही इचलकरंजीस आलों. मातुश्री बाईनीं व नारायणराव यानीं सांगितलें जे, 'तुम्हीं हिंदुस्थानांत न जाणें. मिश्रीकोटाची मामलत करणें.' त्याजवर आम्ही मनेराजुरीस आलों. हिंदुस्तानांत पथक पाठवावें त्यास नालबंदी ऐवज नाहीं. तीर्थरूपानीं शिवाजीपंत बावांपासून पांच हजार रुपये कर्ज काढून लोकांस नालबंदी देऊन जिवाजी व सावजीपंत कारकून बरोबर देऊन ( पथक ) हिंदुस्थानांत पाठवून दिलें. आम्ही मिश्रीकोटास गेलों. तेथें गणेशपंत—आमचे वडील आतेचे लेक—होते त्यानीं फिरून गोष्टी सांगितली. त्यांस इचलकरंजीहून मैसाला करून आणून मामलत आमचे स्वाधीन केली व हिशेबाचा रुमालही|आमचे स्वाधीन केला. उपरांत आम्ही हिशेब वारावयाकरितां झाडून तालुक्याचे कारकून एक वरीषपावेतों श्रीमंतांसमागमें फिरलों. नाशीक त्रिंबकचे मुक्कामीं आम्हास श्रीमंतांस नेऊन भेटविलें. श्रीमंतानीं सांगितलें जे, बाबूरायाचें कोणी असल्यास मामलत सांगूं. नाहीं तरी दुसऱ्यास सांगूं. त्याजवरून नारायणराव तात्यानीं बाबूराव यांचा लेक म्हणून आम्हांस भेटवून मामलतीच्या सनदा आमच्या

—१ अनूबाईनीं. २ मिरजेचे मामलेदार शिवाजी बल्लाळ जोशी. ३ लबाडी केली. बेइमानी केली. ४ नानासाहेब पेशव्यांबरोबर.

नांवें गोपाळ बाबूराव म्हणून करून घेतल्या. त्या दिवसापासून गोपाळ बाबूराव म्हणून कागदींपत्रीं लिहूं लागलों. ते समयीं आमचे ती॥ सौ॥ कमलजाबाईस एक कन्या चिरंजीव सौ॥ बयाबाई मात्र जाहली होती. सौ॥ बयाबाईच्या लग्नास आम्हीं कापड व नक्त ऐवज पाठविला तो तीर्थरूपांस व सर्वांस विदित आहे. आम्ही मामलती करीत होतों ते समयीं ती॥ सौ॥ मातुश्रीस लुगडीं चोळ्या वगैरे जें अनुकूल पडलें तें पाठवीतच होतों. वडिलांसही ते समयीं धंदावंदा चांगलाच होता. शिवाजीपंत बावा उत्तम प्रकारें चालवीत होते. त्याजवरी बयाजी गोपाळास आम्हीं बेवीस हजार रुपये कर्ज दिलें. त्याजवरी दुसरें वर्षीं गोपाळराव बर्वे यांसीं कर्नाटक प्रांतींचा सरंजाम श्रीमंतानीं दिला. गोपाळराव यानीं आमचे नांवें कमाविशीच्या सनदा करून पाठविल्या. ते समयीं आम्हास चातुर्थिक ज्वर लागला होता. आमचे समाचारास तीर्थरूपही आले होते. तेव्हां आम्ही बर्व्यांकडे जाईनासारखे जाहलों. तेव्हां तीर्थरूपानीं व वरकड कारकून मंडळीनीं अतिशय आग्रह करून आम्हास बाहीर काढिलें. त्यांनीं कांहीं कापड व नक्त ऐवज घेऊन येणें म्हणून लिहिलें होतें त्यावरून आमचे नांवचीं खतें लिहून घेऊन तीर्थरूपानीं रामाजी मंगेश वगैरे यांजकडून कर्ज आणिलें व करवीर सेटी डुबलीकर यांजकडून कापड घेऊन आले. आणि आम्हांस समागमें घेऊन बर्व्यांच्या लष्करास यादवाडचे मुक्कामा आले. कापड व नक्त ऐवज कृष्णराव बर्वे यांसीं दिला. तीर्थरूप कृष्णराव यांजपाशीं राहिले. आम्ही श्री कृष्णास्नानास सती संवदत्तीस आलों. स्नान करून आम्ही गोकाकेस परभारें ती॥ रा॥ सदाशिवपंत नानाचे घरास आला. तों तीर्थरूपही लष्कराहून बर्व्यांकडून ( रुसून ) गोकाकेस आले. तों बर्व्यांचे पत्र मागाहून आलें जे, 'तुम्ही तिकडेच राहिलां व

१ बर्व्यांनीं.

आपाही रुसून गेले.' त्याजवरी पांच सात पत्रें त्यांचीं आलीयावरी दुखणेकरी आम्ही तसेच त्यांजकडे गेलों. वडील गोकाकेहून निघोन घरास आले. आम्ही त्यांजबरोबर दुखणेकरी तसेच मुळगुंद वगैरे प्रांतीं फिरून कागलचे मुक्कामीं नरसिंगरायांसी येऊन भेटलों. कृष्णराव यासीं शिलेदारानीं पुढें घालून घरास घेऊन गेले. आम्ही दुखणेकरी करवीरास आलों. तेथें पांच चार महिने होतों. तों हैदराचा दंगा आहला. मिश्रीकोटची मामलत गेली. वडील मामलतींत होते ते निघोन घरास आले. पुढें आम्ही बव्यांसमागमें आमदाबाजेस गेलों. घरचीं घोडीं जिवाजी सरंजामसुद्धां मागाहून घेऊन गेला. 'घरीं चिरंजीव बळवंतरायाचा व्रतबंध करणें आहे. कांहीं खर्चास पाठविणें' म्हणून तीर्थरूपानीं शीतल ब्राह्मण घरीं होता तो पाठविला. त्याजवरून चिरंजीव माणीकरायाबरोबर दोन हजार रुपयांची हुंडी वडिलांकडे पाठवून दिली व आम्हीं अमदाबादेस होतों ते समयीं मुलास इलाचे (!) व तीं॥ सौ॥ मातुश्रीस पाटाव चोळखण व तीं॥ ताईस सोवळें व वडिलांस जरीकिनारीचें सोवळें व मसरू धोतरजोडे पाठवीतच होतों. त्याजवरी बवीसशें रुपयांची हुंडी पाठविली होती. घोडीं घेऊन जिवाजी घरास आला ते समयीं पुतळ्या नक्त ऐवज आणिला होता तो सर्वांस दखल आहे. त्याअलीकडे मिश्रीकोटची मामलत केली ते समयीं दुसरें लग्न केलें. ते समयीं आमचा त्यांचा करार जे धाकट्या मेहुण्याचें लग्न करावें अगर लग्नास रुपये लागतील ते द्यावे; ते आम्हीं हा कालपावेतों दिले नाहात. मामलत गेलियावरी आम्ही पुण्यास हिशेबाकरितां गेलों होतों तेथें घरीं घोडीं उंट उपवाशी मरतात म्हणून ऐकिलें त्याजवरून थोरले बाइकोची सरी माहेरची शेराची होती ती दिली व दीडशें रुपयच्या साखळ्या दिल्या. त्याअलीकडे आज दहा पंधरा वर्षे वडि-

---

१ पटवर्धनांचा सरदार नरसिंगराव हदव.

लांचे पायांशीं वंचितार्थ न करितां संसार करीत आलों. इतक्या दिव-सांत चिरंजीव बळवंतरायानीं नक्त रुपये पाउणशें व एक धोतरजोडा आम्हांस दिला आहे. चिरंजीव गणपतरायाचे सवाशें रुपये आम्हांस पावले आहेत. आम्हीं संसारकृत्य करून थोडें बहुत लग्न मुंजीस व कर्जदारांसही दिलें आहे. आमचे ती॥ व ती॥ आमचे पितृव्य वेगळे होते हे आम्हास दखल नाहीं. व आम्हास दत्तविधान करून कोणास दिलें हे आपणास दखल नाहीं. आजपावेतों वडिलांची सेवावृत्ति करून त्यांचेच आज्ञेनुरूप वर्तणूक करीत आलों, पुढें ती॥ ज्या मार्गानें जावयासी सांगतील त्या मार्गानें जाऊं. वडिलांचे आज्ञेशिवाय आम्हांस वर्तणूक करावयाची नाहीं. चिरंजीव बळवंतरायाचें पहिलें लग्न जालें ते समयीं ती॥ रा॥ सदाशिवपंत नाना यांपासीं आमच्या निसबतचा ऐवज होता हजार रुपये ते वडिलानीं आणिले. त्यापै॥ पांचशें दिले. पांचशें बाकी देणें आहेत. सदरहू लिहिल्याप्रमाणें खरें करून देऊं. छ० ७ सवाल. भाद्रपद शुद्ध ८ क्रोधी नाम संवत्सरे.

नं. २८०९. श्रीगणपति. (भाद्र० व० ५–४ सप्तंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १८ सवाल पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. लक्ष्मणजी साळोंखे याची घोडी मौजे अंकोलें पा॥ सांगोलें येथून चोरीस गेली. त्याचा माग गांवोगांव निघत मौजे घोरपडी प्रांत मिरज येथें आला असतां गांवकरानीं पदरीं घेऊन माग पुढें काढावा तें न करितां धटाईच्या गोष्टी सांगतात. येविशीं त्यांस ताकीद जाली पाहिजे म्हणोन साळोंखे याणीं विदित केलें. ऐसीयास सदरहूची वाजवी चौकशी करून घोरपडी येथील गांवकरानीं माग आला असतां पदरीं घेतला नसल्यास त्यांस निक्षून ताकीद करून घोडीचा माग पुढ काढन देवावा. नसल्यास घोडीचा

फडशा करून देवावा. साळोखे याजविशीं राजश्री हरीपंत तात्या यांणीं पेशजी लष्करांत फार प्रकारें सांगितलें आहे. याजकरितां आपणास लिहिलें असे. तर यांजवर कृपा करून वाजवी असेल तें करावें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २६ सवाल. सन खमस समानीन. भाद्रपद.

नं. २८०२. श्री. ( २१ सप्तंबर. )

पैवस्ती छ० १५ जिल्काद. सन खमस समानीन. आश्विनमास.

सेवेसीं बापूजी बल्लाळ जोशी. साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागायत आश्विन शु॥ १३ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांची स्त्री प्रसूत जाहली. पुत्र जाहला. सात दिवस होती. उपरांतीक उन्मत्त वायु होऊन आश्विन शु॥ ७ भौमवारीं देवाज्ञा जाहली. ईश्वरें वाईट केलें. पुत्र सुखरूप आहे. कळावें. नाना फार श्रमी होत आहेत. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २८०३. श्री. (आश्विन व० ११–१० अक्टो०)

पै॥ छ० २ जिल्हेज. सन खमस समानीन.

तीर्थस्वरूप राजश्री रघुनाथरावदादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें शिवराम रघुनाथ. सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २४ जिल्काद जाणून स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. तेथें लिहिलें कीं, " आम्ही आपले बागांत बंगला बांधणार आहों. याजकरितां मुकुंद-

---

१ पत्र पुण्याहून गंगाधरराव यांस मिरजेस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस शिवरामपंत खासगीवाले यांचें पुण्याहून पत्र.

राम सुतार पाठविला आहे. तरी सरकारचे वसंतबागेंतील व हिराबागेंतील वगैरे बंगले दाखवावे, म्हणजे नकाशा करून घेऊन येईल." म्हणोन लिहिलें; त्यास लिहिल्याप्रमाणें सरकारचे बागांतील बंगले व राजश्री नाना फडनवीस यांचे बागेंतील दिवाणखाना सुतारमजकूर यास दाखविला आहे, व आम्हींही बंगल्याचा नकाशा पसंत करून दिला आहे तो आपणास दाखवील. पसंत पडल्यास उत्तम, नाहीं तरी सुतार मजकूर आपणास समजावील त्याप्रमाणें करावें.....

........."राजश्री नानांची स्त्री देवाधीन जाहली. राजश्री मुकुंद जोशी यानीं सांगितलें काय आणि जाहलें काय ! याचा पक्का शोध करून लिहावें," म्हणोन लिहिलें; त्यास वेदमूर्तीनीं नानांजवळ चिठी अगोदरच लिहून दिली होती. ती चिठी नानांची स्त्री प्रसूत जाहली-यानंतर दुसरे दिवशीं राजश्री हरीपंत तात्या व आपा वगैरे मातबर दहा पांच असामी बसले होते त्यांचे समक्ष चिठी फोडून वाचून पाहिली. चिठीमध्यें प्रसूतिसमयीं जवळ बायका किती असाव्या, त्यांत सुवासिनी किती व विधवा किती, ब्राह्मणज्ञातीय किती, व शूद्रज्ञातीय किती, त्यांचे घरीं ( ? ) धन वस्त्राचे रंग कोणते, जवळ दीप किती, सूतीचें तोंड कोणत्या दिशेस, पोट किती वेळपर्यंत दुखावें, इत्यादि करून तिथीवार नक्षत्र लग्न चिठींत लिहून दिलें होतें. त्याप्रमाणें एकेही गोष्टीचें अंतर न पडतां मिळोन यजमानांची मर्जी वेदमूर्तीवर बहुत प्रसन्न आहे. प्रसूत जाहली त्यानंतर दहा दिवसांची चिठी वेगळी लिहून दिली, त्यांत हा योग लिहून दिला आहे. व आम्हापाशीं व चिरंजीवापाशीं व रघुनाथपंत गद्रे व माधवराव जाधवराव यांजवळ सातवे दिवशीं असें घडेल म्हणून स्वच्छ सांगितलें होतें.

---

१ आपा बळवंत मेहेंदळे, नाना फडनविसांचा मामेभाऊ. २ नाना फडनवीस यांच्या स्त्रियेचा मृत्यूचा योग.

## किरकोळ बावी.

जोशानीं भवितव्य यथास्थित सांगावें. आयुष्याचें दातृत्व त्यांजपाशीं नाहीं. त्यानीं लिहून दिलें त्यांत घटका पळ देखील चुकलें नाहीं यामुळें यजमानांची वाहवा तो पहिल्याहून अधिक आहे. चिठीची नक्कलही हातास आलियास मागाहून पाठवून देऊं. समारंभ फार चांगला जाहला होता, परंतु ईश्वरी सत्तेस उपाय कोणाचा आहे ! अर्भक स्वस्थ आहे. काल पाळण्यांत घातलें. नांव 'जनार्दन' ठेविलें. आपणास कळावें म्हणून लिहिलें आहे.........बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० २ जिल्हेज सन खमास समानीन.

नं. ३८०४. श्री. ( २२ अक्टोबर. )

पैवस्ती छ० ११ जिल्हेज. कार्तिकमास. सन खमस समानीन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक बाळाजी केशव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत कार्तिक शु॥ ९ मुक्काम करकंब स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. नरसोपंत श्री तुळजापुरीं जमाव करीत आहे म्हणोन विनंती सेवेसीं लिहिली होती. त्याजकडे बातमीस माणसें पाठविलीं होतीं तीं काल आलीं. राजश्री गोविंदराव कृष्ण पागा हुजूर हे श्रीचे यात्रेस गेले होते त्यांची गांठ तेथें पडली. त्यानीं त्यास तेथें कैद करून घेऊन आले. मोठेंसें खूळ मोडलें ! याप्रमाणें वर्तमान असे. तुळजापुरीं निंबाळकराकडील राजश्री कल्याणराव कवडे वासीकर याच्या संमतें जमाव करीत होता. अनायासें राजश्री गोविंदराव कृष्ण यात्रेस गेले; त्यांस वर्तमान कळलें, त्याणीं आसपासचें दोनशें माणूस मेळविलें आणि धरिला. गोविंद्रायानें जमाव केला ते लोक कोणी

टिकोन राहिले नाहीं. त्याजला धरितांच निघोन गेले. गोविंदराव कृष्ण याजकडे सहा घोडीं व उंट एक सांपडला. राऊत प्यादे पाठवावे म्हणून विनंती लिहिली होती, ( परंतु ) हें वर्तमान काल जासूद आले त्यावरून विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८०५. श्री. ( ३ नोवेंबर. )

पैवस्ती. छ० २२ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिकमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामींचे सेवेसीं.

पोष्य कोळो बहिरव. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील क्षेम तागायत कार्तिक वद्य षष्ठी जाणोन स्वकीय लिहीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र न येतां चित्त सापेक्षितसमयीं मुजरद जासूद जोडीबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. बहुत संतोष पावलों. इकडील वर्तमान तरी चार सहा महिनेपासून धारवाडकर गंगाराम रिसालदार पांचशें स्वार, दोन हजार पायदळ, दोन तोफांसुद्धां नवलगुंदीं उतरोन शिलशिला लाविला. इकडील फौजही आसपास खेडयांस असतां एकाएकीं स्वारी इकडील खेडयांवर करून गुरें नेलीं. सर्वेच तिसरे दिवशीं हेबाळ म्हणून ठाणेचा गांव तेथें येऊन तोफा लावून हल्ला केला. तेव्हां गांवांत लोक सरंजाम चांगला होता. तेव्हां गांवकरानीं हल्ला मारून काढिली. मुडदे टाकून निघोन नवलगुंदास गेले. येथील उपराळा गेला तों निघून गेले. तिसरे रोजीं मागती हेबाळाकडे येऊन कटकट फारच आरंभिली. तेव्हां उपाय नाहीं, उगेच राहिल्या खेडीं जातातसें समजून हेबाळाजवळ दोन तीन खेडीं लगतीं होतीं त्यांस आम्ही ठाणीं घातलीं. मागती चालून आले.

१ पत्र नरगुंदाहून मिरजेस.

गोळागोळी नित्य होतच होती. इलीकडे ( आम्हीं ) फौज पाठवून पेठ घेतली. गांवांत दाणादुणा काढून ऐवज कांहीं तरी शिबंदीस करावा म्हणून फौज राहिली. तें आयकोन धारवाडकर चालून आले. झुज इकडील फौजेस व त्यांस जाहलें. सौंदत्तीपलीकडे गांठ पडली. फौज इकडील त्यांचे फौजेस पाठीस लागून तीन कोस गेले. त्यांचीं घोडीं पाडून घेतलीं. धडधडीत राऊत घोडे निघोन गेले. प्यादे सडे पांच सातशें आणिले होते त्याणीं ते सांपडले. इकडील मुरारजी भोसले ठार जाहले. प्यादे मारले. ( प्याद्यांनीं ) हत्यारें टाकिलीं. सारीं हत्यारें घेतलीं. प्यादे सोडले. फौज फिरोन माघारी इलीस आली. यांप्रमाणें जाहलें. नंतर पट्टणाकडील राणोजी पोवार म्हणून तीनशें स्वारसुद्धां आले. गंगाराम व मशारनिल्हे एकत्र होऊन बेटगिरीस आले. इलीकडेही चाल करावी म्हणून एकोडीस येऊन एक दोन रोज राहिले होते. तेथून बेटगिरीस माघारे गेले. धारवाड तालुक्याचा हिशेब घेणेंस दरोगा धारवाडास आला आहे त्याणें गंगाराम यास हिशेबाकरितां धारवाडास नेलें. राणोजी पोवार फौजेंत आहे. त्यानंतर घोरपडेचें एक पथक आलें आहे. जमाव वरचेवर मिळतो. खुद्द टिपू पट्टणांत आहे. चित्रदुर्गास चार हजार फौज बार तोफांसुद्धां आले आहेत. इकडे येणारसे वर्तमान. सरकारच्या फौजा आल्यानें आमचा बचाव होईल. श्रीविना आधार नाहीं. हजार दोन हजार स्वार चाकरीचे तरी पाठवावे. पोट भरून राहतील. इभ्रत पडेल. पोटापुरती बेगमी आम्ही करवूं. स्वार इकडे अगत्य पाठवावे. श्रीमंत राजश्री पंतप्रधान नाशिकास जाणार, श्रीमंत मातुश्री[1] महायात्रेस जाणार, म्हणून लिहिलें कळलें. मातुश्री काशीबाई काकी टोंक्यास गेला तें

१ पेशव्यांची आजी गोपिकाबाई.

कळलें. येथील यात्रा यंदा राहिली. कळावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करावा हे विनंती.

नं. २८०६. श्री. ( कार्तिक व० ६—३ नोवेंबर.)

पैवस्ती छ० १९ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिकमास.

छत्रपति.

राजश्री बळवंतरावबाबा गोसावी यांसीं.

अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित सटवाजीराव भोसले. दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन सविस्तर कळत नाहीं, तर ऐसें न करितां सदैव पत्रीं संतोषवीत असावें. यानंतर आम्ही येथून श्रीमन्महाराज राजश्री स्वामीची आज्ञा घेतली, देशास जाणार, येविसीं राजश्री परशुरामपंतभाऊ यानीं दस्तक व जासूद जोडी पाठविली आहे. त्यास पेशजीही दरम्यान इमान प्रमाण बेलभंडार देऊन घेऊन गेले आणि त्याची फलश्रुति सत्वरच घडविली ! बरें ! जें जाहलें तें आमचे दैवेंकडून घडलें. हल्लीं आपण थोर सरदार आहेत. आपलें खातरजमेचें पत्र आलेस आपले वचनावर आम्ही बेफिकीर कूच करून जातों. जासूदजोडी आपणाकडे रवाना केली आहे यांची खातरजमा करून आपलें वचन व उत्तरें निखालसपणें आलियावर आम्ही कूच करून सुरळीत मार्गें निघोन जातों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८०७. श्रीगणपति. (कार्तिक व० ७—४ नोवेंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २० जिल्हेज पावेतों

---

१ मिरजेस गंगाधरराव बाळासाहेब यांस पत्र.

## सटवोजी भोंसल्याचें प्रयाण.

वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री सटवाजी भोसले याचें पत्र आपणास आल्याचा मजकूर व 'त्याचें उत्तर काय द्यावें ते आज्ञा करावी;' म्हणोन लिहिलें, ऐशीयास त्याचे पत्राचें उत्तर 'खातरजमेनें जाणें' म्हणोन लिहून द्यावें. 'राजवाडे याचें पारिपत्य करणें, त्यापक्षीं सामान किती पाहिजे'? म्हणोन लिहिलें, त्यास किमानपक्ष पांचशें स्वार व तोफा दोन व पायचें माणूस पांच सहाशें पाठवावें लागेल. एक हजार स्वार व पायदळ तोफा येणेंप्रमाणें सामान पाहिजे, त्याची तरतूद करावी. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २० जिल्हेज. सन खमस समानीन कार्तिक.

नं. २८०८. **श्रीगणपति.** (कार्तिक व० ११–८नोवेंबर.)

पैवस्ती छ० २५ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिकमास.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. उदईक प्रातःकाळीं भोजन करून (आम्ही) उपळाईस धरण पहावयाकरितां जाणार, त्यास आपणही भोजन करून तेथें यावें. राजश्री सटवाजी भोसले करवीराहून आज आंधळी बेलवडीचे मुकामास आले आहेत. पुढें जातील. आपणास कळावें म्हणून लिहिलें असे. रवाना छ० २४ जिल्हेज. इंदुवार. प्रथम प्रहर रात्र. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. २८०९. **श्रीगणराज.** (कार्तिक व० ३०–१२नोवेंबर.)

पैवस्ती छ० २८ जिल्हेज. सन खमस समानीन. कार्तिक.

अपत्यें रघुनाथानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलांकडून तसबिरा पहावयास आणिल्या बि॥

---

१ कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

## निजामअल्लीची भेट वगैरे.

१ विष्णुपंचायतन. १ शाहू राजे यांची शिकारी.
१ श्री राधाकृष्ण. १ संभाजी राजे यांची.

---

४

चार तसबिरा पाहून सेवेसीं पाठविल्या आहेत. पावलीयाचें उत्तर पाठवावया आज्ञा व्हावी. रवाना छ० २८ जिल्हेज. कार्तिक मास. क्रोधीनाम संवत्सरे. भृगुवार. प्रातःकाल. सात घटका दिवस. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २८१०. **श्रीगणराज.** (मार्ग. शु० १-१३ नोवें.)

पैवेस्ती छ० २९ जिल्हेज. सन खमस समानीन. मार्गशीर्ष.

अपत्यें रघुनाथरायानें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ जिल्हेज पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. बकसगीर गोसावी याजपासून वडिलीं ढाला विकत घेतल्या, माझें स्मरण न झालें ! हल्लीं गोसावी मजकूर ढाला खर ( ? ) घेऊन येथें आला त्या वडिलांस पाठविल्या आहेत. त्यांची किंमत काय, चारांपैकीं घ्यावी कोणती, ती आज्ञा करावी. वडिलानीं घेतल्या त्यांतील चांगली मला

---

१ पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस. यांत ' इंग्रजी बाड ' व ' इंग्रजी गज ' म्हटलें आहे तें काय असेल ? आमच्या मतें हें इंग्रजींत लिहिलेलें ' इंग्रजी बाड. ' म्हणजे इंजनियरिंग विषयावरचें पुस्तक अथवा नोंटबुक असेल, त्यांत कोणच्या प्रमाणावर इमारती बांधल्या असतां त्यांचे निरनिराळे भाग कोणच्या प्रमाणांत असावे, त्यांस सामान काय घालावें, तें कसें तयार करावें, इत्यादि माहिती असेल. हें बाड पटवर्धनानीं जनरल गाडर्ड याचें लष्कर लुटलें तेव्हां त्या लुटींत सांपडलेली चीज दिसते. इंग्रजी गज हा बहुधा यार्ड असावा. त्या वेळीं व्यापाराच्या अगर प्रवासाच्या निमित्तानें फिरस्ते इंग्रज मिरजेस येत असत व बाळासाहेबांस भेटत असत हेंही या पत्रावरून स्पष्ट होतें.

( ३८९१ )

## किरकोळ बाबी.

द्यावी लागेल. किरकोळ जिन्नस येतात त्यांत माझें स्मरण होत नाहीं! विनंती लिहिली आहे. राजश्री विष्णुपंत काकाची प्रकृति कशी आहे ती लिहिली पाहिजे. इंग्रजी बाडाची वही व गज पाठविला तो पावला. पत्रीं आज्ञा कीं, ' येथें इंग्रज येतात त्यांस दाखवावयास येईल ' म्हणून आज्ञा, त्यास गजाचें प्रयोजन आहे यास्तव आणविलें होतें. हल्लीं आज्ञा येईल ते समयीं पाठवून देईन. येथील काम काज चार दिवसांचें आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

# टिपूची नरगुंदावर स्वारी.

यादगीर येथें नाना फडनवीस व निजामअल्ली यांच्या भेटी होऊन उभयपक्षीं घेस्तर सालीं टिपूवर मोहीम करण्याचें ठरलें हें मागच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. वास्तविक पाहिलें तर पेशवे व निजामअल्ली हे आपणांवर स्वारी करणार ही बातमी कळल्यावर टिपूच्या मनास दहशत वाटावी. परंतु तसा कांहीं एक प्रकार न होतां मराठे व मोगल आपणांवर स्वारी करणार त्या आधींच कांहीं तरी कळ काढून त्या दोघांशीं युद्ध सुरू करावें असें टिपूच्या मनांत आलें! आदले वर्षीं बिदनुरास इंग्रजांची एक सबंध फौज टिपूनें कैद केली होती व आपल्या मनाप्रमाणें तहाचीं कलमें ठरवून तीं कबूल करणें मद्रासकर इंग्रजांस भाग पाडिलें होतें. इंग्रजांचे हजारों लोक त्याजकडे पाडाव सांपडले होते ते त्यानें तह झाला तरी सोडिले नाहींत. अशी त्याची इंग्रजांवर सरशी झाल्यामुळें त्यास गर्व झाला होता. आपण मोठे सामर्थ्यवान् आहों असें समजून तो आतां मराठे व मोगल या दोघांसही जुमानीनासा झाला.

इंग्रजांशीं लढण्यास मदत करावी व दर साल सहा लक्ष रुपये पेशवेसरकारांत भरावे या शर्तीवर नाना फडनवीस यांनीं तुंगभद्रा व मलप्रभा या नद्यांमधला मुलूख हैदरअल्लीस दिला होता हें मागें सांगितलेंच आहे. त्या टापूंत नरगुंद व कित्तूर हीं दोन संस्थानें होतीं, त्यांवरची सार्वभौम सत्ता पेशव्यांची असून संस्थानिकांकडे तीं संस्थानें चालविणें अगर खालसा करणें हा अधिकार पेशव्यांचा होता. त्या संस्थानिकांकडून पेशव्यांस दरसाल खंडणी मिळावयाची तीं मात

## पुणें दरबाराशीं कपट.

हैदरानें घ्यावयाची असे. हीं दोन संस्थानें व त्यांत विशेषेंकरून नरगुंदचें संस्थान बलात्कारानें घेऊन आपल्या राज्यांत सामील करावें असा टिपूचा पक्का निश्चय झाला होता. नरगुंदकराविषयीं त्याच्या मनांत विशेष तेढ येण्याचें कारण असें होतें कीं, नरगुंदकर संस्थानिक भावे यांचा पटवर्धनांशीं थोडा आप्तसंबंध असून फार सख्य होतें. नरगुंदकरांचा कारभारी काळोपंत पेठे म्हणून होता तो शूर व मसलती होता. पेशव्यांच्या हमीवर आपलें संस्थान सुरक्षित आहे असें समजून तो टिपूस जुमानीत नसे. यापूर्वीं एक दोन प्रसंगीं टिपूच्या फौजेनें त्याशीं कलागत काढिली असतां त्यानें तिची चांगलीच खोड जिरविली होती. तो काळोपंत टिपूच्या राज्यांतल्या इत्थंभूत बातम्या पटवर्धनांस व पेशव्यांच्या दरबारांत कळवीत असे. अशा प्रकारचीं त्याचीं बातमीपत्रें आजपर्यंत ऐ. ले. संग्रहांत आम्हीं पुष्कळ छापिलीं आहेत. असो.

यद्यपि टिपूसुलतान पेशव्यांस जुमानीत नव्हता, तथापि आपण नरगुंद घेणार ही बातमी पुण्यास आगाऊ कळली तर तेथून नरगुंदच्या कुमकेस फौजांची रवानगी होईल व आपली मसलत फसेल हें त्यास भय होतें. त्या भयाचें निवारण करण्याकरितां त्यानें जी मसलत योजिली तीवरून त्याचा कपटी व विश्वासघातकी स्वभाव चांगलाच दिसून येतो. त्यानें प्रथम सलोख्याचें बोलणें करण्याकरितां पुण्यास वकील पाठविला आणि लगेच मागून नरगुंदावर फौजही रवाना केली ! खंडणीची बाकी चुकती करण्याविषयीं पेशव्यांचा टिपूस वर्ष दोन वर्षें तगादा होता. त्या प्रकरणीं बोलणें करण्याकरितां म्हणून टिपूनें हा वकील पुण्यास पाठविला होता. पण हें कारण बाह्यात्कारी मात्र होतें. आंतला हेतु असा होता कीं, आपण नरगुंदास वेढा घातला म्हणजे ती कागाळी पुण्यास जाऊन नानाच्या

मनाचा क्षोभ होईल त्या वेळीं वकिलानें त्यांस भुलथाप द्यावी कीं, नरगुंदकरांपासून फक्त खंडणी घेण्याकरितां सुलतानाची फौज रवाना झाली आहे. तें संस्थान घेऊन बुडवावें हा सुलतानाचा हेतु नाहीं व पेशवेसरकाराशीं विरोध करण्याचा त्याचा हेतु मुळींच नाहीं. पेशवेसरकारच्या खंडणीचे वगैरे जाबसाल उलगडून देऊन त्यांशीं कायमचा सलोखा करण्याकरितां आपण मुद्दाम आलों आहों हेंच टिपूसुलतानाच्या सद्धेतूचें प्रत्यक्ष प्रमाण आहे !

वर सांगितलेली मसलत योजून टिपूनें पुण्यास जो वकील पाठविला त्यानें आपलें काम फारच शिताफीनें केलें ! आणि त्याच्या बोलण्यावर भरंवसा ठेवण्याचें ढोंग करण्यांत नाना फडनविसांची ही शिताफीच होती ! लक्ष्मणराव रास्त्यांच्या विद्यमानें त्या वकिलानें पेशव्यांच्या दरबारांत पुढें होणाऱ्या तहाच्या कित्येक कलमांचा ऊहापोह सुरू केला न केला तों इतक्यांत टिपूनें दहा हजार स्वार, पंधरा हजार कवाइती पायदळ, पंधरा तोफा व दोन गरनाळा असा मातबर सरंजाम पाठवून नरगुंदास वेढा घातला. टिपूचा मेहुणा बुराणउद्दीन हा या फौजेवरचा मुख्य सरदार होता. याच वेळीं टिपूनें तोरगलकर शिंदे व कित्तूरकर देसाई व करवीरकर महाराज यांस 'बऱ्या बोलानें आम्हांस खंडणी द्या व आमची चाकरी करा, नाहीं तर आमची फौज येऊन तुमचीं संस्थानें घेईल' अशा अभिप्रायाचीं धमकावणीचीं पत्रें लिहिलीं ! नरगुंदास वेढा बसल्याची बातमी परशुरामभाऊंस कळली तेव्हांच तत्काळ सरकारांतून फौज पाठवून टिपूचा वेढा उठवावा असें त्यानीं नानास लिहिलें, परंतु टिपूचा वकील बोलत होता त्यावर विश्वास ठेवल्यासारखा दाखवून नाना व हरिपंततात्या यांनीं भाऊंच्या म्हणण्याकडे लक्ष पुरविलें नाहीं ! होतां होईल तों टिपूशीं युद्ध करण्याचें काम यंदां तरी टाळावें असा त्यांचा बेत होता. टिपूच्या दुष्ट व खुनशी स्वभावाचें ज्ञान

याच्या दरबारी लोकांपेक्षां मिरजेच्या लोकांस अधिक होतें आणि गुंदच्या लोकांस तर सर्वांहून अधिक होतें ! एवढी मोठी फौज ऊन बुराणउद्दिनासारखा सरदार आला तो आपलें संस्थान घेतल्या- वाय रहात नाहीं हें काळोपंतानें पुरें ओळखिलें होतें, पण कस- ाही प्रसंगीं न डगमगणारा तो शूर सरदार होता. शिवाय पुण्याहून ापणास कुमक येईल ही त्यास मोठी आशा होती. त्यामुळें त्यानें ्रशीं उत्साहानें व नेटानें युद्ध सुरू केलें. सन १७८५ च्या ानेवारीपासून जुलै अखेरपर्यंत सात महिने ही लढाई चालली होती ! ळोपंताजवळ दोन हजार स्वार व दोन हजार पायदळ व कांहीं फा असें निवडक सामान होतें. शत्रूनें या सामानाशीं लढाई करून ास शहरांत पिटून घातलें व मोर्चे बसविले तरी नरगुंदकरांची मत कायमच होती. त्यांनीं एकदां अकस्मात् बाहेर पडून न मोर्चे उधळून देऊन शत्रूचें शें दोनशें माणूस ठार लें. मग बुराणउद्दीन यानें चिडून पुनः मोठ्या बंदोबस्तानें र्चे बसवून नरगुंदच्या पेठेवर तोफांचा भयंकर भडिमार सुरू ला. फेब्रुवारी महिन्यांत त्यानें पेठेवर हल्ला केला, तो नरगुंदकरानीं ठ्या आवेशानें लढून मागें परतविला. तथापि पेठेंत एक दोन ठिकाणीं शत्रूनें आसरा धरिला होता तेथून मात्र त्यास हुसकून लावणें ांच्यानें झालें नाहीं. आश्रयाच्या त्याच जागा बळावून फेब्रुवा- च्या १२व्या तारखेस शत्रूनें पेठेवर पुनः जोराचा हल्ला करून ती तली, तेव्हां काळोपंतास किल्ल्याशिवाय आसरा राहिला नाहीं. ामुळें आपल्या पदरीं घोडदळ होतें त्यास निरोप देऊन तो व ाचा धनी व्यंकटराव मुलांमाणसांसुद्धां किल्ल्यावर गेले. त्यांबरोबरच ांवांतले हजारों लोक आपली चीजवस्त घेऊन वर गेले. किल्ल्यावर ोन हजार गडकरी लढाऊ माणूस होतें. दारूगोळा व शिधासामग्री

यांचा पुरवठा पांच सहा महिने पुरेल एवढा केलेला होता. शत्रूनें किल्ल्यावर तोफांचा भडिमार करण्याची पराकाष्ठा केली व आपले मोर्चे हळू हळू किल्ल्याच्या तटास नेऊन भिडविण्याचा उद्योग सतत चालू ठेविला. तथापि काळोपंतानें त्याशीं मोठ्या शिताफीनें लढाई करून त्याचे सर्व प्रयत्न हाणून पाडिले.

टिपूनें नरगुंदची पेठ घेऊन किल्ल्यास वेढा बसविला ही बातमी पुण्यास जातांच त्याच्या वकिलाच्या बोलण्यावर विश्वास ठेवण्याचें सोंग नानास साधेनासें झालें ! 'तुम्हीं स्वस्थ असा. मी सुलतानास लिहून वेढा उठवितों' असें अजून सुद्धां तो वकील छातीवर हात ठेवून सांगत होता. तथापि नानांनीं त्यावरच भिस्त न टाकितां गणेशपंत बेहेरे या सरदाराबरोबर तत्काळ पांच हजार फौज परशुरामभाऊंकडे रवाना केली व भाऊंस पत्र लिहिलें कीं, तुम्हीं आपली व ही फौज घेऊन जाऊन नरगुंदचा वेढा उठवावा. शत्रूचा वकील एका महिन्यांत वेढा उठवितों म्हणतो, परंतु जर त्या अवधीच्या आंतच किल्ला शत्रूच्या हातीं गेला तर काय करावें ? याकरितां क्षणाचा विलंब न करितां तुम्हीं स्वारीस निघावें. सुदैवानें शत्रूचा वेढा उठला तर मात्र त्याशीं विरोध दाखवूं नये व त्याच्या मुलखास उपसर्ग देऊं नये.

नरगुंद प्रकरणीं आजपर्यंत उपेक्षा केल्याबद्दल भाऊंचा नानांवर राग झाला होता. पण वर सांगितल्याप्रमाणें नानांचें पत्र येतांच भाऊंचें कांहींसें समाधान होऊन त्यांनीं तत्काळ फौज जमा केली व तिच्या तीन टोळ्या केल्या. एका टोळींत पांच हजार स्वार असून तींत जनोबा सुभेदार हे मुख्य सरदार होते व त्यांच्या हाताखालीं त्रिंबकराव रेटरेकर यांची योजना झाली होती. या टोळीस मनोळीकडे जाऊन तिकडची बारी राखण्याचें काम सांगितलें होतें. दुसऱ्या

टोळींत दहा हजार स्वार असून तीवर रघुनाथराव कुरुंदवाडकर हे मुख्य सरदार होते व त्यांच्या मदतीस गणेशपंत बेहेरे, रास्ते व व्यंकटराव घोरपडे सोंडूरकर यांची नेमणूक झाली होती. या टोळीस भाऊंचा असा हुकूम होता कीं, तिनें झपाट्यानें मजला करून रामदुर्गास जावें व तेथून रामदुर्गाच्या बारीनें नरगुंदास जाऊन शत्रूचा वेढा उठवावा. या कामीं शत्रूशीं लढाई करण्याचा प्रसंग पडला तरी हरकत नाहीं. पण हें काम जरूर झालेंच पाहिजे. या दोन टोळ्यांची रवानगी केल्यावर खुद्द परशुरामभाऊ वेळ पडेल त्याप्रमाणें दोन्ही फौजांस कुमक करण्याच्या उद्देशानें सात हजार फौज घेऊन मुधोळावर तळ देऊन राहिले.

इकडे बुराणउद्दीन नरगुंदच्या किल्ल्यास वेढा घालून बसला होता त्यास मराठी फौजा आपणांवर चालून येतात ही बातमी कळली व त्या फौजा येण्या आधींच किल्ला काबीज करावा म्हणून त्यानें पराकाष्ठेचा प्रयत्न केला. तोफांच्या मारानें किल्ल्यास कांहीं इजा होत नाहींसें पाहून हल्ला करून किल्ला घ्यावा अशा इराद्यानें त्यानें आपलें कवाइती पायदळ पुढें घातलें. तें पायदळ आसऱ्या आसऱ्यानें लपतछपत किल्ल्याच्या तटाखालीं येऊन पोंचलें. तितक्यांत गडकऱ्यांनीं वरून दहा पांच प्रचंड शिळा लोटून दिल्या त्याखालीं अघाडीचें शंभर मनुष्य ठार झालें! तें पहातांच मागच्या लोकांचा धीर खचून ते पळत सुटले. इकडे मोर्चे पुढें पुढें चालविण्याचें काम रात्रंदिवस चालू होतें, ते मोर्चे जातां जातां किल्ल्याच्या पायास जाऊन पोंचले, परंतु पुढें खडक असल्यानें कांहीं इलाज चालेना. पहिला हल्ला हटल्यावर आठ चार दिवस गेले नाहींत तों बुराणउद्दीन यानें पुन्हां फारच निकराचा हल्ला केला. तेव्हां वरून तोफांचा व दगडांचा असा भयंकर मारा झाला कीं, तेणेंकरून त्याचें हजार माणूस ठार व

दीड हजार जखमी झाले. त्यामुळें या वेळींसुद्धां बुराणउद्दिनाची फौज कचकरून दोनशें मुडदे जाग्यावरच टाकून पळूं लागली. तें पहातांच गडावरचे लोक खालीं उतरून निरानिराळ्या मोर्च्यांवर येऊन पडले व त्यांत सांपडलेल्या शिपायांची कत्तल करून मोर्च्यांस आग लावून गडावर परत गेले.

अशी स्थिति असतां रघुनाथराव कुरुंदवाडकर, रास्ते व बेहेरे वगैरे मराठी सरदार रामदुर्गावर येऊन उतरले. त्यांची फौज बारीपार तलावा करीत नरगुंदापासून दोन कोशांवर येऊन ठेपली. तें पहातांच किल्ल्यावरील लोकांस हर्ष होऊन त्यांनीं खुशालीच्या तोफा केल्या. वेढ्याचें काम सुरू ठेवणें व मराठी फौजांशीं लढाई करणें हीं एकाच वेळीं करावीं लागणारीं दोन कामें बुराणउद्दीन यास होण्याजोगीं नसल्यामुळें त्यानें वेढा उठवून बुणगें व थोर तोफा धारवाडास रवाना केल्या व आपण सड्या फौजेनिशीं नरगुंदापलीकडे बेण्णिहाळ म्हणून प्रसिद्ध ओढा आहे त्यावर जाऊन पट्टणाहून कुमक येत होती तिची वाट पहात राहिला.

या प्रसंगीं टिपूची फौज पाण्याच्या तोटच्यामुळें नरगुंदाहून निघून गेली असें कर्नल वुइल्क लिहितो, पण ती निघून जाण्याचें खरें कारण आम्हीं वर सांगितलें तेंच आहे. त्यावेळीं टिपूच्या सरदारांनीं मराठी सरदारांस कांहीं अपमानाचा निरोप पाठविला व त्यावरून लहानशी चकमक होऊन तींत मराठे मागें हटले असें तो इतिहासकार लिहितो तेंही चुकलें आहे. या स्वारींत युद्धाच्या इराद्यानें मराठी फौज शत्रूवर केव्हांही चालून गेलेली नाहीं. कारण कीं, आपण होऊन शत्रूशीं कुरापत न काढण्याविषयीं मराठे सरदारांस नानाची सक्त ताकीद होती. ' राव पंतप्रधान यांचा खेद आम्हांस राखाव-

याचा असल्यामुळें आम्हीं त्यांच्या सांगण्यावरून नरगुंदचा वेढा उठविण्याविषयीं आमच्या सरदारांस हुकूम पाठविला ' असें टिपूचें पुण्यास वकिलाकडे पत्र आलें व त्याप्रमाणें वेढा उठल्याचें दृष्टोत्पत्तीसहीं आलें. पण तेवढ्यानें परशुरामभाऊंचें समाधान होईना. त्यांचें म्हणणें कीं, बुराणउद्दीन यानें नरगुंदची रयत धरून नेली आहे ती सोडावी, नरगुंदकरांचीं ठाणीं घेतलीं आहेत तीं परत द्यावीं, आणि हल्लीं या स्वारीस आणिलेल्या सर्व फौजेसह तुंगभद्रापार निघून जावें. इतकें झालें तरच शत्रूच्या सरळपणाविषयीं आपली खात्री होईल. नानाचें म्हणणें कीं, ' शत्रूचा वकील येथें खंडणी देण्याचें बोलणें करीत आहे. कबूल केल्याप्रमाणें त्यानें नरगुंदचा वेढा उठविला त्यापक्षीं आपण अधिक पंचाईत कशाला करावी ? या सालीं आतां अखेरीचे दिवस आल्यामुळें व आपली कांहींच तयारी नसल्यामुळें तूर्त कलागत काढूं नये हाच उत्तम पक्ष होय,. वकील सलोख्याचें बोलणें बोलत आहे त्यापक्षीं आपण तरी वांकडेपणा कशाला दाखवावा ! ' या कामीं नानांनीं निजामअल्लीस सल्ला विचारिला तेव्हां त्यानें नानांस लिहून कळविलें कीं, तूर्त लढाई टळत असेल तर बरेंच आहे. तसें नसेल तर मग ती करणें प्राप्तच आहे. आम्ही दोन्ही गोष्टींस कबूल आहों. तूर्त दहा हजार फौज कायमुल्मुल्क या सरदाराबरोबर आम्हीं भाऊंच्या मदतीस म्हणून सुरापुराकडे मुद्दाम पाठविली आहे. कारण पडल्यास भाऊंनीं त्या फौजेस आपणांकडे बोलावून घ्यावें. तात्पर्य, या प्रकरणीं नानाप्रमाणेंच निजामअल्लीचेही विचार डळमळीत होते. निजामअल्लीच्या दरबारीं इंग्रजांचा वकील होता त्याचें म्हणणें कीं, मराठे व मोगल एकत्र होऊन टिपूवर मोहीम करीत असल्यास कंपनीसरकारच्या फौजा या मोहिमेंत सामील होतील. परंतु इंग्रजांनीं आपल्या सामर्थ्याचा लौकिक टिपूशीं तह करून गमावि-

ह्यामुळें त्यांच्या मदतीची किंमत नाना व महादजी शिंदे यांस फारशी वाटेनाशी झाली होती !

होतां होईल तों शत्रूशीं कलागत काढण्याचें यंदां टाळावें हाच विचार शेवटीं नाना व हरिपंत यांनीं पक्का ठरविला व त्यांनीं भाऊंस लिहून पाठविलें कीं, " शत्रूनें नरगुंदचा वेढा उठविला, तुम्हांस ज्या कार्यावर पाठविलें तें कार्य झालें; त्यापक्षीं याउपर शत्रूच्या वाटेस न जातां तुमची फौज पुढें गेली आहे तिनें रामदुर्गासच तूर्त मुक्काम करून रहावें. उतावीळपणानें शत्रूचे सरदार लढाईस येतील तरी सुद्धां तुम्हीं सरकारचा आब रखून धीराधीरानें मागें हटावें, पण लढाई करूं नये ! शत्रूच्या वकिलांनीं येथें तह ठरविल्यासारखा केला आहे, तथापि त्याचा विश्वास येत नाहीं. याकरितां काळोपंत व व्यंकटराव व इतर ब्राह्मणमंडळी कुटुंबांसुद्धां नरगुंदच्या किल्ल्यांत आहेत त्यांस काढून आणावें. काळोपंतांनीं लढाईची शर्थ केली. याउपर त्यानीं तेथें राहूं नये व कोणास ठेवूंही नये. फक्त एखादा लढाऊ सरदार व हजार दोन हजार गडकरी काय असतील तेवढ्यांनीं मात्र किल्ल्यावर रहावें. " टिपूचा मनापासून द्वेष करणाऱ्या व नरगुंदकरांविषयीं कळकळ बाळगणाऱ्या परशुरामभाऊंसारख्या पराक्रमी सरदाराच्या मनास कारभाऱ्यांचीं वर सांगितल्याप्रमाणें वारंवार पत्रें येऊं लागल्यामुळें किती ताप झाला असेल याची कल्पना करितां येण्याजोगी आहे ! भाऊंचा अभिप्राय कीं, "कारभारी टिपूला इतके कां भितात ? मराठी राज्याच्या सामर्थ्यापुढें टिपूची काय बिशाद आहे ? आम्हांजवळ वीस बेवीस हजार स्वार, चार हजार पायदळ, शिवाय तोफा, इतकें सामान आज तयार आहे. या फौजेनिशीं बुराणउद्दिनावर चालून जाऊन त्याचें कवाइती पायदळ तुडवून मारून टाकण्याची, त्याच्या तोफा हिसकून घेण्याची व त्यास तुंगभद्रेपार हांकून देण्याची

आम्हांत धमक आहे. असें असतां शत्रू चालून आला तरी आम्हीं मागें हटावें असें कारभारी लिहितात, तर आमचा उपाय नाहीं ! कारभारी तह झाला म्हणतात तर काळोपंत व त्यांचीं मुलेंमाणसें व ब्राह्मण मंडळी नरगुंदांतून काढून आणण्याविषयीं ते वारंवार कां लिहितात? आम्हीं मागें हटावें अशी सरकारची आज्ञा होते त्याअर्थीं तसें वागणें आम्हांस प्राप्त आहे, पण मागें हटण्यांत आमचा व सरकारचा लौकिक राहणार नाहीं व हें भित्रेपणाचें धोरण कारभाऱ्यांस पुढें जड जाईल, याबद्दल त्यांचा त्यांनींच विचार करावा ! " नरगुंदच्या किल्ल्यांत गुरें, घोडीं व गरीब रयत वगैरे चिकार भरलें होतें तेवढें मात्र सरकारच्या हुकुमाप्रमाणें भाऊंनीं काढून आणिलें. काळोपंतास मुलेंमाणसेंसुद्धां बाहेर निघावें म्हणून तगादा लाविला असतां तो त्यानें मानिला नाहीं. भवितव्यासारखी त्यास बुद्धि झाली ! तह झाल्याचीं पुण्याहून पत्रें येतात त्याअर्थीं शत्रु आतां आपल्या वाटेस फारसा जाणार नाहीं असा भरंवसा उत्पन्न झाल्यामुळें म्हणा, अगर आपण गेलों तर गडकरी निरुत्साह होऊन किल्ला शत्रूच्या हातीं जाईल अशी शंका आल्यामुळें म्हणा, अगर पावसाळ्यानंतर शत्रूवर मोठी स्वारी होणारच आहे व तेथपर्यंत आपण कसा तरी टिकाव धरूं असें वाटल्यामुळें म्हणा, पण काळोपंतानें आज निघतों, उद्यां निघतों, म्हणून टाळाटाळी केली ! या गैरसावधपणाचा परिणाम त्यास किती भोंवला हें पुढें सांगण्यांत येईल.

टिपूनें बुराणउद्दिनाच्या कुमकेस आणखी फौज पाठविली तेव्हां त्याजवळ तीस हजार पायदळ, दहा हजार स्वार व तीस तोफा इतका सरंजाम जमा झाला. भाऊंशीं बरोबरीनें टक्कर देण्याचें सामर्थ्य आतां आपणांस आहे व त्यांचें धोरण सबुरी करण्याचें आहे अशी खात्री होतांच मग बुराणउद्दिनानें कुरापत काढण्यास मागें पुढें पाहिलें

नाहीं ! तो सर्व सैन्यानिशीं बेण्णिहाळाहून कूच करून रामदुर्गच्या बारींत येऊन उतरला. ती बारी बंद करून त्यानें एक टोळी रामदुर्गाकडे पाठविली व दुसरी मनोळीच्या बारीकडे पाठविली. याप्रमाणें बंदोबस्त करून तो बाकी फौजेसह पुन्हां नरगुंदास वेढा देऊन बसला. बारीच्या तोंडीं रघुनाथराव कुरुंदवाडकर व गणेशपंत बेहेरे व रास्ते व जनोबा सुभेदार वगैरे सरदार होते त्यांस शत्रूवर चालून न जाण्याविषयीं ताकीद असल्यामुळें तो अंगावर चालून येतांच ते लढत लढत मागें हटूं लागले. त्या प्रसंगीं दररोज चकमकी होत व त्यांत उभय पक्षाचें थोडेंबहुत माणूस ठार व जखमी होत असे. मराठयांनीं एकदां बन्नुराअलीकडे शत्रूची कही गांठून लुटून फस्त केली व बरोबर फौज होती ती पराजित करून तिचे शंभर सवाशें घोडे घेतले. पण याखेरीज म्हणण्यासारखी लढाई झाली नाहीं. शत्रूनें पुढें पुढें यावें व यांनीं मागें मागें हटावें असें होतां होता मराठी फौजा कृष्णेवर परत येऊन उतरल्या. पुण्याहून परशुरामभाऊंस पैक्याचा व फौजेचा पुरवठा करण्याची तरतूद नानांनीं केलेली नव्हती. रामदुर्गची बारी ओलांडून शत्रु अलीकडे येऊन मराठी हद्दींत धुंडावा माजवील अशी त्यांची अटकळ नव्हती. पण शत्रूनें बाऱ्या ओलांडून मनोळी, रामदुर्ग, बन्नूर हीं ठाणीं काबीज केल्याच्या बातम्या पुण्यास पोंचतांच नानांनीं दोन हजार कवाइती पायदळ, दहा हजार स्वार व कांहीं तोफा असें सैन्य भाऊंच्या कुमकेस पाठविण्याकरितां सिद्ध केलें. पण आतां या धांवाधांवीचा उपयोग कांहींच नव्हता. पावसाळा सुरू झाल्यामुळें रस्ते बंद झाले, नद्या भरल्या, अर्थात् फौजांच्या हालचाली करण्याचे दिवस निघून गेले. [१]यामुळें गोळा केलेली फौज घरोघर परत लावून देणें परशुरामभाऊंस भाग पडलें. रास्ते व बेहेरे वगैरे सरदार मात्र पुण्यास परत न जातां कृष्णे-

अलीकडे छावणी करून राहिले. नरगुंदावर तोफा सुरू झाल्या होत्या त्यांचे आवाज गोकाकेपर्यंत ऐकूं येत होते. पण ते ऐकून महाराष्ट्रानें तळमळावें मात्र ! आतां प्रतीकार करण्याचें त्याच्या हातांत राहिलें नव्हतें !

रामदुर्गची बारी शत्रूनें येऊन बंद केली तरी सुद्धां दुसऱ्या बाऱ्या अजून मोकळ्या आहेत त्यांतून पलीकडे जाऊन शत्रूच्या पिछाडीवर यावें असें परशुरामभाऊ म्हणत होते, तें नानांनीं मान्य केलें असतें तर रामदुर्गच्या बारींतून शत्रूस तत्काळ पलायन करावें लागलें असतें ! पुन्हां नरगुंदच्या वाटेस जाण्याचेंही त्यास सुचलें नसतें. पण तसें करावें तर शत्रूच्या मुलुखावर स्वारी करून आपण होऊन युद्ध सुरू केल्यासारखें होऊन शब्द ठेवण्यास टिपूस जागा होईल या भयानें नानानीं पीछेहाटीची मसलत स्वीकारिली. शेवटीं टिपूनें करावयाचें तें केलेंच. मराठी साम्राज्याची हानि व्हावयाची ती होऊन पुणें दरबाराचा अपमान करण्याची टिपूस संधि मिळाली ही मात्र त्यांत आणखी विशेष गोष्ट झाली ! मागें हैदरअल्लीनें गुत्तीचा किल्ला घेऊन मुरारराव घोरपड्यांस सहकुटुंब धरून कैदेंत टाकिलें व सावशीच्या लढाईंत मराठी फौजांचा पराजय करून पांडुरंगराव पटवर्धन व शिवराव घोरपडे यांस पाडाव करून नेलें. मनास सतत झोंबणाऱ्या त्या अपमानाबद्दल पुणें दरबारानें शत्रूवर सूड उगवावयाचा, परंतु राज्यक्रांतीच्या गडबडींमुळें त्यास तसें करितां आलें नाहीं; असें एक वेळ म्हणतां येईल. पण या नरगुंद प्रकरणीं महाराष्ट्राच्या राज्यलक्ष्मीस म्हैसूरकरांनीं जी ही तिरस्कारदां लाथ मारिली ती नानांनीं मनावर घेतलें असतें तर त्यांस चुकवितां आली असती असें आमच्या बुद्धीस वाटतें. असो. आतां या शोकपर्यवसायी प्रकरणापैकीं नरगुंदकरांविषयींचा वृत्तांत सांगण्याचा राहिला आहे व तो फारच हृदयद्रावक आहे.

मे महिन्यांत बुराणउद्दिनानें नरगुंदास पुनः वेढा घातल्याचें मागें सांगितलेंच आहे. वारंवार हल्ले केले तरी त्यांचा कांहीं उपयोग न होतां आपलें माणूस मात्र फार मारलें गेलें, याकरितां आतां तोफांची मारागिरी करूनच काय होईल तें पहावें, असा त्यानें बेत केला. त्या वेळीं अशी बातमी पसरली होती कीं, " बुराणउद्दिनानें किल्ल्याचा नकाशा ( Model ) मेणाचा तयार करून श्रीरंगपट्टणास पाठविला होता. तो पाहून टिपूनें हुकूम पाठविला कीं, नकाशांत पुसाटी म्हणून स्थळ दाखविलें आहे तेथून किल्ल्यावर एक लाख गोळे मारावे ! त्यानें काम न होईल तर मग काय करावयाचें तें मागून कळवूं ! आणि सुलतानाच्या त्या हुकुमास अनुसरूनच आतां किल्ल्यावर दररोज हजार दोन हजार गोळे टाकण्याचा कारखाना सुरू झाला आहे. " या बाजारगप्पेंतला तथ्यांश किल्ल्यावर तोफांचा भयंकर मारा चालला होता एवढाच दिसतो. पण टिपूचे गोलंदाज कसबी नसल्यामुळें त्यांच्या मारागिरीनें किल्ल्यास कांहींच इजा झाली नाहीं. शेवटीं बुराणउद्दिनास या निष्फळ उद्योगाचा कंटाळा येऊन तो वरच्या लोकांस उपासमारीनें वठणीस आणण्याचा निश्चय करून बसला व त्यांतच त्यास यश आलें. बदामीचा किल्लेदार गुलाम हैदर हा काळोपंताच्या ओळखीचा होता त्याबरोबर बुराणउद्दिनानें जून महिन्यांत काळोपंतास निरोप सांगून पाठविला कीं, " तुम्हीं मर्दुमीची पराकाष्ठा केली. आतां व्यर्थ हाल कां भोगितां ? खालीं उतरून किल्ला आमच्या हवालीं करा. तुमच्या जिवास व मालमत्तेस धक्का न लावितां पार करून देतों. पाहिजे तिकडे खुशाल निघून जावें. " तें बोलणें त्या वेळीं काळोपंतानें धिक्कारिलें, परंतु जुलैच्या अखेरीस असा प्रसंग येऊन ठेपला कीं, त्यानें आजपर्यंत दाखविलेली मर्दुमी व निग्रह वायां जाऊन शत्रूस शरण जाण्याखेरीज त्यास गत्यं-

तर राहिलें नाहीं ! त्या वर्षी नरगुंदप्रांतीं पावसानें टाळा दिला होता व त्यामुळेंच वेढ्याचें काम सुरू ठेवणें शत्रूस सुलभ झालें, आणि त्यामुळेंच भरपावसाळ्यांत नरगुंदच्या किल्ल्यावर पाण्याचा तुटवडा पडला ! मग तोरगलच्या काजीच्या विद्यमानें बुराणउद्दिनानें काळोपंतास आणभाक देऊन करार केला कीं, गडावरच्या सर्व मनुष्यांनीं खालीं उतरून वाटेल तिकडे खुशाल जावें. त्यांच्या जिवास, अब्रूस अगर मालमत्तेस आपण काडीमात्र उपसर्ग देणार नाहीं. याप्रमाणें करार झाल्यावर काळोपंत व व्यंकटराव सर्व लोकांनिशीं किल्ल्याखालीं उतरले तों शत्रूनें विश्वासघात करून त्यांस कैदेंत ठेविलें ! हा प्रकार कसकसा झाला हें त्या वेळच्या बातमीपत्रांतले उतारे पुढें देत आहों त्यावरून लक्षांत येईल.

" किल्ल्यांतील पाणी सरलें थोडेसें होतें, परंतु किडे फार पडून उपयोगी नाहीं व दारू गोळी व किरकोळी सामान झाडून सरलें. जुने दाणे आठ पंधरा दिवस खाऊन होते. दुखणें फार लोकांस लागलें, परिणाम नाहीं, तंव बोली तोरगलकर काजीचे मतें लोक व काळोपंतास देखील सोडून द्यावें ऐसा करार करून उतरले. त्यावर लष्करच्यानीं पहारा देऊन तैसेच ठेविले होते. दोन परवानग्या ति[1]कडून आल्या, त्यावरून लोकांस थोडे बहुतांस निरोप दिला. सोमवारीं सोडिले. ज्यांचीं चांगलीं हत्यारें असतील त्यांचीं पाहून घेतात. कांहीं लोक व ब्राह्मण मंडळी चाळीस पन्नास सोमापुरांत ठेविली आहे. राजश्री काळोपंत यांची मातुश्री खालीं उतरल्यावरी मृत्यु पावली. श्रीरंगपट्टणाहून तिसरी परवानगी आलियावरी काळोपंतास मंडळीसुद्धां सोडावें ऐसें लष्करांत बोलत होते. "

---

१ श्रीरंगपट्टणाहून टिपूकडून.

नरगुंदच्या किल्ल्यावर पाण्याचें दुर्भिक्ष झाल्यामुळें किल्लेकऱ्यांची व काळोपंतांची मर्दुमी व्यर्थ होऊन त्यांस किल्ला सोडावा लागला हें दर्शविलेंच आहे. टिपूच्या सद्दीचा जोर किती चमत्कारिक होता हें दाखविणारी अशी एक गोष्ट नरगुंदचे लोक सांगतात कीं, काळोपंत खालीं उतरून शत्रूच्या स्वाधीन होतात तोंच जोराचा पाऊस सुरू होऊन किल्ल्यावरचीं तळीं पाण्यानें तुडुंब भरून गेलीं! असो. त्यापुढची हकीकतः—

" काळोपंत व भगवंतराव कुटुंबसुद्धां सोमापूर ( मोहल्यांत ) हणमंताच्या देवळाच्या पाठीमागें रड्डी याच्या घरांत कोंडिले आहेत. घराभोवती हजार दोन हजारांची चौकी आहे. मशारनिल्हेनीं हातेर अद्याप दिलें नाहीं. जवळ पांच जण प्यादे जिवाळ्याचे हत्यारबंद आहेत तेही सोडून निघत नाहींत. भले लोक व सर्वत्र शें दोनशें एकीकडे पहाऱ्यांत आहेत. घोडीं सर्वत्रांची ( शत्रूनें आपल्या फौजेंत ) वांटून सोडिलीं. काटकांस एकीकडे दूर कोंडिलें आहे. ब्राह्मण सर्वत्र मंडळी पन्नास, नारो दादाजी व शास्त्री आदिकरून, एका घरांत घातले आहेत. एकाची खबर एकास नाहीं. जितरूब नक्त नाणें सोनें रूपें म्हणतां लक्ष होनाचें गडावरील जहालें. काळापाची आई मात्र मेली. वरकड आजपर जिवंत आहेत. काल इकडील माणूस याप्रमाणें पाहोन आला. अद्यापि एकाची सुटका नाहीं. मशारनिल्हेची कन्या नारो दादाजीची सून चांगली आहे. ती मूल नबाबखान घेणार. परवांच ( पहावयास ) आणविली होती. वरकड सर्वत्रांस पट्टणास नेतात. सोडितील म्हणायाची भ्रांत धरून जीव ठेवून बैसले आहेत. निघते वेळेस काय घडतें पहावें ! "

या उताऱ्यांत काळोपंताच्या मुलीविषयीं उल्लेख आला आहे. नरगुंदकर संस्थानिकांची मुलगी टिपूनें बाटवून आपल्या जनानखान्यांत

ठेविली असें डफ्साहेब म्हणतात. त्यास आधार दंतकथेखेरीज आम्हास अद्यापि उपलब्ध नाहीं. टिपूकडून दोन परवानग्या आल्यावर बुराण-उद्दिनानें बहुतेक लोकांस सोडून दिलें हें वर आलेंच आहे. काळोपंत वगैरे मंडळी चातकाप्रमाणें तिसऱ्या परवानगीची वाट पहात बसले होत. शेवटीं ती परवानगी एकदाची आली, पण तींत काळोपंत वगैरे मंडळीस सोडून द्यावें असें नसून त्या सर्वांस बिड्या ठोकून श्रीरंग-पट्टणास पाठवून द्यावें असें होतें ! त्या हुकुमाचा अंमल बुराणउद्दिनानें कसा केला हें पुढील उताऱ्यावरून दिसेल.

" नरगुंदाकडील वर्तमान. राजश्री व्यंकटराव व काळोपंत व त्यांच्या मुलांमाणसांस कौल देऊन पट्टणास नेलें. मार्गीं चालते समयीं काळोपंतास धरून मुसक्या बांधोन सर्वत्रांस माघारें आणिलें. शिपाई व राजश्री नारो दादाजी, निळकंठ शास्त्री सर्वत्रांस बिड्या घालून रवाना केले. मागाहून व्यंकटराव व काळोपंत मुलें माणसांस बिड्या घालून नेणार आहेत. "

त्याप्रमाणें मागून लौकरच ' व्यंकटराव व काळोपंतांस व मुलें माणसांस बिड्या घालून ' बुराणउद्दिनानें श्रीरंगपट्टणास रवाना केलें. एकदम सर्व मंडळी हालवावी तर कांहीं दंगा होईल या भयामुळें त्यास इतका द्राविडी प्राणायाम करावा लागला ! मागें मुरारराव घोरपडे वगैरे मंडळीस कैद करून गुत्तीहून रवाना करण्याच्या वेळीं शत्रूनें हीच युक्ति योजिली होती ! ( पहा नं. १८३८. )

नं. २८११. श्रीगणराज. ( २३ जानेवारी. )

चिरंजीव राजश्री दादा* यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी. आज आतांच नऊ ताप रात्रीनंतर डांकेवरून नरगुंदचे बातमीचें पत्र रामदुर्गकर हवालदाराचें आलें जें, सोमवारीं लढाई जाली होती त्यानंतर गडच्या[1] लोकांनीं बाहेर निघून जवामर्दीनें दोन मोर्चे[2] उधळून दिले. शत्रूकडील शेंदोनशें माणूस ठार व जायां-- जखमी जालें. याप्रमाणें लिहिलें आहे. तें पत्र तासगांवास वडिलां[3]) कडे आतांच रवाना केलें. छ० ११ रबिलावल. अकरावा तास. रात्र. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २८१२. ( माघ व० ७--१ फेब्रुवारी. )

आपाजी गोविंद सखदेव[4] याचें पत्र बाळासाहेबांस--

२० रबिलावलचें. मुक्काम नजीक जगजीवणी येथून--

" नरगुंदाकडील वर्तमान--शत्रूकडील लोकांनीं पेठेवर हल्ला केली. ते समयीं आंतील लोकांनीं निकड करून हल्ला पेठेंतून मारून काढिली. परंतु सोमापुरांत बाहेरील लोकांचे मोर्चे कायम होऊन राहिले. व पेठेचे दक्षिणेस हालबावीवर आंतील लोकांचा मोर्चा होता तोही त्याणीं उठवून तेथें त्यांजकडील लोकांचा मोर्चा बसला. आणि पुढें मोर्चांची निकड चालतच आहे. आंतील फौजेस राजश्री काळोपंत आपांनीं निरोप दिला. "

नं. २८१३.[5] श्री. ( माघ व० ८--२ फेब्रु० )

विनंती उपरी. टिपूकडील जमीयत व सरंजाम येऊन नरगुंदास महसरा दिला म्हणून दोहोंचोहोंकडून वर्तमानें आलीं. येथें महमद

---

* रघुनाथराव कुरुंदवाडकर.

१ नरगुंदच्या किल्ल्यावरच्या. २ टिपूकडील. ३ परशुरामभाऊंकडे. ४ हा मिरजकरांचे पथकावरील मुख्य सरदार होता. ५ हीं नानाफडनविसांनीं परशुरामभाऊंस लिहिलेल्या पत्राची पुरवणी.

पगयाजखान बोलावयास पाठविले काय, तिकडे नरगुंदास शह देतात हें काय, याजवरून त्यांची चाल ठीक नाहीं; असें समजोन नरगुंदचा शह सुटावा या अर्थें आपली तिकडे जाण्याची योजना करावी तर उघड विघाड दुतर्फा नाहीं. वकिलाचें म्हणणें जे, " नरगुंदास महसरा देऊं नये येविशीं टिपूकडे व सरदार त्याजकडील त्या शहास आले आहेत त्यांस आम्हीं लिहिलें आहे. उपसर्ग न करितां शह सोडून आपले तालुक्यांत जातील. हें नसल्यास जशी मर्जी असेल तसें करावें " असें बोलणें आहे. आपल्यास ' जा ' म्हणावें, आणि तेथील सरदार वकिलाच्या लिहिण्यावरून शह सोडून गेला, आणि पुढें कलागतीची सुरव नाहीं, त्यापक्षीं जाऊन शह मात्र उठविला, तितकेच कार्यावर माघारें यावें, ती गोष्ट आपल्या योग्यतेची नव्हे. तसेंच मातबर कारण पडलें तर मोठाच उद्योग करणें प्राप्त आहे. तूर्त जितक्यास तितकें करावें असें समजून येथून रा॥ गणेशपंत बेहेरे यांबरोबर पांच हजार फौजेची नेमणूक करून रवानगी केली. कूच करून वानवडीवर गेले. पुढें दरमजल लौकरच जातील. काम पडो न पडो, परंतु प्रयोजनापुरता भरणा फौजेचा म॥निल्हेपाशीं असावा, याजकरितां आपल्याकडील फौज तीनही पथकांतील मिळोन तीन चार हजार पत्र पावतांच म॥निल्हेकडे पाठवावी. मागाहून आपल्या निघण्याचा दबाब ठेवावा. कदाचित् वकिलाचे लिहिण्यावरून मनसबा सोडून माघारे निखालसपणें त्याची फौज गेली तर उत्तमच जालें. ते गोष्ट न करितां शह त्याणीं दिला आहे तो या फौजेचे आवाईनें सोडून किनारा खेंचला तर तूर्त शह तुटला, हें काम जालें. त्याच प्रांतीं राहिले तर आपले फौजेचें कसें करावें त्याचा विचार करितां येईल. अगदींच माघारे गेले, येथें वकिलांनीं सरकारचे जाबसाल यथास्थित

१ हें टिपूनें पुण्यास पाठविलेल्या वकिलाचें नांव.

पुरवून दिले, तर गणेशपंतास माघारे आणविण्यास चिंता नाहीं. असें समजून रवानगी करून सविस्तर आपल्यास समजावें, व फौज जलद गणेशपंत यांजकडे पोंहोंचावी, याकरितां लिहिलें आहे. रवाना छ० २१ रबिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती.

नं. ३८१४. (३ फेब्रुवारी.)

मुरारजी जगथाप हवालदार किल्ला भुजबळगड[1] यांजकडून रघुनाथराव निळकंठ यांस माघ व॥ ९ चें पत्र—

" नरगुंद शहर चतुर्थी शनिवारीं हल्ला[2] शिरून हस्तगत केलें. शहरांत श्रीचे[3] देवालयांत आक्रम त्याचा[4]। तांबडे तळ्याकडे दरवाजावर तोफा दोन रोखून दवदळ्यावर ठेवून मारतात. हलवावी-कडे दोन तोफानीं मारितात. कमानतळेस शारून फोडावें या यत्नांत आहेत. गोळे लागू कांहीं होतात, नाहीं, असें आहे. किल्ल्यावर ब्राह्मणमंडळी शंभरपर्यंत आहे, शिपाई राउतांपैकीं शें दीडशें आहेत. शिवाय गडकरी दीड दोन हजारपावेतों मनुष्य आहे. शिवाय कांहीं अगत्याचें माणूसही शहरांतून पाहून पाहून वर घेतलें आहे. पाण्याचा वगैरे खर्च बराच आहे, सामानही उत्तम प्रकारें आहे. उपराळा मात्र आपणांकडून जाला पाहिजे. "

नं. ३८१५. श्री. (माघ व० ११—५ फेब्रुवारी.)

पै॥ छ० ३७ रा॥वल. अस्तमान.

सेवेशीं विसाजी नारायेण[5]. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ३४ रा॥वल रविवार सायंकाल घटका दिवसपर्यंत यथास्थित

---

१ हें रामदुर्गच्या किल्ल्याचें नांव. हा किल्ला स्वतः मजबूत नसल्यामुळे केवळ भुजबळावरच राखावयाचा, सबब याचें नांव भुजबळगड ! २ टिपूच्या फौजेचा हल्ला. ३ नरगुंदास श्रीव्यंकटेशाचें देवस्थान प्रसिद्ध आहे तेथें. ४ शत्रूचा. ५ विसाजी नारायण वाडदेकर हा पटवर्धनांचा पेशव्यांच्या दरबारीं वकील. याचें हें पुण्याहून परशुरामभाऊंस पत्र.

असे. विशेष. स्वामींनीं दोन तीन रवानगीचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. जे समयीं बातमी आली ते समयीं श्रीमंत राजश्री नानांस व तात्यांस दाखविलीं. मध्यें दोन चार रोज तात्या तुळापुरास गेले होते ते काल मंदवारीं पुण्यास आले. आलियावर नानाचें व तात्यांचें बोलणें होऊन निश्चय ठरला जे, ( शत्रूनें ) नरगुंदची पेठ घेतली त्याअर्थीं याउपरी उपराळा न जाल्यास किल्ला जाईल, हें समजोन राजश्री गणेशपंत बेहरे रवाना केलेच आहेत. त्यानीं आपलें पत्र येईल त्या सुमारें जावें; आणि आपल्याकडील फौज आपण पत्र पावतांच डेरेदाखल होऊन पुढें फौज; मागाहून आपण, याप्रमाणें बेत करावा. आपण बाहेर निघाल्याखेरीज दबाव पडत नाहीं. आपण बाहेर निघोन जसा फौजेचा वगैरे जय पाडावयाचा असेल त्याप्रमाणें सविस्तर लिहून पाठवावें. बाहर निघण्यास उपेक्षा होऊं नये " नरगुंद जातें पुढें टिपूचा तंह ( ? ) कोठपर्यंत आहे ? अलीकडे सरकारचे वगैरे तालुके आहेत. याजकरितां येविशींचे सविस्तर लिहून पाठविणें " व " आम्हीही कोंकगांत अगर आणखी एखादे स्थलीं जाऊं " म्हणोन विस्तारें लिहिलें, त्याप्रमाणें सविस्तर ( नाना व तात्या यांस ) समजाविलें. त्यास येथील म्हणणें जे, " आम्हीं जी मसलत करणें ते आपल्यास कळविल्याखेरीज करितों असा अर्थ नाहीं. जें करणें तें आपल्यास कळवीतच आहों. " " नरगुंदची उपेक्षा जाली " म्हणोन रागें भरून लिहिलें, त्यास येथें रास्ते यांचे विद्यमानें ( टिपूच्या ) वकिलाचें बोलणें खातरजमेचें होतें; आणि ( शत्रु येऊन ) एकाकींच निकड बसवील आणि शहर घेईल असें नव्हतें. हल्लीं आपल्याकडून निकडीचीं पत्रें आलीं, त्यास नरगुंदची उपेक्षा मनापासून करावयाची

---

१ अनुक्रमें फडनवीस व फडके. २ येथें पत्र कसरीनें खाऊन एक अक्षर नाहींसें केलें आहे. त हें अक्षर शाबूद आहे पण ह आम्ही तर्कानें घातला आहे.

नांहीं. राजश्री काळो बहिरव यांस युक्तीनें किल्ल्यांत बातमी पोहचवून महिना दोन महिने दम धरून लढत असें करावें. आणि आपण पत्र पावतांच मुहूर्ते निघावें. आपले निघण्यावरून ( शत्रूवर ) दबाव पडेल. पत्र पाहतांच निघावयाचें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८१६. ( फाल्गुन शु० ८–१६ फे० )

वासुदेव कृष्ण याचें बाळासाहेबांस पत्र. ६ रबिलाखरचें—

" अमित्राचे फौजेंत बातमीस माणसें पाठविलीं होतीं तीं काल आलीं. त्याणीं वर्तमान सांगितलें जे, दहा हजार फौज व पंधरा हजार बार व तोफा पंधरा व गरनाळा दोन येणेंप्रमाणें सामान आहे. तीन धबधबे मातबरच आहेत. दर धबधब्यास तीन तोफा, पक्के सोळाशेरी गोळ्याच्या येऊन लागू जाल्या आहेत. गोळ्यांची कारागिरी चांगली होती. गुरुवारीं एक तोंडें[1] दिवसास आसरा धरून किल्ला समीप करीत होते. वरच्यानीं दहा पांच दगड वरून लवंडून दिले. तेव्हां शंभर मनुष्य ठार जाले. सभोंवते मोर्चे जाऊन किल्ल्याच्या पायास लागले. पुढे खडक. मोर्चे चालत नाहींत. लष्करास रात्रंदिवस या तोंडें[2] छबिना चांगला सावध असतो. मागाहून एक सरदार मातबर पट्टणाहून आला. त्याचा मुक्काम शनिवारीं साताकोसांवर जाला होता. रविवारीं लष्करास येणार होता. बरोबर दोनहजार फौज व पांचशें तुरुप स्वार व बार पांच हजार व तोफा दहा येणेंप्रमाणें सामान आहे. "

---

१ पेठे. हे नरगुंदकरांचे कारभारी. २ जिकडून मराठी फौजा नरगुंदावर येण्याचा संभव होता त्या तोंडावर.

नं. २८१७. ( फाल्गुन व. ४—१८ फे. )

आपाजी गोविंद सखदेव यांचे पत्र लष्करांतून बाळासाहेबांस छ० १८ रबिलाखरचें—

" नरगुंदाकडील वर्तमान—शत्रूकडील लोकानीं पेशजी हल्ला केली होती. त्यानंतर आणखी पौर्णिमेचे दिवशीं दोन वेळ पुसाटीकडे तोफांची मारागिरी करून फारच निकडीची हल्ला केली. तटाजवळ गेले होते, मग वरील तोफांची व दगडांची मारागिरी जाहली. ते समयीं दोन दिवसांत हजार माणूस बाहेरील ठार पडले व हजार दीड हजार माणूस जखमी जालें, तेव्हां हल्ला माघारी फिरली. ते समयीं शेंदोनशें मुडदा जाग्यावर राहिलें. येणेंप्रमाणें पुसाटीकडील वर्तमान होतांचे त्यो गडबडींत पूर्वेकडील दरवाजांतून गडावरील कांहीं लोक बाहेर पडोन मोर्च्यावर मारामारी केली. तांवडे तळें बाहेर आहे तेथवर जाऊन तळ्यांचें पाणी पिऊन मागती गडावर माघारे गेले. त्यानंतर भृगुवारीं येक दिवस समग्र तोफांची मारागिरी फारच केली. त्या अलीकडील वर्तमान कांहीं कळलें नाहीं."

नं. २८१८. श्री. ( अधिक चैत्र— मार्च. )

विज्ञापना. नवाब निजामअल्ली यांस " टिपूकडील मसलत कशी करावी. सालमजकुरी करावी कीं पेस्तर सालीं करावी, याचा मनसबा कसा करावा", म्हणोन तेथून तपशीलवार लिहिलें होतें. त्यांचें उत्तर नवाबानीं लिहिलें जे, " मसलत प्राप्त झाली त्याअर्थी करावी. सालमजकुरीं काय करितो हें पाहून पेस्तर करावी हें ठीक नाहीं. शत्रु प्रबळ होतो व आपलीं ठाणीं घेतो त्यापक्षीं मसलत

१ पत्र विसाजी नारायण वाडदेकर यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. २ येथून पेशव्यांच्या कारभाऱ्यानीं.

करावी; छावणी करावी; मदारुलमहांनीं निघावें; आम्ही निघतों; पुढें भाऊ गेलेच आहेत त्यांजकडे वीस हजार फौज रवाना करितों. हा एक पक्ष. दुसरा पक्ष नरगुंद राहून खंडणी होऊन कजिया बरसातीचा चार महिने मिटत असल्यास मिटवावा. पेस्तर मसलत करावी. हें होत नसल्यास यंदांच मसलत करावी. मसलतीविशींचा आळस करूं नये." याप्रमाणें पत्रें आलीं. दुसरें वर्तमान—इंग्रजांचा वकील नबाबाकडे आला आहे. "मदारुलमहां सामील होऊन चाल करीत असल्यास आम्ही बिघाड करितों. गुंता नाहीं" असें बोलणें आलें. हें सदरहू वर्तमान राजश्री कृष्णराव बल्लाळ यांजकडील पत्रांतील पाहिलें तें सेवेसीं लिहिलें आहे. तेथें त्याचें प्रतिउत्तर लिहिते वेळेस स्याहींवया आज्ञा व्हावी सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. नबाबाची कांहीं फौज रवाना जाहली ती चितापुरावरीं आहे. हे विज्ञापना. विसाजीपंत बिनीवाले यांस समाधान नव्हतें. प्रायश्चित अधिक शुद्ध नवमीस घेतलें, दशमीस तुळा केली, एकादशी सोमवारीं पहाटेचे प्रहर रात्रीस देवाधीन जाहले. कळावें. मोठा माणूस होता, परंतु गेला. फार वाईट जाहलें. हे विज्ञापना.

नं २८१९. (फाल्गुन व० १०—६ मार्च.)

आपाजी गोविंद सखदेव यांचें लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पत्र—

"पुसाटीकडे मोर्चे बसले होते. तोफांची मारगिरी फार निकडीची करीत होते. त्यास चार दिवस जाहले; शत्रूकडील लोकानीं हल्ला केली होती. ते समयीं गडावरील लोकानीं हल्ला मारून काढिली.

---

१ मदारुलमहां = नानाफडनवीस. २ 'आपण नानाफडनविसास काय उत्तर लिहिलें तें मला कळवा.'

बाहेरील माणूस जायांजखमी फार जालें. खंदकावरील मोर्चा बाहेरील होता तो मारून काढिला. तोफा पुसाटीकडे होत्या त्या झाडून धारवाडाकडे लावून दिल्या इकडील लष्करची आवई फार खातात. सडे होऊन स्वारीच्या तोफा घेऊन राहिले आहेत. ''

नं. २८२०. श्री. (अधिक चैत्र शु० ३–१३ मार्च.)

राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं--

विनंती उपरी नरगंदाजवळ टिपूची फौज आहे तेथें आंचीवाले आहेत त्यांचें पत्र येथें वकील आहेत त्यांस आलें; त्यांत मजकूर कीं, '' टिपूचीं पत्रें नरगुंदचे सरदारांस आलीं कीं, मोर्चे उठवावे याविशीं तुम्हांस लिहिलें आहे. परंतु सरकारची फौज रामदुर्गाजवळ आली हें पाहून मोर्चे उठविले म्हणोन कळलें, त्यास अशी गोष्ट ( तुम्हीं ) केली असली तर कोडेयाळ बंदरास सरदारांची गत जाली तशी तुमची होईल, याप्रमाणें लिहिलें आलें आहे. '' म्हणोन बातमी कळविली. त्यास टिपूचीं पत्रें वकिलास बदल खासर ( ! ) महसरा उठविला म्हणून आलीं असतां मागाहून याप्रमाणें बातमी येते ! तस्मात् यांची मिजाज कायम नाहीं. याजकरितां आपणास लिहिलें असे. फौजेंत सावधगिरी असावी. बातमी चहूंकडून राखीत जावी. मोर्चे उठल्यास पंधरा वीस दिवस होत आले. फौज टिपूची उतरली आहे तेथेंच आहे किंवा पुढें मागें जाहली हें कांहीं कळलें नाहीं.

---

१ नानाफडनविसांनीं परशुरामभाऊंस पत्र लिहिलें त्याची पुरवणी. २ टिपूकडचे टपालखात्याचे अधिकारी ३ वकील टिपूचे. ४ पेशवे सरकारची. ५ कोड्याळ म्हणजे मंगलोर. तेथें दोन वर्षांपूर्वीं इंग्रजांचा वेढा पडला असतां तेथच्या सरदारांनीं टिपूकडून कुमक येण्याची वाट न पहातां घाबरून इंग्रजांस किल्ला दिला; मागून टिपूनें त्या सरदारांस फांशीं दिलें; या गोष्टीस अनुलक्षून हें लिहिणें. ६ वेढा. ७ टिपूची.

लिहून पाठवावें. तुम्हीं आपलेकडून कजियाची गोष्ट करूं नये. त्याचे मुलखास तसदी देऊं नये. पुढें त्यास काय कर्तव्य आहे तें समजल्यावर तसें पाऊल टाकावें. अखेरीचे दिवस आले यामुळें टाळा द्यावा लागतो. असो. जैसें दृष्टीस पडेल तैसें करितां येईल. काळोपंतार्चीं मुलेंमाणसें व आणखी ब्राह्मणमंडळी तेथें असतील तीं झाडून काढावीं. फक्त किल्ला, तेथें लढवाई सरदार व माणूस सरंजाम इतकें मात्र असावें. येविशीं पूर्वीं लिहिलेंच आहे, त्याप्रमाणें केलेंच असेल. आपले ऐकण्यांत तिकडील बातमींत काय आहे तें लिहून पाठवावें. रा। छ० १ जमादिलाखर हे विनंती.

नं. २८२१. ( अधिक चैत्र शु० ७—१७ मार्च. )

काळोपंतांचें[1] परशुरामभाऊंस पत्र. पै॥ छ० ७ जमादिलावल खमस समानीन.—

" आज नऊ रोज जाले. उत्तर न आलें. आपण ' उपराळेविशीं फिकीर न करावी, येऊन पोंचतों,' असें लिहिलें, तें वचन दृढ धरून मार्ग लक्षीत आहों. त्वरेनें येऊन पोंचावें. विलंब न व्हावा. गांवांतून दाणे व कडबा झाडून गनिमानें नेला. सहा तोफा येथें ठेविल्या आहेत. मोर्चे कायम आहेत. लष्करांत वरकड तोफा व बार जमा करून सावधगिरीनें आहेत. ( त्यांनीं ) बुनगें नवलगुंदास ठेविलें. येऊन गांठ घालण्याचा समय उत्तम आहे. आपणास काय निमित्त विलंब जाला न कळे. यावर पत्र पावतांच येऊन पोंचावें. आपणास मोठें यश येतें. काम फत्ते होतें. त्वरा करावी. तीं[2] ठायीं वांटणी जाली आहे. आपलें आगमन जालें म्हणजे शत्रूचा धर सुटोन रानोमाळ होतात ! सडे स्वारीनिशीं सत्वर येऊन पोंचावें. "

---

१ नरगुंदच्या किल्ल्यांतून काळोपंत पेठ्यांचें पत्र. २ तीन ठिकाणीं शत्रूची फौज वांटली गेली आहे.

नं. २८३३. श्री. (अधिक चैत्र शु० ११–२१ मार्च.)

पै॥ छ० ११ जमादिलावल सन खमस.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं—

पो॥ बाळाजी जनार्दन. सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. " नरगुंदास टिपूचे मोर्चे लागले आहेत. संस्थान सरकारचे पदरचें. याजकरितां आपण बाहेर निघावें व फौज जमा करावी. रा॥ गणेशपंत येथून फौज देऊन रवाना केले आहेत. आपणास सामील होतील. " म्हणोन पूर्वीं आपणास उलगडून लिहिलें होतें. त्याजवरून आपण बाहेर निघालां. फौजही जमा होत आहे. गणेशपंतही आपले लिहिल्याप्रमाणें कृष्णेचे उत्तर तीरीं राहिले. त्याजवर आपलीं पत्रें आलीं कीं, " बाहेर निघालों. त्यास याउपर उपेक्षा कामाची नाहीं. सरकारचा नक्षा राहत नाहीं. " त्याजवरून येथून लिहिलें कीं, " मोठा मनसबा आहे. करणें तेव्हां पक्केपणेंच केला पाहिजे. याजकरितां तूर्त आपण आहेत तेथेंच असावें. मागाहून सविस्तर लिहून पाठवूं त्याप्रमाणें करावें; " म्हणोन पूर्वीं पत्राचें उत्तर पाठविलें. त्यास टिपूचा वकील येथें आहे त्यासीं निक्षूण सरकारचें बोलणें जालें. त्याणें रास्ते यांशीं करार केला आहे कीं, येका महिन्याअलीकडे महसरा नरगुंदचा उठवितों. असें बोलून वकिलानीं टिपूकडे निकडीचीं पत्रें रवाना केलीं आहेत. कराराप्रमाणें फौज उठून गेली तर बरेंच जालें. नाहीं तर मग त्याचा विचार करणें प्राप्तच आहे. तोंपर्यंत आपण आहेत तेथेंच असावें. पुढें जाण्याचें करूं नये. नरगुंदकरांस आपलीं पत्रें जावीं जे, ' तुम्ही दम

धरून हुशार राहणें.' असें ल्याहावें. इतक्यांत याच्चाही जाबसाल समजेल त्याप्रमाणें पुढें विचार करून लेहून पाठवूं. सविस्तर राजश्री विसोजीपंत यांसीं बोलण्यांत आलें आहे. लिहितील त्याजवरून कळेल; आमचा दस्ताऐवज धरून आपण लिहितां तें प्रमाण. परंतु आपण बाहेर निघावें, गणेशपंतास आपणाकडे पाठविलें या दबावानें काम व्हावें, दुसरें—पुढें प्रसर करूं न पावत, असे कितेक अर्थ समजून लिहिलें. हे अर्थ आपलेही ध्यानांत आलेच असतील. दिवस पडले अखेरीचे. जें करणें तें पोक्तपणें केल्यास चांगलें, असें समजून या विचारांत आहों. तोंपर्यंत वकिलाचेंही बोलणें व टिपूचें करणें समजेल; त्यासारखें आपणांस लिहून पाठवूं. रा। छ० ९ ज॥ वल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. २८२३. ( अधिक चैत्र शु० १९—२१ मार्च. )

आपाजी गोविंद सखदेव यांचें लष्करांतून ता० १० जमादिलावलचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस. मुक्काम ढवळेश्वर घटप्रा उत्तर तीर येथून—

" श्रीमंत राजश्री भाऊ साहेब यांचा मुक्काम काल हलिंगली परगणे तेरदाळ येथें होता. आज तेथून कूच होऊन लोकापुरचे सुमारें जाणार आहेत. श्रीमंत राजश्री दादा साहेब व रा॥ गणेशपंत बेहेरे वगैरे सर्व येथें आहेत. उभयतांच्या भेटी काल जाल्या. गणेशपंत दादांचे डेऱ्यास आले होते. येथें दहा हजार फौज जमली आहे. आज येथें मुक्काम जाहला आहे. येथून सडे व्हावयाच्या मसलतींत आहेत. नरगुंदाकडील वर्तमान—भृगुवारीं आणखी हल्ला शत्रूकडील लोकांनीं केली होती. त्यास आंतील लोकांनीं हल्ला मारून काढिली. बाहेरील मोर्चे होते ते आंतील लोकानीं जाळून गडावर गेले. "

---

१ तुमचा वकील वाडेदकर यांसीं.

नं. २८२४. ( अधिक चैत्र व० ३—२८ मार्च. )

लष्करांतून परशुरामभाऊंचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै॥ १९ जमादिलावल.

" काळोपंत याचे पत्रांतील भाव किंचित दम कमीसा दिसोन आल्यावरून चिरंजीव राजश्री दादा व राजश्री गणेशपंत बेहेरे यांची रवानगी सडयां फौजेनिशीं केल्याचा मजकूर पेशजी विस्तारें लिहिलाच आहे. त्यास चिरंजीव व मा॥निल्हेसुद्धां नरसापूरनजीक रामदुर्ग दोन अडीच कोस येथें मुक्कामास गेले. पुढें मलप्रहेरेवर जाण्याविशीं लिहिलें आहे. बारीपलीकडे तलाव्यास फौज रवाना केली म्हणून चिरंजीवांचें पत्र आलें होतें. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार मनोळीच्या मुक्कामास गेले. एक दोन रोजीं भंडी कणवीच्या बारीपार होतील. आम्ही छ० १५ जमादिलावलीं बेळगांवाहून कूच करून घटप्रभा उत्तर तीर नजीक चनाल तालुके मुधोळ येथील मुक्कामीं आलों आहों. पुण्यांच्या पत्रांत 'विसा दिवसांचा करार जाहला' म्हणून लिहिलें, आपणाकडील व दादांकडील बुनगें मागें अर्ध कोसावर राहिलें. परंतु तोंपावेतों किल्लेकरी दम धरितात किंवा नाहीं हें कशावरून ? किल्ला अलीकडेच गेला तर मग करार करून फळ काय ? यास्तव चिरंजीवास फौजसुद्धां बारीपार जावें म्हणोन लिहिलें आहे. रामदुर्गास काल गेले नाहींत, आज जातील तर न कळे."

नं. २८२५. ( अधिक चैत्र व० ४—३० मार्च. )

सडया स्वारींतून आपाजी गोविंद सखदेव यांचें मुक्काम रामदुर्ग नजीक येथून बाळासाहेबांस पत्र छ० १८ जमादिलावलचें—

---

१ रघुनाथराव कुरंदवाडकर. २ वीस दिवसांत नरगुंदचा वेढा उठवितों असें टिपूच्या वकिलानीं कबूल केल्याचें नानाफडनविसानीं आम्हांस लिहिलें.

" श्रीमंत राजश्री दादासाहेब नरसापुराहून कूच करून आज येथें संध्याकाळीं येणार. राजश्री गणेशपंत बेहेरे, रास्ते वगैरे काल रामदुर्गचे उत्तरेस येऊन उतरले आहेत. काल आम्ही व व्यंकटराव घोरपडे बारीपलीकडे तळाव्यास गेलों होतों. स्वार पुढें नरगुंदापासून दोन कोसपर्यंत गेले होते. इकडील फौज किल्ल्यावरील लोकांच्या दृष्टीस पडली. आम्हांकडील पेंढारी याणीं शत्रूकडील कहींचीं तट्टें पंचवीस तीसपर्यंत व बैल शंभरपर्यंत आणिले. शत्रूनें थोर तोफा व झाडून बुनगें धारवाडास लावून दिलें. मोर्चे अद्यापि कायम आहेत. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यादवाडापलीकडे घटपातीरीं आहेत. "

नं. २८२६ ( अधिक चैत्र व० ५–३१ मार्च. )

सडी स्वारी मुक्काम रामदुर्ग येथून आपाजी गोविंद याचें बाळासाहेबांस पत्र छ० १९ जमादिलावलचें—

" नरगुंदांत शत्रूकडील मोर्चे बसले होते ते परवां चतुर्थी भौमवारीं पहांटेस मोर्चे उठले. झाडून जमावसुद्धां नरगुंदापलीकडे बेग्गीहाळावर कूच करून गेले. याप्रमाणें किल्ल्यावरून राजश्री काळोपंतांचें पत्र आलें. ईश्वरें त्यांजवर बहुत कृपा केली. श्रीमंत राजश्री दादासाहेब[1] नरसापुरावर होते ते काल संध्याकाळीं येथें आले. गणेशपंतही आले आहेत. आज झाडून फौज बारीपलीकडे तळाव्यास जात आहे. नरगुंदापावेतों जातात किंवा काय तें पहावें. आम्ही व व्यंकटराव[2] घोरपडे ऐसे पुढें आलों होतों. चार दिवस जाहले. भौमवारीं आम्ही उभयतां बारीपलीकडे तळाव्यास जाऊन सूर्यबनाजवळ उभे राहून पुढें एक हजार फौज कोरी गोवनकोपेपर्यंत पाठविली होती. तेथून नरगुंद अडीच कोस होतें. तेथें फौज एक घटका उभी होती.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर. २ सोंडूरकर. ३ सोंडूरकर.

किल्ल्यावरून ही फौज गेलेली पाहून तोफांचे बार केले. मग आम्ही माघारे गोटास आलों. त्यांचे फौजेंत फार गडबड जाहली होती. कालचा मुक्काम त्यांचा अगरगोळावर होता. आज तेथून कूच जालें कीं नाहीं हें कळलें नाहीं. "

नं. २८२७ ( अधिक चैत्र व० ९—३ एप्रिल. )

बाळासाहेबास आपाजी गोविंद यांचें पत्र छ० २२ जमादिलावलचें सडीस्वारी मुक्काम रामदुर्ग येथून—

" वेढा उठल्यानंतर पत्र पाठविलेंच आहे. शत्रूचा मुक्काम अद्यापि बेण्णीहाळावरच आहे. त्यांजकडील स्वार छबिन्यास नरगुंदाजवळ उभे राहत असतात. बेदडे त्यांजकडील नरगुंदा-अलीकडे तीन कोस फिरत आहेत. आमचीही फौज बारीपलीकडे तलाव्यास नेहमीं जात आहे. इकडील पेंढारी यांस बारीपलीकडे जावयास निरोप होत नाहीं, याकरितां शत्रूकडील स्वारांची गांठ पडत नाहीं. श्रीमंत राजश्री दादा व गणेशपंत झाडून फौजेनिशीं तलाव्यास गेले होते ते दिवशीं रामापा किल्ल्यावर जाऊन सर्वांस भेटून आला. इकडील कहीचीं तट्टें चाळीस पन्नास बेदडयांनीं पाडून नेलीं. कांहीं बेदडे बदामीस व मुदलावीस कहीचे लागावर येऊन राहिले आहेत. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब मुधोळानजीक आहेत. "

नं. २८२८ श्री. ( अधिक चैत्र व० १०—६ एप्रिल. )

पै ॥ छ० २८ जमादिलावल. खमस समानीन. अधिक चैत्र वद्य अमावास्या. मंदवार.—

पुरवणी राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेशीं.

---

( ३९२२ )

## श. १७०७ टिपूची नरगुंदावर स्वारी. इ. स. १७८५

विनंति उपरी. नरगुंदचा वेढा उठला ही गोष्ट चांगली जाहली. फौजेचा शह बसला याजमुळें वेढा उठला यांत संदेह नाहीं. पुण्यांत वकिलांशीं बोलणें होतें. त्याणीं पट्टणास लिहिलें होतें. वेढा उठवितों म्हणून कबूल केलें होतें. त्यास कजिया करावयाचा नसला तरी ' आम्हींच वेढा उठविला. ' म्हणतील. कजिया करावयाची सुरत टिपूची असली तर त्याचा प्रकार वेगळाच दृष्टीस पडेल. याजकरितां तूर्त आपण होऊन त्याचे फौजेशीं कजिया करूं नये व त्याचे मुलखांत काडीमात्र दंगा करूं नये. याचें कारण दिवस अखेरींचे आले, याजकरितां चार महिने टाळा द्यावा असें मनांत आहे. बाजतबरसात जसें पाहूं तसें करावयास येईल. आपली फौज रामदुर्गाजवळ गेली आहे ती तेथेंच असों द्यावी. आपला मुक्काम आहे तेथेंच असावा. काळोपंतानीं मुलेंमाणसें व ब्राह्मण लोक किल्ल्यावर असतील ते झाडून बाहेर काढून मिरज प्रांतीं रवानगी करावी. किल्ल्याचा बंदोबस्त चांगला राखावा. पुढें टिपूचें पाऊल कसें पडतें हें समजेल त्याप्रमाणें करावयास येईल. सर्व अर्थ आपणास कळावे म्हणोन उलगडून लिहिले आहेत. वेढा उठला हें वर्तमान येथें वकील आहेत त्यांस कळेलच. त्याजवर ते काय म्हणतात; पट्टणास कागद गेले आहेत याचा जाब काय येतो, हें समजल्यावर आपणास लिहून पाठवूं. मोर्च्यास फौज होती ते मुक्काम करून राहिली असेल. त्यांशीं कजिया करूं नये. ते काय तेथेंच मुक्काम करितात, किंवा कूच करून जातात, हें वर्तमान वरचेवर लिहून पाठवीत जावें. रामदुर्गाजवळ आपली फौज राहील त्याणीं सावध बातमी राखोन असावें. नरगुंदची ब्राह्मणमंडळी अतःपर तेथें ठेवूं नये. येविशीं आळस करूं नये. काळोपंतानीं किल्ला लढवावयाची शर्त केली. बायका, मुलें, ब्राह्मण, कोणी ठेवूं नये. रा॥ छ० २९ जमादिलावल. हे विनंती.

नं. २८२९ श्री. (अधिक चैत्र व० १३–७ एप्रिल.)

पै॥ छ० २९ जमादिलावल. खमस समानीन. चैत्र शु॥ १ रविवार.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री परशुरामपंत भाऊ स्वामीचे सेवेसीं. पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष, आपण छ० १९ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. "नरगुंदास शत्रूचा वेढा बसला होता. त्यास सडी फौज घेऊन उभयतां सरदार[1] तलाव्यास गेले होते, त्याजवरून शत्रूचे फौजेस वाटलें कीं, आपला टिकाव होणार नाहीं; त्याजवरून छ० १७ मिनहूस रात्रीं मोर्चे उठवून बेण्णीहाळावर येऊन राहिले; म्हणोन राजश्री काळोपंताचें पत्र त्यांचे बंधूस आलें" म्हणोन लिहिलें, व "नरगुंदचा मोठा नक्ष जाहला. आपण फौजेची रवानगी कृपा करून केली म्हणोन स्थळ राहिलें." तें सर्व कळलें. त्यास नरगुंदचा वेढा उठला, मोठी गोष्ट जाहली. ईश्वरें आपणास यश दिलें. चांगलें जाहलें. या उपर आतां आपलेकडून आगळीक होऊं नये असें करावें. पुढें फौज गेली आहे त्याणीं एक मजल माघारे येऊन तेथें मुक्काम करावा. आपण आहेत तेथेंच असावें. येणेंकरून टिपूस बोलावयास जागा आहे. त्याचा उपर चढावयाचा नाहीं. याजकरितां त्याचे प्रांतास वगैरे कोणेविशीं आपले कडील फौजेचा उपद्रव न लागे असें करावें. टिपूची फौज बेण्णीहाळावर राहिली आहे, त्यास त्याची चाल पुढें काय आहे, तेथें राहून पुढें मनसवा करणार किंवा माघारे जाणार, हेंही समजेल. वेढा उठला हें वर्तमान टिपूस कळल्यानंतर उगाच

---

१ रघुनाथराव पटवर्धन कुरुंदवाडकर व गणेशपंत बेहरे.

राहतो किंवा उद्योग करितो हें समजेल. दुसरें, येथून टिपूकडील वकिलानीं पंचवीस दिवसांचा करार करून पत्रें पाठविलीं आहेत त्यावरून त्याणीं आपले फौजेस लेहून वेढा उठविला, किंवा फौजेचे शौरतीनें उठला, हेंही समजेल. त्याजसारखा पुढें विचार करणें तसा करावयास येईल व त्याअन्वयें आपणास लेहून पाठऊं. जर फौजेच्या शौरतीनें वेढा उठला असें आहे तर टिपू हा वेळ उगाच राहील असें वाटत नाहीं. त्याजकडील वांकडी चाल दृष्टीस पडल्यास मग तैसें करावें लागेल. परंतु आपलेकडून कलागत वाढवूं नये, याजकरितां लिहिल्याअन्वयें फौजेस तार्कीद असावी. दुसरें, नरगुंदावर काळोपंताचीं माणसें व आणखी कोणी ब्राह्मण वगैरे कोणी असतील त्याणीं याउपर किल्यावर राहूं नये. मिरज प्रांतांत जावें. किल्यावर लढवाई सरंजाम व एक दोन सरदार याप्रमाणें ठेवावें. काळोपंतानीं वर राहूं नये. याप्रमाणें करावें. येविशींचा मजकूर सविस्तर सांडणीस्वाराबरोबर पत्र पाठविलें त्यांत लिहिला आहे त्याजवरून कळेल. टिपूचे फौजेची बातमी राखून लेहून पाठवावें. ‘ आपण कृपा करून फौज पाठविली याजमुळें स्थल राहिलें ’ म्हणोन आपण लिहिलें, त्यास आपण तेथें होते म्हणून शत्रूस शौरत पडून कार्य जाहलें. आपणास यश आलें, संतोष जाहला. अदवानीकडे फौज पाठवावयाचें लिहिलें, त्यास तूर्त आपण इकडील शह सोडून तिकडे गेले असतां कसें घडेल येविशीं मागाहून लिहून पाठवूं त्याप्रमाणें करावें. या समयीं आपण मसलतीनें उतावळी न करितां चांगलें केलें. याउपर किल्यावर आप्तविषयी मुलें मनुष्यें काळोपंतसुद्धां कोणी राहूं नये. लढवाई सरंजाम व सरदार व लोक मात्र असावे. रवाना छ० २६ जमादिलावल. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. २८३० श्री.( अधिक चैत्र व० १३ ७ एप्रिल. )

पुरवणी राजश्री परशुरामपंतभाऊ स्वामींचे सेवेशीं—

विनंति उपरी. नरगुंदचा मजकूर रास्त्यांशीं व टिपूच्या वकिलांशीं बोलत होतों. त्यांची लिहिलीं टिपूस जात असत. त्यास नरगुंदास सरदार आला आहे त्याचें पत्र वकिलांस आलें कीं, "पट्टणाहून पत्रें आलीं त्याजवरून मोर्चे उटविले. पुढें पट्टणाहून आज्ञा येईल त्याप्रमाणें करूं." दुसरें, पट्टणाहून टिपूचें पत्र वकिलास आलें त्यांत लिहिलें आहे कीं, "श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा स्नेह राखणें, त्यापक्षीं वेढा उठवावयाचा हुकूम पाटविला;" याप्रमाणें लिहिलें आहे. तीं पत्रें आणून दाखविलीं तेव्हां त्यांस सांगत गेलों, त्याणीं लिहिलें, त्याजवरून हे गोष्ट म्हणावयास जाली. आम्हास कजिया वाढविणें नाहीं त्यापक्षीं त्याणीं केलें असेंच म्हणावें. परंतु सरकारची फौज जमा जाली, आपण मोहऱ्यावर गेले, दुरोख शह पुरवणार नाहीं, यामुळें मोर्चे उठवावयाची परवानगी जाहली असेंही दिसतें. असो. तूर्त पेंच तुटला. पुढें जसें पाहूं तसें करितां येईल. नरगुंदचा महसरा उठवावा येविशीं वकिलाशीं कांहीं पैक्याचें बोलणें पडल्यानें बोलिलों आहों, त्याचा निश्चय जाल्यावर लिहून पाठवूं. ही गोष्ट आपणास कळावी म्हणून लिहिलें आहे. जाहिराण्यांत आणूं नये. आपण फौजसुद्धां बाहेर निघाले हें वर्तमान नबाबास लिहून फौज आपणाकडे पाठवावी येविशीं निकड केली; तेव्हां त्याणीं दहा हजार फौज कयामनमुल्क यांजबरोबर सुरापुराजवळ तोफा गारदसुद्धां रवाना केली. आपण लिहितील त्याप्रमाणें अनकूल व्हावें याप्रमाणें ठरोन भागानगराहून पत्रें येथें आलीं. आपल्याकडे परभारीं पत्रें आलींच असतील.

---

१ नानाफडनवीस यांजकडून परशुरामभाऊंस पत्र. २ निजामअल्लीस.

आपण त्या सरदारांस व नवाबाकडे स्नेहाचीं पत्रें पाठवीत जावीं. वर्तमान लिहीत जावें. एक बाजारू वर्तमान येथें आहे कीं, सरकारची फौज नरगुंदचे कुमकेस निघाली याजकारितां दहा हजार फौज त्यांनीं पट्टणाहून रवाना केली, खासाही निघणार, याप्रमाणें बोलतात. तथ्य नाहीं. परंतु आपणही बातनी चांगली राखावी. त्याणीं महसरा उठविल्याचीं पत्रें वकिलास पाठविलीं त्यापक्षीं असें करणार नाहींत. तत्रापि नवजवानी आहे. कोणेसमयीं काय करील कळत नाहीं. याजकरितां पक्की बातमी येई तोंपर्यंत सावध चहूंकडील बातमी राखोन असावें. रवाना छ० २६ जमादिलावल. हे विनंती.

नं. २८३१. ( अधिक चैत्र व० ३०–९ एप्रिल. )

लष्करांतून परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र. २८ जमादिलावलचें—

“ शत्रूकडील[1] फौज बेण्णीहाळावर होती तेथून बुधवारीं कूच करून खालते बदामीचे रोखें पूर्वेस हदलीचे मुक्कामीं गेली. काय मसलत आहे कळत नाहीं. मुदलाविकडील जमावापैकीं कांहीं बेदडे वगैरे हजार पांचशें लोक आमच्या लष्करापासून तीनचार कोसांवर येऊन चिरंजीव राजश्री दादा यांचे लष्करास इकडून जाणारावरी हुलड करून एक दोघे जखमी केले व एक दुसरें तट्टूही नेलें. हें वर्तमान आम्हांस कळतांच चिरंजीव राजश्री गणपतराव व आपा यांस काल त्या रोखें फौजसुद्धां पाठविलें होतें, परंतु बेदड्यांची गांठ पडली नाहीं. ते पळून गेले. रा. त्रिंबकराव रेटरेकर यांस हजार फौज देऊन बन्नुरानजीक रहावयास पाठविले आहेत. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांजवळ तीनचार हजार फौज आहे. प्रस्तुत मनोळीकडे

१ टिपूनें.

कांहीं कामही नाहीं; यास्तव त्यांस बन्नुराचे मुक्कामास आणविले आहेत. पुण्यास पत्रें निकडीचीं गेलीं आहेत परंतु उत्तरें लवकर येत नाहींत याचें कारणही समजत नाहीं. शत्रचा जथ दिवसेंदिवस भारी पडतो. एक वेळ पारिपत्य जाल्याशिवाय ताळ्यावर येणार नाहींत. यास्तव त्यांजकडील जमाव मुदलावींस आला आहे त्याचें पारिपत्य करण्याविषयीं चिरंजीव राजश्री दादा व गणेशपंत यांस लिहिलें आहे."

नं. २८३२. ( चैत्र शु० १-१० एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र छ० २९ जमादिलावलचें, रामदुर्गाहून—

" शत्रूकडील जमावाचा मुक्काम मेणसंगीवर होता तेथून आज प्रातःकाळीं कूच करून हंपीहोळी व आडरवादी—मलप्रहरा तीरीं बारीपासून दोन कोस—तेथें मुक्काम जाला. येथून तीन कोस आहे. आज फौज तयार होऊन बारीपर्यंत गेले होते. तेथून पुढें हजार स्वार गेले होते. त्यांची व यांची कांहीं थोडीशी गोळागोळी जाहली. उदईक प्रातःकाळीं बारीचे तोंडीं इडकल नरगुंदकरांचा गांव आहे तो घेऊन ( ते ) बारी धरणार. यानंतर येथें रहावायाचें होत नाहीं. उदईक येथून कूच होणार. कोणीकडे जाणें घडतें पहावें ! शत्रू तो चालून पुढें येत आहे ! "

नं. २८३३. ( चैत्र शु० २-११ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र छ० १ जमादिलाखरचें घटप्रभा दक्षिणतीर नजीक मुधोळ येथून—

" त्रिंबकराव रेटरेकर व जनोबा सुभेदार यांस बन्नुरास ठेविलें होतें. त्यांस आज शत्रूच्या फौजेच्या रोखें तलाव्यास जावयाविशीं लिहिलें आहे. शत्रूची गांठ पडल्यासही चिंता नाहीं. दोघांजवळचें सामान पोक्त

आहे. शत्रूची फौज बेण्णीहाळावर होती ती किल्ल्याकडील[1] मेणसंगी वगैरे दोन तीन ठाणीं घेऊन त्यांतील कांहीं लोक जिवें मारून व कांहीं कैदेंत ठेऊन चार दिवसांपूर्वीं रामदुर्गाचे बारीपलीकडे तीन कोसांवर आवारवादी येथें मलापहारी किनाऱ्यास आली. त्यांजवर चिरंजीव राजश्री दादा व गणेशपंत चालून गेले आहेत. गांठ पडली किंवा नाहीं हें कळत नाहीं. पुण्याचे पत्रीं ( नरगुंदचे ) मोर्चे सलुखानें उठले असें लिहिलें आहे, परंतु त्याची चाल पहातां तो प्रकार दिसत नाहीं ! यांस मात्र भरंवसा वाटतो ! चिरंजीव राजश्री दादा याचे विचारें आम्हीं पुढें यावें. त्यावरून एक दोन दिवसांत कूच करून मुधापुरास जात आहों. किल्ल्यावरील कचरा व ब्राह्मण मंडळी झाडून काढावी म्हणून कारभारी लिहितात, याचा अर्थ समजत नाहीं ! शत्रूच्या मतें इडगल घेऊन बारीचा बंदोबस्त करून मग मागाहून कोपळास सरंजाम आला आहे त्यासुद्धां पुनः किल्ल्यास बसावें असें आहेसें दिसतें. "

नं. २८३४. ( चैत्र शु० २-११ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० ३ जमादिलाखर—

" पुण्याहून पत्रें ' कलागत करूं नये. ' अशीं वरचेवर येतात, शत्रु तर बेजरब चालून यावयाच्या मनसब्यांत आहे ! त्याप्रमाणें दृष्टीसही पडतें. आज पावेतों कारभारी[2] यांचे लिहिण्यावरून सबुरी केली. हल्लीं माघारें सरकावें तर लौकिकांत चांगलें नाहीं, कलागत करावी तर तहांस पेंच पडतो, असा प्रकार बनला आहे ! कांहीं सुचत नाहीं. श्रीगजाननाचे कृपेंकडून घडेल तें खरें ! "

---

१ नरगुंदच्या किल्ल्याकडील. २ नानाफडनवीस यांस,

नं. २८३५. ( चैत्र शु० ४–१३ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० ५ जमादिलाखर.

" आज गुरुवारीं चौदा घटका दिवसास अमित्राची फौज तयार होऊन बारीचे तोंडीं आली म्हणून चिरंजीव राजश्री रघुनाथ राव दादांनीं चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदारांस लिहिलेली चिठीच पाठविली आहे. पाहून पुढें पुण्यास रवाना करावी. आम्ही आजच सडे होऊन पुढें जाणार होतों. परंतु दिवस बरासा नाहीं. उदईक शातवार. यांत त्यांचें पत्र निकडीचेंच आलें तर चांगली वेळ पाहून सडे होऊन पुढें जातों. त्यांचें पत्र प्रहर रात्रीस आवशीचें आम्हांपाशीं आलें. येथें पाऊस पडत आहे. उघडलियावरी निघतों. शत्रूस दोन तीन हजार फौज व तोफा सामील जाल्या म्हणून नरगुंदाहून पत्र आलें. त्याचा जमाव वरचेवर येतच आहे. याउपर उपेक्षा करीत नाहीं. गांठ घालतों. मग श्रीगजानन आहे ! "

नं. २८३६. श्री. ( चैत्र शु० ६–१४ एप्रिल. )

पै॥ छ० १० जाखर. खमस समानीन. चैत्र शु॥ एकादशी. बुधवार. अडीच प्रहर दिवस.

सेवेशी विसाजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ४ जमादिलाखरपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० २३ जा॥वलचीं पत्रें पाठविलीं तीं छ० २९ मिनहूस रविवारीं सायंकाळीं पावलीं. " तुम्हाकडील उत्तरें लौकर येत नाहींत. वेढा उठोन पंधरा वीस रोज जाले. नाहक खर्चाखालीं यावें. किल्ल्याची पेठ शत्रूनें घेतली ते दिवशीं गांवांतील बंद धरून धारवाडास रवाना

---

१ वाडदेकर वकील यांचें पुण्याहून परशुरामभाऊंस पत्र. २ नरगुंद किल्ल्याचा.

केला व लष्करांतही आहे त्याची सुटका होऊन व त्यांजकडील गांव खेडीं घेतलीं आहेत तींही सुटावीं, तह जाला त्यापक्षीं त्यास स्वारी शिकारी करितां नये. आणि ही[3] फौज तुंगभद्रापार जावी, तरच नरगुंद राहील. ' टिपूकडील वकील तेथें[4] आहेत ते म्हणतात जे, नरगुंद खेरीजकरून सरकारतालुक्यांत चिळ्याचपाळ्या केल्या नाहींत ' म्हणोन ( तुम्ही ) लिहिलें होतें, त्यास करवीरकर व तोरगलकरांस ( टिपूचीं ) पत्रें आलीं आहेत तीं त्यानीं आम्हांकडे पाठविलीं आहेत. मागाहून पाठवून देतों. कित्तूरकर देसाई यास टिपूचें पत्र आलें त्याची नक्कल पाठविली आहे. अस्सल पत्र पाहिजे असल्यास पाठऊन देऊं. किल्ल्यावर निकारणी माणूस व गुरें व घोडीं बहुतच आहेत, पाण्याचा तोटा, सबब काढून आणावयास श्रीमंत राजश्री दादास व राजश्री गणेशपंत यास लिहिलें आहे. याच अन्वयें राजश्री नानास पत्र लिहून पाठविलें आहे तरी प्रविष्ट करून पेशजीच्या व हल्लींच्या पत्रांचीं उत्तरें लौकर घेऊन पाठविणें " म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें पत्र पावतें केलें. टिपूचें पत्र ( नानानीं ) वाचून पाहिलें. नानानीं उत्तर दिलें तें पाठविलें आहे त्याजवरून कळेल. किल्ल्यावरील घोडींगुरें माणसें आणविलीं हें फारच उत्तम केलें म्हणोन नाना बोलिले. वरकड कुटुंबें देखील राजश्री काळोपंतसुद्धां उतरून आणवावे. वर एक सरदार लढवाई सामान याप्रमाणें ठेऊन काळोपंतानीं देखील वरें राहूं नये याप्रमाणें नानाचें म्हणणें आहे. शत्रूचे वकील येथें[5] रास्ते यांचे विद्यमानें बोलतात, परंतु बोलणें हरदमख्याली दिसतें. निखालसपणें बोलोन ठरावांत आलें असा अर्थ नाहीं. आज बोलले तर उद्यां दुसराच पक्ष बोलण्याचा पडतो असा विचार आहे. हे[6] मागें घेतात ही

---

१ नरगुंदकरांचीं. २ टिपूस. ३ हल्लीं टिपूची फौज आली आहे ही. ४ पुण्यास. ५ रघुनाथराव कुरुंदवाडकर. यांस ' श्रीमंत ' हें उपपद वकिलानें लावलेलें. ६ नाना फडनवीस.

मसलत कोणाचे खातरेस येत नाहीं, परंतु उपाय नाहीं ! ' त्याज-कडील फौज बातेम्या बांधोन आहेत. आणखी जमाव येत आहे. जमियत व्हावयाकरितां एकीकडे जाऊन राहिले आहेत ऐसा विचार दिसतो; ' म्हणोन नानाचे पत्रीं स्वामीनीं लिहिलें ही गोष्ट खरी. येथेंही आंचीवाल्यांची बातमी आली त्यांत हाच भाव आहे. आणखी बातम्या आहेत. स्वामीनीं चहूंकडील बातम्या राखून बहुत सावध-गिरीनें असावें. पुढील फौजेस वरचेवर आज्ञा जात असावी. सावध-गिरीविशीं नाहक फौजेचा खर्च वाढवीत बसावें लागतें म्हणोन लिहिलें, त्यास विना बोलणें तुटक किंवा सल्ला जाल्याविना माघारें फिरणें हेंही ठीक नाहीं. याजकरितां येथून उत्तर स्पष्ट जाई तोंपर्यंत स्वामी आहेत तेथेंच असावें, कलागत वाढवूं नये, येविशीं उभयतां[1] कारभारी यांचे वारंवार सांगणें आहे. याजकरितां विनंती लिहिली आहे. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८३७. ( चैत्र शु. ७– १५ एप्रिल. )

लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस पत्र आपाजी त्रिंबक पोंक्षे यांचें ५ जमाखर्चे—रामदुर्गाहून.

" अमित्र बारीआंत आला. गोळागोळी चांगली जाली. दहा-वीस घोडे पडले, व माणूसही दहावीस जायां जालें. आमची फौज तोंडावर ठासून उभी होती, म्हणून अमित्र फिरून माघारा बारीचे बाहेर गेला. एकदां त्यास गांठून त्याचा रेंच मोडल्याशिवाय त्याची गुर्मी जिरणार नाहीं ! "

नं. २८३८. श्री. ( चैत्र शु. ८–१७ एप्रिल. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेसीं पोष्य परशुराम रामचंद्र. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी

---

१ नाना व हरिपंत तात्या.

येथील कुशल तागायत छ० ७ जमादिलाखरपावेतों जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण छ० १ जमादिलाखरचीं पत्रें पाठविली. तीं छ० ५ जमादिलाखरीं तिसरे प्रहरीं पावलीं. तेथें लिहिलें जे " टिपूकडील आंचीवाले नरगुंदावरच लष्कर आहे त्यांत आहेत त्यानीं तेथें वकील आहे त्यास पत्र लिहिलें असेल. सरकारची फौज रामदुर्गास आली म्हणोन मोर्चे उठविले असल्यास जी गत कोडयाळ बंदरास सरदार होते त्यांची जाहली तशी तुमची होईल म्हणोन बातमी कळली, व वकिलास टिपूचीं पत्रें आलीं. दोस्ती खातर महसरा उठविला म्हणोन आलीं असतां मागाहून याप्रमाणें बातमी येते. तस्मात् काईम मिजाज नाहीं याकरितां आपण फौजेंत सावधगिरी करावी. चहूंकडील बातमी राखीत जावी, मोर्चे उठल्यासही फार दिवस जाहले. फौज टिपूकडील आहे तेथेंच आहे किंवा अलीकडे पलीकडे सरली हें कळविणें. तुम्ही आपलेकडून कजिया न वाढविणें. त्याचे मुलखास उपद्रव देऊं नये. दिवस अखेरीचे, यास्तव टाळा द्यावा लागतो. असो. जैसें दृष्टीस पडेल तैसें करावयास येईल. काळोपंताचीं मुलें माणसें कांढणेविशीं पेशजी लिहिलेंच होतें, त्याप्रमाणें काढलींच असतील. फक्त लढवाई माणूस व सरदार इतके मात्र असावे. येविशीं पूर्वी लिहिलेंच होतें त्याप्रमाणें केलेंच असेल. आपले ऐकण्यांत तिकडील बातमी येईल ती लिहीत असावें. " म्हणून आपण लिहिलें, त्यास इकडील जें होतें तें अधिकोत्तर वरचेवर लिहीतच आहों. टिपूचीं पत्रें सरदारांस आलीं हें आपणास पक्कें समजलेंच आहे. व फौजेंत सरदारांस आल्याचे भावही पक्के समजलेच आहेत. येथें दिसण्यांत तर जसें आंचीवाले यानीं लिहिलें तसेच दिसतात. आज सात आठ दिवस कोसा दीडकोसाचे अंतरानें फौज आहे. मी ही सडा होऊन आज जाणार होतों. परंतु कालचे पत्रीं सर्व टिपूचे

भाव समजले असतांही टाळाच द्यावा म्हणोन ( आपलीं ) पत्रें आलीं यास्तोन राहिलों. तेथें जावें तेव्हां कांहीं खटपट करावी व होईल. ते नाहीं ते पक्षीं जावें कशास, म्हणोन गेलों नाहीं. येथून कूच जाहल्याचीं पत्रें आपणाकडे गेलीं आहेत. आणखीही रवानग्यांचीं पत्रें गेलीं आहेत त्याचे जाब येतील तसें करितां येईल. राजश्री काळाप्पाचीं मुलेंमाणसें निघालीं नाहींत. कांहीं कचरा गोरगरीबांचा आंत होता तितका मात्र निघाला. आज पावेतों मळमळीताखालींच गेलें ! दिवसेंदिवस अखेरीचे दिवस आले. शत्रूचा सरंजाम येतच आहे. कोपळाकडील सरंजाम आला म्हणोन लिहिलें होतें तोही सरंजाम या लष्करांत येऊन बारीस मिळाला. वरचेवर येतच आहे. आपली मागाहून तरतूद कांहींच नाहीं. शत्रूची फौज खटपट करावयाची तो कुरीवच आहे. आम्ही मात्र मागें मागें सरकतों ! हल्लीं हीं पत्रें आल्यावर ( आमच्या सरदारांस ) मागें सरकणें म्हणोन लिहिलें आहे. सरकतील. प्रस्तुत ते बारीचा बंदोबस्त करून बारीपार आम्हाकडील फौज न जाई असें जाहलें, व ते बारीचे तोंडी बातेच्या वगैरे बांधोन विशेष मजबुदी करितात ! याउपर पुढें येतात, किंवा तेथील बंदोबस्त करून फिरोन नरगुंदास मोर्चे देतात, हेंही समजत नाहीं ! बहुतकरून इकडील बातमी तर याप्रकारची आहे. एक दोन पत्रेंही बातमीचीं पहावयास पाठविलीं आहेत त्यावरून कळेल. आज वीस दिवस येथें मुकाम करून आहों. ते आमचे रोखें बारीस दहा कोस आले. आमची फौज दोन कोस मागें सरकली. त्यांचा सरंजाम येतच आहे. आपण आम्हास ' कलह वाढवूं नये, दिवस अखेरीचे आले, म्हणोन लिहितात. नरगुंदचा वेढा मात्र उठे तोंपर्यंत आम्ही येथवर आलों. फौज रामदुर्गच्या बारीस गेली. मोर्चे उठल्याचे कळतांच पुढील फौजेस ' पुढें न जाणें, जाहलें तें काम जाहलें, याउपर त्याचे

तालुकियास उपद्रव न देणें, ' म्हणोन लिहीत गेलों. त्याणीं कही देखील पलीकडे पाठविली नाहीं. अलीकडेच आपल्या प्रांतांत कही भरून स्वस्थ होतों. परंतु तेच येथवर चालोन आले. आपलेकडील तरतूद नाहीं, मोर्चे उठविलेपासून तीन वेळ त्याची फौज आली. आणखीही येत आहे. त्यास वकिलाचे विश्वासावर राहून तरतूद करावयाची नसल्यास तसेंच ल्याहावें. आम्ही मागें सरकोन कृष्णातीरास येऊं. नाहक खर्च खात बसणें हें किमर्थ ! दोन चार वेळां बातमीचीं पत्रें आपणाकडे पाठविलीं आहेत. त्यास त्या पत्रांचीं उत्तरें मळमळीत असल्यास या पत्राची वाट न पाहतां मागें सरकोन कृष्णातीरास येतों. मग आम्हावर शब्द नाहीं ! बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती. ते पुढें येतात, आम्ही उगेच न रहावें; परंतु मागें सरकतों आपला शब्द लागेल यास्तव ! नाहीं तर दुसऱ्या बाऱ्याही आहेत. प्रांत बारीपलीकडे त्याचाच आहे. मारून लुटून टाकतों म्हणजे ही फौज सहजच बारी सोडून जाती ! परंतु ( आपल्या पत्रापुढें ) उपाय नाहीं ! लोभ कीजे हे विनंती.

नं. २८३९. ( चै० शु० ८–१७ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ०९ जमादिलाखर.

" शत्रूच्या सैन्यांत बुरानउद्दीन नांवाचा सरदार मुख्य आहे तो टिपूचा मेहुणा आहे. पंचवीस तीस हजार गाडद व तीस तोफा व आठ दहा हजार स्वार याप्रमाणें सामान पोक्त आहे. "

नं २८४०. ( चैत्र शु०८–१७ एप्रिल. )

आपाजी गोविंद याचें बाळासाहेबांस पत्र छ० ७ जमादिलाखरचें. रामदुर्गाहून—

" चैत्र शु॥ २ इंदुवारीं शत्रु चालोन रामदुर्गचे बारीनें आंत आला. ते दिवशीं गोळागोळी जाहली त्याचा मजकूर पूर्वीं लिहिलाच

आहे. त्यानंतर इंदुवारीं हंपीहोळीहून तयार होऊन बारींआंत आला. इकडील स्वार चौकीस गेले होते यांची त्यांची मारामारी होत आले. ही बातमी कळल्यानंतर श्रीमंत राजश्री दादा व गणेशपंत बेहेरे वगैरे झाडून फौजा तयार होऊन रामदुर्गापुढें नदीवर गेल्या. तों शत्रु सहा तोफा व गाडद पांच सात हजार व स्वार चार हजारपर्यंत घेऊन तोफांची मारगिरी करीत घटकनूर हलगतीपर्यंत नदीतीरीं आले. तोफांचे मारगिरीनें इकडील झाडून फौजेंतील पंधरा सोळा घोडीं ठार पडलीं, व दहावीसपर्यंत माणूसही जायांजखमी जालें. यांप्रमाणें वर्तमान जाहलेवर शत्रु ते दिवशीं माघारा बारीपार पलीकडे होऊन गेला. मग इकडील फौजा मागती पहिला मुक्काम होता तेथेंच राहिल्या. त्यानंतर भौमवार, बुधवार, दोन दिवस तेथेंच मुक्काम जाहला. गुरुवारीं शत्रूचें हंपीहोळीहून कूच होऊन गोणगरापासून पलीकडे उतरलें, आणि त्यानें बारींत चौकी बसविली. आम्हांस त्यांस एक कोसाचें अंतर. याजकरितां ते दिवशीं रात्रीं बुनगें बन्नुरास पाठवून फौजा जीन ठेवून जाग्यावर उभे होतों. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं भृगुवारीं किल्ल्याचे पश्चिमेस येऊन राहिलों. शत्रूकडील स्वार छविन्यास बारीअलीकडे आले. तेव्हां बातमी आली जे, रात्रीं कांहीं गडबड करणार. त्याजवरून रात्रीं जीन ठेवून तयारच होतों. आज तेथून कूच होऊन रामदुर्गचे अलीकडे पाव कोस मुक्काम जाहला. श्री॥ रा॥ भाऊसाहेब मुधोळाहून उद्यां कूच करून बन्नुरास येणार. याउपरी रामदुर्गचे बारींतून पलीकडे जावयाचा काट दिसत नाहीं. मनोळीचे बारीनें अथवा मुदलावीचे पलीकडून होसकेरेचे (?) बारीनें पलीकडे गेल्यास शत्रु बारींतून कूच करील. नाहींतर तूर्त येथून कूच करीत नाहीं. पट्टणाहून नवा सरंजाम वरचेवर येतच आहे. नरगुंदास मागती बसणार. नंतर नरगुंद घ्यावयाचा त्याचा मनसबा

आहे. पुण्याहून तर ' तह जाला ' म्हणोन पत्रें वारंवार येतात ! येथें वर्तमान असें आहे. "

नं. २८४१. श्रीगणपति. (चैत्र शु० ८–१७ एप्रिल.)

राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं—

विनंती उपरी. आम्ही आपले आज्ञेवरून नरगुंदचे मोर्चे उठवावे या अर्थें बाहेर निघालों. मागाहून ( आपलीं ) मळमळीत पत्रें येऊं लागलीं. परंतु हलके हलके येथवरी आलों. सडी फौज पुढें गेली. श्रीमंतांचे प्रतापें किल्ल्याचे मोर्चे उठले. आपल्या फौजेस यशही आलें. नक्षा सरकारचा मोठा जाहला. टिपूकडीलही ' मोर्चे उठविले ' म्हणून आपणास पत्रें आलीं. नरगुंदास टिपूकडील सरदार होते त्यांचीं पत्रें " हुकूम आला त्याजवरून मोर्चे उठविले " म्हणोन पुण्यास वकील आहेत त्यांजकडे गेलीं. मोर्चे उठतांच मागें सरकावें तरी ठीक नाहीं, आपणास मोर्चे उठल्याचीं पत्रें पाठवून जाब येतील तसें करावें, म्हणून येथेंच मुक्काम करून राहिलों होतों. तों शत्रूची फौज चार दिवस तेथें मुक्काम करून होती. उपरांतिक दुसरी फौज येऊन त्यांत मिळालियावरी या रोखें कूच केलें. दरमजल हलके हलके आले. व आपणासही आम्हीं पत्रें पाठविलीं त्याचा जाब आला त्यांत " किल्ल्यावरील ब्राह्मणमंडळीचीं मुलेंमाणसें काढवून फक्त किल्ल्यावरील लढवाई माणूस ठेवून बंदोबस्त करविणें. तिकडील चाल दिसेल तसें लिहीत जाणें. मागाहून लिहूं तसें करणें. " तों शत्रुही चार कोसांवरी पुढील फौज पाठवून आला. किल्ल्यावरील माणसें आधीं काढवावीं तर सलुखानेंच मोर्चे उठले ते पक्षीं चिंता नाहीं, आपलेकडील जाब येतील तसें करावयास येईल, म्हणून काढ-

---

१ परशुरामभाऊंचे नानाफडनवीस यांस पत्र गेलें त्याची ही पुरवणी आहे.

विलीं नाहींत. हल्लीं तर प्रसंग असा पडला. आम्ही येथें मोर्चे उठवावे याअर्थें आलों तें तरी काम जालें. याउपर मागें सरकलों तरी आपण पाठीमागून पुरावा न केला म्हणोन मागें सरकलों असें होईल. आम्हांस तर खर्चास नाहीं व मागील पुरावाही नाहीं, तेव्हां तेथें राहतां येत नाहीं. याचा विचार पोक्त करून उत्तरें यावीं. फौजेस खर्चास नाहींसें जालें म्हणजे मिळणीची फौज कशी राहील ? हेंही ध्यानात आणून आठा दिवसांत उत्तर यावें. तोंपावेतों ते पुढें न आल्यास येथें मुक्काम करून आहोंच. रातबिरात आपले बुद्धीनें बहुत जपून आहों. अघाडीचे फौजेसही सावधतेविशीं लिहितों. तेही सावध आहेत. दोन कोसांचे तफावतीनें आहेत. आम्ही मागें सरकलियावरी गणेशपंतानीं कोठें रहावें हें त्यांस ल्याहावें. खर्चाविशीं लिहीत गेलों त्याचें उत्तरच नाहीं, तेव्हां समजलेंच आहे ! याउपरी बहुत दिवस येथें राहणें होणार नाहीं. तेथें ठराव जाला असल्यास उत्तमच. आपली पंचवीस दिवसांची मुदत होती तीहि जाली. पक्कें ठरलें असेल तसें स्पष्ट ल्याहावें. छ० ७ जमादिलाखर. रविवार प्रातःकाळ. दीड प्रहर दिवस. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती.

नं. २८४२. ( चैत्र शु १०–१९ एप्रिल. )

शिवराव निळकंठ यांचें पत्र कुरुंदवाडाहून बाळासाहेबांस—९ जमादिलाखरचें—

" ती॥ रा॥ भाऊसाहेब सडे होऊन रामदुर्गास जाणार होते तों पुण्याचीं पत्रें 'पुढें न जावें, फौज पुढें गेलेली माघारी आणवावी, म्हणोन आलीं त्याजवरून सडे होऊन जावयाचे राहिले. ती॥ रा॥ दादांस नरसापूर म्हणून रामदुर्गच्या अलीकडे खेडें आहे तेथें मुक्कामास यावयाविशीं भाऊसाहेबानीं लिहिलें आहे. "

नं. २८४३. ( चैत्र शु० ११-२० एप्रिल. )

रघुनाथराव नीलकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र-रवाना १० जमादिलाखर. मुक्काम कुदनाळनजीक यादवाड येथून—

" काल भौमवारीं बन्नुरावर मुक्काम होता. तेथून पुढें तलाव्यास आम्हांस व रा।। व्यंकटराव घोरपडे यांस पाठविलें होतें. आम्ही उपयतां बन्नुरापासून एक कोस पलीकडे सुनदाळ म्हणोन गांव रामदुर्गचें अलीकडे एक कोस, तेथवर गेलों. शत्रूचा मुक्काम बारीपलीकडे होता तेथून कूच जाहलें. त्याची अघाडी सुनदाळाजवळ आली. तेथें एक घटकापर्यंत उभे होतों. तों शत्रूकडील जमाव तोफांसुद्धां चलून आला. तेव्हां आम्ही पाठीमागें सरकत नरसापुराजवळ आलों. शत्रूही जमावसुद्धां चालोन येऊन तोफा लागू केल्या. तेव्हां व्यंकटराव घोरपडे यांजकडील लोक त्यांजवर उठले. तेथें त्यांजकडील दोन चार घोडीं व माणसें जखमी जालीं. शत्रूनें आमच्या तळावर काल मुक्काम केला. इकडील फौजा तेथून निघून काल प्रहर रात्रीस येथें आल्या. आज आणखी तयार होऊन पुढें जात आहेत. शत्रूच्या मनांत इकडील फौजेच्या पाठीवर आणखी एक दोन मजली यावें असें आहे. "

नं. २८४४. श्री. ( चैत्र शु० १२-२१ एप्रिल. )

पै।। छ० १९ जमादिलाखर. खमस.

विज्ञापना. छ० ३ जमादिलाखरचीं पत्रें जोडी पाठविली त छ० ११ जमादिलाखरीं गुरुवारीं प्रातःकाळीं पावली. " राजश्री गणेशपंत बेहरे यांचें पत्र व काळोपंत याचीं पत्रें आम्हास आलीं तींच बाजिन्नस पाठविलीं आहेत, तरी राजश्री नाना यांस दाखवावीं. पेशजी

---

१ विसाजी नारायण वाडदेकर याचें परशुराम भाऊंस पत्र.

लिहिल्याअन्वयें फौजेची व खर्चाची रवानगी सत्वर व्हावी. दिवसगत होऊं नये; " म्हणोन तपशीलवार आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें पत्रें दाखविलीं व फौजेचे वगैरे तयारीविशीं बोलिलों व खर्चाविशींही बोलिलों. फौजेची व गाडदी यांची व तोफांची रवानगीची तयारी करविली आहे. एक दोन दिवसांत रवाना होतील. खर्चाचेंही वरचेवर विचारून रवानगी करवितों. स्वामीस कळावें. जासूद जोडी आली ते उंटासमागमें पाठवावयाकरितां ठेवून घेतली आहे. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. टिपूकडील बातमीदार लष्करांतून स्वामीच्या रवाना जाले आहेत म्हणोन बातमी आहे. याचा शोध असावा. हे विज्ञापना.

नं. २८४५. श्रीगणपति. ( चैत्र शु० १३—२२ एप्रिल. )

पै॥ छ० १२ जमादिलाखर.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसी प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १२ जमादिलाखर परियंत मुकाम घटप्रभा दक्षिणतीर नजीक मुधोळ येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. लढाई जाहल्यानंतर राजश्री नाना व विसाजीपंत वाडदेकर यांसी पत्रें लिहून पुणियास पाठवावयाकरितां आपणाकडे पेशजी पाठविलीं आहेत, त्यास आज अकरा रोज जाहले, अद्याप उत्तरें येत नाहींत याचें कारणही समजत नाहीं. दिवसेंदिवस त्यांची प्रबलता होत चालली आहे. पत्रांचीं उत्तरें आल्याखेरीज कोणतेंहि करितां नये. उत्तरें आपणाकडे आलीं असावीं असें वाटतें. नसल्यास माणसें पाठवून उत्तरें लौकर आणवून पाहून पाठवावीं. त्याचे फौजेचा मुक्काम सांप्रत बन्नुरानजीक आहे, गांवचा बंद फार सांपडला असें गांवांतून कोणी पळून आले त्याणीं वर्तमान सांगितलें आहे. तेथेंच

जमून आहेत. चिरंजीव राजश्री दादा व जनोबा सुभेदार व राजश्री गणेशपंत कुनालचे ( ? ) मुकामीं आहेत. रोज त्याचे रोखें तलाव्यास जात असतात. तेही तयार होऊन उभे राहतात. परवां शत्रूची कही बन्नूरचे पश्चिमेस गेली होती. समागमें एक सरदार कांहीं लोकांनिशीं होता. इकडील तलाव्याचे फौजेची गांठ पडून झटापट होऊन सरदार ठार जाहला. शेंसवाशें घोडे चांगलेच पाडाव आणिले व माणूसही जायां जखमी जाहलें. त्याचे पारिपत्यास अगाध नाहीं ! परंतु पुण्याचीं पत्रें मळमळीत येतात, आणि तहाचाही भाव दर्शवितात, म्हणोन उतावळी करितां येत नाहीं. ते बेजरब चालून येतात त्या पक्षीं घडतां घडेल तें खरें ! चिरंजीव राजश्री दादा यास गणेशपंतसुद्धां लोकापुरचे मुक्कामास आणविलें ते आज आले आहेत. चिरंजीव राजश्री जनोबा सुभेदार यांस सतीगिरेचे सुमारें चंदरगीचे ओढ्यावर जाण्याविशीं लिहिलें आहे. आम्ही बुणगें झाडून सिरूल पा। मुधोळ येथें ठेवून बुनग्यांत राजश्री केसोपंत मामा यासी ठेविले आहेत. सडे मुक्काममजकुरीं आहोंत. पत्राचीं उत्तरें येत तंवपावेतों येथून कूच करीत नाहीं. उद्यां कूच करून दुधापुरास जातों. तेथून चिरंजीवाचा मुक्कामही जवळ पडतो. आपल्याकडून पत्रें पुण्यास रवाना जाहलीं त्यास फार दिवस जाहले, परंतु अद्यापि जाब येत नाहीं ! याजवरून अपूर्व वाटतें. तर जाब आले असतील तर लौकर पाठवून द्यावे. छ० १२ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. पुण्याहून नाना व विसाजीपंत वाडदेकर यांचीं पत्रें परभारें येथून जासूद गेला होता त्याजबरोबर आलीं तीं पाठविलीं आहेत. पाहून माघारीं पाठवावीं. हीं पत्रें लढाईचें वर्तमान कळून आल्याचीं नव्हेत, फारा दिवसांचीं आहेत. येथें सहावे दिवशीं येऊन पोंहचलीं. त्या पत्रांचीं उत्तरें येतील तेव्हां खरें ! हे आशीर्वाद.

अपत्यें गणपतीनें व रामचंद्रानें व हरीनें दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार. सदैव आशीर्वादपत्रीं सांभाळावें. हे विज्ञापना.

नं. २८४६. श्री. ( चैत्र शु० १५ ॥ २४ एप्रिल. )

पै॥ छ० २० जमादिलाखर. खमस.

विज्ञापना. स्वामीनीं छ० ९ जा॥खरचें पत्र पाठविलें तें छ० १४ जा॥ खर रविवारीं दोन प्रहरीं पावलें. "शत्रूची फौज रामदुर्गा-जवळ आली. श्रीमंत राजश्री दादा माघारे बन्नुरास आल्याचें पत्र आलें तेंच पाठविलें आहे. तरी राजश्री नाना यांस दाखविणें. शत्रूची फौज बन्नुरावर आली. इकडील फौज माघारी सरकून आहे. तोफांची मारगिरी होत आहे म्हणोन स्वार आला त्याणें सांगितलें, त्याजवरून आम्ही तयारी करविली आहे. घडेल तें मागाहून लिहितों" म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें बातमीचीं पत्रें व स्वामीचें पत्र दाखविलें. शत्रूचा जमाव भारी आला. याजवर वरचेवर मागाहून पुरावा करावा म्हणोन वारंवार विनंती करीत आहें. परंतु आजपर्यंत रास्ते यांचे बोलण्यावर व वकिलाचे बोलण्यावर विश्वास वाटत होता. हल्लीं फौज पुढें आली तेव्हां यांसे बिघाड असें समजों लागलें ! रास्ते याणी परभारां पत्रें येयून लष्करांत पाठविलीं आहेत. उत्तर काय येतें पहावें. स्वामींसहीं त्यांजकडे पत्र पाठवावयाविशीं पेशजी नानानीं लिहिलें आहे. परंतु आतां पत्र पाठवावयाची मर्यादा दिसत नाहीं ! तत्राप पाठविलें असल्यास उत्तर येईल तें पाठवावया आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ गणपतराव हा सांवशीच्या लढाईत ठार झालेले कोन्हेर त्रिंबक पटवर्धन कुरुंदवाडकर यांचा पुत्र. रामचंद्रपंत आपा व हरीपंत बाबा हे परशुराम भाऊंचे पुत्र.

१ पत्र विसाजीपंत वाडदेकर यांचें पुण्याहून परशुरामभाऊंस. २ नानाफडनवीस यांस.

## श. १७०७ टिपूची नरगुंदावर स्वारी. इ. स. १७८५

नं. २८४७. ( चैत्र व० ४· २८ एप्रिल. )

आपाजी गोविंद सखदेव याचें पत्र बाळासाहेबांस– छ० १८ रबिलाखरचें–

" इकडील फौज जमा होऊन नरगुंदचे कुमकेस जाणार म्हणून शत्रूचे लष्करांत वर्तमान कळून आज पांच सात दिवस पुसाटीकडे शत्रूकडील लोकांनीं झाडून तोफा लावून रोज हजार दोन हजारपर्यंत गोळा किल्ल्यांत टाकितात. कुमकेचें वर्तमान आहे यास्तव फारच निकड करीत आहे. एक दोन हल्ला केल्या. आणखी दोन चार दिवसांत हल्ला करणार म्हणोन वर्तमान आहे. गंगाराम धारवाडकर व कृष्णराव शिवमोघे यांजसमागमें स्वार व बार मिळोन पांच हजार जमाव आणखी पट्टणाहून नरगुंदास चार दिवसांपूर्वी आला. आणखी मागाहून जमाव पट्टणाहून रवाना जाहला आहे तोही येणार. लौकर उपराळा इकडून जाहला तरी उत्तम आहे ! "

नं. २८४८. ( ५ मे )

दाजी त्रिंबक परचुरे यांचें बाळासाहेबांस पत्र. चैत्र व॥ १२ —गुरुवारचें तळेगांवाहून—

" ती॥ भाऊसाहेब व राजश्री गणेशपंत बेहेरे ऐसे फौज सुद्धां नरगुंदचा वेढा उठवावा म्हणून गेले. वडील घटप्रभेवर मुधोळ नजीक मुक्काम करून आहेत. चिरंजीव राजश्री दादा व गणेशपंत बेहरे दहा पंधरा हजार फौजेनिशीं रामदुर्गास गेले. तेथून बारीपार होऊन तलावे केले. शत्रु इभ्रतीवर वेढा उठवून गेला होता, तेच समयीं बारीपलीकडे फौज जाती तर शत्रु न ठरता. रा. नानाचीं पत्रें ' पुढें जाऊं नये. तहाचें बोलणें लागलें. ' म्हणोनच येत गेलीं, यास्तव वडिलीं मुक्कामच करून राहिले. तों शत्रूनें आपला जमाव

करून तीस हजार पायदळ व दहा हजार फौज व तीस तोफांनिशीं चालून बारींत आला. एक दोन लढाया माफक जाल्या. प्रस्तुत रामदुर्गाअलीकडे बन्नुरावर शत्रु आला आहे. आमच्या फौजा अलीकडे दोन कोशांवर आहेत. त्यांचे कहीसमागमें फौज आली, त्यांतील सवारों घोडे चांगले पाडून आणिले. मातबर माणूस एक शत्रूकडील ठार पडला. हुजूर पत्रें वरचेवर जात आहेत. फौजा आणखी आल्यास उत्तम आहे, " म्हणोन पत्रीं लिहिलें, त्यास हुजुराहून काशीपंत मामा दोन हजार गारदी कवाइती व तोफा पांच असे रवाना केले आहेत. आठ दहा दिवसांत येऊन पोंचतील. होळकराची रवानगी नऊ लक्ष रुपये तूर्त खर्चास देऊन करितात, परंतु होळकर मान्य करीत नाहींत. तूर्त दहा हजार फौजेचीं पथकें रवाना लौकरच होणार आहेत. पांच हजार फौजेची रवानगी जालीच आहे. लोकांचे हातीं पैका यावयास उशीर लागतो, यास्तव येणें लवकर होत नाहीं. "

नं. २८४९. ( चैत्र व० १३–६ मे. )

आपाजी गोविंद सखदेव याचें बाळासाहेबांस पत्र छ० २६ जमादिलाखरचें. मुक्काम मोरब येथून—

" होसुराहून एक वाणी आला त्यानेंही सांगितलें कीं, नरगुंदास पुनः मोर्चे बसले. तोफा उडतात. शत्रूचें हंपीहोळीवरून कूच होऊन नरगुंदापलीकडे बेण्णीहाळावर गेले ते दिवशीं नरगुंदचे सोमापुराजवळून रंव[1] जात होती. इतक्यांत शत्रूकडील गाडदी रामदुर्गचे लोक पळून गेले त्याप्रमाणें हे पळाले असतील, म्हणोन पेठेंत शिरले ते व्यंकोबाचे देवळापर्यंत गेले. तेव्हां किल्ल्यावरील माणूस हजारपर्यंत देवळाजवळ होते त्यांची यांची मारामारी जाहली. वरून तोफांची मारागिरी केली. तेव्हां शत्रूकडील लोकांस मारून बाहेर

1 रव=फौजेची रांग.

काढिले. दोनशेंपर्यंत माणूस ते समयीं शत्रूचें जखमी व ठार जाले. मग ते दिवशीं किल्ल्यास स्वारांची चौकी ठेऊन बेण्णीहाळावर मुक्कामास गेला. याप्रमाणें वर्तमान आहे. हें वर्तमान दोहों चोहों ठिकाणांहून आलें आहे, तेव्हां खरें दिसतें."

नं. २८५०. ( वैशाख शु० ६-१४ मे. )

श्री.

* श्री
राजा शाहुनर-
पतीहर्षनीधा-
न माधवराव नारा-
यण मुख्य प्रधान.

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान तां।। मोकदमानीं समस्त दाहीजण मौजे तुपारी कर्यात भिलवडी प्रां।। मिरज सु।। खमस समानीन मय्या व अल्लफ. बाळोजी पवार पाटील मौजे मजकूर यांणीं हुजूर विदित केलें कीं, "मौजे मा।।र येथील पाटीलकी पूर्वापार आपली चालत आली असतां हल्लीं बिरादर भाऊ सुदामतप्रमाणें चालों देत नाहीं, येविशीं ताकीद जाली पाहिजे" म्हणून. त्याजवरून हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी पाटीलकी पवारमजकुराकडे सुदामत चालत असतां बिरादर भाऊ हल्लीं नवीन कजिया गैरवाजवी करीत असल्यास ताकीद करून वाजवीप्रमाणें पाटीलकी चालवणें. फिरोन बोभाट ओलीयां कार्यास येणार नाहीं. जाणिजे. छ० ४ रजब. आज्ञा प्रमाण.

लेखन-
सीमा.

नं. २८५१. ( वैशाख शु. ६–१४ मे. )

आपाजी गोविंद सखदेव यांचें पत्र छ० ४ रजबचें बाळासाहेबांस—

" मुदेनुरास माणूस पाठविला होता त्यानें जबानी वर्तमान सांगितलें कीं, रामदुर्गावर स्वार कांहीं नाहींत. दोन हजार गाडदी आहेत. ठाण्यांतील दारूगोळी घेऊन गेले. तोफा अद्यापि नेल्या नाहींत. नरगुंदास मोच बसून पांच सात दिवस जाले. तोफांची मारागिरी फारच अहोरात्र होत आहे. कवजल्गी, कोप, गोकाकपर्यंत तोफा ऐकावयास येतात. पेशजी गंगाराम धारवाडकर याची व नरगुंदकरांची लढाई होऊन गंगारामाचा मोड होऊन नरगुंदकर पाठीस लागले होत. तेव्हां गंगारामास सौंदत्तीकरानीं आसरा दिला नाहीं म्हणून शत्रूनें त्यांजपासून दोन तोफा व गाडदी पाठवून दहा हजार होन गुन्हेगारी घेतली. शत्रूचे चित्तांत इकडील फौजा छावणीस राहणार त्यापक्षीं तूर्त इकडील फौजांचा जय पडला नाहीं, मसलत होत आहे, तोंच नरगुंद घ्यावें असा मनसबा आहे. नरगुंद घेतल्यावर कित्तुराकडून गोकाकेवरून बेळगांवास येणार. कित्तूर गोकाकेकडील गुळें जाहलें. मनोळीस गाडदी व रोहिले सात आठशेंपर्यंत श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याणीं पाठविले होते ते निघून आले. श्रीमंतांच्या आज्ञेवरूनच आले असतीलसें वाटतें. ते निघून आल्यानंतर शत्रूचें ठाणें मनोळींत पडलें. "

नं. २८५२. ( वैशाख शु० ७–१५ मे. )

आपाजी गोविंद सखदेव याचें बाळासाहेबांस पत्र छ० ५ रजबचें—

" शत्रूची फौज सडी होऊन कांहीं बदामीकडे व कांहीं शहापुराकडे गेली आहे असें श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचें पत्र आलें, याज-

करितां सावध असावें; म्हणून लिहिलें, त्यास सावधपणेंच रहात आहों. नरगुंदाकडील तोफेचे बार येथेंही ऐकावयास येतात. नरगुंदचा नकाशा मेणाचा करून पट्टणास नेला होता तो नकाशा पाहून " पुसाटी-कडील बाजूनें एक लाख गोळा मारावा. इतकियानें फडशा जाह-ल्यास उत्तम आहे. न होय तर मग लिहून पाठवावें. म्हणजे पुढें काय करावयाचें तें लिहूं. " याप्रमाणें पट्टणाहून फौजेंतील सरदारास पत्रें आलीं म्हणून नरगुंदकराचा कारकून गोकाकेस आला त्याणें वर्त-मान सांगितलें. तेंच धोंडोपंत आपानीं इकडे लिहून पाठविलें. तोफांचीं मारागिरी फारच होत आहे. नित्य दोन तीन हजारपर्यंत गोळे मारतात. "

नं. २८५३. (वैशाख शु० ७–१५ मे.)

आपाजी गोविंद सखदेव याचें मुक्काम मोरब येथून छ० ५ रजबचें पत्र बाळासाहेबांस–

" मनोळीस शत्रूचें ठाणें पडलें म्हणून पेशजी लिहिलें होतें. परंतु अद्यापि सरकारचेंच ठाणें आहे. गाडदी व रोहिले परत आले, तेव्हांच आंतील प्यादे निघून येत होते, परंतु राहिले आहेत. तथापि अवसान नाहीं. रामदुर्गप्रमाणेंच स्थिति आहे. या मुक्कामास येऊन आम्हांस पंधरा दिवस जाले. येथून रामदुर्ग अठरा कोस आहे. "

नं. २८५४. (वैशाख शु० ८–१६ मे.)

आपाजी गोविंद सखदेव याचें बाळासाहेबांस पत्र छ० ६ रज्जबचें–मुक्काम कुडची कृष्णा दक्षिण तीर येथून—

" नरगुंदावर तोफांची मारगिरी होतच आहे. किल्ला हिमतीनें लढत आहे. किल्ल्यावर दोन महिन्यांची बेगमी. वरकड सर्व साहित्य आहे. तुपाचा मात्र तोटा ! "

नं. २८५५. ( वैशाख शु० १४-२३ मे. )

आपाजी गोविंद सखदेव यांचें बाळासाहेबांस पत्र छ० १३ रज्जबचें उंगार खुर्द येथून—

" श्रीमंत सौभाग्यवती राधाबाई[1] प्रसूत जाहली होती. तदनंतर सहावे दिवसापासून काहिलीं अंगास होऊं लागली. औषधी उपाय बहुत जाले, परंतु गुण न आला. परवां मंदवारीं देवाज्ञा जाली; म्हणून लिहिलें तें कळलें. मोठी अनुचित गोष्ट जाहली. घात जाला."

नं. २८५६. श्री. ( ७ जून. )

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ वैशाख वद्य अमावास्या सोमवार जाणोन स्वकीय कुशल लेखन करावें. विशेष. इकडील वर्तमान नरगुंदचे यथाप्रकार आहेत. बाहिरल्यानीं बदामीचा किल्लेदार वगैरे यांस गडकरी यांजकडे पाठवून " फार जुजलां; मेहनत फार केली, याउपरी श्रम न करणें, तुम्हांस पार करून देतों. उतरून जाणें " म्हणोन दोन तीन वेळां येरझाऱ्या करविले. परंतु गडकरी याणीं उत्तर केलें जे, " पुण्यास पत्रें गेलीं आहेत तेथूनच आपणास पत्रें येतील. सबुरीनें घेतल्यास विवेकच होईल. " याप्रमाणें उत्तर दिलें. सारांश दम बराच आंत आहे. नरगुंदास आल्या फौजांपैकीं कांहीं फौज व हजरत कमरदिन साहेब यांस हुजूर पट्टणास आणोन घेतलें आहे. जावगाने तजाकिजोत आहे. दहा वीस हजार बार व कर्नाटकी पांच सात हजार फौजा व तोफा चौकी देऊन ठेवणार; किचूरकर जमावनिशीं चाकरीस जावयाकरितां शिगीहोळीस जमा जाहले आहे. येलगुरहून माणसें आलीं. राजश्री रास्ते व गणेशपंत बेहरे उकळी मणगुलीसुमारें आहेत. दोन्ही मिळोन दहा वीस हजार बार सुद्धां आहेत. सुरापुराकडे

1 परशुरामभाऊंची स्त्री.

जाणार म्हणोन सांगतात. याप्रमाणें हे वेळपावेतों वर्तमान आहे. आगोन येईल तें लिहून पाठवितों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती. बातमीचें पत्र सौंदत्तीहून आलें.

नं. २८५७. श्री. (आषाढ शु० ८—१४ जुलई.)

पै॥ छ० ११ सवाल. सनसीत समानीन. श्रावणमास.

राजश्री गंगाधरपंत गोसावी यांस अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ राजे खेमसावंत भोसले बहादर सरदेसाई प॥ कुडाळ व महालानिहाय. रामराम. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे. विशेष. आपल्याकडून पत्र येऊन संतोष होत नसे. तर ऐसें न करितां सदैव पत्रद्वारें आपल्याकडील कुशलवृत्त लेहून स्नेहाची वृद्धि होय तें करावें. यानंतर हजरत पातशहा दिल्ली यांहीं राजश्री महादजी शिंदे यांचे विद्यमानें 'राजे बहादर' मरातब व मोर्चेलें दोन व जवाहीर व खिलत ऐसें रवाना केलें ते शु॥ मधें (!) अक्षततीयेचे सुमुहूर्तें फरमानबाडी करोन उत्साहें घेतलें. हें आपणास स्नेहाचे जागां कळावें याजकरितां लिहिलें असे. र॥ छ० ७ रजमान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८५८. (आषाढ शु० १२—१८ जुलई.)

तीर्थो लक्ष्मण, दोडवाडचा ठाणेदार, याचें पत्र बाळासाहेबांस छ० १२ रमजानचें—

" धारवाडाहून सहा हजार स्वार व तीन तोफा व पांचशें स्वार येऊन दोडवाडास उषःकाळीं मोर्चे दिले. दोन तास दिवस चढल्या-

१ हा शेरा बाळासाहेबांच्या हातचा. २ पत्राच्या माथ्यावर शिक्का व शेवटीं मोर्तब आहे त्यांतलीं अक्षरें फारशी आहेत.

नंतर हल्ला जाहला. अर्धा गांव त्याणीं घेतला. आंतील लोकांनीं मारगिरी करून बाहेरील लोक पाउणशें ठार केले. आंत तीन साडे-तीनशें प्यादे सांपडले आहेत. ते बाहेर काढून आणण्याचा मार्ग दिसत नाहीं. ठाणें तर टिकत नाहींच.'

नं. २८५९. ( आषाढ व० ४—२५ जुलई. )

श्रीगणपतिर्जयति.

पै॥ छ० ५४ रमजान. सनसीत समानीन. श्रावणमास.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १८ रजमान इंदुवार दोन प्रहर दिवस पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ० ९ रमजानचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर सविस्तर कळोन संतोष जाहला. "नरगुंद शत्रूनें घेतलें म्हणोन बातमी आली आहे, व राजश्री महादेवबावा वडगांवकर येथें आले होते, येथें दोन दिवस राहून श्रीपंढरपुरास गेले व हिक पर्जन्य नाहीं," म्हणोन लिहिलें तें कळलें. पत्रीं आज्ञा जे, "तीर्थस्वरूप मातुश्री काशीकाकीस पत्रें लिहून लाखोटा करून पाठविला आहे हा राजश्री धोंडो बापूजी जोशी यांजवळ देण म्हणजे ते सावकारींतून रवाना करितील" म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें लाखोटा मशारनिल्हेजवळ दिला. बावामहात व रसूलखान व चांदखान यांची ही पत्रें त्यांस पावतीं करून उत्तरें घेऊन पाठविलीं आहेत. आम्ही काल रविवारीं प्रातःकालच्या बारा घटकांत श्रीमंतांच्या दर्शनास गेलों. नजर मोहरा

१ चिंतामण पांडुरंग ( आपासाहेब सांगलीकर ) व विठ्ठलराव पांडुरंग यांचें गंगाधरराव गोविंद यांस पत्र पुण्याहून. हें कित्येक ठिकाणीं फाटून अक्षरें गेलीं आहेत. २ पेशवे सवाई माधवराव यांच्या.

दोन ठेविल्या. राजश्री नानाची ...... भेट घेतली. काशीचे ची पि..... ...... वयाचें, त्यास आणखी एक दोन दिवसानीं जाऊं ते समयीं देऊं. लक्ष्मण बैरागी यास सत्तर रुपयांची हुंडी ग्वालेरीची करून देणें म्हणोन आज्ञा, त्यास त्यागें सदरहू ऐवजपैकीं बरोबर खर्चास रुपये १० दहा समागमें रोख नेले. बाकी साठ रुपयेची हुंडी झांशीची आज्ञेप्रमाणें खुणा लिहून करून देविली. ग्वालेरीची हुंडी करून द्यावी, त्यास त्याणें झांशीची मागितली यास्तव करून दिली. ग्वालेरीची हुंडी चलती होत होती, त्यास त्याणें चलती हुंडी नको म्हणाला; ठिकाणबंद झाशीची हुंडी देववावी म्हणोन बोलिला. त्याजवरून झांशीचीच करून देविली. येथून निरोप घेऊन गुरुवारीं भोजन करून सायंकालचा निघोन गेला. त्यास करारप्रमाणें येणें म्हणोन जातेसमयीं सांगितलें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. २८६०. श्री. ( आषाढ व० ७–२८ जुलई. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री चिंतामणराव पांडुरंग स्वामी गोसावी यांस.[1]

पो॥ माधवराव नारायण प्रधान. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणें. विशेष. स्वारी बाहेर निघणार. याजकरितां तुम्ही आपलेकडील सरंजामी फौज जमा करणें. जाणिजे. छ० २१ रजमान. सु॥ सीत समानीन मय्या व अलफ बहुत काय लिहिणें हे विनंती.

पै॥ छ० ७ सवाल सनसीत समानीन. श्रावण मास. शके १७०७

---

१ चिंतामणराव अल्पवयी होते तरी सरदारी त्याच्याच नांवें असल्यामुळें पत्र ही त्याच्याच नांवें आलें.

नं. २८६१ श्री. ( ३० जुलई. )

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ आषाढ वद्य नवमी मंदवार सायंकाळ जाणून स्वकीय लेखन करीत असावें. विशेष. आपण लिहिला पत्रार्थ कळला. काल शुक्रवारीं सायंकाळसमयीं राजश्री काळोपंत कुटुंबलेकरेंसह दीडशें शिपाई हजार दीडहजार लोक सामानसुद्धां किल्लयावरून खालीं उतरून आले. सर्वेच पांच सात हजार लोकांचा पहारा देऊन उतरविले. भविष्यानुसार घडलें ! शत्रूनें गडावर दोन हजार लोक ठेविले. हुजुरास अर्जी पाठविली आहे. उत्तर आल्याप्रमाणें करितील. याउपरी तुम्ही जमावानिशीं सावधगिरींत असावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८६२. श्री. ( आषाढ वद्य १०—३१ जुलई. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामरावजी स्वामीचे सेवेशीं.

सेवक वासुदेव पांडुरंग. सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० २४ रमजानपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. नरगुंदचें वर्तमान तरी छ० २१ रोज शुक्रवारीं काळोपंत सल्लयानें उतरोन खालीं आले. चौकी देऊन लोकांसुद्धां बसविले आहेत. पुढें काय होईल पहावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८६३. श्री. ( आषाढ व० ११—११ ऑगस्ट. )

पै॥ छ० २७ रमजान. सनसीत समानीन. आषाढ मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना.

---

१ हें बातमीपत्र नरगुंदाहून तेरदाळास. २ श्रीरंगपट्टणास टिपूकडे. ३ यादवाडचे कमावीसदार यांजकडून तेरदाळच्या फडणिसांस पत्र. ४ तेरदाळच्या फडणिसांचें पत्र.

येथील वर्तमान ता॥ छ० २९ रमजान इंदुवार चतुर्थ प्रहर दिवस. यथास्थित असे. विशेष. नरगुंदचें बातमीचें पत्र आलें त्याची नक्कल करून पाठविली आहे त्याजवरून कळेल. राजश्री काळोपंत कुटुंब-लेकरेंसह भृगुवारीं सायंकाळीं किल्लयावरून उतरले. नरगुंद किल्ला शत्रूच्या हस्तगत जाला. मागाहून येईल वर्तमान तें कळवितों. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २८६४. श्री. ( आषाढ व० ११—१ ऑगस्ट. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २४ रमजान इंदुवार संध्याकाळपावेतों स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. नरगुंदचे बातमीकरितां यादवाडास माणूस पाठविला होता तो आतांच आला. राजश्री वासुदेवपंत[1] यांचें पत्र बातमीचें आलें तेंच सेवेशीं पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. नरगुंदचा किल्ला शुक्रवारीं अमित्रास हस्तगत जाहला म्हणून लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८६५. ( आषाढ व० ३०—५ ऑगस्ट. )

गोविंद सखदेव यांचें पत्र बाळासाहेबास छ० २९ रमजानचें.

" दोडवाडास शत्रूचा जमाव येऊन पंधरा दिवस चौकी देऊन बसले होते. परंतु ठाण्यांतील लोक दम धरून होते. मग त्याणीं निकड करून हल्ला केली; ते समयीं ठाण्यांतील लोकांनीं एक दिवस फार मेहनत करून हल्ला शत्रूची मारून काढिली. त्यानंतर चार पांच हल्ला शत्रूनीं केल्या, परंतु आंतील लोकांनीं मारून काढिल्या. यापुढें दम धरून रहावें तर परिणाम नाहीं, याकरितां रात्रौ निघोन

1 तेरदाळचे फडणीस.

शत्रूकडील मोर्च्यांवर मारामार करून त्याजकडील दोन निशाणें गाडद्यांचीं घेऊन स्वामीजवळ सेवेशीं आले आहेत, ते सर्व मुखतः निवेदन करतील. ''

नं २८६६. श्रीगणपतिर्जयति. ( श्रावण शु० २–७ ऑगस्ट. )

पै।। छ० १ सवाल. सन सीत समानीन. श्रावणमास.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता।। छ० २९ रमजान इंदुवारपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० १७ रमजानचें पत्र पाठविलें तें छ० २२ मिनहूस पावोन संतोष जाहला. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं म्हणोन लिहिलें, त्यास पुण्यास आलेनंतर श्रीमंतांची भेट जाहली हा मजकूर इकडील सविस्तर वृत्त लिहून पत्रें जासूदजोडीसमागमें पाठविलीं आहेत तीं पावलींच असतील, त्याजवरून निवेदन होईल. अलीकडे दुसरेनें श्रीमंतांचे दर्शनास भृगुवारीं गेलों होतों तेव्हां श्रीमंतांस पितांबर व श्रीमंत सौ।। बाईसाहेबांस पितांबर व चोळी नेऊन दिली. आज्ञेप्रमाणें पढत असतों. बारीक दस्तूर ल्याहावें म्हणोन आज्ञा, त्यास पहिले कित्तेपेक्षां थोर अक्षर लिहीत होतों. त्यांस अलीकडे त्या कित्या......... लिहीत असतों. " राजश्री धोंडो बापूजी जोशी व श्रीमंत राजश्री वेंकटरावदादा घोरपडे यांचे नांवचीं पत्रें लखोटे करून पाठविलीं आहेत हीं धोंडो बापूजीजवळ देणें " म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें लखोटे मशारनिल्हेजवळ दिले. त्याणीं पत्राचें उत्तर व श्री देवाचीं सनगें वगैरे जिन्नस निंबाजी जासूद व शेटी जाधव खिजमत-

१ चिंतामणराव पांडुरंग व विठ्ठलराव पांडुरंग यांचे, गंगाधरराव गोविंद यांस पत्र पुण्याहून.

गार यांजबरोबर पाठविला आहे, येऊन पावेल. आपण जासुदा-समागमें कृष्णा तोडकर खिजमतगार दिल्हा होता त्यास समाधान वाटेनासें जाहलें, मार्गीं यकोन रहिमतपुरचे सुमारें राहिला. येथून सनगें न्यावयाचीं, जासूद एकटा, यास्तव शेटी जाधव बरोबर दिला आहे. कृष्णा तोडकर बरा होऊन वाटेस त्याची व याची गांठ पड-ल्यास शेटीनें माघारे यावें म्हणोन सांगितलें आहे. राजश्री रघुनाथराव कोल्टकर व चिरंजीव राजश्री रावजी येथेंच आहेत. रावजीस चार पांच दिवस आपणाजवळ आणिला होता. सुखरूप आहेत. ती॥ सौ॥ ताराबाई येथेंच आहे; सुखरूप आहेत. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८६७. श्री. ( ९ ऑगस्ट, )

सेवेशीं सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ श्रावण शु॥ ४ चतुर्थी भौमवासरपर्यंत यथास्थित जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. नरगुंदाकडील वर्तमान कसें आहे म्हणवून जाणविलें, ऐशीयास काळोपंत व भगवंतराव कुटुंब-सुद्धां सोमापूर हणमंताच्या देवळाचे पाठीमागें रड्डी याच्या घरांत कोंडिले आहेत. घराभोवती हजार दोन हजारोंची चौकी आहे. मा॥रनिल्हेनीं हातेर अद्याप दिलें नाहीं. जवळ पांच जण प्यादे जिवाव्याचे हत्यारबंद आहेत तेही सोडून निघत नाहींत. भले लोक व सर्वत्र शेंदोनशें एकीकडे पहाऱ्यांत आहेत. घोडीं सर्वत्रांची ( आपल्या फौजेंत ) वांटून सोडलीं. काटकांस एकीकडे दूर कोंडिलें आहे. ब्राह्मण सर्वत्र मंडळी पन्नास, नारो दादाजी व शास्त्री आदि-करून एका घरांत घातले आहेत. एकाची खबर एकास नाहीं. जितरूब, नक्त नाणें सोनें रुपये म्हणतां लक्ष होनांचें गडावरील

---

१ वातमीपत्र यादवाडाहून तेरदाळच्या फडणिसांस.

जाहलें. कापड व भांडीं खेरीज. काळापाची आई मात्र गेली. दहन परवां जाहलें. वरकड आजवर जिवंत आहेत. काल इकडील माणूस याप्रमाणे पाहोन आला. अद्यापि एकाची सुटका नाहीं. मा॥रनिल्हेची[1] कन्या नारो दादाजीची सून चांगली आहे, ती मूल नबाबेखान घेणार. परवांच आणविली होती. वरकड सर्वत्रांस पट्टणास नेतात. सोडितील म्हणायाची भ्रांत धरून जीव ठेवून बैसले आहेत ! निघतेवेळेस काय घडतें पहावें. (शत्रूचें) लष्कर उदईक कूच करून धारवाडावरून बेळगावास जातात. तो किल्ला घेऊन किचुराकडे येऊन देसनूर वगैरे, घ्यावें, गोकाकही पहावी,. तेथपावेतों एकंदर ठाणीं घ्यावीं, याची वदंता फार असे. आमच्याही दोन्ही स्थळांस उपद्रव देणार असा अर्थ आहे. श्रीहरी करील तें प्रमाण ! सारांश लष्कर[2] हा प्रांत सोडून माघारें जात नाहीं. याप्रमाणें इकडे वकील सैन्यांत काजी आहेत त्याणें सांगून पाठविलें होतें. मुख्यतार्थ त्याची मसलत झाल्यावरच कळावें, तोंपर्यंत समजणेचें नाहीं, हे तो प्रसिद्ध आहे ! घटपेपावेतों राहणारास भरंवसा नाहीं. आपल्या स्थलापावेतों वल्गना फार आहे. नदीमुळें आठ पंधरा रोज व्यवधान पडेल तर पडो ! आपण बातमी रक्षून असावें. बेळगांव किचुराकडे येतांच सर्वत्र नदीपार होऊन जाणेंस पाहिजे. वरकड लिहिणेंसें नाहीं. कोणाचा परिणाम नाहीं ! हें पत्र आपण पाहोन विसर्जन करावें. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंती.

नं. २८६८. श्री. ( श्रावण शु० ५–१० ऑगस्ट. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब[3] स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ४ सवालपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें

---

१ काळोपंताची. २ टिपू सुलतान ? ३ तेरदाळचे फडणीस.

वर्तमान यथास्थित असे. विशेष. नरगुंदाहून बातमीचें पत्र आलें त्याची नक्कल लिहून सेवेशीं पाठविली आहे. त्यावरून सर्व मजकूर निवेदन होईल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २८६९. श्री. ( श्रावण शु० ८–१३ ऑगस्ट. )

पै॥ छ० ९ सवाल सनसीत समानीन श्रावणमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० ७ सवाल पावेतों स्वामींचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. स्वामीचे आज्ञेप्रमाणें येथून बनवण्णा प्यादा नरगुंदास मुद्दाम पाठविला. छ० ३० माहे रमजानीं येथून निघोन गेला तो तीन रोज लष्करांत होता. तेथें याचे वळखे होते व किल्ल्यांतील लोक आले तेही वळखींचे पांच चार त्यांतील होते. त्याणीं किल्ल्यांतील वर्तमान सांगितलें: किल्ल्यांतील पाणी सरलें. थोडेसें होतें, परंतु किडे फार पडून उपयोगी नाहीं व दारूगोळी व किरकोळी सामान झाडून सरलें. जुने दाणे आठ पंधरा दिवस खाऊन होते. दुखणें फार लोकांस लागलें, परिणाम नाहीं, तंव बोली तोरगलकर काजीचें मतें लोक व काळोपंतास देखील सोडून द्यावें ऐसा करार करून उतरले. त्यावर लष्करच्यानीं पहारा देऊन तैसेच ठेविले होते. तीन परवानग्या येतील तेव्हां सर्वत्रांस सोडावें ऐसी बोली जाहली, त्यास दोनी परवानग्या तिकडून आल्या, त्यावरून लोकांस थोडेबहुतांस निरोप दिला. सोमवारीं सोडिलें. ज्यांचीं चांगलीं हत्यारें असतील त्यांची पाहून पाहून घेतात. कांहीं लोक व ब्राह्मणमंडळी चाळीस पन्नास सोमापुरांत ठेविली आहे. राजश्री काळोपंत यांची मातुश्री खालीं उतरल्यावरी मृत्यु पावली. श्रीरंगपट्टणाहून तिसरी पर-

खानगी आलियावर काळोपंतास मंडळीसुद्धां सोडावें ऐसें लष्करांत बोलत होते. छावणी धारवाडप्रांतीं होणार. म्हणोन तोंडजबानी वर्तमान सांगितलें. जो लष्करास गेला होता त्यासच सेवेशीं पाठविला आहे. तोंडजबानी वर्तमान सांगतां विदित होईल. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होईल. हे विज्ञापना.

नं. २८७०. ( भाद्रपद व० ११–२९ सप्टेंबर. )

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत यांजकडून शहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें छ० २४ जिल्कादचें.

" नरगुंदाकडील वर्तमान राजश्री व्यंकटराव व राजश्री काळोपंत व त्यांच्या मुलांमाणसांस कौल देऊन पट्टणास नेलें. मार्गीं चालते समयीं काळोपंतास धरून मुसक्या बांधोन सर्वत्रांस माघारें आणिलें. शिपाई व राजश्री नारो दादाजी निळकंठशास्त्री सर्वत्रांस बिड्या घालून रवाना केले. मागाहून व्यंकटराव व काळोपंतास व मुलेंमाणसांस बिड्या घालून नेणार आहेत. टिपू बेंगरूळास फौजसुद्धां आहे. "

# टिपूची कित्तुरावर स्वारी.

## सन १७८५ सप्टेंबर ते सन १७८६ मार्चअखेर.

सन १७८५ च्या ऑगस्ट महिन्यांत नरगुंद काबीज झाल्यावर बुराणउद्दीन उर्फ सैदबुरान यानें आपली फौज कित्तूर संस्थान काबीज करण्यासाठीं नेली. त्या फौजेंत त्याचे मदतनीस म्हणून सैदगफार व शेख अनसार हे सरदार नेमलेले होते. त्याच फौजेस श्रीरंगपट्टणाहून वेळोवेळ कुमक येत गेल्यावरून शेवटीं तिचा जमाव १५००० कवाइती पायदळ व ७।८ हजार कर्नाटकी प्यादे व ८००० स्वार व ४० पर्यंत तोफा; याप्रमाणें झाला होता.

ही फौज कित्तुराजवळ येऊन पोंचल्यावर तेथील संस्थानिक देसाई यानें विचार केला कीं, नरगुंदकर इतके बलिष्ठ व लढाऊ असून शिवाय त्यांच्या कुमकेस पेशवे सरकारच्या फौजा आल्या होत्या, तथापि टिपूसुलतानाच्या सामर्थ्यापुढें त्यांचें कांहीं न चालल्यामुळें नरगुंद-संस्थान सुलतानानें घेतलें आणि संस्थानिकास कैद करून नेलें. आपण लढाई करावी तर आपलीही दशा त्याचप्रमाणें होईल; याकरितां शत्रूस शरण जावें हेंच उत्तम. असा विचार करून तो देसाई सुलतानाच्या फौजेस येऊन भेटला. परंतु शरणागताचें रक्षण करण्याचा बाणा टिपूसुलतानाचा कधींच नव्हता ! त्याच्या फौजेनें देसाई व त्याचीं बायकामुलें व गुरुनाथपंत म्हणून कारभारी होता तो, या सर्वांस पहाऱ्यांत ठेविलें व कित्तूरचा किल्ला व संस्थानचा सर्व मुलूख ताब्यांत घेतला.

इतकें झाल्यावर ती शत्रूची फौज पेशवाई मुलखाच्या राशीस लागली. नोव्हेंबर व डिसेंबर या दोन महिन्यांत तिनें दोडवाड, खानापूर, संपगांव, बसवंत बागेवाडी वगैरे ठाणीं घेतलीं. त्या काळांत जांबोटीकर देसाई बराच प्रबळ होता. त्याच्या पारिपत्याकरितां ५।७ हजार पायदळ व ४ तोफा याप्रमाणें सरंजामानिशीं शत्रूनें जाऊन जांबोटीस वेढा घातला. ५।६ दिवस जांबोटीकरांनीं लढाई केली. शेवटीं नाइलाज झाला तेव्हां देसाई रात्री ठाणें टाकून निघून सड्यास पळून गेला. त्याच सुमारास शत्रूनें नेसरीचें ठाणेंही घेतलें.

सड्याचें ठाणें सावंतवाडी संस्थानाच्या पूर्व सरहद्दीवर आहे. तें ठाणें घेण्यासाठीं शत्रूची फौज गेली तर सावंतवाडीकर देसाई व गोवेंकर फिरंगी, सडेकर देसायाची कांहीं कुमक करितील अशी बोलवा होती. परंतु आयते वेळीं तसें कांहीं न घडल्यामुळें तें ठाणेंही शत्रूच्या हातीं लागलें. दिसेंबरच्या अखेरीस शत्रूनें होसकोटें व पाच्छापूर हीं दोन्ही ठाणीं घेतलीं. सारांश त्या प्रांतीं एक बेळगांव किल्ल्याखेरीज पेशवेसरकारची मातबर जागा राहिली नाहीं. त्याच किल्ल्याचे आसपास पटवर्धनांचा शहापूर तालुका असल्यामुळें त्याचाही केवळ बेळगांवच्या आश्रयामुळेंच बचाव झाला.

बेळगांवप्रांतीं याप्रमाणें शत्रूनें दंगा केल्याच्या बातम्या पुण्यास वेळोवेळ जातच होत्या. सन १७८६ च्या जानेवारींत निजामअल्लीच्या भेटीकरितां लष्कर घेऊन नानाफडनवीस निघाले. टिपूचे सरदार बेळगांवाकडे दंगा करीत होते त्यांचा कांहीं तरी प्रतीकार करणें नानांस नाप्राप्त झालें तेव्हां त्यांनीं फेब्रुवारीच्या अखेरीस लष्करांतून तुकोजी होळकरांची कित्तुराकडे रवानगी केली. गणेशपंत बेहेरे कृष्णेच्या उत्तरेस पर्जन्यकाळीं छावणी करून होते तेही दहा हजार स्वारांनिशीं बाहेर पडून येडूर मांजरी तेथें तळ देऊन राहिले. त्या

संधींत सडेकर देसाई यानें हजार दोन हजार माणूस जमा करून सडयाच्या ठाण्यावर येऊन " छेपा घालून शेंपन्नास माणसें जखमी करून दहा जणांचे डोचके कापिले. अमित्राचे निसबत माणसांचे बाइका पांच सहा जणी सांपडले त्यांशीं मारून पोट फाडून कांटे भरले ! ठाणेंतील सारे माणसें पळऊन ठाणें काईम करून घेतले. ठाणेंत दारूगोळी व तोफा पांच, व तांदूळ वगैरे साहित्यही होतें तें सर्व त्याचे स्वाधीन झाले. राजश्री नीलकंठ गौंडा सरदेसाई खानापूर याचा लेक व्यंकटराव म्हणायाचा त्यानें पुढें सरून एवढें काम केलें." पण हा सडेकरांचा जय फार दिवस टिकला नाहीं. शत्रूनें पुन्हां फौज पाठवून तें ठाणें काबीज करून त्याचा पक्का बंदोबस्त केला.

कित्तूरकराच्या संस्थानांतून साडेपांच लक्ष रुपये मी वसूल करून देतों असा टिपूजवळ करार करून व्यंकटरंगय्या या नांवाचा मामलेदार श्रीरंगपट्टणाहून कित्तुरास आला होता; त्यानें कराराच्या दुप्पट तिप्पट रक्कम प्रांतांतून गोळा केली तरी त्याची तृष्णा शांत होईना ! त्यानें कित्तूरचा वाडा खणून काढिला व दागदागिने भांडें-कुंडें वगैरे चीजवस्त संस्थानिकाची जेवढी म्हणून होती तितकी सर्व घेतली. शिवाय प्रांतांत मातबर कुळें होतीं तीं धरून नेऊन त्यांपासून पैका घेतला. मागची बाकी व चालू सालचा वसूल तर रयतेपासून त्यानें चोपून घेतलाच, पण त्याशिवाय उंबरापट्टी म्हणून दर घरास तीन रुपये याप्रमाणें कर बसवून तोही वसूल केला ! मामलेदाराचें हें कृत्य चाललें असतां फौजही रिकामी बसली नव्हती. तिनें प्रांतांतलें धान्य व वैरण गोळा करून धारवाडाकडे रवाना करण्याचा उद्योग एकसारखा सुरूच ठेविला होता. त्या फौजेने जिंकलेल्या प्रांतावर जो जुलूम केला त्यापैकीं एक बाब रयतेस अपूर्व व फारच असह्य वाटली. ती बाब म्हणजे सुंदर बायका व दांडगे पूर्व वयाचे जवान पुरुष

पकडून नेण्यासंबंधाची होय. बायका टिपूच्या व त्याच्या आप्तांच्या जनानखान्याकरितां नेल्या जात होत्या, व दांडगे पुरुष बाटवून त्यांस आपले चेले करण्याचा टिपूसुलतानाचा शिरस्ता होता. अशा चेल्यांचीं त्यानें ५।४ पलटणें तयार केलीं होतीं! यासंबंधें कानडी बातमीदारांच्या पत्रांतील वाक्यें चमत्कारिक आहेत.

" करीनकोप कर्यात बागेवाडी येथील चांगले बाइका व निवडक दांडगे माणसें धरून घेऊन गेले. याचप्रमाणें कित्तूरप्रांतांतही घडणार. खानापूर येथें दंड बांधणें, वसूल झाडा घेणें, मातबरांसी धरून नेणें आरंभिलें आहे. " " तमाम प्रांतांत पाहरे दिले आहेत. खानापुरास परवांपासून पाहरे ठेवून बैसले आहेत. दोघे लिंगाइताचे चांगले बाइका धरिले. वरकडांसही धरावयाकरितां जपणी घातले आहेत. तमाम सुंदर बाइका बारा वाटा पळून गेले ! "

होळकर व बेहेरे हे समीप येत असल्याचें कळतांच शत्रूनें आपलें बाजारबुणगें व थोर तोफा वगैरे धारवाड मिश्रीकोटाकडे लावून दिलें, आणि खानापूर व कित्तूर या दोन स्थळीं तो सड्या फौजेच्या टोळ्या करून राहिला. कित्तूरच्या टोळींत बेदेडे होते त्यांची दौड हुकेरीपर्यंत आली तेव्हां गोकाक व हुकेरी या परगण्यांतले रयत लोक घाबरून मिरज प्रांताकडे पळत सुटले. तों इतक्यांत गणेशपंत बेहेरे व होळकर जवळ आलेसे पाहतांच शत्रूच्या दोन्ही टोळ्या पुनः एकत्र होऊन ती फौज कित्तुरापासून अर्ध कोसावर लढाईच्या इराद्यानें तयार होऊन राहिली. पण तिच्या मनांतून मराठ्यांशीं लढाई करायची नव्हती. शत्रूची गांठ पडल्याबरोबर मागें झाडीचा आसरा होता त्या मार्गानें हल्याळ सांबराणीकडे अथवा धारवाडाकडून मुरगोडाकडे जावें असा तिचा उद्देश होता. परंतु मराठ्यांची फौज प्रथम वाटलें होतें त्याप्रमाणें कित्तुराकडे न येतां धारवाड प्रांतीं गेली अर्थे

वर्तमान कळतांच शत्रूनेंही फक्त पांच हजार स्वारांची टोळी कित्तुरास ठेवून बाकी सर्व सैन्यासह हुबळीस जाऊन तेथें किल्ल्याच्या तटाखालीं तळ दिला.

कित्तूरकर देसाई शत्रूस शरण गेला तरी त्यामुळें त्यास कांहींच फायदा झाला नाहीं. उलट त्याचें सर्व संस्थान वर सांगितल्याप्रमाणें शत्रूनें लुटून पादाक्रांत केलें, आणि तो व त्याचीं बायकामुलें व कारभारी यांस कैद करून श्रीरंगपट्टणास नेलें.

---

नं. २८७१. ( आषाढ व० १–२२ ऑगस्ट. )

धोंडो अनंत याचें पत्र बाळासाहेबांस छ० १५ रमजानचें—

" दोडवाडांत तिघे ब्राह्मण व प्यादे आहेत. गांव अगदीं पळाला आहे. किल्ल्यांत जाकिरा नाहीं व लोकांस पोटासही बाहेरून आणितात, व दारूगोळीही नाहीं. आंत कांहीं सामान जावयाजोगें असल्यास दारूगोळी व सामानही आंत पोंचविणेंविशीं लिहितों. शत्रूकडील शिलशिला खानापूर व जांबोटी व सडें येथेंही लागला आहे."

नं. २८७२. ( कार्तिक शु० २–४ नोव्हेंबर. )

रामाजी अनंत याचें बाळासाहेबांस पत्र छ० १ मोहरमचें—

" शत्रूचा जमाव धारवाडास आला आहे. चहूंकडे स्वारी करूं लागला. "

---

१ हा शहापुरचा कमावीसदार. उपनाम सखदेव जोशी. याचें हें कुरुंदवाडाहून पत्र मिरजेस. २ तेरदाळाहून मिरजेस पत्र.

नं. २८७३. ( कार्तिक शु० ३–५ नोव्हेंबर ).

विसाजी नारायण वाडदेकर याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. छ० २ मोहरमचें—

" शत्रूची फौज कित्तुराजवळ आल्याच्या बातम्या श्रीमंत राजश्री भाऊसाहेबानीं पाठविल्या. आणखीकडूनही सरकारांत बातम्या आल्या. परंतु आजपर्यंतही येथें स्वस्थ होतें ! आतांशीं तयारीचा नेट धरिला आहे. राजश्री हरिपंत तात्या उदईक येथून कूच करून जाणार. श्रीमंत राजश्री नानाही कार्तिक वद्य सप्तमीस निघणार. नबाब डोले जाले म्हणजे क्षेपनिक्षेप निघणार. शत्रूकडील संधानाचें बोलणें आतां अगदीं नाहीं. "

नं. २८७४. श्री. ( कार्तिक शु० ४–६ नोव्हेंबर ).

पै॥ छ० ५ मोहरम. भौमवार. सेनेसीत—

साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम तागायत छ० ३ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. अमित्राचे फौजेचें वर्तमान लिहून पाठविणेविशीं लिहिलें, त्यास त्याची फौज कित्तुरावरच आहे. कित्तूरकराचे तह चालला नाहीं............लिहून पाठविलें आहे. तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें करणार. आलाव्याचे दिवस आहेत ते जाहाल्यावर मग कोणीकडे जातो पहावें. सध्यां तेथेंच आहेत. त्यांचे लष्करचें वर्तमान तथ्य कळत नाहीं. दगेखोर आहे ! फौजा न आल्यास कृष्णेपर्यंत उपद्रव करावयाचे ( त्याच्या ) मनांत आहे. आपण फार सावधगिरीनें रहावें. आणखी माणसें पाठवावीं. बातमी लिहून कळवितों. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

---

१ हें बेळगांवाहून तेरदाळच्या फडणिसांस गेलेलें बातमीपत्र. याचा उल्लेख पुढच्या पत्रांत आहे.

नं. २८७५. श्री. ( कार्तिक शु० ६–८ नोव्हेंबर. )

पै॥ छ० ६ मोहरम सीत समानीन मय्या व अल्लफ.

श्रीमंत राजश्री बाळासाहिब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ० ५ मोहरम भौमवार प्रातःकालपावेतों स्वामींचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. अमित्राची फौज कित्तुरावरीच आहे. असुरा जाहालेखेरीज कूच होऊन कोणीकडे जात नाहींत. बेळगांवाहून राजश्री सखारामपंत यांचें पत्र बातमीचें काली सोमवारीं सायंकाळीं आलें तेंच बजिन्नस सेवेशीं पाठविलें आहे. त्यावरून विदित होईल. आणखी बातमीस माणसें पाठविलीं आहेत. येईल वर्तमान तें सेवेशीं लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २८७६. श्रीगणराज. (कार्तिक शु० ८–१० नोव्हेंबर. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे व रा॥ बाळाजीपंत स्वामीचे सेवेशीं—

पोष्य महादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत ७ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष.......
...शत्रूचा जमाव दोन चार हजारपर्यंत धारवाडास आला. इकडील रस्त बंद करावी, मार्ग चालूं देऊं नये, या अर्थें आला आहे. गोकाक प्रांतीं गडबड जाहली, याचा मजकूर समजत नाहीं. हे विनंती.

नं. २८७७. श्री. ( कार्तिक शु० १२–१३ नोव्हेंबर )

पै॥ छ० १४ मोहरम. सन सीत समानीन. कार्तिकमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

---

१ पत्र तेरदाळाहून मिरजेस. २ मोहरमचे दहा दिवस. ३ पत्र कुरुंदवाडाहून पुण्यास. ४ पत्र गोकाकेहून मिरजेस.

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० १० मोहरम मु॥ गोकाक यथास्थित असे. विशेष. शत्रूची फौज कित्तुरावर आहे तेथेंच आहे. अद्यापि हालचाल नाहीं. अलावा जाल्यावर कोणीकडे जातो पहावें. बातमीचीं पत्रें आलीं त्यांच्या नकला पाठविल्या आहेत. आणखी माणसें बातमीस पाठविलीं आहेत. येईल वर्तमान ( तें ) लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८७८. श्री. ( कार्तिक व० २–१८ नोव्हेंबर. )

पै॥ छ० १७ मोहरम सन सीत समानीन. कार्तिकमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं—

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १५ मोहरमपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. शत्रूकडील वर्तमान अद्याप कित्तुरानजीकच आहे. एक दोन रोजांत कूच होणार. कोणीकडे जातो पहावें. त्याची मसलत समजत नाहीं याप्रमाणें गोकाकेहून व यादवाडाहून आतांच पत्रें आलीं. कित्तुरास व बेळगांवास आणखी माणसें गेलीं आहेत. एक दोन रोजीं येतील. आल्यावर सेवेशीं लिहितों. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २८७९. श्री. ( मार्ग० शु० ४–५ दिसेंबर )

पै॥ छ० ४ सफर सीत समानीन बुधवार प्रातःकाळचा प्रहर.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथिल वर्तमान तागाईत छ० २ माहे सफर इंदुवारपावेतों

---

१ पत्र तेरदाळाहून मिरजेस.

मुक्काम गोकाक. यथास्थित असे. विशेष इकडील वर्तमान कित्तूरकराचा जमाव दोन तीन हजार प्यादे व शत्रूकडील बार एकशें व स्वार पन्नास येऊन हणबरहट्टीचें ठाणें घेतलें. आंतील प्यादे पळून गेले. संपगांव व बसवंत बागेवाडींत ठाणें शत्रूनें घातलें. होसकट्टें घ्यावयास येणार, याकरितां पाच्छापूरकरानीं पांच सातशें प्यादे जमा करून बारी धरली आहे. शत्रूकडील बार व कित्तरचे प्यादे जाणार. होईल तें मागाहून लिहितों. खानापुरास शत्रूची फौज गेली. तोफांचे आवाज वाजत होते. ठाणें शत्रूनें घातलें. खानापुरांतील लोक नागवून घेतलेले काणुरास आले म्हणून सांगत होते. बारीपलीकडे पाच्छापूर व बेळगांव दोन जागां सरकारचीं ठाणीं. वरकड प्रांत शत्रूनें घेतला. बातमीचें पत्र पाच्छापुराहून आलें त्याची नक्कल पाठविली आहे. येईल वर्तमान मागाहूनें लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८८०. श्री. (मार्ग० शु० १२–१३ डिसेंबर.)

पै॥ छ० १० सफर सन सीत समानीन भौमवार. आठ तास रात्र.

सेवेशीं रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० १० सफर भौमवार मु॥ गोकाक यथास्थित असे. विशेष. शत्रूची फौज व स्वार तोफा व कित्तुरचे प्यादे होसकट्टें घ्यावयास आले. हणबरहट्टीस उतरले. तेथून रविवारीं प्यादे होसकट्यास जाऊन चौकी दिली. दिवसभर गोळी उडविली. रात्रीं पळोन गेले. होसकट्टें शत्रूनें घेऊन त्याची फौज हणबरहट्टीस आहे तेथून माघारे जातात किंवा कोणीकडे जातात कळत नाहीं. जांबोटी

---

१ पत्र गोकाकेहून मिरजेस बाळासाहेबांस.

घेतली म्हणोन आवाई आहे. माणसें बातमीस पाठविलीं आहेत. येईल वर्तमान लिहितों. बातमीचें पत्र पाछापुराहून आलें त्याची नक्कल पाठविली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८८१. श्री. ( मार्ग० व० १-१६ डिसेंबर. )

पै॥ छ० १४ सफर सीत समानीन......अकरा तास रात्र.

श्रीमंत राजश्री गंगाधर रावजी स्वामींचे सेवेशीं—

पो॥ चिंतो विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० १३ माहे सफर पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. पुण्याकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. लवकर फौजेचें येणें जाहल्यास उत्तम आहे. इकडील वर्तमान हुसकोटें[1] घेऊन त्याजेकडील जमाव तोफांसुद्धां माघारे संपगांव बागेवाडी येथें येऊन राहिले होते ते काल जांबोटीकडेस गेले. तूर्त जांबोटीकराचे राशीस लागले आहेत. त्याचें इनामगांव व शेतें जेथें जेथें आहेत तीं घेत आहेत. काल धामणें येथें त्यांचे ठाणें आलें. दोन अडीचशें प्यादे व दहा पांच स्वार ऐसे गांवास येऊन राहिले आहेत. किल्ल्यापासून दोन कोस धामणें आहे. ऐशास तेथें किल्ल्यांतून लोक पाठवून उठवून द्यावें तरी त्याची फौज जवळ. तेव्हां सारेच निघोन......येतील. तूर्त परगण्याचा बखेडा होईल ............तो विचार केला नाहीं. मुचंडीस आ.........कोणी आले नाहीं परंतु तेही आज उद्यां येतील. सारांश ते कित्तुरकराचे निसबतीचें आहे तें बेलाशक घेत आहेत. चंदगड तालुकियापैकीं माणगांव म्हणोन गडनेसरीपासून दोन कोस आहे. तिकडेसही कांहीं त्याचा[2] जमाव जाईल असें दिसतें. तेव्हां त्याचा अमल नेसरी-

---

१ बेळगांवचा किल्लेदार. २ टिपूकडील.

पर्यंत पश्चिमभागीं व इकडे हणबरहट्टी हुसकोटें घेतलें तेव्हां पाछापूर गोकाकेस जाऊन लागेल. ते सोईसोईनें एक एक ( ठाणें ) हाताखालीं घालितात. सरकारच्या फौजा येण्याची आवाई मात्र येती. राजश्री गणेशपंत कृष्णेअलीकडेसही आले असेंही लिहिणें जिकडून तिकडून येतें, परंतु ते कोठें आहेत याचें पक्कें कांहींच समजत नाहीं. त्यास येविसीं पक्कें वर्तमान आणवून ल्याहावें. कित्तुरकराचे नि॥ दोन गांव शाहापूर परगणेंत आहेत तेथें त्याचे चार प्यादे राहून वसूल गांवचा घेतला. त्यांस आज धुडावून लाविलें तरी ते आज लावूं. परंतु मागून पिच्छा भारी, यास्तव जोंपर्यंत मास पक्ष फौज आपली येऊन हे मार्गे सरत तोंपर्यंत कालहरण करावें अशी तजवीज करून राजश्री नरसो रामजीस...सांगितलें. आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८८२. श्री. ( मार्ग० व० २–१७ दिसेंबर. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ रा॥ धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० १४ माहे सफर मंदवार प्रातःकाळ जाणून यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं १२ तेरखेचें पत्र पाठविलें तें तेरा तारखेस भृगुवारीं दोन प्रहरीं पावलें. शत्रूचा मुक्काम कित्तुराअलीकडे होता तेथून आज कूच करून मलप्रहेरअलीकडे हुबळीस येणार असें वर्तमान. हणबरहट्टीकडील जमाव संपगांवावरून बागेवाडीस येऊन करीनकोप अंकलेस मोकाम करून पुढें कांहीं प्यादे पाठवून परगणे शहापुर येथील धामणें तर्पे अलूर खेडयांस ठाणा घालून दुसरे दिवशीं भृगुवारीं करीनकोपावरील

१ बेहेरे. २ पत्र शहापुराहून.

जमाव खानापुराकडे इदिलहोडेपावेतों जाऊन तेथून लागलेंच कूच करून मुडयें म्हणून गांव बेळूर कर्यातीचें कलानिधिगडाखालें वर्ततें त्या गांवास जाऊन वेढिलें. गोळागोळी काल रात्रीं लागले होतें. याप्रमाणें सभोंवतें व्यापलें. धामणें तो घेतलें. मुचंडीस ठाणें जाणार. माणगांव मुडियें घेतलेवर जातील. मग नेसरीपावेतों त्याचा दाब बसला. किल्ले बेळगांवसभोंवतें त्याचे व्याप जाहले. एक सुतगट्टेचे बारी मात्र येकमनमुर्डी.........आजपावेतों मोकळें आहे. राजश्री आपाजीराम याचा भाऊ नारोराम याचा लेंक व बायका व सदाशिवराव उणकल याचें एकंदर कुटुंबपैकीं तिघे मात्र धरायास आले तेवेळीं पळाले. आपाजीराम याची बायको व लेंक कृष्णराव व सदाशिवराव उणकल तिघे मात्र पार जाहले. वरकड सांपडले त्यांसीं नेऊन धारवाडचे किल्लेत ठेविले आहेत. आपाजीराम यास गळचेडाव[1] केलें म्हणून बाजारी वर्तमान आहे. खरें लटकें ईश्वर जाणे. वर्तमान पक्कें लागत नाहीं. ऐकिलेलें वर्तमान स्वामीस विदित व्हावयाकरितां विनंती लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै।। छ० १४ सफर. सीत समानीन.

नं. २८८३. श्री. ( मार्ग० व० ३—१८ दिसेंबर. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि।। राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता।। छ० १५ सफर भानुवार जाणून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्राचा मुक्काम कित्तुराअलीकडे आहे; ते कूच करून मलप्रहरेअलीकडे येणार. अमकेच वेळेस येणार हें कळत नाहीं. संती बस्तवाडावर

1 फांशीं दिलें.

काली हगबरहट्टीवर गेले होते ते जमाव आले होते. तेथें कुदळी खोरें व बिगार कित्तुरप्रांतांतील जमा करून आणवून शिडेही तयार करवून जांबोटीस गेले. संतीबस्तवाडावर तळास तीनशें बार व पन्नास राऊत ठेवून पुढें गेले. याप्रमाणें वर्तमान. धामणे मुंचंडास शत्रूचें निशाण चढलें. माणगांव राजगुळीस ठाणेंस जाणार. मुडयें कलानिधीकडे चालत होतें तें घेतलें. येथील विचार पहातां केधवां काय करतील हें कळत नाहीं. दगेखोर निशाचर कृत्रिम ! जाहलें वर्तमान स्वामीस विदित व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापि.

छ० १५ सफर. रविवार. दहा तास रात्र.

नं. २८८४. श्रीगणराज. ( मार्ग०व०१०–२६ दिसेंबर.)

पै॥ छ० २३ सफर सीत समानीन.

श्रीमंत राजश्री बळवंत रावजी स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक महादाजी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २३ सफरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पेशजी एक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. संतोष जाहला. पुण्याहून पत्रें आल्यास तिकडील सविस्तर वर्तमान ल्याहावया आज्ञा करावी. शत्रूकडील वर्तमान काल शापुराहून बातमीचें पत्र आजी प्रातःकालीं आलें. शत्रूचा जमाव तगूर प्रांत किंतूर येथें आहे. पांच सात हजार जमाव व चार तोफा याप्रमाणें जांबोटीस जाऊन जांबोटी घेतली. जांबोटीकर पांच सात रोज जुजले. उपरांतीक ठाणें टाकून रात्रीचे निघोन सडयास गेले. ठाणें शत्रूनें घातलें. तेथून कुणकुं-

---

१ शिड्या. २ बळवंतराव कृष्ण मंगळवेढेकर यांस मिरजेच्या किल्ल्यांत ठेवून गंगाधरराव बाळासाहेब पुण्यास गेले होते, त्या बळवंतरावांस हें पत्र कुरुंदवाडाहून.

व्यास शत्रूचा जमाव जाऊन राहिला आहे; सडच्यांस जाणार. सडयांस फिरंगी दोनशें गोव्याहून आला आहे व वाडीकराचाही जमाव आला आहे. काय होईल तें पहावें. सडेकरानीं दम धरून जुजल्यास आठ पंधरा दिवस लागतील. दरबारचें वर्तमान येईल तें ल्याहावयास आज्ञा करावी. स्वामींनीं सदैव पत्रीं परामर्ष करावा. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २८८५. श्रीगणराज. ( मार्ग० व० ११–२७ दिसेंबर ).

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा वडिलांचे सेवेशीं,

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० २४ सफरपर्यंत सुखरूप असे. विशेष. आपण छ० २२ रोजचें पत्र पाठविलें तें आज सकाळचे प्रहर दिवसास पावलें जांबोटी शत्रूनें घेतली, वाईट गोष्ट जाहली. श्रीसत्ता प्रमाण ! दोनीं लेमें जाहलीं. आम्ही लौकरच येत आहों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २८८६. ( पौष शु० १–२ जानेवारी. )

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शहापुराहून पत्र मिरजेस बळवंतरावांस आलेलें. छ० १ रबिलावलचें—

" अमित्राचा मुक्काम कितुराअलीकडे आहे तेथेंच आहे. कुलकुंबेवर जमाव सडेचे मसलतीस आहेत. झाडी तोडून बिगाऱ्यांकडून मार्ग तयार करवीत आहेत. गोळ्यागोळीनें बिगारी मात्र मरतात. सडेकरांचे कुमक वाडीकर व गोवेंकर यानीं केली आहे. मुदगलाकडून कोणी गृहस्थ आले होते त्यानीं वर्तमान सांगितलें कीं, मिजरखान

१ गंगाधरराव गोविंद यांचें पुण्याहून पत्र. २ केशवराव गंगाधर व चिंतामणराव पांडुरंग यांचीं.

म्हणून एक चांगला मर्द सरदार कपटनाथाचे घांटानें उतरून अर्काट-वाल्यांचा मुलूख मारण्यास जात होता. त्यास अर्काटकरानीं व फिरं-ग्यानीं[1] छापा घालून समूळ बुडविलें. बारा हजार बार व पांच हजार फौज व चार तोफा यांसुद्धां बुडविलें. याप्रमाणें सांगत होतो. कम-रुद्दीन तो पहिलेच नबाब निजाम अल्लीखान यांजकडे गेला म्हणून पेशजी विनंती लिहिलीच आहे."

नं. २८८७. (पौष शु० ३–३ जानेवारी).

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें. छ० २ रबिलावलचें—

"शत्रूचा मुक्काम कित्तुराअलीकडे आहे. सैद गफूर म्हणून कित्तुरांत आहे त्यानें देसायाचे वाड्यांतील चीजबस्त पट्टणास नेण्याक-रितां जमा केली आहे. सड्यावर फौज गेली आहे तिचा मुक्काम सड्यापासून दोन कोसांवर आहे."

नं. २८८८. (पौष शु० ४–४ जानेवारी.)

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें. छ० ३ रबिलावलचें—

"सड्याचें ठाणें झुजत आहे. कित्तुरांत एकंदर बंदोबस्त करून चीजबस्त जमा करून आतां प्रांतांतील वसूल झाडून जमा करीत आहेत. मातबर कुळें पाहून धरून नेतात. त्याचप्रमाणें गांवां-तील पूर्ववयाचीं चांगलीं सुरेख माणसें पुरुष व बायका धरून नेऊन जमा करीत आहेत."

नं. २८८९. (पौष शु० ६–६ जानेवारी.)

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें. छ० ५ रबिलावलचें—

---

1 मद्रासकर इंग्रजांनीं.

" आंबेखोल म्हणून ( जागा ) आहे तेथपावेतों पावतांच तिकडून सडेकर येऊन त्यांशीं यांशीं गोळागोळी होऊन सडेकरानीं यांस माघारें सारिलें. टिपू भारी जमावसुद्धां पट्टणाहून निघून इकडे येणार म्हणून वर्तमान आहे. "

नं. २८९०. श्री. ( पौष शु० १०–९ जानेवारी. )

श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा स्वामींचे सेवेशीं—

सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० ८ माहे रबिलावल इंदुवार जाणून यथास्थित असे. विशेष. अमित्राचा मुक्काम कित्तुराअलीकडे आहे तेथेंच आहे. कुलकुंबेवर जमाव सडेचे मसलतीस राहिले आहेत. बिगारी पुढें घालून झाडी तोडितात. दूरचेदूर गोळागोळी जाहले तरी बिगारी मात्र मरतात. कित्तूर प्रांतांतील वसूल व देसाईचे वाड्यांतील देखील घर खणून चीजबस्त वगैरे एकंदर झाडून रवाना करितात, यांचें विस्तारपूर्वक पहिलेंच विनंती लिहिलें आहे. करीमकोप क॥ बागेवाडी येथील चांगले बायका, निवडक व दांडगे माणसें धरून घेऊन गेले. याचप्रमाणें कित्तूर प्रांतांतही घडणार. खानापूर येथें दंड बांधणें, वसूल झाडा घेणें, मातबरांशीं धरून नेणें, आरंभिले आहेत. आमंचेंत कोण वेळ काय करितात हें कळत नाहीं. दगेखोर आहेत ! कित्तुरापाशीं बंदोबस्तीनें राहिले आहेत. श्रीमंतांचे फौज येणार असे आवाईनें सभोंवते चार कोसांवर मलप्रहरा धरून चवकी ठेविले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापि.

पै॥ छ० ८ सफर. सीत समानीन. पौषमास. इंदुवार. दहा तास रात्र.

---

१ पत्र शहापुराहून मिरजेस. २ आमच्या तालुक्यांत.

नं. २८९१. श्री. ( पौष व० ७–२१ जानेवारी. )

श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा स्वामीचे सेवेशीं—

सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० २० माहे रबिलावल स्थिरवासर जाणून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्राचे मुक्काम किचुराअलीकडे आहे तेथेंच आहे. कुलकुंबेवर जमाव सडेचे मसलतीस आहे तसेच आहे. झाडी तोडीत पुढें जागा साधीत जातात. याप्रमाणें वर्तमान आहे. एक गृहस्थ आला होता तो सांगत होता कीं टिपू कोडेयाळाकडेच आहे. राजश्री आपाजीराम यास चवकी म्हणत होते तें वर्तमान लटकें म्हणत होता. त्याचे मुलेंमाणसें वगैरे या प्रांताकडे होते त्यांस जप्त करून धारवाड किल्लेंत घातले होते, त्यास घालायास कारण किचुर प्रांतांत मिरज वगैरेकडील देखील राजश्री वेंकाप्पा नाईक कलकेरी सावकार आहेत म्हणून टिपूपाशीं अर्जी करणारानीं करून सावकार असतील ते जप्त करणें म्हणून चिठी आले होते. त्याजवरून येथें शत्रूकडील आले गृहस्थ याणीं सावकार येथें कोण आहेत म्हणून वाजपूस करावयास लागले तेव्हां सांगणारानीं सावकार हे या प्रांतांत असतात म्हणून सांगितलें. त्याजवरून यांशीं कैद केलें होतें. तें वर्तमान अप्पाजीराम यास कळलें. त्याणें अर्ज करून मोकळीक चिठी चीजवस्तसुद्धां सोडावयाची करून पाठविली, म्हणून वर्तमान. किचुरकराचे भिकाप्पा तेरगांव व लछीराम दोघे जाबसालास पट्टणास गेले होते ते प्रस्तुत आप्पाजीराम याजपाशीं आहेत. त्यांचे विद्यमानें जाबसाल लागले आहे म्हणे. आम्ही ऐकिलेलें वर्तमान स्वामीस कळवावयाकरितां विनंती लिहिली आहे. खरें लटकें ईश्वर जाणे. श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांस काल विनंतीपत्र

१ पत्र शहापुराहून मिरजेस. २ मंगलोरास.

लिहिलें होतें त्या पत्राचें उत्तर लवकर आणून पाठवावयास आज्ञा करावी. बेळगावकर याणीं किरकोळ उपद्रव पेठेशीं मांडिला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै।। छ० २० रबिलावल सीत समानीन. मंदवार. दहा तास रात्र.

नं. २८९२. श्री. ( पौष व० ११–२६ जानेवारी. )

पै।। छ० २७ रबिलावल. मंदवार. सूर्योदय. सीत समानीन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बळवंतरावजी स्वामीचे सेवेशीं—

पोष्य चिंतो विश्वनाथ. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागाईत छ० २५ माहे रबिलावल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें आतांच पावलें. लष्कर तेलगांव परगणे मंदरूप येथें गेल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. अलीकडील वर्तमान ल्याहावें. इकडील वर्तमान–अमित्राची फौज दोहीं ठिकाणीं आहे तशीच आहे. मध्यें तहाचें बोलणें सडे-करांशीं लागलें. कराराप्रमाणें पैका कित्तुरास अमित्राची फौज माघारी गेल्यानंतरी द्यावा; असें कांहीं बोलणें होऊन दोन दिवस उगेच राहिले. कालपासून तोफांची मारागिरी बहुत होत आहे. उद्यां पक्की बातमी काय ती समजेल. समजल्यानंतरी आपणास लिहून पाठवूं. कुमक नाहीं, त्यापक्षीं ठाणें कोठवर राहील कळतच आहे ! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. २८९३. श्री. ( पौष व० १३–२८ जानेवारी. )

पै।। छ० २७ रबिलावल. सीत समानीन. पौष मास.

श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक अप्पाजी सीदनाथ व रामाजी दामोदर कृता-

---

१ बेळगांवाहून मिरजेस पत्र. २ गणेशपंत बेहेरे यांचें लष्करांतून मिरजेस पत्र.

नेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान छ० २७ रबिलावल रोज मंदवार मुक्काम लष्कर येडूरपावेतों स्वामीच्या कृपेकरून यथास्थित असे. विशेष. आपण सरकार पागेच्या बारगीराबरोबर पत्र पाठविलें होतें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. " राजश्री गणेशपंत बेहेरे यांचे लष्करांत लोणी दर रुपयास सहा शेर मिळतें म्हणोन कळलें, त्यास शोध करून लिहून पाठवणें " म्हणोन पत्रीं आज्ञा, तरी येथें गवळीयाचे येथें शोध केला. लोणी तीन शेर व म्हैशीचें दूध अठरा शेर व शेळीचें दूध एकवीस शेर याप्रमाणें लष्करांत निरख आहे. लष्करचें कूच कधीं होणार हें लिहिणें म्हणोन आज्ञा, त्यास अद्यापि कुचाचा निश्चय नाहीं. सात आठ मोकामच आहेत. दोन तीन रोज कही जात नव्हती. आज कही आडीबनोडीच्या सुमारें गेली. कित्तुरावरी शत्रूची फौज आहे त्यांतील बुनगें रात्रौ निघोन रोजचे रोज जातें म्हणोन वर्तमान आहे. होळकर व राजश्री बाजीपंत अण्णा कृष्णेवर गेले. तेथून पेंढार व लुगारे हणमसागरावरी जाऊन पेठ लुटल्याचें वर्तमान आलें. कागदींपत्रींचे वर्तमान नव्हे. बाजारी आहे. सेवेशीं कळावयाकरितां लिहिलें आहे. परवांचे दिवशीं तोफा चारी लष्करास आल्या. कुचाचा निश्चय होईल तें सेवेशीं लिहून पाठवितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. २८९४. श्री. ( माघ शु० १–३१ जानेवारी. )

सेवेसी विज्ञापना. स्वामीनीं काल रात्रीची चिठी पाठविली ती पावली. राजश्री नरसो रामाजी याचा रोजमुरा तेथेंच रामाजी भरमाजी याजकडून देविला. " होसकोटेंत प्यादे होते ते परवां रविवार ठाणें टाकून रात्रीं बेळगांवास निघोन आले. होसकोटें ठाणें शत्रूचें

१ चिठी कुरुंदवाडाहून धोंडो अनंत याची मिरजेस.

पडलें" म्हणून लिहिलें तें कळलें. पाछापूर बारोसुद्धां त्याचें जाहलें ! राजश्री अेचाजीपंत याचें पत्र सलगऱ्याहून स्वामीस आलें तें सेवेसी पाठविलें आहे. पावेल. विदित होय हे विज्ञापना.

नं. २८९९. श्री. ( माघ शु० १०–८ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० ८ माहे रबिलाखर सौम्यवासर प्रातःकाल जाणून स्वामीचे कृपानुग्रहें वर्तमान यथास्थित असे. विशेष. शत्रूचा मुक्काम कित्तुराअलीकडे आहे तसाच आहे. सडेवरील जमाव ठाणेंपुरते दहा पांच हजार बार व प्यादे मात्र आहेत. वरकड सर्व कित्तुरावरील फौजेस मिळाले. देसाई व राजश्री गुरुनाथपंत यांस ( शत्रूनें पट्टणास ) रवाना केलें. तमाम प्रांतांत पाहरे दिले आहेत. खानापुरास परवांपासून पाहरे येऊन बसले आहेत. दोघें लिंगाइताचे चांगले बाइका धरिले. वरकडां-सही धरावयाकरितां जपणी घातले आहेत. तमाम सुंदर बाइका बारा वाटा पळून गेले ! बाइका धरावयास कारण, पालक लेक आहेत त्यांस स्त्रिया करून देणेंस नेतात. असे वर्तमान. शिबंदी ( ठेवण्याकरितां ) प्रांतांतील दांडगे जवान धरून पट्टणाकडे पाठवणार. याप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री आप्पाजीराम तहाच्या जाबसालास श्रीमंतांकडे येणार असें बाजारी वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञाप्ति.

पै॥ छ० ८ रबिलाखर. सीत समानीन नऊ तास रात्र.

---

१ पत्र शहापुराहून. हें लिहिणाराची लिपि बरी आहे, पण भाषा कानडी वळणावर गेलेली असल्यामुळें विचित्र भासते ! २ लिंगाईत जातीच्या दोन सुंदर बायका पकडल्या. ३ टिपूनें मुलगे बाळगले आहेत त्यांस. ४ पेशव्यांकडे.

नं. २८९६. श्री. ( माघ शु० १२—१० फेब्रुवारी)

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक नरसो रामाजी नि॥ पांढरे. साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १० माहे रबिलाखर भृगुवार पावेतों स्वामीचें कृपेकडून यथास्थित असे. विशेष. शत्रूचा मुक्काम कित्तुरा पैलीकडे जाऊन पहिले मुक्काम होता तेथें मुक्काम केले आहे. राजश्री देसाई व राजश्री गुरुनायपंत व संस्थानची मालमत्ता व चीज वस्त अवघे धारवाडास रवाना केले. लष्करांतील बुणगे रवाना केले. सडी फौज मात्र राहिले आहे. सडेचे मसलतीस होता तो जमाव ठाणेची बंदोबस्ती करून कूच करून काल येऊन खानापुरचे नदीवर मुक्काम करून राहिले आहेत. तेथून कूच कोणीकडे जातात हें कांहीं मसलत कळूं देत नाहींत. दगेखोर घातकी ! कोणे वेळेस काय होईल तें कळत नाहीं. स्वामीचे पुण्येंकडून आजपावेतों येथें बचाव जाहला आहे; पुढेंही पुण्य तारील. आणखी मजकूर विस्तारें राजश्री रामाजी भरमाजी यांणीं लिहिला आहे. विदित होईल. डांकेच्या जासुदाची रोजमुरेची तेरीख दप्तरीं पाहून बेगमी करून पाठवावयास आज्ञा जाहली पाहिजे शापुरचे[1] मुक्कामीं जासूद असामी चार आहेत त्यांस रुपये शापुरी देववावे. येथें मलकापुरीस रुपयेस अवरा ( ! ) बट्टा पडतो. याजकरितां विनंती लिहिली आहे. आमचे रोजमुरेचे वरात राजश्री रामाजी भरमाजीचे नांवें पाठविलिया रोजमुरा पावेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

पै॥ छ० ११ रबिलाखर. सीत समानीन. माघमास. भृगुवार. दहा तास रात्र.

---

१ पत्र शहापुराहून.

नं. २८९७. श्री. ( माघ शु० १–१४ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० १४ रबिलाखर भौमवार प्रथम प्रहर जाणून स्वामीचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्रानीं सडे वगैरे ठाणेंचा बंदोबस्त करून सारे जमाव एकत्र करून कित्तुरापलीकडे लोमणमर्डी धरून मोरागिरीपर्यंत मुक्काम करून राहिले आहेत. दोन रोजांत मुगुदास जाऊन रहावें याचे योजनेंत होते. परवां सडेकर देसाई याणीं तेळी करून चौघांचें डोचकें कापून घेऊन दहा पांच असामीस लपवून गेले. हे मजकूर सडेंतील ठाणेकरी ( यानीं ) बुरानूदीन यास " याप्रकारें विचार होतो. पुढें आमचे परिणाम कसा ! " म्हणून सांगून पाठविलें. याजकरितां फिरोन सडेंचे ठाणेस चार हजार बार, दोन तोफा, खानापुरास ठेविले होते त्यांस पाठवून दिले. पट्टणाहून चार हजार चट्टेकरी दोन तोफा ऐसे पाठवून दिले ते कित्तुरावरील फौजेस येऊन मिळाले. त्याजमुळें तूर्त त्याचे मुक्काम करून राहणें जाहलें. कित्तूरकर देसाई व गुरुनायपंत वगैरे चिरंजीव सर्व मंडळीस व्यंकटरंगय्या याणें रवाना करणेंस बंदोबस्त करूं लागला, तेव्हां गुरप्पास व व्यंकटरंगय्यास वागवाद जाहला. गुरप्पानें पाहरेकरांशीं भांडून बुरानुदीन याजपाशीं फिर्याद देऊन पागोटें टाकिलें. याजकरितां बुरानुदीन याणें व्यंकटरंगय्यास बोलावूं पाठवून विचारिलें, " कित्तुरकराचे अपराध काय ? तूं साडेपांच लक्षांचे कबुलात पट्टणास करून हें दर्म केलास, ठाणें घेतलें, राज्य काबीज केलेंस, वसूल घेतलास, देसाई वगैरेची चीजवस्त

---

१ दंगा.

स्वाधीन करून घेतलास, याप्रमाणें करून या गरीबांस पाठवणें उत्तम नव्हे. याणीं कोणे गोष्टीविषीं अंतर केलें नाहीं; " म्हणतांच व्यंकटरंगय्या रुसून धारवाडास गेला. देसाई वगैरेस पाहरेंत तसेच ठेविले आहेत. बुरानुद्दीन याणें येथें जाहलेली हकीकत सर्व लिहून पट्टणास पत्र पाठविलें आहे. तेथून आज्ञा येईजेपर्यंत गुरप्पास अभय देऊन ठेवून घेतलें आहे. अकरा रोजांत उत्तर यावें असा करार करून माणसें पाठविले आहेत त्यास सात आठ रोज जाहले. तेथून आज्ञा येईल त्याप्रमाणें पुढें कळेल. त्याप्रमाणें स्वामीकडे विनंती लिहून पाठवितों. श्रीमंतांचे फौजा येणार म्हणून शत्रूच्या लष्करांत वर्तमान आहे त्याजकरितां पुढें वाटेस पावकोसपावेतों आठ हजार बार व तोफा तोंडाशीं ठेवून राहतात. याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापि.

पै।। छ० १९ रबिलाखर सन सीत समानीन. माघ.

नं. २८९८. श्रीजगदंब. ( १९ फेब्रुवारी. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजीपंत[1] यांस.

प्रती गोपाळभट कवठेंकर साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान माघ वद्य द्वितीया सौम्यवार प्रातःकाल पावेतों यथास्थित असे. विशेष. शनिवारीं अमित्राची फौज येऊन पाछापुरास ठाणें घातलें व हुकेरीपर्यंत बेदडेची दौड येऊन दहा पांच घरें नागविलीं. इतकेंत हुकेरीकरांनीं गोळी उडविली. मग तेथून माघारे गेले. हुकेरी प्रांताचे व गोकाक प्रांताचें गुळें तमाम जाहलें. मुलकाचा आधार तुटला. आम्ही श्रीमंतांसही विनंतीपत्र पाठविलें आहे. प्रविष्ट करून सत्वर उत्तर पाठवावें. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं.

---

१ बाळासाहेबांस.

त्यांच्याही बातम्या प्रकारें पुष्कळ आल्या असतील, परंतु आम्हास आढळलें वृत्त लिहिलें असे. कळावें, बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हे विनंती.

नं. २८९९. श्री. ( माघ व० २—१५ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशी—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १५ माहे रबिलाखर बुधवार प्रथम प्रहर जाणून, स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्राचे मुक्काम कित्तुरापलीकडे सडेनिशीं आहेत. राजश्री देसाई व गुरुनाथपंत वगैरे सर्वांस पाहरेंत ठेविले आहेत. दुर्गास पाठवणार होते. पट्टणाहून दुसरे परवाना यावयाचे उजूर करून ठेविले आहेत. दुर्गाहून चार हजार चटेकरी पट्टणाहून आले त्यांचेच पाहरा दिल्हे आहे. सडेचे ठाणेस ठाणेपुरते लोक सामान बंदोबस्ती करून अमित्रानीं ठेविले होते. त्यास परवां सोमवारीं दोन तास रात्री सडेकरी देसाई याणीं हजार दोन हजार लोकांनिसीं येऊन छेपा घालून शेंपन्नास माणसें जखमी करून दहा जणांचें डोचकें कापिले. अमित्राचे निसबत असामांचे बायका पांच सहा जणी सांपडले त्यांशीं मारून पोट फाडून कांठे भरले! ठाणेंतील सारे माणसें पळवून ठाणें काईम करून घेतलें. तेथें सरदार करून ठेविला होता त्याशीं जिवें मारिलें म्हणतात. ठाणेंत दारुगोळी व तोफा पांच व तांदूळ वगैरे साहित्यही होतें तें सर्व त्याचें स्वाधीन जाहलें. आंबे मोळाचे चौकी व मांगेरी चोरवाटेची चौकी दोनी जागचे बंदोबस्ती केले. याप्रमाणें राजश्री निळकंठगौडा सरदेसाई खानापूर याचा लेक त्र्यंकटराव म्हणायाचा त्याणें पुढें सरून एवढें काम केलें. फिरून अमित्रानीं सडेस रवाना केले आहे. याजउपर होईल तें वर्त-

मान स्वामीसीं लिहून पाठवितों. तूर्त कळलें वर्तमान स्वामीस निवेदन व्हावें या अर्थीं विनंति लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० १६ रबिलाखर सीत समानीन. माघ मास.

नं. २९००. श्री. ( माघ व० ३—१६ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० १६ माहे रबिलाखर गुरुवार प्रातःकाल प्रहरपर्यंत जाणून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष अमित्राचे मुक्काम कित्तुरापलीकडे आहे तसे आहे. सडें सडेकर देसाई याणीं घेतलें, याजकरितां मागती शत्रूच्यानीं सात आठ हजार बार व तोफा सडेकडे रवाना केल्या. कुणकुंबेवर मुक्काम आहे. याजउपर काय होईल तें स्वामीकडे लेहून पाठवितों. राजश्री देसाई व गुराप्पा व चिरंजीव वगैरे मंडळीसह अद्याप पाहरा देऊन ठेविले आहेत. पट्टणाहून परवाना येईल त्याप्रमाणें करणार. वेंकटरंगय्या धारवाडास रुसवा करून गेला. बुरानदीन मात्र कित्तुरकराचे साहित्यावर आहे असें बोलतात. सैद गफार बादामीस[1] गेला असें बाजारी वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० १७ रबिलाखर. सीत समानीन. भृगुवासर. प्रातःकाळचा प्रहर.

नं. २९०१. श्री. ( माघ व० ५—१८ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० १८

---

१ बदामीस.

माहे रबिलाखर, मंदवार, प्रातःकाळ, जाणून स्वामीचे कृपेकडून यथास्थित असे. विशेष. शत्रूची फौज किचुरापलीकडे आहे तर्सी आहे. सडयास फौज गेली होती ती कुणकुंबेवर आहे तशी आहे. राजश्री देसाई व गुरुनाथपंत वगैरे यांस जुनें तेलगुरास न्हेलें. धारवाडास नेणार म्हणोन वर्तमान आहे. बातमीचे माणसें येतांची आणली येईल तें वर्तमान लिहितों. सेवेशीं श्रुत हे विज्ञप्ति.

पै॥ छ० १९ रबिलाखर सीत समानीन प्रातःकाळ दोन तास दिवस.

नं. २९०२. श्री. ( माघ व० १०—२३ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० २३ माहे रबिलाखर गुरुवार प्रातःकाळ प्रथम प्रहरपर्यंत यथास्थित असे. विशेष. अमित्राची फौज किचुरानजीक होती तेथून बातमीचा माणूस काल संध्याकाळीं आला. त्याणें मुक्ता[1] सांगितलें कीं, टिपू पट्टण सोडून दोन मजल आला. तेथून सैदबुरान व सैद गफार, शेख अनसार, यांस परवाना आला. "श्रीमंतांचा[2] व आमचा तहाचा जाबसाल राहिला. आम्ही मजल दर मजल चित्रदुर्गास येतों. तुम्ही पुढें मिरज्येच्या रोखें डेरे देणें. खबरदारीनें बंदोबस्तीनें राहणें. आम्ही येथून कुमक पुरवणी करितों; चिंता न करणें." म्हणोन, त्याउपर त्रिवर्ग मसलत करून हुबळी मलप्रभेतीरीं सात हजार बार व कांहीं तोफा रवाना केल्या आहेत. त्रिवर्ग किचुरानजीक आहेत तेथेंच आहेत. पुढें येणार आहेत. कूच करून कोणत्या रोखें येतात तें मागाहून वर्तमान येतांच स्वामीकडे लेहून पाठवितों. धारवाडाहून दारूगोळी सामान

---

१ तोंडजबानी. २ पेशव्यांचा.

कित्तुरावरील लष्करांत आले. खानापुरावर दोन हजार बार व तोफा दोन आहेत. बाकीची फौज हुबळीस जाणार. राजश्री देसाई व गुरु-नायपंत व चिरंजीव मंडळी रायरहुबळीस पावले होते तेथून सावनुरास रवाना केले म्हणोन वर्तमान आहे. कित्तुर प्रांतांतील पैका सालाबादप्रमाणें घेऊन उंबरेपट्टी म्हणोन दर घरास तीन रुपये प्रमाणें लाविलें आहे. व शत्रु कावेबाजही आहे. कोठें दंगा करितो न कळे ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २४ रबिलाखर. सीत समानीन. माघ मास.

नं २९०३. ( माघ व० १२–२५ फेब्रुवारी. )

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत यांजकडून शहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें. छ० २५ रबिलाखरचें—

" राजश्री होळकर यांचा मुक्काम गणीचिमलगे येथें होता तेथून कूच करून काल भृगुवारीं बिदरीचे मुक्कामास आले. आज कूच करून शूर्पाळीचे मुक्कामास येणार. बरोबर फौज पंचवीस हजार व तोफा, शिवाय पेंढारीं याप्रमाणें आहेत. "

नं. २९०४. श्री. ( माघ व० १२–२५ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २५ रबिलाखर स्थिरवासर प्रातःकाळ जाणून स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष स्वामींनीं २३ तेरिखेचें आज्ञापत्र पाठविलें पावलें. श्रीमंत राजश्री अप्पासाहेब व दाजीसाहेब पुण्याहून सुखरूप आले, तेणेंकरून बहुत संतोष जाहले. अमित्राचे मुक्काम कित्तुरापाशींच आहे. खानापुरापाशीं

१ घरपट्टी. २ अनुक्रमें चिंतामणराव व केशवराव.

हजार स्वार व हजार बार व तीन तोफा मात्र ठेविले आहेत. हुबळीस बार आले म्हणून लिहिलें होतें ते कांहीं नेहमीं राहत नाहीं. बातमीचा माणूस काल प्रहर रात्रीस शत्रूच्या लष्करांतूनच आला. त्याणें सांगितलें कीं, श्रीमंताचे फौजेची आवाई; करितां हुबळीपाशीं व किचुराहून पुढें देशनूरच्या मार्गें दोन कोसांवर रात्री चौकीदाखल बार व तोफा येऊन राहतात, पहांट जाहलेवर माघारे जातात, याप्रमाणें सांगितलें. शत्रु आपले जागां आहे तेथें हुशारीनें चौकी पाहरा खबरदारीनें आहेत हेंही वर्तमान सांगत होता. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २५ रबिलाखर. सीत समानीन. रविवार. प्रातः-काळचा प्रहर.

नं. २९०५. श्री. ( माघ व० १४-२७ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब. स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० २७ रबिलाखर इंदुवार प्रातःकाळपर्यंत यथास्थित असे. विशेष. अमित्राची फौज तिमापुराजवळ आहे तसी आहे व खानापुरास दोन तीन हजार बार व स्वार आहेत. हुबळी व तेगूर व गोकाक तिनी मार्गांस रात्री दर मार्गास हजार दोन हजार बार चौकीस पाठवून आपल्या ठिकाणीं तोफादेखील रोखून खबरदारीनें राहतात. या प्रांतावर स्वारी करावयाची आवाई फार आहे. शत्रु दगेखोर, कावेबाज ! कोणेवेळेस काय दगा करितो कळत नाहीं ! काल भीमगडच्या सुमारें प्रातःकाळापासून दोन प्रहरपर्यंत तोफेची मारागिरी जाहाली. आवाज मात्र ऐको आले, परंतु पत्ता लागला नाहीं. पक्कें वर्तमान कळतांच सविस्तर लेहून पाठवितों. शत्रूनें मुंडगोडची बारी तोडवून वाट नीट करून ठेविली आहे. श्रीमंतांचे फौजेचे नेट फारच जाहलेस त्या मार्गें निघोन सोंदे-

कडे जाणार. ऐशी योजना करून राहिले आहेत. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २८ रबिलाखर. सीत समानीन. इंदुवासर.

नं. २९०६. **श्री.** ( माघ व० ३०–२८ फेब्रुवारी. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० २८ रबिलाखर भौमवार प्रातःकाळपर्यंत यथास्थित असे. विशेष. अमित्राची फौज तिमापुरास आहे तसी आहे. खानापुरासही फौज आहे तसी आहे. गोकाक व हुबळी व तेगूरच्या मार्गांनीं रात्रौ बार चौकीस दोन हजार प्रमाणें ठेवित असतात. कित्तुर प्रांतांतील देखील बागेवाडी संपगांव येथील वैरण झाडून घेऊन गेले. दोन जिन्नस अगदीं झाडून धारवाडास रवाना करावयास लागले आहेत. काल तोफा उडाल्या म्हणोन लिहिलें होतें त्यास गोवेंकर राजा आदितवारीं बाहेर निघाला होता. त्याच्या तालुक्यांत राजा बाहेर निघाला म्हणजे तोफा उडवाव्या अशी रीत आहे म्हणे; त्याजमुळें उडविल्या ते आवाज आइकूं आले. दक्षिणेकडील मुख्य शत्रु[1] जिवंत आहे असें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २९ रबिलाखर. सीत समानीन. दोन तास दिवस प्रातःकाळ.

नं. २९०७. **श्री.** ( फाल्गुन शु० १–१ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २९ माहे रबिलाखर

---

१ टिपू मेल्याची खबर खोटी. तो जिवंत आहे.

सौम्यवासर प्रातःकाळ जाणून स्वामींचे कृपावलोकनेंकडून वर्तमान यथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र पाठविलें पावलें. अमित्राचे मुक्काम कित्तुरापाशीं तिमापुरावर आहे तेथेंच आहे. बातमीचा माणूस काल्हीं संध्याकाळास आला तो मुक्ता सांगत होता. लष्कर श्रीमंतांकडून रवाना जाहलें आहे, त्वरेंकडून येणार, म्हणून आवाई फार आहे; त्याजकरितां बहुत सावध रीतीनें आपले बंदोबस्तीनें आहेत. मार्गानें रात्रीं चौकी बारांचे ठेवून तोफादेखील रोखून हुशार असतात. फौजा श्रीमंतांकडील जबरदस्तीनें आलेस जाहलें तरी एक लढाई द्यावी; मग धारवाडचे आसरेस जावें; असे मसलत केले आहेत. खानापुरावर दोन तीन हजार बार ठेविले आहेत. सडच्यांचे टाणेस जखिरा बंदोबस्त करितात याप्रमाणें वर्तमान आहे. कित्तूरकर देसाई वगैरे सावनुराहून पुढें घेऊन गेले असें वर्तमान आहे. आणखी वर्तमान येतांचि सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० १ जमादिलावल. सीत समानीन. गुरुवार.

नं. ३९०८. श्री. ( फाल्गुन शु० २–२ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ माहे जमादिलावल गुरुवार प्रातःकाळ प्रथम प्रहर जाणून स्वामींचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं अठ्ठावीस रबिलाखरचें प्रातःकाळ दोन तास दिवसाचें पत्र पाठविलें तें एकोणतीस तेरिखेस बुधवारीं दोन प्रहरास पावलें. तेथें आज्ञा कीं, ' डांकेचें पत्र जलद येत नाहीं ' म्हणून, त्यास पहिलें पत्र संध्याकाळीं जासुदाजवळ लिहून देऊन प्रातःकाळचे तेरीख घालून प्रहररात्रीस पहाटेचे रवाना करून

देत होतों; आतां उजाडल्यावर रवाना करून देत असतों. एक प्रहराचा फेर होतो. आतां स्वामीचे आज्ञा जाहले तर प्रहर रात्रींच रवाना करून देऊं. मध्यें आपले आज्ञा आले होते कीं, 'नाजूक असल्यास त्याप्रमाणें पाठवीत जाणें;' म्हणून, त्याजकरितां उजाडल्यावर जासूद यास रवाना करीत होतों. जासुदास ताकीद करून ठेविली आहे. येथील जासूद कांहीं वाटेस आळंस करीत नाहींत; तिकडून स्वामींची ताकीद असावी. अमित्राचे मुक्काम कित्तुरापाशीं सड्यानिशीं तिमापुराशीं राहिले आहेत. तोफा देखील रोखून लढाई द्यावयाचे मनसुबेंत आहेत. खानापुरावर दोन तीन हजार बार आहेत. सड्यास जखिरा वगैरे घातले आहेत. टाणेंत तीनशें प्यादा मात्र आहेत. कित्तुरप्रांतांतील झाडून कडबा वैरण न्हेऊन जमा करितात. मार्गानें रात्रीं बाराची चौकी ठेवितात. याप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री रघुनाथ मंगेश याजकडे स्वामीचा लखोटा आला तेच समईं रवाना करून दिल्हे होते. अद्यापि तिकडे गेलेलीं माणसें आले नाहींत व हाल्लीं लखोटा पाठविला तो आज्ञेप्रमाणें रवाना करून दिल्हे आहे. उत्तर येतांच स्वामीकडे पाठवून देतों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २ जमादिलावल. सीत समानीन. भृगुवार.

नं. २९०९. श्री. ( फाल्गुन शु० ३—१ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं:—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. ता॥ छ० २ माहे जमादिलावल भृगुवार प्रातःकाळपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकडून यथास्थित असे. विशेष. अमित्राची फौज कित्तुरानजीक तिमापुराजवळ आहे तशी आहे. बुणगें बाजार सर्व मिश्रीकोटेकडे रवाना करणार आहेत. सडे

होऊन लढाई द्यावयाचा मनसबा केला आहे. पट्टणाहूनही त्यांस आज्ञा आली आहे कीं, तुम्ही ज्या ठिकाणीं आहां तेथेंच काईम राहणें. मागाहून तुमचे कुमकेस साहित्य जें लागेल तें पुरवून देवितों. याप्रमाणें वर्तमान आहे. खानापुरास जमाव आहे तसा आहे. सडेच्या ठाण्यास जखिरा वगैरे घालून बंदोबस्त केला आहे. श्रीमंतांची फौज आली तरी लढाई द्यावी याप्रमाणें दम आहे, म्हणोन वर्तमान आहे. या प्रांतीं स्वारी करावयाची आवाई फार आहे. दगेखोर कोणे वेळेस दंगा करितो कळत नाहीं! बातमीचा माणूस आला त्याणें याप्रमाणें वर्तमान सांगितलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० ३ जमादिलावल. सीत समानीन.

नं. २९९०. श्री. ( फाल्गुन शु० ४–४ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० ३ जमादिलावल मंदवार प्रातःकाळपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकडून यथास्थित असे. विशेष. अमित्राचे फौजेचा मुक्काम कित्तुरानजीक तिमापुरास आहे तसा आहे. रात्रौ तोफा देखील रोखून सावध राहातात व खानापुरावर दोन तीन हजार जमाव आहे तसा आहे. राजश्री देसाई व कारभारी वगैरें कित्तुरकर यांस चित्रदुर्गास घेऊन गेल्याचें वर्तमान आलें. या प्रांतीं स्वारी करावयाची मसलत फार आहे म्हणून बातमीचीं माणसें जबानी सांगतात. आणखी वर्तमान येतांच लेहून पाठवितों. कित्तुरावरील फौजेंतील कचरा सारे मुगोदास व मिश्रीकोटेस रवाना करून सडे होऊन राहिले आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. २९११. श्री. ( फाल्गुन शु० ५–५ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं:—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ४ जमादिलावल भानुवासर प्रातःकाळ जाणून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्राचे मुक्काम कित्तुरापाशीं तिमापुरावर आहे तसीच आहे. मलप्रभेतीरीं पुढें हुबळीवर येणार असे एक वदंता, वकुंदास येणार असे वदंता. पक्कें वर्तमान येतांच लिहून पाठवितों. बुणगेंबाजार सारें झाडून मिश्रीकोट धारवाडाकडे रवाना करून सडे होऊन राहिले आहेत. श्रीमंतांचे फौजा आल्या, येणार, असे बातमी कच्ची त्याच्या लष्करांत आहे. लढाई द्यावयाचे दम धरिले आहेत. खानापुरावर दोन तीन हजार बार आहे. सेवेशीं कळावें. राजश्री रघुनाथ मंगेश याकडे स्वामींचे लखोटे दोन पाठविले त्याचें उत्तर अद्याप आलें नाहीं. आतां आज्ञेप्रमाणें राजेश्रीस पत्रही लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० ५ जमादिलावल. सन सीत समानीन. फाल्गुन मास.

नं. २९१२. श्री. ( फाल्गुन शु० ५–५ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ छ० ५ जमादिलावल इंदुवार प्रातःकाळ जाणून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्राचें बुणगेंबाजार कचरा सारें झाडून धारवाड मिश्रीकोटेकडे रवाना करून सडे होऊन कित्तुराअलीकडे आद कोसावर तयार होऊन लढाई द्यावयाचे दम धरून राहिले आहेत. तेथून पुढें मल-

(पहिले तीरास हुबळी आणि वकुंदास येणार असें वर्तमान. रात्रीं श्रीमंतांचे फौजेची आवाई; करितां काढणी हातीं धरून तोफा देखील रोखून तयारींत असतात. बातमीचा माणूस आला तो याप्रमाणें सांगत होता. आणि बेळगांव व शाहापुराकडे खामखा स्वारी करावयाचे मसलत आहे; म्हणून हेंही वर्तमान सांगत होता. खानापुरावर दोन तीन हजार बार आहेत. कित्तुरकर बंकापुरास पावले. पुढें दुर्गास रवाना करणार असें वर्तमान. आणखी वर्तमान येतांची सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० ६ जमादिलावल. सीत समानीन.

मं. २११३. श्री. ( फाल्गुन शु० १०—९ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं:—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ८ जमादिलावल गुरुवार प्रातःकाळ जाणून वर्तमान यथास्थित असे. विशेष. अमित्रानीं कचरा बुंगगेंबाजार सारे झाडून माघारे धारवाड मिश्रीकोटेकडे रवाना करून सडे होऊन आहेत. पंधरा हजार बार व कर्नाटकी प्यादे सात आठ हजार, सुमार स्वार आठ हजार पैकीं चांगले पांच सहा हजार आहेत. तोफा बेचाळीस, पैकीं थोरले पाठवून स्वारीजोगे वीस पंचवीस ठेवून घेतले आहेत. त्यांत कांहीं गरनाळा व फटकडी व मकर बिरीही आहेत. श्रीमंतांच्या फौजा आल्याची दाट आवाईनें रात्र सारे काढणी हातीं धरून सोई पडल्यास लढाईचें तोंड मात्र दाखवणार. मार्गे झाडीचा आसरा हल्याळ संबराणीचे मार्ग एक, दुसरा धारवाडाकडून मुडगोडाकडून मार्ग एक, दोनी मार्गानें वाट नीट करून टेविले आहेत. कित्तुर प्रांतांतील गोरगरिबास दुसरा मामलेदार मुसलमान आला आहे तो भला आहे. सोईसोईनें गुळें काढा-

वयास निरोप दिल्हे आहे. बाकीचा पैका मात्र मार्ग करून देण म्हणोन लाविलें आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. स्वामीस कळावयास्तव विनंती लिहिलें आहे. आणखी माणसें येतांची सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै।। छ० ९ जमादिलावल. सीत समानीन.

नं. २९१४. श्री. ( फाल्गुन व० १–१९ मार्च. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीः—

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि।। राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता।। छ० १४ जमादिलावल सौम्यवार प्रातःकाळपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकडून यथास्थित असे. विशेष. अमित्राचे फौजेचा मुक्काम मुगदावर आहे तसा आहे. शत्रूचे जमावापैकीं पांच हजार बार व चारी तोफा कित्तुराशीं आले, ऐसें वर्तमान आहे. येथील बातमीचीं माणसें गेलीं आहेत. पक्के वर्तमान येतांच सेवेशीं लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै।। छ० १५ जमादिलावल. सन सीत समानीन. फाल्गुन मास.

नं. २९१५. ( चैत्र शु० १–३० मार्च. )

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शाहापुराहून पत्र बळवंतरावांस आलेलें, छ० २९ जमादिलावलचें—

" अमित्राचा मुक्काम कित्तुराअलीकडे होता तेथून कूच करून या प्रांतांत येणार. धामणें म्हणून येथून एक कोसावर सरदेशकतीचें इनाम खेडें आहे तेथवर त्यानीं मार्ग तोफखाना जावयाजोगा नीट केला आहे. बेळगांवच्या किल्यावर येण्याचा रोख आहे. "

# टिपूवर पहिली मोहीम.

## सप्टेंबर १७८५ ते एप्रिल १७८७.

सन १७८५ त पेशव्यांच्या आश्रयाखालीं असणारीं नरगुंद व कित्तूर हीं संस्थानें काबीज करण्याच्या उद्देशानें टिपूनें फौज पाठविली; तेव्हां मराठे व मोगल यांची लढाईची तयारी नसल्यामुळें टिपूशीं यंदा कलागत वाढवूं नये, व त्याशीं कशाही प्रकारें समेट करून पावसाळाअखेरपर्यंत दिवस घालवावे, असा नाना फडनवीस व निजामअल्ली यांचा हेतु होता. पण टिपूनें पुणें दरबाराची अथवा निजामअल्लीची कांहीं मुरवत न धरितां नरगुंद व कित्तूर हीं संस्थानें बळजबरीनें काबीज करून आपल्या राज्यांत सामील केलीं इतकेंच नाहीं, तर घटप्रभा व मलप्रभा या दोन नद्यांमधला व बेळगांवचे आसपासचा मुलूख घेऊन मिरजेच्या किल्ल्यावर चालून येण्याचा रोख दाखविला. ही सर्व हकीकत मागच्या दोन प्रकरणांत आलीच आहे. याप्रमाणें टिपूनें आपण होऊन आगळीक केल्यामुळें त्याचें पारिपत्य करण्याचें काम पुणें दरबार व निजामअल्ली यांनीं कसें काय पार पाडिलें हें या प्रकरणांत सांगावयाचें आहे.

टिपूनें नरगुंदचा किल्ला घेतल्याबरोबर पुण्यास नानानीं टिपूवर मोहीम करण्याची तयारी सन १७८५ च्या ऑगस्ट महिन्यांतच जारीनें सुरू केली. मुधोजी भोंसले नागपूरकर या वेळीं पुण्यास आले होते. इंग्रजांशीं झालेल्या लढायांत भोंसल्यांनीं पुणें दरबारास अनुकूल न होतां इंग्रजांचेंच होतां होईल तों साहाय्य केलें याबद्दल त्यांवर नाना

फडनविसांचा फार राग झाला होता. तो त्याचा राग घालवावा, व आपल्यामागें सेनासाहेबसुभ्याचें पद आपला पुत्र रघूजी भोंसले यासच मिळेल असें पेशव्यांकडून आश्वासन मिळवावें, असा हेतु धरून मुधोजी भोंसले या वेळीं पुण्यास आले होते. नाना व भोंसले यांचीं परस्पर बोलणीं होऊन असें ठरलें कीं, मागें झालेल्या गोष्टी उभयतांनींही विसरून जाव्या, यापुढें मराठे व इंग्रज यांची पुन्हां कधीं लढाई जुंपली तर भोंसल्यानीं इंग्रजांचा पक्ष धरूं नये; व चालू सालीं टिपूवर होणाऱ्या मोहिमेंत फौजेनिशीं स्वतः येऊन सामील व्हावें, आणि पुणें दरबारानें मुधोजी भोंसल्यांच्या हेतूप्रमाणें त्यांचे पुत्र रघोजी भोंसले यांसच सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें द्यावीं. मुधोजी भोंसल्यांचे शरीरीं कांहीं असमाधान उत्पन्न झालें होतें म्हणून त्यानीं आपले पुत्र मन्याबा भोंसले यांस दोन हजार फौजेनिशीं पुण्यास ठेविलें आणि दसरा झाल्याबरोबर आपण नागपुराहून फौजेची तयारी करून येतों असें कबूल करून ते सप्टेंबरच्या अखेरीस नागपुराकडे कूच करून गेले.

या वर्षीं पुण्यास श्रावणमासच्या दक्षिणेचा समारंभ बराच टोलेजंग झाला असावा असें चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांच्या कारकुनाच्या एका पत्रांतल्या मजकुरावरून दिसतें. तो लिहितो कीं, " श्रावणमासचे दक्षिणेचे ब्राह्मण वाड्यांतील व रमण्यांतील मिळोन चाळीस हजार झाले. दक्षिणेस दीड लक्ष रुपये

सप्टेंबर.

लागले. श्रीमंत राजश्री अप्पासाहेब व बापू यांस श्रीमंत ज्या दरवाजेस बसले होते तेथें घेऊन गेलों होतों, श्रीमंत दोन घटिका दक्षिणा देत होते. तोंपर्यंत बसलों होतों. श्रीमंत उठोन श्रीपर्वतीस गेले, नंतर ब्राह्मणांस प्रदक्षिणा करोन घरीं आलों. राजश्री होळकर व भोंसलेही तेथें आले होते. " दुसऱ्या एका पत्रांत पटवर्धनांचा वकील विसाजीपंत वाडदेकर त्यावेळची पुण्यांतली हाल-

हवाल लिहितो कीं, " भोंसले अद्यापि येथेंच आहेत. आज उद्यां जातों जातों म्हणतात. जातील तेव्हां खरे! भोंसल्याच्या लष्करामुळें व पर्जन्यानें ताण दिल्यामुळें पुण्यांत वैरण बहुत महाग झाली आहे. कडबा चाळीस रुपये हजार व गवत वीस रुपये हजार याप्रमाणें जालें आहे."

चिंतामणरावांच्या एका पत्रांत भोंसले व पेशवे यांनीं परस्परांस मेजवानी व बहुमान केल्याचा मजकूर लिहिला आहे तो असा कीं, " राजश्री मुधोजी भोंसले यांनीं श्रीमंतांस मेजवानी श्रावण शुद्ध पौर्णिमा मंदवारीं केली. बहुमान जवाहीर पन्नास हजारांचें व हत्ती एक व घोडे दोन व वस्त्रें याप्रमाणें दिलें. इंदुवारीं श्रीमंतांनीं भोंसले यांस मेजवानी केली. वस्त्रें व हत्ती एक व घोडा एक व जवाहीर याप्रमाणें दिलें. राजश्री मन्याबा बापू-भोंसले यांचे पुत्र-यांस दोन हजार फौजेनिशीं येथें ठेऊन मुधोजी भोंसले यांनीं नागपुरास जाऊन दहा हजार फौज घेऊन लौकर यावें याप्रमाणें ठरोन निरोप दिला आहे. "

टिपूवर होणाऱ्या मोहिमेचा बेत पक्का ठरविण्यासाठीं नानानीं परशुरामभाऊ व गंगाधरराव व रघुनाथराव या त्रिवर्ग पटवर्धन सरदारांस पुण्यास बोलाविलें होतें. परंतु परशुरामभाऊनीं उत्तर लिहिलें कीं, गेले वर्षी तुम्हीं नरगुंदप्रकरणीं आम्हास हिसके देऊन फसविलें आहे. यंदा आम्ही कोणचीही मसलत तुम्हांस सांगत नाहीं. तुम्हीच काय ती पक्की मसलत ठरवून आम्हास हुकूम करा म्हणजे त्याप्रमाणें आम्ही वागूं. आम्ही कोणी तूर्त पुण्यास येत नाहीं.

ऑक्टो०

पटवर्धनांनीं याप्रमाणें उदासीनपणा दाखविला तरी फौजेची तयारी करणें नानास भागच होतें. श्रावण महिन्याच्या अखेरीसच हरीपंततात्या वानवडीवर डेरेदाखल झाले होते व तमाम शिलेदार व

सरदार लोकांस फौजेची तयारी करून निघून येण्याविषयीं पत्रें रवाना झालीं होतीं. तथापि स्वारीची जुळवाजुळव कार्तिक अखेरपर्यंत झाली नाहीं. तारीख १२ दिसेंबर रोजीं नाना फडनवीस स्वतः डेरेदाखल झाले. तुकोजी होळकर पुण्यास होतेच. ते व हरीपंततात्या त्याच सुमारास पुण्याहून निघून बारामतीवरून पंढरपुराकडे कूच करून चालले. मागून पांच चार दिवसांनीं खुद्द नाना फडनवीसही त्याच मार्गें निघाले. मुधोजी भोंसले फौजेचा पोक्त सरंजाम तयार करून मोहिमेकरितां गाईलगडाहून कूच करून आल्याचीं पत्रें आलीं. तों तिकडे निजामअल्लींची सिद्धता झालीच होती. तेही भागानगराहून हलक्या हलक्या मजली करीत यादगीरच्या रोखें येऊं लागले.

दिसेंबर.

गंगाधरराव गोविंद यांचा पुत्र केशवराव व पांडुरंगराव गोविंद यांचा पुत्र चिंतामणराव या उभयतांचे विवाह या वर्षी पुण्यास मार्गशीर्ष महिन्याच्या वद्य पक्षांत झाले. हरीपंततात्या फडके यांनीं केशवराव यांस आपली कन्या व चिंतामणराव यांस आपली नात म्हणजे बाबा फडके यांची कन्या दिली. त्या निमित्तानें गंगाधरराव यांचें पुण्यास जाणें झालें होतें. हरीपंततात्या लग्नाकरितां घरीं आले नव्हते. ते लष्करांत असतां त्यांच्या घरीं लग्नें झालीं. पुण्याहून परस्परच लष्करांत निघून येण्याविषयीं गंगाधरराव यांस नाना व हरीपंत यांचा आग्रह पडला. त्यामुळें वऱ्हाड मिरजेस लावून देऊन ते परस्परच लष्करास जाऊन मिळाले. ते पंढरपुरापुढें पांच चार मजलीपर्यंत लष्करांतच होते. लष्कर पंढरपुरास येतांच तासगांवाहून परशुरामभाऊ व कुरुंदवाडाहून रघुनाथराव आपापल्या पथकांसह येऊन मिळाले. मुधोजी भोंसलेही त्याच मुक्कामीं नागपुराहून आले. मग ही एकत्र जमलेली सर्व मराठी सेना तिगस्तां

दिसेंबर.

सन १७८६

जानेवारी.

निजामअल्लीची भेट ज्या ठिकाणीं झाली त्या रोखें कूच करून चालली. या सेनेंत पेशव्यांची हुजरात वगैरे फौज हरीपंततात्या व बाजीपंत अण्णा यांच्या हाताखालीं होती. शिवाय पटवर्धन, भोंसले, होळकर वगैरे सरदार आपापल्या सैन्यानिशीं हजर होते. गणेशपंत बेहेरे हे गेल्या वर्षापासूनच दक्षिणमहाराष्ट्रांत होते. त्यांचा मुक्काम या वेळीं कृष्णातीरीं होता. त्यांच्या मदतीस रास्ते व अक्कलकोटकर यांचीं पथकें नेमलेलीं होतीं. कित्तुराकडे २५ हजार पायदळ व २५ तोफांनिशीं टिपूचा सरदार सैद बुरान होता त्यानें फारच उचल खाल्ल्यामुळें त्यास जरबेंत ठेवणें एकट्या बेहेऱ्यांस झेंपणार नाहीं असें समजून नानांनीं होळकरांची रवानगी तिकडे केली व बेहेऱ्यांच्या मदतीस दहा पांच पागा व शिलेदार सरंजामी मिळून पांच हजार फौज आणखी पाठविली.

फेब्रुवारी.

मराठी राज्यांत या वेळीं टिपुसुलतान मरण पावल्याचें वर्तमान चोहोंकडे उठलें होतें. म्हैसूरच्या राज्यांतून लोक इकडे येत तेसुद्धां तीच बातमी सांगत. मागें हैदरअल्ली जिवंत असतां एकदां तो मेल्याचें असेंच खोटें वर्तमान उठलें होतें. असल्या बातम्यांचा उद्भव कां व कसा होत असे हें समजत नाहीं. टिपू मेल्याचें वर्तमान सामान्य लोकांत जारीनें फैलावत होतें तथापि सरदार व मुत्सद्दी वगैरे वरिष्ठ दर्जाचे लोकांस तें खरें वाटत नसल्यामुळें त्याचा परिणाम राजकारणावर कांहीं एक झाला नाहीं.

जाने०.

यादगीरच्या सुमारास मराठी फौजा येऊन पोंचतात तों त्याआधींच निजामअल्ली तेथें येऊन उतरले होते. दोहों लष्करांच्या

छावण्यांनीं भोंवतालचा दहा पंधरा कोसांचा प्रदेश व्यापला होता.
मार्च. निजामअल्ली हे दक्षिणच्या सहा सुभ्यांचे सुभेदार असल्यामुळें त्यांचा दरबारी डामडौल विशेष होता हें सांगावयास नकोच. तसल्या डामडौलानें पेशव्यांचे कारभारी यांच्या व निजामअल्लीच्यां गांठी पडून मोकळेपणानें बोलणीं चालणीं व्हावयास अर्थातच दिरंग लागे. तसल्याही अडचणींत उभयपक्षीं गांठी पडून बोलणीं झालीं. पण तीं व्हावयास अर्थातच महिना दीड महिना लागला.

नाना फडनवीस यांस टिपूवरची मोहीम संपेपर्यंत लष्कराबरोबर हिंडण्याची सोय व इच्छाही नव्हती. मोहिमेचें काम कसें तरी चालीस लावून लौकर पुण्यास परत जावें हीच त्यांस उत्कंठा होती. याचें कारण असें कीं, सर्व फितुराचें माहेरघर श्रीमंत दादासाहेब जरी आतां वारले होते तरी त्यांची स्त्री आनंदीबाई अद्यापि जिवंत
एप्रिल. होती. व तिचे बाजीराव व चिमाजीअप्पा हे दोन मुलगे होते. दादासाहेबांचे सहस्रावधि अनुयायी चोहोंकडे लपून छपून होते ते कोठें केव्हां फितूर उत्पन्न करून सवाई माधवराव पेशवे यांच्या जिवास दगा करितील हा नेम नव्हता. त्या काळजीमुळें नानांचें चित्त नेहमीं व्यग्र असे व पेशव्यांचें सांनिध्य सोडून राहणें त्यांस धोवयाचें वाटे. कसेंही करून मोहिमेचा भार निजामअल्ली व हरीपंततात्या यांवर सोपवून लवकर पुण्यास जावें असे विचार नानांच्या मनांत घोळत होते. परंतु त्यांचा पुण्यास परत जाण्याचा रोंख दिसल्याबरोबर निजामअल्लीनेंही लष्करावरोबर राहण्याचें नाकारिलें. नाना व निजामअल्ली परत जाणार हें पाहतांच मुधोजी भोंसल्यांच्या मनांतही परत नागपुरास जावें असें आलें. परशुरामभाऊ तर लष्कराबरोबर राहणार नव्हतेच. कारण, त्यांनीं नवी फौज मोहिमेकरितां चाकरीवर ठेवावयाची

तीं किती व कोणत्या शर्तीवर ठेवावी हा निश्चय अद्यापि ठरला नव्हता व पुढेंही तो ठरण्याचा रंग दिसत नव्हता. यासंबंधाचे त्या वेळच्या पत्रांतले उतारे बरेच मनोरंजक आहेत. पटवर्धनांचा वकील वाडदेकर तारीख ८ मार्चच्या पत्रांत लिहितो कीं, " ( नबाब निजाम अली यांची ) भेट झाल्यापासून मसलतीचीं बोलणीं होत आहेत. शेवटीं नानाचें बोलणें पडलें जे, ' आम्ही पुणीयास जातों. तात्या व नबाबानीं पुढें जावें. ' त्यास नबाबाचें म्हणणें " तुम्ही जातां तेव्हां आम्हीही जातों. आज चाळीस वर्षे त्याचा आमचा बिघाड नाहीं तों तुम्हांमुळें करणें प्राप्त जाहला. तुम्ही जातां त्याअर्थी आमचें कारण काय ? आम्हीही माघारें जातों. " या मनसब्यास इतके दिवस लागले. शेवटीं मनसबा बुडतो, लौकिक वाईट होतो, यास्तव नानानीं रहावयाची मसलत केली. उदईक येथून कूच होऊन कृष्णातीरास जाणार. पलीकडील मुलूख सुटेल त्यापैकीं निमे निमेप्रमाणें अलीकडील पलीकडील झाडून वांटून घ्यावा याप्रमाणें करार यांचा व नबाबाचा ठरला भाऊसाहेबांकडील जाबसाल अद्यापि कांहीं ठरत नाहीं. नबाबाची बरकड सरदारांनी भेट जाली नाहीं. नाना तात्या मात्र भेटले. त्याप्रमाणेंच भोंसले त्याचे डेऱ्यास जाऊन भेटले. नबाब एक वेळ सरकारचे डेऱ्यास आले ते समयीं पोशाख व जवाहीर शिरपेंच कंठी कलगी दिली. दहा हजार रुपयांचे जवाहीर दिलें. टिपू जिवंत आहे ऐशा बातम्या अदवानीकडून येतात व मुकुंद जोशीही ( ज्योतिषावरून ) जिवंत आहे म्हणून सांगतात.

त्यानंतर तारीख १४ एप्रिलच्या पत्रांत परशुरामभाऊ लिहितात कीं, " पहिले नबाबाच्या भेटीस गेलों होतों हा मजकूर लिहिलाच होता. त्याजवर दुसऱ्यानें नबाबानीं राजश्री नानाकडे सांगून पाठविलें जे फिरोन राजश्री हरीपंत व परशुराम पंडित यांची भेट

जाहली पाहिजे. त्याजवरून त्यांचे डेऱ्यास जाण्यासीं निघालों, त्यांचे लष्कराजवळ गेलों तों " नबाब निजावयासीं गेले. आतां गांठ पडावयाची नाहीं. " म्हणून वकिलांनीं सांगून पाठविलें, त्याजवरून माघारे आलों. फिरोन नबाबाचे निरोप आले तेव्हां राजश्री नानांनीं सांगून पाठविलें जे ' ते रुसले आहेत. जाजसाल वकील बोलतच आहेत. ' त्याजवर मैनुद्दौला परवांचे दिवशीं राजश्री हरीपंततात्यांचे डेऱ्यास आले. आम्हाकडे येतात म्हणोन सांगोन पाठविलें. सर्व साहित्य त्यांसीं देण्याचीं वस्त्रें जवाहीर आदिकरून राजश्री हरीपंततात्या

एप्रिल.

घेऊन आले. सहा घटका रात्रीस आले. दोन घटका बसले होते. एक घोडा आम्हीं दिला. वरकड सरकारचा सरंजाम आला होता त्याप्रमाणें जेगा व शिरपेंच दिला. त्यांचे चिरंजीव समागमें होते त्यांस शिरपेंच वस्त्रें दिलीं. दहा घटका रात्रीस गेले. त्याजवर काल आम्ही व राजश्री तात्या मिळोन नबाबाचे डेऱ्यास गेलों. त्यांचें आमचें बोलणें बहुत जाहलें त्यांतील हाशील " जर छावणीस बाळाजी पंडित राहतात तर आम्ही राहतों. ते राहत नाहींत तर आम्ही राहत नाहीं. छावणी किंवा जाणें हें आधीं ठरवावें त्यासारखी चाल धरूं. चार संस्थानिकांकडील राजकारणें येतात तीं विना छावणी जाल्यावांचून साधत नाहींत. त्यांस वचन द्यावें तर मसलतीचा ठराव नाहीं. आम्ही काय करितों हें आमचें आम्हास न समजे, तेव्हां दुसऱ्यास काय सांगावें ? दोनी लष्करांत माघारे जातात हीच बोलवा, तेव्हां आम्ही छावणीस राहतों हें कोणास खरें वाटत नाहीं. हें चांगलें नाहीं. बदामीस ( वेढा घालून ) बसावें म्हणतां, त्यास (बदामी घेतल्यावर ती ) टाकून जावें ! (बदामीच्या रक्षणार्थ जुजबी) फौज छावणीस ठेवावी तर शत्रु जबरदस्त, ते फौज आजच बुडाली म्हणून ठेवावी हेंही ठीक नाहीं, तर छावणीचा ठराव, कीं माघारें

V2315,K·M18
E २·४
19443

जाणार, याचा ठराव व्हावा. मग कोणत्याही कामास लागावें. " ये-विषयींचीं बहुत प्रकारचीं बोलणीं जालीं. अद्यापि ठराव जाला नाहीं. आज पांच कोसांचें कूच आहे. दोन चार दिवसांत ठराव होऊन ठरेल तें मागाहून लिहितों. कांहीं नबाबाकडील फौज व राजश्री बाजीपंत जोशी असे मिळोन कनकगिरीस रवाना केले. * * * * * टिपू पट्टणाहून निघून दोन चार मजली अलीकडे आला. पन्नास साठ हजार पायदळ व पंधरा सोळा हजार फौज व दोनशें तोफा येणें-प्रमाणें सरंजाम आहे म्हणतात. परंतु कोणतीही तहकीक बातमी नाहीं. " हरीपंत व परशुरामभाऊ यांचा रुसवा घालविण्याकरितां निजामअलीचा कारभारी मैनुद्दौला आल्याचें वरच्या उताऱ्यांत आलें आहे तो मैनुद्दौला म्हणजे पुढें आठ वर्षांनीं खर्ड्यांच्या स्वारींत प्रसिद्धीस आलेला मशीरउल्मुल्क हाच होय!

" जर छावणीस बाळाजी पंडित राहतात तर आम्ही राहतों. ते राहत नाहींत तर आम्ही राहत नाहीं; " असें निजामअली म्हणूं लागले तेव्हां 'मसलत हुकते. लौकिक वाईट होतो,' हें लक्षांत आणून पुण्यास परत जाण्याचा नानानीं हेका सोडिला व लष्कराबरो-बर छावणीस राहण्याचें कबूल केलें. पण परत जाण्याची उत्कंठा व घाई नानापेक्षां निजामअलीनाच अधिक होती! बदामी काबीज करण्याची मसलत पक्की ठरवून त्या उद्देशानें दोन्हीं लष्करें बदामी-जवळ गेलीं तों निजामअलीनीं एकाएकीच आपला परत जाण्याचा निश्चय प्रकट केला. नाना व हरीपंत व भोसले यांनीं राहण्याविषयीं फार आग्रह केला तरी त्यांनीं ऐकिलें नाहीं. तहव्वरजंग या नांवाच्या आपल्या सरदाराबरोबर स्वार पायदळ मिळून पंचवीस हजार फौज मोहिमेच्या कामावर हरीपंतांच्या हाताखालीं ठेवून ते भागानगरास परत निघून गेले.

टिपूवर होणाऱ्या मोहिमेंत इंग्रजांनीं सामील व्हावें म्हणून नाना व महादजी शिंदे यांनीं कलकत्त्याच्या लाटसाहेबांशीं यापूर्वीच पत्रव्यवहार सुरू केला होता. लाटसाहेबांचें म्हणणें पडलें कीं, आपण टिपूशीं तह नुकताच ठरविला असून आतां उघडपणें त्याशीं वैर करावें तर वचनाचा खोटेपणा पदरीं येतो. याकरितां आपण तुमच्या व निजामअल्लीच्या कुमकेस पांच पांच पलटणें पाठवूं, पण तीं तुमच्या व निजामअल्लीच्या राज्याच्या सरहद्दीवर तुम्हां उभय सरकारांच्या राज्याच्या रक्षणार्थ मात्र रहातील. तीं पलटणें टिपू तुमच्या मुलखावर चढाई करून येईल तर त्याशीं लढतील. परंतु आपण होऊन तुम्हां-बरोबर टिपूच्या मुलखावर चालून जाणार नाहींत! परंतु असली ही मदत मराठे व मोगल या दोघांसही नको होती. टिपूस दहशत वाटावी व इंग्रजांनीं त्यास मिळूं नये, एवढ्याचकरितां हा शुष्क पत्रव्यवहार कित्येक महिनेपर्यंत सुरू ठेवण्यांत आला होता! परराज्याचे वकील एखाद्या सरकाराकडे येतात तेव्हां ते त्या सरकाराच्या राजधानींत रहातात. त्यांस स्वारींत बरोबर हिंडविण्याचा शिरस्ता नाहीं. असें असतां नाना फडनवीस यांनीं इंग्रजांचा वकील सर चार्लस म्यालेट यास पुण्याहून लष्करांत बदामीच्या मुक्कामीं बोलावून नेलें, यांत तरी त्यांचा हेतु इंग्रजांशीं आपलें किती सख्य आहे हें टिपूस भासविण्यापुरताच होता! पण हे सारे डावपेंच टिपूनें पुरते ओळखले होते!

त्या प्रांतीं बळकटीविषयीं बदामीच्या किल्ल्याची मूळचीच फार प्रसिद्धि होती. त्यांतून अलीकडे टिपूनें त्या किल्ल्याची उत्तम-प्रकारें मजबुती केली होती. नरगुंदकरांची मध्यस्थी करून त्यांस ज्यानें शेवटीं दगा दिला तो गुलाम हैदर नांवाचा सरदार त्या किल्ल्यांत मुख्य अधिकारी टिपूनें नेमला होता व त्याच्या हाताखालीं

पायदळ, तोफा वगैरे मुबलक सामान किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलें होतें. त्या किल्ल्यास मराठी फौजेनें तारीख १ मे

१ मे.

दिवशीं अक्षतृतीयेच्या मुहूर्तानें मोर्चेबंदी केली. आंतील लोकांनीं किल्ला झुजविण्याची शर्त केली तरी मोर्चे दररोज पुढें चालतच होते. सर्वांपुढें परशुरामभाऊंचा मोर्चा होता, व ते त्याच्या "सामानाची तरतूद चांगली आपण स्वतः जाऊन पाहत असत." शेवटीं मोर्चेबंदीनें किल्ला साध्य होण्यास दिवस फार लागतील, टिपू तर प्रचंड सेनेसह श्रीरंगपट्टण सोडून निघाला आहे त्याअर्थीं तो आपल्या रोखें खचित येणार, याकरितां हल्ल्यानें किल्ला काबीज करावा; असा मराठ्यांचा निश्चय ठरला. त्यास अनुसरून त्यांनीं शिड्या वगैरे सामानाची तयारी केली.

बदामीस वेढा बसण्यापूर्वींच नानांनीं बाजीपंतअण्णास तुंगभद्रेकडे स्वारीस पाठविलें होतें हें वरच्या एका उताऱ्यांत आलेंच आहे. बाजीपंत लांब दौड करून एकदम कनकगिरीस

एप्रिल.

गेले. तेथें कांहीं सावकार होते त्यांस व तेथील संस्थानिकांस धरून मुबलक पैका उकळावा हा त्यांचा बेत होता. परंतु त्यांच्या येण्याची बातमी आगाऊच कळल्यामुळें संस्थानिक व सावकार पळून गेले होते. इतकेंच नाहीं, तर कनकगिरी व अनागोंदी या दोन्ही संस्थानांतील रयत चीजवस्त व गुरेंढोरें घेऊन टिपूच्या राज्यांत गेली होती. बाजीपंतांनीं हणमसागराची पेठ जातां जातां घेऊन लुटून फस्त केली व कंचनगुड्डचें ठाणें हल्ल्यानें घेऊन आंत टिपूचे लोक होते त्यांची कत्तल केली. इतक्यांत परत येण्याविषयीं त्यांस नानांचें पत्र आल्यामुळें ते स्वारीचें काम तितकेंच टाकून बदामीस लष्करास येऊन मिळाले. बेहेऱ्यांच्या फौजेंत रास्ते होते त्यांसही नानांनीं बदामीस बोलावून आणिलें होतें.

निजामअली गेल्यावर आपणही पुण्यास जातों असें नाना फडनवीस म्हणूं लागले होते, परंतु किल्ला फत्ते झाल्याशिवाय त्यांनीं परत जाऊं नये असा सरदारमंडळींचा आग्रह पडल्यावरून ते लष्करांत राहिले होते. तारीख २० मे रोजीं पेशवे व मोंगल व भोंसले यांच्या फौजांनीं बदामीच्या किल्ल्यावर हल्ला करून तो काबीज केला. त्या हल्ल्याचें वर्णन नीलकंठ अप्पाजी पोंक्षे नांवाचा कारकून परशुरामभाऊंजवळ होता त्यानें केलें आहे. त्यांत तो 'यजमान स्वामी' या शब्दांनीं ज्यांचा उल्लेख करितो ते परशुरामभाऊ होत. पोंक्षे यानें हकीकत लिहिली आहे ती अशीः—

२० मे.

"श्रीमंत राजश्री नाना माघारे जावयाची योजना करूं लागले. सर्वांचे विचारें 'किल्ला फत्ते जाल्याशिवाय जाऊं नये.' तरी त्याणीं जावयाचा आग्रह अतिशय केला. दोन तीन दिवस फारच घोळ पडला. त्याजवरून यजमानस्वामी याणीं श्रीमंत राजश्री अप्पासाहेब यांस मुहूर्तेकरून बाहेर मुक्काम करून रहावें, तूर्त येण्याचें करूं नयें, असें सांडणीस्वारासमागमें पत्र रवाना केलें. उपरांतिक किल्ल्यास हल्ला करावा असा ठराव जाहला. शिड्या वगैरे तरतूद पहिल्यापासून करावयास लावलें होतें. छ० २१ रज्जबीं मंदवारीं अरुणोदयास हल्ला जाहली. किल्ल्याचे पश्चिमेस एक बातेरी होती त्या सुमारें व शहरपन्ह्याचे दरवाजामध्यें व रेवणीजवळ दारूचे बुधले किल्लेकरांनीं पुरले होते. हल्ला येतांच बत्ती दिली. त्यांत लोक फार ठार जाले. अद्यापि कोणकोणाचें ठिकाण लागत नाहीं. अजमासें शेंदीडशें माणूस मेलें. खेरीज जखमी दोन अडीचशें. जेर जखमी शेंपन्नास आहे. शहरपन्ह्याचा दरवाजा यजमानस्वामीकडील लोकांनीं अगोदर घेतला. यजमानस्वामी पाटोपाठ होते. गांवांत किल्ल्याचे खडप्या-

लगत आणखी एक वाडा होता त्यासही हल्ला याच हिरिरींत चढली. यजमानस्वामी अस्तमानपर्यंत गांवच्या दरवाज्यांत उपवासी बसले होते. अस्तमानीं माघारे आले. रणमंडळचें व किल्ल्याचें बोलणें लागलें आहे जे, ' जिवानिशीं हत्यारसुद्धां पार करून द्यावें, त्यास भोंसले यांस दरम्यान द्यावें. ' असें बोलणें येतांच सरकारच्या तोफा बंद जाल्या. परंतु वरील लोक अद्यापि उतरले नाहींत. यजमानस्वामींनीं हरीपंतांस सांगून पाठविलें जे, ही गोष्ट पसंत नाहीं. तोफा लागू कराव्या. आंतील लोक आपोआप बाहेर पडतात. उतरावयाचे असल्यास लौकर उतरवावे; नसल्यास कस्त करावी. परंतु ' बरें बरें ' म्हणतात ! कालच्याच दिवसांत गुंता उरकावयाचा, परंतु बोलण्यामुळें विलंब लागला आहे. " किल्ल्यांत गुलाम हैदर मुख्य आहे त्यानें नरगुंदकरांची मध्यस्थी करून फसविलें. त्यास धरावें. सोडूं नये. आणखी कारणिक मनुष्य असेल तें देखील. बाकीचीं सोडावीं." असें यजमानस्वामींचें म्हणणें आहे. त्यास उभयतां कारभारी यांचें म्हणणें जे, वचन गुंतलें आहे पार करून देण्याविशीं; त्यास कसें करावें ! असा मजकूर आहे. डौल पाहतां लोकही आज जरूर उतरतील. वर पाणी नाहीं यास्तव आंतील लोकांचा दम नाहीं. गांवांत गुळें फार भरलें होतें. लूट माफ केली. किल्ल्याचे लढाऊ व गांवांतील लोक मनस्वी मारिले. बायकाही थोड्याबहुत मेल्या. तशींच लहान लहान मुलेंही मेलीं. कांहीं मनुष्य सरकारांतून पाहऱ्यांत दिले आहेत. वळख पाहून सुटका होते. बनशंकरीच्या वस्ता गांवांत पुरल्या होत्या त्या पुजारी याणें दाखविल्या. सरकारांत आणून ठेविल्या आहेत. आणखी चवकशी करावयाकरितां पुजारी अटकेत ठेविले आहेत. गांवांत ब्राह्मणसमुदाय फार होता तितकाही बाहेर आला. सरकारांतून काढून पोटास दिलें. "

यासंबंधें गोविंद सखदेव याच्या पत्रांतील मजकूर असा आहे. " गांवांतील दरवाज्यापुढील मार्गावर खंदकाबाहेर बातेरींत गांवकरांनीं दारवेचे बुधले पुरले होते. हल्ला जवळ जातांच दारवेस बत्ती दिली. बुधले उडाले. ते समयीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडील शिलेदार मंडळी व रोहिले लोक व ब्राह्मण मिळून शंभरपर्यंत माणूस ठार जालें. हुजरातीकडीलही लोक उठले होते. तिकडेही बुधले होते. परंतु तिकडे साठ माणूस उडालें. फार खराबी जाली नाहीं एकंदर भोंसल्यांकडील व हुजरातीकडील व नबाबाकडील व भाऊसाहेबांकडील मिळून आठशेंपर्यंत माणूस ठार जालें. गांवांतील माणूस हल्ल्याचे समयीं चार पांचशेंपर्यंत मारिलें. पेठेस खंदक भालाभर खोल, रेवणी बांधीव चुन्याची, दरजगी रुंदी वीस पंचवीस हातपर्यंत, भिंताड मजबूत, याजप्रमाणें जागा फार अवघड; परंतु श्रीमंतांचे प्रतापें साध्य जाली. "

याप्रमाणें बदामी फत्ते झाल्यावर नाना फडनवीस पुण्यास जाण्याकरितां परत निघाले. त्याबरोबर परशुरामभाऊही तासगांवास जाण्याकरितां निघाले. या टिपूवरच्या मोहिमेंत भाऊनीं प्रथमपासूनच उदासीनपणा धरला होता. गतवर्षी नानांनीं भाऊंस टिपूवर स्वारी करण्याच्या उद्देशानें प्रथम फौज गोळा करावयास सांगून मागून आयते वेळीं शत्रूची गांठ पडल्यावरसुद्धां त्यांस पिछेहाट करावयास लावलें; ही गोष्ट भाऊंच्या मनांत फार डांचत होती. यंदांच्या स्वारींत नवी फौज चाकरीस ठेवण्यासंबंधानें नानांचा व त्यांचा लढा पडला होता. त्या कामीं नाना व हरीपंत त्यांच्या मताप्रमाणें वागले नाहींत, यामुळें त्यांचें मन प्रसन्न नव्हतें. तथापि बदामी काबीज करण्याच्या उद्योगांत अनास्था अगर हेळसांड करावी तर आपल्या शिपाईबाण्यास बट्टा येतो हें समजून त्यांस मेहनत व मर्दुमी करावीच लागली.

ती त्यांनीं कशी कशी केली हें वर आलेल्या उताऱ्यांत दाखविलेलेंच आहे. बदामी हातीं आल्यावर नाना परत जाऊं लागले तेव्हां भाऊंचें म्हणणें पडलें कीं, लष्करांत राहण्याचें आपलें तरी काय काम आहे ? मुलाच्या मुंजीकरितां आपणास घरीं गेलें पाहिजे. चाकरीवर आम्हा त्रिवर्गांचीं तीन पथकें नेहमींप्रमाणें हजर झालींच आहेत. माझ्या जागीं मी रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस आमच्या तिन्ही पथकांवरचे मुख्य सरदार नेमून दिलें आहे. हरीपंततात्या हुकूम करितील त्या-प्रमाणें वागून रघुनाथराव सरकारी काम बजावीत जातील. माझ्या तर्फेची नवीन फौज मोहिमेंत चाकरीस असती तर मला स्वारीबरोबर राहणें भागच होतें. तें घडलें नाहीं, त्यापक्षीं मीं स्वारींत कशाला रहावें ? यावर नाना व हरीपंत यांचा आग्रह पडला कीं, तुम्ही स्वारींत नसलां तर शत्रूवर मराठी सैन्याचें तेज व दरारा कमी पडेल. लढाई-च्या ज्या मसलती होतील त्यांत तुमच्या अनुभवाची व धोरणाची भर न पडल्यामुळें त्या त्या मसलतींचा पोक्तपणा तितका कमी होणार. याकरितां तुम्हीं स्वारीबरोबर असलेंच पाहिजे. याप्रमाणें उभयतांचा फारच आग्रह पडला तेव्हां घरीं जाऊन मुलाची मुंज करून पुन्हां लष्करास येतों असें भाऊनीं कबूल केलें. पण ही कबुली बाह्यात्कारी असून भाऊंचा खरा उद्देश मोहिमेचे काय काय प्रकार होतात हें स्वस्थपणें घरीं राहून पाहण्याचा होता. असो.

२५ मे. नाना व भाऊ परत चालले तेव्हां मुधोजी भोंसले अर्थातच परत निघाले. भोंसले हे मराठी राज्यांतले अव्वल-दर्जाचे सरदार असल्यामुळें ते पेशव्यांखेरीज इतर कोणा सरदाराच्या हाताखालीं रहावयाचे नव्हत. निजामअली अगर पेशवे स्वारींत असते तर गोष्ट निराळी होती. पेशव्यांचे जागीं त्यांचे दुय्यम कारभारी हरीपंत मोहिमेचे मुख्य सरदार राहणार, त्या अर्थी

आपणही आपले पुत्र मन्याबा बापू यांबरोबर फौज लढाईच्या कामावर ठेवून घरीं परत जावें; याप्रमाणें त्यांनीं मनांत आणून नानांस आपला उद्देश कळविला. नानांस स्वतः रहावयाचें नव्हतें त्या अर्थीं भोंसल्यांस रहा असें त्यांस म्हणतां येईना. रहा म्हणावें तर ते पेशव्यांच्या बरोबरीचे सरदार असल्यामुळें सर्व मराठी लष्करावर मोहीम संपेपर्यंत कुलमुखत्यारीनें अधिकार चालविण्याचा मान त्यांचा होता तो कबूल करावा लागणार ! त्या अर्थीं मुधोजी भोंसल्यांच्या परत जाण्यास त्यांस अर्थातच संमति द्यावी लागली. मग मुधोजी भोंसले एका मार्गानें पंढरपुरावरून हळू हळू मजला करीत पुण्यास जाऊन तेथें कांहीं मुक्काम करून मग तेथून आपल्या स्थळास निघून गेले. आणि दुसऱ्या मार्गानें नाना व परशुरामभाऊ निघाले ते मजला करीत कृष्णातीरीं कुडचीच्या आसपास आले. नानांस सामोरे जाऊन मेजवानीचें आमंत्रण करण्याकरितां मिरजेहून गंगाधरराव गेले यांची व नानांची गांठ ऐनापुरच्या मुक्कामीं पडली. पुण्यास जातां जातां कुरुंदवाड, मिरज व तासगांव या तिन्ही ठिकाणीं मेजवानी घेऊन जावें असा भाऊनीं व गंगाधररावांनीं आग्रह धरल्यावरून नानांनीं त्याप्रमाणें कबूल केलें. मग तारीख ३१ मे रोजीं नानांची स्वारी कुरुंदवाडास आली. त्या दिवशीं तेथें राहून दुसरे दिवशीं ते मिरजेस आले. मिरजेच्या मेजवानीची तरतूद " ब्राह्मणसमुदाय शिवायकरून दोनशें मराठे जेऊं घालावयाचे. पांचशें शागीर्द पेशाचे माणसांस डाळ भाकरी करवाव्या. " याप्रमाणें नानांनींच ठरविली होती. त्याप्रमाणें अमलांत येऊन मेजवानीचा समारंभ झाल्यावर त्याच दिवशीं सायंकाळीं नाना व भाऊ तासगांवास बरोबरच गेले. तेथें एक दिवस राहिल्यावर नानांची स्वारी मेणवलीस जाऊन पुण्यास गेली. लष्करांतून परत येतां येतां

भाऊंबरोबर मिरज वगैरे ठिकाणीं नानांचें मेजवानीकरितां राहणें दिसतांना साहजिक दिसतें. परंतु आमच्या मतें यांत थोडा राजकीय उद्देशही असावा. परशुरामभाऊ मोहिमेबरोबर न राहतां परत घरीं गेले ते नानावर रुसवा करून गेले असा बोभाटा न व्हावा, व पटवर्धनांशीं नानांचा पूर्ण मिलाफ आहे हें जगजाहीर व्हावें, याकरितांच नानानीं हा मार्ग स्वीकारिला असावा असें आम्हांस वाटतें.

इकडे कित्तूर प्रांतीं गणेशपंत बेहरे यांच्या कुमकेस नानानीं फेब्रुवारीच्या अखेरीस तुकोजी होळकर यांस पाठविलें होतें, असें आम्हीं पूर्वीं लिहिलेंच आहे. होळकर व बेहरे यांनीं तिकडे काय काय केलें हें प्रथमतः थोडक्यांत सांगून नंतर आम्ही पुन्हां थोरल्या लष्करच्या हालचालींकडे वळूं. होळकर व बेहरे

मार्च.

एकत्र झाल्यावर कित्तूर प्रांतांत वकुंद येथें बरेच दिवस मुक्काम करून राहिले होते. कित्तुराखेरीज तिकडचीं सर्व ठाणीं त्यांनीं काबीज केलीं इतकेंच नाहीं, तर खुद्द कित्तुरासुद्धां वेढा घालण्याचा आपला उद्देश असल्याचा त्यांनीं बोभाटा केला होता. त्या बोभाट्यास भिऊन सैदबुरान यानें कित्तुरांत तीन हजार कवाइती पायदळ व तोफा ठेवून त्या ठाण्यांत दारूगोळी व धान्य वगैरेचा चांगला पुरवठा केला. नंतर तो तेथून जवळच डोंगराळ झाडीच्या आसऱ्यास आपली बाकीची फौज नेऊन कित्तुरावर मराठ्यांची स्वारी येण्याची वाट पहात बसला.

पण होळकर व बेहरे यांच्या मनांत कित्तुरावर चालून येण्याचें मुळींच नव्हतें! त्यांचें सारें लक्ष हल्लीं सावनुराकडे वेधून राहिलें होतें. खंडणी देण्याविषयीं तेथच्या नबाबास टिपूचा तगादा लागला होता. पण " तुम्ही टिपूस खंडणी द्याल तर पेशवेसरकारचें तुम्हाशीं सख्य राहणार नाहीं. कसाही प्रसंग आला तरी आम्ही तुमचा बचाव

करूं. तुम्हीं टिपूस खंडणी देऊं नये " अशी होळकराची नबाबास ताकीद होती. सावनूरचा नबाब टिपूचा मेहुणा होता, परंतु त्या उभयतांत द्वेष उत्पन्न झाला असून नबाब टिपूस फार भीत असे. मराठ्यांच्या दपटशामुळें नबाब खंडणी देण्याची टाळाटाळ करितोसें पाहून टिपूनें ती वसूल करण्याकरितां आपला सावकार राघवेंद्र नाईक नकाते यास कांहीं जुजबी फौज बरोबर देऊन सावनुरास पाठविलें. तो सावकार फार धनाढ्य असल्याबद्दल त्या प्रांतीं कीर्ति होती. तो सावनुरास आल्याचें वर्तमान येतांच होळकर व बेहरे एकदम चाळीस कोसांची

मे.

दौड एका अहोरात्रांत करून सावनुरास गेले. ते तेथें जाऊन पोंचतात तों आधीं चार घटका राघवेंद्र नाइकास बातमी कळून तो मोठ्या तारांबळीनें तुंगभद्रापार निसटून गेला होता! तरी मध्यमप्रतीचे पांच चार सावकार तेथें टिपूच्या राज्यांतले होते त्यांपासून होळकरांनीं कांहीं पैका हबकलाच! मग सावनूरचें रक्षण करावें व पटवर्धनांच्या लक्ष्मेश्वर परगण्यांत टिपूचा अंमल होता तो उठवावा या दोन कामाकरितां गणेशपंत बेहरे यांजबरोबर १५ हजार स्वार नेमून त्यांस सावनुरानजीक बंकापुरास ठेवून तुकोजी होळकर परत फिरले. येतां येतां त्यांनीं धारवाडप्रांतीं अंमल बसविण्याकरितां बेहट्टी येथें बापू होळकर व आपले दिवाण पाराशरपंत यांस दहा हजार फौजेनिशीं ठेविलें व बाकी सुमारें १५ हजार फौज घेऊन आपण कित्तुराजवळ सैदबुरान याच्या तोंडावर पुन्हां येऊन राहिले.

बहरे व बापू होळकर यांच्या फौजेच्या जरबेमुळें लक्ष्मेश्वर परगण्यांत टिपूचीं ठाणीं होतीं त्यांपैकीं सावशी, मूळगुंद, गदग,

तडस, बेहट्टी, नवलगुंद या सर्व ठिकाणीं मराठ्यांचीं ठाणीं बसलीं.
जून. शिरहट्टी, येळवंती, श्रीमंतगड, वडवट्टी, बालेहसूर एवढींच ठाणीं शत्रूकडे राहिलीं होतीं तींही घेण्याचा उद्योग सुरू होता. बेहट्टीस बापू होळकर होते त्यांस हुबळीचा देसाई केंचनगौडा यानें सांगून पाठविलें कीं तुम्ही हुबळीस फौज पाठवाल तर जुनी व नवी हुबळी हीं दोन्ही ठाणीं माझ्या हवालीं आहेत हीं मी तुम्हास देतों. हें संधान आल्यावरून बापू होळकर व पाराशरपंत हुबळीस गेले. त्यांच्या मदतीस गणेशपंत बेहरे यांनींही आपले पुतणे महादाजीपंत यांबरोबर थोडी फौज पाठविली होती. ते त्रिवर्ग सरदार हुबळीस जातांच केंचनगौडानें नवी हुबळी त्यांच्या हवालीं केली. जुन्या हुबळीचें ठाणें तो मराठ्यांच्या हवालीं करणार तों तें वर्तमान धारवाडास टिपूचा किल्लेदार होता त्यास कळलें. त्या किल्ल्यांत केंचनगौडानें आपला मुलगा ओलीस ठेवलेला होता. त्या मुलास किल्लेदारानें तोफेच्या तोंडीं बांधून केंचनगौडास सांगून पाठविलें कीं, जुन्या हुबळीचें ठाणें मराठ्यांच्या हवालीं करशील तर तोफेस बत्ती देऊन तुझ्या मुलास मारून टाकीन! याप्रमाणें दहशत देतांच केंचनगौडा उद्विग्न होऊन ठाणें मराठ्यांच्या हवालीं करण्याची टाळाटाळ करूं लागला. तेव्हां मराठ्यांनीं बरोबर तोफा नेल्या होत्या त्यांचा मारा हुबळीवर सुरू केला. हुबळीस याप्रमाणें शह बसल्याचें ऐकून तुकोजी होळकरांच्या तोंडावर सैदबुरान होता तो तेथून निघून हुबळीजवळ कलघटगीस आला आणि तेथून रात्रीं आपलें कवाइती पायदळ व तोफा घेऊन बापू होळकर वगैरेवर छापा घालण्यासाठीं निघाला. ता येत असल्याची आगाऊ बातमी कळल्यामुळें ते त्रिवर्ग सरदार हुबळीचे मोर्चे उठवून बेहट्टीस गेले. सैदबुरान याच्या हालचालींवर तुकोजी होळकरांचीही नजर होतीच. त्यांस तें वर्तमान कळतांच ते फौजेचा

तळ हालवून बकुंदाहून बेहट्टीस गेले, आणि तेथली फौज मिळवून घेऊन पुन्हां हुबळीस वेढा देऊन बसले. हीं वर्तमानें मार्च महिन्यापासून जूनअखेरपर्यंत घडलीं.

बदामीस मराठ्यांचा वेढा पडला होता तेव्हां टिपू कुमकेस येईल असें त्यांस वाटत होतें व त्याप्रमाणें तो तुंगभद्रेपलीकडे बडदरूजीस आल्याचीं वर्तमानेंही आलीं होतीं. आणि त्यासाठींच तो येण्यापूर्वीं बदामी हस्तगत करावी म्हणून एकाएकीं मराठ्यांची धडपड नानांनें सुरू झाली होती, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. त्या वेळीं आपल्या हातून बदामीची कुमक होणार नाहीं असें समजून टिपू दक्षिणेस परत गेला. जातां जातां पुणें दरबार व निजामअल्ली यांशीं मुधोजी भोंसल्यांच्या मार्फत सलोखा करावा म्हणून त्यानें भोंसल्यांकडे वकील पाठविला. भोंसले नागपुरास जातां जातां पुण्यास गेले तेव्हां त्यांच्या मध्यस्थीनें त्या वकिलाचीं पुणें दरबाराशीं पुष्कळ बोलणीं झालीं. परंतु समेटाचा प्रकार त्यावेळीं बनून आला नाहीं.

बदामी घेतल्यावर हरीपंततात्या मोहिमेचें काम पुढें सुरू करण्यास मोकळे झाले. त्यांच्या हाताखालीं पटवर्धन, रास्ते, अक्कलकोटकर यांचीं पथकें व सर्व हुजरात मिळून सुमारें चाळीस पन्नास हजार फौज पेशवाईची होती. त्याशिवाय मन्याबा भोंसले नागपूरकर यांचे स्वार दहा हजारांवर होते. आणि निजामअल्लीची फौज तहवारजंग याच्या हाताखालीं पंचवीस हजार होती. मोगलाच्या फौजेंत गारदी व तोफा यांचा भरणा विशेष होता. हरीपंततात्यांजवळ सात आठ हजार पायदळ होतें व तोफांचा सरंजामही चांगला होता. याप्रमाणें जवळ जवळ पाऊण लक्षावर फौज हरीपंततात्यांच्या हाताखालीं होती. याशिवाय होळकर व बेहरे धारवाड सावनुराकडे होते त्यांचा जमाव स्वार पायदळ मिळून चाळीस हजारांपर्यंत होता.

ही संख्या दिसायला मात्र मोठी दिसते. पण या संख्येच्या मानानें पाहिलें तर या अफाट सैन्याचें सामर्थ्य कमीच होतें असें म्हटलें पाहिजे, कारण कीं ही फौज एकहातीं नव्हती. तीमध्यें निरनिराळे सरदार होते त्यांत ऐकमत्य नव्हतें. तात्यांचा हुकूम पशवाई फौजेवर जितका होता तितका मोगल व भोंसले यांच्या फौजेवर अर्थातच नव्हता. मोगलाई लष्कर नेहमींप्रमाणें या मोहिमेंतलेंसुद्धां बेकैदी व अव्यवस्थित होतें. असो.

बदामी काबीज झाल्यावर हरीपंततात्या मे महिन्याच्या अखेरीस तेथून कूच करून गजेंद्रगडाकडे गेले. त्या किल्ल्यास मोर्चे दिल्यावर पायदळाच्या दोन लहान तुकड्या टिपूकडून कुमकेस येत होत्या त्या मराठी स्वारांनीं वाटेंतच गांठून मारून टाकिल्या. मग किल्लेकऱ्यांनीं घोरपड्यांचे मार्फत संधानाचें बोलणें लाविलें. आठ दिवस वाटाघाट होऊन आतां किल्ला स्वाधीन व्हावा तों टिपूनें अकस्मात् जाऊन अदवानीस मोर्चे दिल्याची बातमी आली. अदवानीचें संस्थान निजामअल्लीचे बंधु बसालतजंग यांचें होतें हें पर्वी सांगितल्याचें वाचकांस स्मरत असेलच. बसालतजंग आतां वारले होते व त्यांचे पुत्र मोहबतजंग हे मुलांमाणसांसुद्धां अदवानींत होते. टिपूनें त्या किल्ल्यास वेढा घालून फार निकड केली. परंतु मोहबतजंगांनीं शर्थीनें लढून शत्रूचे दोन हल्ले माघारे परतविले. " आपली कुमक झाली नाहीं तर आपण मुलांमाणसांसुद्धां शत्रूच्या हातीं सांपडणार; याकरितां आपल्या घराण्याची अब्रू रहावी, आपल्या घरच्या बायका टिपूच्या हातीं लागूं नयेत, एवढ्याकरितां तरी कुमकेस फौज पाठवून आपला बचाव करावा, अशी मोहबतजंगांनीं आपल्या चुलत्याची म्हणजे निजामअल्लीची प्रार्थना केली. निजामअल्लींनीं तत्काळ आपले धाकटे बंधु मोगलअल्ली यांबरोबर पंचवीस हजार फौजेची रवानगी

केली व हरिपंततात्यांस निकडीचीं पत्रें पाठविलीं कीं, तुम्ही आपली फौज व मोगलअली एकत्र होऊन टाकोटाक अदवानीस जाऊन टिपूचे मोर्चे उठवावे. तीं पत्रें येतांच तात्यांनीं गजेंद्रगड घेण्याकरितां तिसरा हिस्सा फौज आपणाजवळ ठेवून सुमारें दोन-तृतीयांश फौज तारीख ९ जून रोजीं अदवानीकडे रवाना केली.

९ जून. त्या फौजेंत आप्पा बळवंत मुख्य सरदार असून त्यांचे हाताखालीं बाजीपंत अण्णा, रघुनाथराव नीळकंठ पटवर्धन व मोगलाई फौजेसुद्धां तहवारजंग हे सरदार नेमिले होते. आप्पा बळवंत यांनीं भागानगराहून मोगलअली आले होते, त्यांस सामील करून घेऊन अदवानीकडे झपाट्यानें चाल केली. ते तेथें पोंचतांच टिपू मोर्चे उठवून तीन कोस मागें सरला. तारीख २२ जून रोजीं आप्पा बळवंत व बाजीपंत व रघुनाथराव पटवर्धन हे त्रिवर्ग सरदार तयार होऊन टिपूवर चालून गेले. टिपूनें आपल्या अघाडीस हजार बाराशें स्वारांची चौकी ठेविली होती, ती मराठ्यांनीं मारून उधळून दिली व तिचे शेंदीडशें घोडे हिसकून घेतले; तों खासा टिपू सुलतान पायदळ व तोफा घेऊन गोटांतून आला त्यानें तोफांचा भडिमार केला. अस्तमानपर्यंत लढाई होऊन शेवटीं मराठ्यांनीं टिपूस त्याच्या गोटापर्यंत रेटीत नेलें. इतकी लढाई झाली तरी मोगलांची चाळीस पन्नास हजार फौज लढाईचा तमाशा पहात गोटांतच बसून होती ! मराठ्यांची कुमक तिनें काडी-मात्र केली नाहीं.

आप्पा बळवंत निघून गेल्यावर दोन दिवसांनीं गजेंद्रगड हरिपंततात्यांच्या हवालीं झाला. मग तेही अदवानीकडे गेलेल्या फौजेचा पाठपुरावा करण्याकरितां तेथून निघून कवताळ भनूपर्यंत आले. ते दिवस अखेरीचे होते, तरी तुंगभद्रेच्या उत्तरतीरीं बुनगें ठेवून पलीकडे जाऊन

पलीकडची फौज व आपण एकत्र होऊन टिपूवर चालून जावें व लढाईचा हंगाम त्याच्या मुलखांत पाडावा असा तात्यांचा बेत होता. त्या वर्षीं त्या प्रांतीं मृगाचा पाऊस झाला नव्हता. पुढचीं एक दोन नक्षत्रें पाऊस न पडता, तर तात्यांचा बेत सिद्धीस जाता आणि कदाचित् चार महिनेपर्यंत मोगल मराठी फौजांची छावणीही तिकडेच झाली असती. परंतु आर्द्रांचा पाऊस झपाट्याचा सुरू झाल्यामुळें तात्यांचा पलीकडे जाण्याचा बेत एकीकडेच राहून पलीकडे सडी फौज अदवानीच्या कुमकेस गेली होती, ती नदीस पाणी येऊन पलीकडेच अडकून पडते कीं काय ही त्यांस काळजी उत्पन्न झाली! अशा अडचणीच्या दिवसांत अदवानीस शह देऊन टिपूनें हरिपंतें-तात्यांस एक प्रकारचें कोडेंच घातलें होतें व हें कोडें ते कसें सोड-वितात हें तो पहात बसला होता! सडी फौज घेऊन पलीकडे जावें तर बुनगें अलीकडे राहिल्यामुळें नदीस पाणी आल्यावर निभाव लाग-णार नाहीं आणि मागून धान्य व वैरण पोंचणार नाहीं! पलीकडे न जावें तर अदवानीचा टिकाव शत्रूपुढें कसा लागणार? नरगुंदचा अनुभव तात्यांस होताच. या सर्व अडचणींचा विचार करून त्यांनीं आप्पा बळवंत यांस लिहून पाठविलें कीं, तुम्ही मोहबतजंग यास मुलें-माणसें व चीजवस्तसुद्धां अदवानीहून काढून नदीस पाणी भरलें नाहीं तों लौकर निघून अलीकडे यावें. त्याप्रमाणें आप्पा बळवंत यांनीं केलें. पण अदवानीची तटबंदी पाडणें, तोफा फोडणें, धान्याचा नाश करणें, या गोष्टी शत्रु ठाणें घेणार हें कळलें असूनही परत जाण्याच्या धांदलींत त्यांस करितां आल्या नाहींत. ते घाईघाईनें परत

जुलई. आले तों तुंगभद्रा नदीस उराइतकें पाणी झालेंच होतें! अलीकडच्या तीरीं लष्कर पुरतें उतरतें न उतरतें तों नदीस पूर येऊन दुथडी पाणी भरून चाललें!

यांप्रमाणें अदवानीच्या मसलतींतून शर्थीनें पार पडल्यावर दोन्ही सैन्यें पुन्हां एकत्र होऊन कनकगिरीपर्यंत आलीं. तेथें मोगल अल्लीस निरोप देऊन तहवारजंगास मात्र बरोबर घेऊन हरिपंततात्या बहादुरबिंड्यास आले. इतकें होतें तों जुलैचा महिना संपला. कुमकेस आलेली फौज नदीपार जातांच टिपूनें अदवानीच्या किल्ल्यावर निशाण चढविलें. अदवानी टाकून येण्याची मसलत हरिपंतांनीं केली ती परशुरामभाऊंस पसंत पडली नाहीं. " अदवानी टाकून आले, हें ठीक जालें नाहीं. होणार भावी ! " हे त्यांचे उद्गार एका पत्रांत आहेत. परंतु तात्यांच्या अडचणी काय होत्या त्या आम्हीं वर दर्शविल्याच आहेत.

अदवानी काबीज केल्यावर टिपू पन्नास साठ हजार कवाइती पायदळ, पंचवीस हजार स्वार, दीडशें तोफा, याप्रमाणें सरंजाम तयार करून तुंगभद्रेच्या दक्षिणतीरीं आला. तें वर्तमान कळतांच सावनूरचा नबाब घाबरून गेला. टिपूची बहीण त्या नबाबास दिलेली होती. या शरीरसंबंधामुळें उभयतांत सौरस्य असावें; पण नबाबाशीं टिपूचें पराकाष्ठेचें वैमनस्य होतें ! तुंगभद्रेपलीकडे टिपू आल्याचें वर्तमान येतांच नबाबास भय उत्पन्न होऊन आपण मुलेंमाणसें घेऊन तुमच्या लष्करांत रहावयास येतों असें त्यानें हरिपंततात्यांस सांगून पाठविलें. पण तात्यांनीं त्यास धीर दिला कीं, नदी भरून चालली असतां टिपू कांहीं एवढ्या अफाट लष्करासह अलीकडे येण्याचा संभव नाहीं. तो किरकोळ फौज पाठवील तर तुम्हांपाशीं बेहरे यांस फौजसुद्धां नेहमीं ठेविलेंच आहे, ते तुमचें संरक्षण करितील. तुम्हीच सावनुरांतून निघाल्यावर तो तमाम प्रांत गडबडून पळत सुटेल. याकरितां तुम्हीं सावनुरांत रहावें. शिबंदी कमी असेल तर सरकारचे गारदी व स्वार बंदोबस्ताकरितां सावनुरांत ठेवितों. तात्यांकडून याप्रमाणें

निरोप गेल्यावरून नबाब धीर धरून सावनुरांत राहिला. त्या शहरा नजीक गणेशपंत बेहरे फौजेचा तळ देऊन राहिले होते, त्यांस दुखणें येऊन ते जुलईअखेरीस मृत्यु पावले. त्यांची सरदारी त्यांचे पुतणे महादाजीपंत यांस मिळाली.

टिपू सुलतान भरपावसाळ्यांत नदी उतरून अलीकडे येत नाहीं, असें हरिपंतास वाटत असल्यामुळें धारवाड सुभ्यांतकीं व पटवर्धन जहागिरींतलीं ठाणीं एक धारवाड खेरीजकरून आपण स्वस्थपणें स्वाधीन करून घेऊं अशी त्यांस उमेद होती. बहादुरबिंड्यास त्यांनीं वेढा दिला होता हें मागें सांगितलेंच आहे. तो किल्ला घेऊन ते कोपळास मोर्चे देऊन बसले. तो किल्ला हस्तगत होण्याच्या बेतांत होता, इतक्यांत जुलईच्या अखेरीस टिपू टोंकऱ्यांच्या नावांतून सर्व लष्करासह उत्तर तीरीं गलगनाथावर आला ! ! ! गलगनाथ हें स्थळ कोठें आहे हें डफ् साहेबांस माहित नव्हतें, व तें कोठें आहे हा आपण पुष्कळ शोध केला तरी आपणास कळलें नाहीं असें ते लिहितात ! व नकाशांतही कोठें हें स्थळ नाहीं असें त्यांनीं म्हटलें आहे. या स्थळास ते ' गरघाट ' म्हणतात, तर कर्नल विल्क ' करकनाट ' असें म्हणतात ! डफ् पेक्षां विल्कचा उच्चार मूळ नांवाला जवळ आहे. विल्क-पेक्षां आपण अधिक माहितगार, नदीच्या उताराचें नांव असेल त्यांत ' घाट ' हा शब्द असला पाहिजे, अशा समजुतीनें डफ्साहेबांनीं गर-घांट असें रूपांतर केल्यावर तें स्थळ नकाशांत कसें सांपडावें ? गलग-नाथ हा तुंगभद्रेचा उतार प्रसिद्ध असून तो धारवाड जिल्ह्यांत हावेरी तालुक्यांत आहे.

शत्रु अलीकडे आला त्या अर्थीं तो प्रथम सावनूरच्या गळीं पडेल, हें जाणून तात्यांनीं कोपळास रघुनाथराव पटवर्धन यांजबरो-बर दहा हजार फौज ठेवून टिपूचे रोखें बाकी फौजेसह कूच केलें.

तुंगभद्रा व वर्धा या नद्यांच्या संगमावर टिपू सुलतान इटगें येथें उतरला होता. पश्चिमेस वर्धा ऊर्फ वाळानदी व पुढें ओढा अशी ती अडचणीची जागा मूळचीच असून शिवाय जागोजाग बातेऱ्या बांधून व त्यांवर तोफा ठेवून टिपूनें खूब बंदोबस्त केला होता. त्यांत अघाडीच्या बातेऱ्यांवर लांब पल्ल्याच्या थोर तोफा ठेविलेल्या होत्या. त्याच्या लष्करास धान्य वैरण वगैरे सामुग्रीचा पुरवठा तुंगभद्रेपलीकडून व वर्धानदीच्या पश्चिमेकडून होत असे. हरिपंततात्या लक्ष्मेश्वर परगण्यांत येऊन कपोतगुड्ड व बनीकोप यांच्या दरम्यान राहिले. तेथून शत्रूचा मुक्काम तीन कोसांवर होता. तात्यांनीं आपलें थोरलें बुणगें कोपळाहून येतांना रामदुर्गास पाठवून दिलें होतें. सडे स्वारीचें बुणगें मात्र हल्लीं त्यांजबरोबर होतें.

आगस्ट.

यापुढें आठ महिनेपर्यंत उभयपक्षांच्या हालचाली व युद्धाची विशेष तऱ्हा जी दिसून आली तीसंबंधें येथें थोडें विवेचन करणें जरूर आहे. इंग्रज व टिपूसुलतान यांशीं मराठ्यांचें जें युद्ध झालें तें इतर शत्रूंशीं झालेल्या युद्धापासून भिन्न आहे. इंग्रज व टिपू यांचें पायदळ व तोफखाना यांतच विशेष बळ होतें. मराठी फौज म्हणजे मुख्यत्वें घोडेस्वारांची फौज असे. या मोहिमेंत पन्नास साठ हजार स्वारांचें तितक्याच संख्येच्या पायदळाशीं युद्ध व्हावयाचें होतें. असलें युद्ध म्हणजे ज्याला ' काकोलूकीय ' म्हणतात, तशा स्वरूपाचें होय ? कावळा आणि घुबड यांचें हाडवैर आहे तरी त्यांचें समोरासमोर युद्ध कधीं होत नाहीं. दिवसास कावळ्यानें घुबडास छळावें आणि आंधळे झालेल्या घुबडांनीं तो छळ चुकविण्यासाठीं अडचणीच्या जागेंत लपून बसावें; उलटपक्षीं रात्रीस कावळे आंधळे झाल्यावर घुबडांनीं त्यांचा छळ करावा; असें हें युद्ध चालत असतें, त्याचप्रमाणें ही गोष्ट होय. दिवसास पायदळाच्या मनांत घोडेस्वारांशीं लढाई करा-

वयाचें आलें, तर तें कसें साधणार ? पायदळ एका तासांत चार मैल चाललें, तर तितक्या वेळांत घोडे दहा मैल पळून जाणार ! त्यांची त्यांची गांठ कशी पडावी ? आणि एकादे वेळीं सोईवार सपाट मैदानावर गांठ पडलीच तर एकदां हजारों घोडेस्वारांची धडक येऊन आदळल्यावर तिजखालीं पायदळाचा चुराडा झाल्याशिवाय तरी कसा रहावा ? पण हें घोडेस्वारांचें वर्चस्व दिवसापुरतें असतें. त्यांच्या हालचाली फार चपळतेनें होणाऱ्या असल्यामुळें त्यांच्यानें बरोबर विशेष तोफखाना बाळगणें होत नाहीं. कारण, तोफा म्हटल्या म्हणजे त्या संभाळण्याकरितां पायदळ हें बाळगावें लागतेंच. आणि पायदळ व तोफखाना यांचें ओझें गळ्यांत अडकल्यावर मग स्वारांच्या फौजेच्या हातून लांब मजली होत नाहींत. याकरितांच प्रस्तुतच्या मोहिमेंत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें भारी तोफा व अवजड सामान रामदुर्गास ठेवून हरिपंततात्या सडे बुनगे व थोड्याशा हलक्या तोफा मात्र बरोबर घेऊन शत्रूच्या मुकाबल्यास आले होते. हरिपंततात्यांचें बहुतेक सैन्य घोडदळच होतें. तसलें घोडदळाचें सैन्य रात्रीच्या वेळीं पंगु असतें व त्या वेळीं काळोखांतून येऊन त्यावर छापे घालण्यास शत्रूचें कवाइती पायदळ संधि पहात असतें.

इंग्रजांशीं हरिपंततात्या व महादजी शिंदे या दोघांनींही लढाया केल्या, पण या दोघां प्रसिद्ध सरदारांच्या त्या वेळच्या सेनापत्यांत एक विशेष आहे, तो ध्यानांत ठेविला पाहिजे. गुजरायच्या स्वारींत प्रत्येक दिवशीं इंग्रजांच्या मुक्कामापासून पांच सहा कोस अंतर ठेवून हरिपंत नेहमीं मुक्काम करीत. हेतु एवढाच कीं, आपणांवर छापा घालावा असें इंग्रजांच्या मनांत आलेंच तर त्यांना लांब पल्ल्यावरून यावें लागल्यामुळें त्यांच्या येण्याची वर्दी आपणांस आगाऊ सहज कळावी. यावरून इंग्रजांच्या छाप्यास हरिपंत फार भीत असत

हें सिद्ध झालेंच. महादजी शिंद्यांची गोष्ट तशी नव्हती. इंग्रजांपासून कोस दोन कोसांवर आपला तळ पडला, तरी त्याची त्यांना क्षिति वाटत नसे. इतकेंच नाहीं, तर पुष्कळ वेळां त्यांनीं मुद्दाम इंग्रजांजवळ येऊन रात्रीचे मुक्काम केलेले आहेत व रात्रीच्या वेळीं इंग्रजांच्या फौजे-वर बाण व तोफा सोडणें व त्यांचें बाजारबुणगें लुटण्याचा यत्न करणें इत्यादि उपद्रव दिलेला आहे. इंग्रजांजवळ त्यांच्या लष्कराचा तळ असे, तेव्हां पाव अर्धी घटकेचा इशारा मिळतांच आपल्या सर्व सैन्यास शत्रूच्या तोफेच्या माऱ्याबाहेर जातां यावें अशी सावधपणाची तयारी शिंद्यांची नेहमीं असे. इतकें असूनही इंग्रजांनीं एक दोनदां छापा घालून शिंद्यांची नासाडी केलीच ! तथापि इंग्रजांशीं लढण्यांत त्यांचा क्रम प्रथमपासून चालू होता, तोच अखेरपर्यंत कायम राहिला. शिंद्यांचे हाताखालीं फौज असे ती सर्व त्यांचीच असल्यामुळें तिजवर त्यांची हुकमत चांगली चालत असे. हरिपंतांच्या हाताखालीं निर-निराळ्या फौजा एकत्र आणिलेल्या असल्यामुळें त्यांवर त्यांची कदर तितकी चालत नसे. ही गोष्ट जमेस धरली, तरी एकंदरींत विचार केला असतां हरिपंततात्यांपेक्षां महादजी शिंद्यांचें सेनापत्य अधिक हिमतीचें व कौशल्याचें होतें, असें आम्हांस वाटतें. सेनानायक या नात्यानें हरिपंतांस इंग्रज मानीत असत, पण महादजी शिंद्यांस वचकत असत, हें आमच्या म्हणण्याला आणखी प्रत्यंतर आहे.

हरिपंत व महादजी शिंदे यांची जी वर तुलना केली, ती शिं-द्यांनीं डिबाईनच्या हाताखालीं कवाइती पायदळ तयार केलें त्या-पूर्वीची आहे व ही तुलना इंग्रजांशीं झालेल्या युद्धापुरतीच आहे. शिंद्यांचें व टिपूचें कधीं युद्ध झालेंच नाहीं, त्याअर्थीं त्या बाबतींत त्यांची व हरिपंतांची तुलना करितां येत नाहीं. प्रस्तुतच्या मोहिमेंत टिपूशीं भलत्याच प्रदेशांत युद्ध करण्याच्या भरीस पडून तात्या सावनूर प्रांतीं

अडकून पडले, हें त्यांनीं योग्य केलें कीं अयोग्य केलें, याविषयीं त्या वेळच्या सरदार वगैरे तज्ज्ञ लोकांतसुद्धां मतभेद होता. २२ वर्षांपूर्वीं माधवराव पेशव्यांनीं याच सावनूरच्या रानांत हैदरअल्लीशीं गांठ घातली होती, ती सावनूरकर नबाबाच्या रक्षणाकरितांच घातली होती. तोच नमुना पुढें ठेवून हरिपंत या वेळीं सावनुराकडे आले असतील तर त्यांची दोन गोष्टींत चूक झाली असें आम्ही म्हणूं. त्यापैकीं पहिली गोष्ट ही कीं, माधवराव पेशव्यांनीं पावसाळ्यांत शत्रूशीं गांठ घालण्याचा अविचार केला नाहीं आणि यांनीं तो करून आपल्या लष्कराचे व्यर्थ हाल व नुकसान करून घेतलें. दुसरी गोष्ट अशी कीं, शत्रूचें व आपलें त्या वेळचें आणि हल्लींचें बळाबळ किती आहे, हा त्यांनीं विचार केला नाहीं. माधवरावांचें आणि हरिपंतांचें सैन्य सामर्थ्यानें सारखें नव्हतें. तथापि तें होतें असें मानलें तरी हैदराच्या व टिपूच्या सामर्थ्यांत फारच फरक झाला होता. हैदरापेक्षां टिपू फारच बलिष्ठ झाला होता, हें कोणासही समजण्याजोगें होतें. हरिपंतांनीं सावनूर प्रांतीं शत्रूशीं पावसाळ्यामध्यें गांठ घालण्यांत कदाचित् चूक केली असेल; पण एकदां गांठ पडल्यावर ती सुटेपर्यंत त्यांनीं धैर्यानें, सावधपणानें व दक्षतेनें वागून संकटांतून आपल्या लष्कराचा बचाव केला, याबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत.

हरिपंततात्यानीं टिपूच्या तळापासून तीन कोसांवर बनीकोप येथें मुक्काम केला होता, हें मागें सांगितलेंच आहे. तारीख २ ऑगस्ट रोजीं भोंसले व मोंगल यांच्या फौजांसुद्धां हरिपंत सर्व सैन्य व दहा वीस तोफा बरोबर घेऊन शत्रूच्या गोटाजवळ गेले. तेव्हां टिपूनी व त्यांची परस्पर तोफांची मारगिरी झाली, तिनें अघाडीस बाजीपंत अण्णा होते त्यांचीं दहा वीस घोडीं माणसें जाया झालीं. शत्रूनें गोटाबाहेर येऊन लढाई करावी, अशी हरिपंतांची अपेक्षा होती, पण तो छावणीबाहेर

मुळींच आला नाहीं ! मराठ्यांची एक टोळी वर्धानदीचे पश्चिमेस गेली होती, तिनें शत्रूच्या कहीवर पडून तीनचारशें बैल व शेंदीडशें तट्टे हिरून घेतलीं. ही टोळी कहीच्या पाठोमाठ वर्धानदी उतरून गेली होती; परंतु शत्रूनें चालून येऊन तिला नदीपार पुन्हां हुसकून लाविलें. सायंकाळपर्यंत शत्रूच्या गोटाजवळ उभे राहून हरिपंततात्या सर्व सैन्यासह परत मुक्कामास आले. त्यानंतर आणखी एकदां तात्या शत्रूच्या गोटावर गेले होते. त्या वेळींसुद्धां हाच नमुना झाला. टिपू सुलतानास मराठ्यांनीं छावणींतून बाहेर काढण्याचा जो जो यत्न केला, तो तो निष्फळ झाला. सुमारें एक महिनापर्यंत तो आपले छावणींत स्वस्थ बसून होता. गणेशचतुर्थीच्या दुसऱ्या दिवशीं म्हणजे तारीख २८ ऑगस्ट रोजीं सुलतानाची स्वारी बरोबर दहा पंधरा हजार पायदळ व तोफा घेऊन मराठ्यांवर छापा घालण्यासाठीं रात्रीं बाहेर पडली. त्या रात्रीं विसाजीपंत आठवले पांच चार हजार स्वारांसह गोटापासून अंतरावर छबिन्यास उभे होते. टिपूचा छापा कसा असतो हें विसाजीपंतांनीं नऊ वर्षांपूर्वी एकदां अनुभविलें होतें. टिपू छबिन्यापर्यंत येऊन तोफा मारूं लागला तेव्हां ते त्याच्या पायदळावर बाण सोडीत धीराधीरानें हटूं लागले. तों शत्रु आल्याची वर्दी गोटांत जाऊन हरिपंततात्या फौज तयार करून अघाडीस आले. तें पहातांच टिपू माघारा परतून गेला. दहा पांच घोडीं माणसें जखमी करण्यापलीकडे या खेपेस त्याच्या हातून कांहीं नुकसानी झाली नाहीं. चार दिवस गेल्यावर आणखी एकदां तो छापा घालण्याकरितां आला. परंतु मराठे सावध असल्यामुळें त्याला असेंच परतावें लागलें. बनीकोप येथें मुक्काम पडले असतां हरिपंतांनीं कोपळाहून रघुनाथरावांस व हुबळीहून तुकोजी होळकरांस निघून येण्याविषयीं पत्रें पाठविलीं होतीं. त्याप्रमाणें कोप-

२८ आगस्ट

ळचा वेढा उठवून रघुनाथराव तत्काळ येऊन मिळाले. पण सैद-बुरान कलघटगीस असल्यामुळें तुकोजी होळकरांस हुबळी सोडून येतां आलें नाहीं.

एका जागीं मुक्काम करून राहण्यांत टिपूला दम होता. याचें कारण त्याच्या लष्करांत घोडीं व गुरें कमी होतीं. व त्याची वैरण त्याच्या पाठीशीं तुंगभद्रेपलीकडे त्याचेंच राज्य होतें तिकडून नेहमीं येत असे. परंतु मराठ्यांचें लष्कर मुख्यत्वें घोडेस्वारांचें असल्यामुळें त्यांच्या लष्करांत घोडीं, तट्टें व गुरें असंख्य होतीं. त्यांस वैरण पुरविणें मोठ्या आयासाचें काम होतें. चार दोन मुक्काम झाले, म्हणजे दहा पांच कोसांतली वैरण खलास होई. पिछाडीस वैरण आणावयास दूर जावें तर पावसाळ्यामुळें नद्या नाले भरलेले, आणि कांहीं ठिकाणीं अजून शत्रूचा अंमल कायमच होता. मराठ्यांस टिपूचा शह तर सोडावयाचा नव्हता आणि वैरणीच्या अडचणीमुळें एके जागीं पुष्कळ दिवस मुक्काम तर करण्याचीही सोय नव्हती! बनीकोप येथें सव्वा महिना राहिल्यावर वैरणीच्या अडचणी-मुळें तेथून कूच करून तारीख १२ सप्टेंबर दिवशीं हरिपंततात्या लक्ष्मेश्वरापासून एक कोसावर बडणी येथें मुक्कामास आले. त्याच रात्रीं पहाटेच्या प्रहरीं पुन्हां टिपूचा छापा आला. छबिन्याच्या लोकांनीं गोळागोळी सुरू केली तों गोटांतून हरिपंततात्या फौजेसह तयार होऊन आले व अघाडीस ठांसून उभे राहिले. त्या वेळीं काळोख होता सबब तात्यानीं चंद्रजोती लावून त्यांच्या उजेडांत शत्रू-वर तोफांचा व बंदुकांचा मारा केला व शत्रूनेंही त्यांवर अतोनात मारा केला. नंतर सूर्योदयाच्या सुमारें टिपू आपल्या गोटास परत गेला आणि इटगीहून तळ हालवून वर्धा नदीच्याच तीरानें सावनूरा-पासून ४ कोसांवर आला. दुसरे दिवशीं तेथून आणखी एक कोस पुढें

सप्टेंबर.

सरून हत्तीमोतूर येथें आला. त्यामुळें तात्याही बडणीहून निघून सावनुरापासून एक कोसावर आले. दोन्ही गोटांमध्यें २ कोसांची व उभयतांच्या छबिन्यांत पाऊण कोसाची तफावत राहिली. या अति सांनिध्यामुळें केव्हां टिपूचा छापा येईल हा नेम नाहीं या भयानें मराठी लष्कर रात्रभर घोडयांवर जीन घालून तयार असे.

बुराणउद्दीन कलघटगीवर होता, त्याचे तोंडावर तुकोजी होळकर व बेहरे हुबळीस राहिले होते, त्यांसही रात्रभर लष्करापुढें छबिने ठेवून फार सावधपणें वागावें लागे. बुराणाच्या सैन्यांत फितूर करून त्यांनीं पांचशें मराठी घोडेस्वार व १५० पायदळ फोडून आपणांकडे आणिलें होतें. उभय पक्षांची झटपट म्हणावी तर मात्र कांहीं होत नव्हती. अशा स्थितींत टिपूनें बुराणउद्दीन यास सैन्यासह आपणांजवळ बोलावून घेतलें, तेव्हां होळकर व बेहरे हेही हुबळीहून निघून हरिपंततात्यांच्या लष्करास मिळाले. मराठी लष्करास एक महिनाभर सावनुराजवळ स्वस्थ पडून रहावें लागलें. वैरणीचा दुष्काळ पडला होता, तरी त्यांस डावे उजवेकडे सावनूर टाकून जाववेना.

लष्करच्या हकीकतीचीं वर्तमानें पुण्यास दररोज जात होतींच. टिपूचा शह लष्करासमीप पडल्यामुळें तो वारंवार छापे घालण्याची मसलत करितो व तिचा प्रतिकार करण्याचा बोजा एकटया हरिपंततात्यांवर पडतो; याकरितां परशुरामभाऊ तासगांवास घरीं स्वस्थ बसून होते. त्यांनीं लष्करांत जावें. अशी नानांची फार इच्छा होती. पण कांहीं झालें तरी या मोहिमेंत आपण सामील व्हावयाचें नाहीं, असा भाऊंचा निश्चय असल्यामुळें ते नानांस कांहीं तरी सबब लिहून पाठवून लष्करांत जाण्याचें टाळीत होते. मध्यंतरीं एकदां लष्करांत न जातां आपण आपल्या कामाचा उलगडा करून घेण्यासाठीं पुण्यास येतों, असें भाऊंचें पत्र गेलें. त्यावर नानांनीं उत्तर दिलें कीं, " ति-

ळचा वेढा उठवून रघुनाथराव तत्काळ येऊन मिळाले. पण सैद-बुरान कलघटगीस असल्यामुळें तुकोजी होळकरांस हुबळी सोडून येतां आलें नाहीं.

एका जागीं मुक्काम करून राहण्यांत टिपूला दम होता. याचें कारण त्याच्या लष्करांत घोडीं व गुरें कमी होतीं. व त्याची वैरण त्याच्या पाठीशीं तुंगभद्रेपलीकडे त्याचेंच राज्य होतें तिकडून नेहमीं येत असे. परंतु मराठ्यांचें लष्कर मुख्यत्वें घोडेस्वारांचें असल्यामुळें त्यांच्या लष्करांत घोडीं, तट्टें व गुरें असंख्य होतीं. त्यांस वैरण पुरविणें मोठ्या आयासाचें काम होतें. चार दोन मुक्काम झाले, सप्टेंबर. म्हणजे दहा पांच कोसांतली वैरण खलास होई. पिछाडीस वैरण आणावयास दूर जावें तर पावसाळ्यामुळें नद्या नाले भरलेले, आणि कांहीं ठिकाणीं अजून शत्रूचा अंमल कायमच होता. मराठ्यांस टिपूचा शह तर सोडावयाचा नव्हता आणि वैरणीच्या अडचणीमुळें एके जागीं पुष्कळ दिवस मुक्काम तर करण्याचीही सोय नव्हती ! बनीकोप येथें सव्वा महिना राहिल्यावर वैरणीच्या अडचणी-मुळें तेथून कूच करून तारीख १२ सप्टेंबर दिवशीं हरिपंततात्या लक्ष्मेश्वरापासून एक कोसावर बडणी येथें मुक्कामास आले. त्याच रात्रीं पहाटेच्या प्रहरीं पुन्हां टिपूचा छापा आला. छबिन्याच्या लोकांनीं गोळागोळी सुरू केली तों गोटांतून हरिपंततात्या फौजेसह तयार होऊन आले व अघाडीस टांसून उभे राहिले. त्या वेळीं काळोख होता सबब तात्यानीं चंद्रजोती लावून त्यांच्या उजेडांत शत्रू-वर तोफांचा व बंदुकांचा मारा केला व शत्रूनेंही त्यांवर अतोनात मारा केला. नंतर सूर्योदयाच्या सुमारें टिपू आपल्या गोटास परत गेला आणि इटगीहून तळ हालवून वर्धा नदीच्याच तीरानें सावनुरा-पासून ४ कोसांवर आला. दुसरे दिवशीं तेथून आणखी एक कोस पुढें

सरून इत्तीमोतूर येथें आला. त्यामुळें तात्याही बडणीहून निघून सावनुरापासून एक कोसावर आले. दोन्ही गोटांमध्यें २ कोसांची व उभयतांच्या छबिन्यांत पाऊण कोसाची तफावत राहिली. या अति सांनिध्यामुळें केव्हां टिपूचा छापा येईल हा नेम नाहीं या भयानें मराठी लष्कर रात्रभर घोड्यांवर जीन घालून तयार असे.

बुराणउद्दीन कलघटगीवर होता, त्याचे तोंडावर तुकोजी होळकर व बेहरे हुबळीस राहिले होते, त्यांसही रात्रभर लष्करापुढें छबिने ठेवून फार सावधपणें वागावें लागे. बुराणाच्या सैन्यांत फितूर करून त्यांनीं पांचशें मराठी घोडेस्वार व १५० पायदळ फोडून आपणांकडे आणिलें होतें. उभय पक्षांची झटपट म्हणावी तर मात्र कांहीं होत नव्हती. अशा स्थितींत टिपूनें बुराणउद्दीन यास सैन्यासह आपणांजवळ बोलावून घेतलें, तेव्हां होळकर व बेहरे हेही हुबळीहून निघून हरिपंततात्यांच्या लष्करास मिळाले. मराठी लष्करास एक महिनाभर सावनुराजवळ स्वस्थ पडून रहावें लागलें. वैरणीचा दुष्काळ पडला होता, तरी त्यांस डावे उजवेकडे सावनूर टाकून जाववेना.

लष्करच्या हकीकतीचीं वर्तमानें पुण्यास दररोज जात होतींच. टिपूचा शह लष्करासमीप पडल्यामुळें तो वारंवार छापे घालण्याची मसलत करितो व तिचा प्रतिकार करण्याचा बोजा एकट्या हरिपंततात्यांवर पडतो; याकरितां परशुरामभाऊ तासगांवास घरीं स्वस्थ बसून होते. त्यांनीं लष्करांत जावें. अशी नानांची फार इच्छा होती. पण कांहीं झालें तरी या मोहिमेंत आपण सामील व्हावयाचें नाहीं, असा भाऊंचा निश्चय असल्यामुळें ते नानांस कांहीं तरी सबब लिहून पाठवून लष्करांत जाण्याचें टाळीत होते. मध्यंतरीं एकदां लष्करांत न जातां आपण आपल्या कामाचा उलगडा करून घेण्यासाठीं पुण्यास येतों, असें भाऊंचें पत्र गेलें. त्यावर नानानीं उत्तर दिलें कीं, " ति-

कडे मसलत पडली असतां इकडे येणें ठीक नाहीं. शत्रूस आवई जाईल कीं, भाऊ पुण्याकडे गेले. येणेंकरून दाब कमी होतो. यास्तव लष्करास लवकर जावें. ( तुमचीं ) जीं कामें आहेत तीं करून देतों. परंतु ये समई न गेलें असतां मसलतीस कमी पडते. यास्तव जरूर जावें. पुण्यास येऊं नये. " परंतु यासंबंधें भाऊंचा निश्चय काय होता तो वर दर्शविलाच आहे. ' आपले पुतणे रघुनाथराव व पुत्र रामचंद्रपंतअप्पा हे सरंजामी पथकांसुद्धां हरिपंततात्यांच्या हाताखालीं लष्करांत चाकरीवर हजर आहेतच. नवी फौज चाकरीस ठेवितों म्हणून आम्ही कारभाऱ्यांस सांगत होतों तें त्यानीं ऐकिलें नाहीं. आम्हाजवळ फौजफांटा कांहींएक नाहीं, त्या अर्थी उगीच रिकामें लष्करांत जाऊन हरीपंततात्यांस कोरड्या मसलती सांगत बसण्यांत कांहीं जीव नाहीं. ' हे विचार त्यांच्या मनांत घोळत होते.

मराठे व मोंगल यांच्या लष्करावर छापा घालण्याविषयीं टिपूचे आजपर्यंतचे यत्न सफळ झाले नाहींत; तरी त्याचा आणखी यत्न सुरू होताच. आतां सैदबुरान आपल्या सैन्यासह कलघटगीहून निघून त्यास नुकताच येऊन मिळाला होता. त्याशीं मसलत करून तारीख १ आक्टोबर रोजीं रात्रौ टिपूसुलतान मराठी लष्करावर पुन्हां छापा घालावयास आला. त्या छाप्याचें वर्णन गोविंद सखदेव यानीं केलें आहे तें असें, " प्रथम प्रहर रात्रीस शत्रु तयार जाला आहे, म्हणोन बातमी आली होती. त्यावरून जीन मात्र ठेविलें होतें. त्यानंतर दोन प्रहर गेले, यामुळें थोडीशी असावधता आली होती. इतक्यांत पहांटेच्या प्रहर रात्रीस इकडील छबिना हुजूरचा पुढें होता त्याजवर शत्रु येऊन चार पांच तोफांचे बार व बाण सोडिले. ते समयीं छबिन्यांतील लोक जाग्यास बसले होते त्यांपैकीं कांहींचीं घोडीं उधळोन गोटास आलीं. ते

१ आक्टो०

दिवशीं छबिन्याबरोबर राजश्री नारोपंत चक्रदेव होते. शत्रु आपण खासा एक बाजनें, व सैदबुरान यास सरकारच्या इकडील तोफा गोटाचे अघाडीस टेंकडीवर ठेविल्या होत्या तिकडील बाजूस, याप्रमाणें करून चालून आला. हुजरातसुद्धां उभे राहून इकडील तोफा झाडून काढिल्या. शत्रु मारगिरी करीत आला, तों प्रातःकाळ जाला. सरकारची फौज टेंकडयाचा आसरा धरून राहिली. इकडील तोफा चार सुरू केल्या, तेव्हां तिकडून मारागिरी तोफांवर जाहली. तेथें राजश्री हरिपंत खासेच उभे राहून इकडील व तिकडील अडीच प्रहर पर्यंत मारगिरी होत होती. इकडील तोफा थोडया व लहान, शत्रूची मारगिरी फार, यामुळें तोफा माघाऱ्या काढिल्या. हुजरात व होळकर व बेहरे मिळून दोनशें घोडे ठार पडले व माणूसही जायां जखमी जालें. संध्याकाळचे चार घटका दिवसास शत्रु परत गेला. पाठीमागील दुमदारी अस्तमानचे सुमारास जागा सोडून गेली. तेथपर्यंत इकडील फौजा तेथेंच उभ्या होत्या. नंतर तेथें वीस हजारपर्यंत फौज छबिन्यास ठेवून राजश्री हरीपंततात्या रात्रीस गोटास सावनूरचे उत्तरेस दीड कोसावर आले. छाप्याचे समयीं होळकराकडील कांहीं पेंढारी व बापू होळकर ऐसे शत्रूचे पाठीमागील बाजूस गेले होते. तिकडील एक हत्ती व बैलाच्या माळा तोफेच्या रिकाम्या चार व वीस पंचवीस घोडे ऐसें आणिलें. ”

याच प्रसंगाचें खुद्द रघुनाथराव नीलकंठ यानीं वर्णन केलें आहे तें असें—

छ० ६ जिल्हेज रोज भृगुवार या दिवशीं रात्रीं टिपूचा छापा येतो, सरंजाम तयार जाला आहे, म्हणोन एक दोन बातम्या आल्या. त्यावरून फौजा आपापल्या जागां सावध होत्या. पहांटेच्या प्रहर रात्रीस खासा टिपू आपल्या सरंजामासुद्धां निघोन दोन टोळ्यांनीं नीट

चालून छबिन्यावरून गोटाच्या अघाडीस येऊन तोफांची व बाणांची मारगिरी फार केली. सरकारची फौज तयार होऊन त्याच्या तोंडावर उभी राहिली. सरकारच्या तोफाही लागू केल्या. परंतु रात्रीचा समय, आणि त्याचा आगीचा मार भारी. तेव्हां आपल्या तोफा मागें काढून तळ सोडून मार खात पाऊण कोसपर्यंत सरकत अलीकडे आलों. इतक्यांत सूर्योदय जाला. मग सरकारच्या फौजा साऱ्या जमून राहिल्या. सावनूरच्या अंगें होळकरही राहिले आणि सरकारच्या तोफा चार पांच लागू करून त्याजला मार देऊं लागले. सूर्योदयापासून दोन प्रहर पावेतों परस्परें तोफांची मारगिरी जाहली. शत्रु तेथून माघारा अस्तमानास गेला. आम्ही साऱ्या फौजा शत्रु गेल्यावर मुक्काम मजकुरास अस्तमानीं आलों. लढाईंत तोफेचे गोळे लागून तीनशेंपर्यंत एकंदर घोडीं ठार पडलीं व लोकही फार जायां जाले."

मराठ्यांपेक्षां या प्रसंगीं टिपसुलतान बलवत्तर आहे असा सावनूरच्या नबाबाचा ग्रह यापूर्वींच झाला होता. टिपू त्याच्या राजधानीजवळ उतरला होता व सैदबुरान त्यास येऊन मिळाला होता. त्या दोघांच्या मनांतून मराठ्यांच्या देखदेखत आपणास आपल्या राजधानींत पकडून कैद करून लष्करांत न्यावें, अशी मसलत आहे, असें त्यानें ऐकिलें होतें. सावनुरांत धीर धरून राहण्याविषयीं हरिपंततात्या त्यास नेहमीं सांगत होते व केवळ त्याचा बचाव करून पेशवे सरकारची इभ्रत राखावी, म्हणूनच ते वैरणीचा असा दुष्काळ पडला असतांही संकटें सोसून सावनुराजवळ राहिले होते. परंतु वर वर्णिलेल्या युद्धांत मराठ्यांचा काट कांहींच चालला नाहीं असें पाहतांच तो नबाब गर्भगळित होऊन घाईघाईनें सावनुरांतून निघून हरिपंततात्यांच्या लष्करांत येऊन राहिला।

२ आक्टो॰

मग हरिपंततात्यांस सावनुराजवळ राहण्याचें अर्थातच कांहीं प्रयोजन

राहिलें नाहीं. मग नबाबाचे व कांहीं आपले लोक सावनूरच्या बंदोबस्तास ठेवून ते कूच करून हुलगूर परगणें कारडगी येथें आले. तेथून पुढें सावशी, कुंदगोळाकडे येण्याचा त्यांचा बेत होता.

मराठ्यांनीं बदामीस वेढा घातला तेव्हांपासूनच तह करण्याविषयीं टिपूचें बोलणें लागलें होतें. त्या बोलण्याचे मुद्दे काय काय होते, हें रघुनाथराव नीलकंठ यांच्या तारीख २५ सप्टेंबरच्या पत्रावरून स्पष्ट होतें. ते लिहितात—

" टिपूकडील वकील नूरमहमदखान याचें पत्र कपतगुड्डचे मुक्कामीं राजश्री हरिपंततात्यांचे नांवें आलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं, ' आपणाकडील दोघे भले माणूस पाठवावे. ' त्याजवरून त्याच्या जासूद जोड्या दोन आल्या होत्या त्यांपैकीं एक तात्यांकडे व एक सरकारांत-त्यांत ब्राह्मण एक व जासूद एक-याप्रमाणें होते. त्याप्रमाणें यानींही येथून जासूद दोघे पाठविले. त्यांजबरोबर त्यांचीं उत्तरें आलीं जे, " दोन्ही दौलती मातबर, लघु गोष्टीविशी खलष पडले, यास्तव ज्या गोष्टीकडून श्रीमंतांचा व आमचा स्नेह अक्षतमरिष्ट चालेल असें व्हावें. गुदस्तां नरगुंदकरांकडे पेशकशीचा पैका येणें असतां ( त्यानीं ? ) महाल मारून ताराज केले. आम्ही इंग्रजांचे मसलतीस गुंतलों. बाजत बरसाद तंबी करोन पेशकशीचा ऐवज घ्यावा म्हणून फौज पाठविली असतां आपली फौज कुमकेस आली. दोहीं फौजेचा मुकाबला जाला. कित्तूर संस्थान यादींत लिहिलेंच असतां आम्हाकडून अंतर नसतां तिकडून पेशकदमी जाली; तेव्हां इकडून पेशकदमीची तरतूद करणें प्राप्त जालें. यास्तव ज्या गोष्टीकडून खलष न पडतां स्नेह चालेल ते गोष्ट करावी. " याप्रमाणें पत्रें आल्यावर त्यांचीं उत्तरें यानीं लिहून दिलीं कीं, ' राजश्री सेनाधुरंधर यांजबरोबर वकील पुण्यास गेलेच होते, त्यांजबरोबर जाबसाल बोलण्यांत आले ते फत्ते

अल्लीखान यांच्या जाहीराण्यांत आलेच असतील. त्यास त्यांचीं उत्तरें यावीं तशीं आलीं नाहींत.' याप्रमाणें उत्तरें पाठविलीं." या उताऱ्यांत फत्ते अल्लीखान हें नांव आलें आहे तें टिपूचें नांव होय.

सावनूर राखण्याच्या नादीं लागून हरीपंततात्यांनीं आपलें लष्कर कसें अडचणींत घातलें हें देशीं राहणाऱ्या व मोहिमांच्या कामांचा अनुभव घेतलेल्या प्रत्येक माणसास दिसत होतें. अशांपैकीं एकाचा अभिप्राय पुढीलप्रमाणें आहे. "शत्रूचा मोकाबला अति संनिध, आगीचा मार बहुत, आणि लष्करांत महर्गताही बहुत; आणि लोकांस खर्चासही पावत नाहीं; असा प्रकार असतां सावनूरनजीक फौजेचा टिकाव होणें कठीण दिसतें. शत्रूच्या पिछाडीस कांहीं लाग भाग या फौजेचा साधावयाचा नाहीं. पिछाडीकडून त्याचा रस्त वगैरे सामानाचा पुरावा वरचेवर होतो. त्यास कोणे गोष्टीचें कठिण नाहीं. शत्रूभोंवता यांचे फौजेचा तलावा फिरल्यास मग त्यास जड पडेल. तें कांहीं नाहीं ( त्या पक्षीं ) आणखी महिनाभर दम धरून तेथेंच राहिल्यास खराबी मात्र होईल. परंतु कांहीं काटागिरी चालावयाची नाहीं. संनिध राहिल्यास रोज तो छापा घालील आणि खराबी करील. यास्तव आठ दहा कोसांच्या अंतऱ्यानें राहिल्यास छापा आला तरी खबरदारीनें असल्यास कांहीं लागभाग साधावयास येईल. यांत काय घडतें पहावें. संनिध शत्रूच्या राहून कांहीं उपयोग नाहीं. निवडक माणूस मात्र जायां होतें. रात्रंदिवस काळजी लागली आहे." हरिपंततात्यांस हें सर्व समजत होतें. परंतु सावनूरच्या अभिमानामुळें ते अडचणींत सांपडल्यासारखे झाले होते. शेवटीं त्यांचा तो अभिमानही तडीस गेला नाहीं !

सावनुरांतून नबाब बाहेर निघाला तेव्हां त्या शहराचें रक्षण करण्याच्या कामावर हरिपंतांनीं लोक ठेविले होते. परंतु टिपूनें त्या

लोकांस जरब देतांच त्यांनीं गोळी न वाजवितां मुकाट्यानें तें शहर टिपूच्या हवालीं केलें! गतवर्षी मराठ्यांच्यानें नरगुंद राखवलें नाहीं व त्यांस कित्तूरकराची कुमकही करितां आली नाहीं. यंदां अदवानीचेंही रक्षण त्यांच्यानें झालें नाहीं. या गोष्टी लागोपाठ घडत गेल्यामुळें मराठी राज्याचा सामर्थ्याविषयीं जो पूर्वी लौकिक होता त्याला मोठाच धक्का बसला. त्यांत मराठ्यांची लाख फौज समीप असतां तिच्या देखदेखत टिपूनें सावनूर काबीज केलें तेव्हां तर टिपूच्या पराक्रमाचा दरारा विशेषच वाढला. " शत्रु फार शेर जाला आहे. त्याचे तोफांचें सामान भारी. तूर्त शत्रूजवळ दीडशेंपर्यंत तोफा आहेत, यास्तव इकडील फौजेची कारागिरी चालत नाहीं. तुंगभद्रेस उतार जाहलेनंतर त्याचे पाठीमागून फौजा हिंडूं लागल्यानंतर माघारा सरकेल तर न कळे!" हा अभिप्राय या मोहिमेंत गुंतलेल्या प्रमुख लोकांचा होता. परंतु मराठ्यांवर ज्या अडचणी आल्या होत्या त्या सगळ्याच केवळ टिपूच्या पराक्रमामुळेंच आल्या होत्या असें नाहीं. त्यांचें मुख्य कारण टिपूनें धरतांना मुळीं अशीच जागा धरली होती कीं, ज्या ठिकाणीं मराठ्यांच्या घोडदळास चोहोंकडे फैलावण्यास अवकाशच मिळूं नये! अशा बळकटीच्या जाग्यांत स्वतः आपण राहून पायदळाच्या व तोफांच्या जोरावर छापे घालून तो मराठ्यांची नासाडी करीत होता. त्याला युक्तीयुक्तीनें मैदानांत आणून चोहोंकडून वेढून त्याचा कोंडमारा करावा अशा उद्देशानें हरिपंततात्या रोज थोडे थोडे मागें सरकत शिरहट्टीपर्यंत आले. तो किल्ला टिपूच्या ताब्यांत होता. परंतु मराठ्यांनीं तारीख १४ नोव्हेंबर रोजीं हल्ला करून तो काबीज केला. त्या किल्ल्याची कुमक करण्याकरितां तरी टिपू आपली जागा सोडून येईल असें त्यांस वाटत होतें. परंतु तो मोहरम महिना असल्यामुळें सणाकरितां टिपू सावनुरांतच राहिला.

१४ नोव्हेंबर.

मध्यंतरीं धारवाड काबीज होण्याचें कांहीं संधान दिसून आल्यावरून तुकोजी होळकर व बेहरे तिकडे तांतडीनें निघून गेले. परंतु गेल्यासारखें कांहींच कार्य घडून येण्याचा रंग न दिसल्यामुळें त्यांस हात हालवीत परत यावें लागलें. हल्लीं सावनुरापासून मराठी लष्कराचा तळ आठ कोसांवर होता.

त्या दिवसांत टिपूनें निजामअल्लीकडे तहाचा संदर्भ लावण्याकरितां वकील पाठविले, व होळकराकडे त्याच कामावर पुन्हा वकील पाठविले. नरगुंद व कित्तूर आम्हांकडे ठेवाल, व लढाई सुरू होण्यापूर्वीं तुंगभद्रेच्या उत्तरेस आमचें राज्य जेवढें होतें तितकें सारें आम्हांस परत द्याल, तर थोडीबहुत खंडणी आम्हीं तुम्हांस देऊं, असें त्याचें मगरूरीचें बोलणें असल्यामुळें तें होळकर वगैरे सरदारांस अर्थांतच पसंत पडलें नाहीं.

शिरहट्टीहून निघाल्यावर हरिपंततात्या पूर्वींप्रमाणें कपतगुड्डावर येऊन राहिले, व थोरलें बुनगें पूर्वीं त्यांनीं रामदुर्गास ठेविलें होतें तें कपतगुड्डचे पिछाडीस कलकेरी म्हणून चार कोसांवर गांव आहे तेथें आणिलें. कपतगुड्ड व कलकेरी यामध्यें एक बारी आहे तेथें पूर्वीं दाट जंगल होतें. मराठयांचा तळ कपतगुड्डावर पडला असतां तारीख १० नोवेंबर रोजीं टिपू सावनुराहून तळ हालवून वर्धा नदीच्या तीरातीरानेंच पुन्हां इटग्याच्या उत्तरेस दोन कोसांवर ओढा आहे तेथें मुक्कामास आला. तें स्थळ मराठयांच्या गोटापासून तीन कोसांवर होतें. शत्रु समीप आला असें पाहतांच हरिपंततात्यानीं कलकेरीपर्यंत मागें सरकण्याचा निश्चय करून आपलें सड्यां स्वारीचें बुनगें सायंकाळीं तिकडे पाठवून दिलें. आणि मोंगल व भोसले यांसही तसेंच करण्याविषयीं ताकीद दिली. परंतु स्वारी बरोबरच बुनगें जाईल, तें आगाऊ निराळें पाठवावयास कशाला पाहिजे, असें मनांत आणून त्या दोघांनीं हरि-

पंतांच्या ताकिदीकडे दुर्लक्ष केलें व त्याचा परिणाम त्यांस चांगलाच भोंवला, आणि पेशव्यांच्या लष्करासही थोडाबहुत भोंवलाच !

टिपूच्या लष्करांत मराठ्यांच्या हालचालींच्या सर्व बातम्या कळत होत्या. सायंकाळची संध्या आटपून हरिपंत तात्या मोंगल व भोसले यांसह आवशीस कलकेरीकडे निघाले. तों वाटेंत बारी होती, तींतून बाजार बुणगें व लष्कर जात असतां टिपूच्या फौजेनें येऊन त्यावर बाणांचा अतोनात वर्षाव केला व बेदड्यांच्या झुंडी येऊन बेलाशक बाजार बुनगें लुटूं लागल्या ! त्या वेळीं फारच धांदल होऊन लष्करच्या बाजारचे वाणी उदमी व लमाण वगैरे बरेच लोक मारले गेले. हरिपंतांबरोबर तोफखाना व जरीपटका, नौबत, निशाण वगैरे सरंजाम होता त्यासुद्धां ते व्यवस्थितपणें बारी उतरून गेले. तरी त्यांच्या फौजेंतल्या पागांपैकीं कित्येकांची दहा पांच पंधरा वीसपर्यंत घोडीं लुटींत गेलींच. परंतु याखेरीज त्यांचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. भोसल्यांचें बुनगें बरेंच लुटलें गेलें आणि मोंगलांची तर अतोनात नासाडी झाली. या मोहिमेंत टिपूनें मराठ्यांच्या लष्करावर घातलेला हा शेवटचा छापा होय.

३० नोवेंबर.

नंतर हरिपंत तात्या कलकेरीहून निघून गदग परगण्यांत निरलगी येथें मुक्कामास आले. छापा घालण्यापूर्वीं व नंतरसुद्धां टिपूकडून हरिपंत व होळकर यांजकडे प्रत्यहीं पत्रें येत होतीं कीं, तहाचें बोलणें करण्याकरितां वकील पाठवीत आहों. ते वकील कधीं पाठवावे हें लिहून यावें. दिसेंबरपासून टिपूची तहाविषयीं आतुरता विशेष दिसूं लागली. तारीख ७ दिसेंबर रोजीं टिपूकडून रास्ते व होळकर यांजकडे सांडणीस्वार पत्रें घेऊन आले. रास्त्यांच्या पत्रांत टिपूनें लिहिलें होतें कीं, पूर्वीं ठरल्याप्रमाणें वकील रवाना करितों. साऱ्या सरदारांची व या वकिलांची भेट करवून वकिलांस सुरक्षितपणें पुण्यास पोंचते करून द्यावें. त्यावर रास्त्यानीं उत्तर लिहिलें

दिसेंबर

की, " आपण वकील पाठवितों असें लिहिलें, त्यास मध्यें छाप्याची गोष्ट अशी जाली. त्यापक्षीं वकील पाठवावा, परंतु सरदारांस भेटविण्याचें प्रयोजन नाहीं. वकिलाची रवानगी गाडदी बरोबर देऊन पुण्यास करून देऊं. " होळकराच्या पत्रांत टिपूनें लिहिलें होतें कीं, " वकील मातबर पाठविले आहेत. यांचा बहुमान करून ज्या गोष्टींकडून दोहींकडील खलष दूर होय तें करावें. " त्यावर होळकरानीं जबाब लिहिला कीं, " वकिलाची रवानगी करितों, कधीं करावी हें उत्तर येतांच रवानगी करितों, म्हणून ( आपलीं ) पत्रें येत असतां दरम्यान छापा आला ही गोष्ट न व्हावी. त्यास आपण दाना दुरंदेशी आहेत. असें असतां ही गोष्ट घडूं नये. त्यास ज्या समयीं सरकारांत वकिलाचें प्रयोजन लागेल ते समयीं आणविले जातील. " हें होळकराचें उत्तर बाणेदारपणाचें होतें. तहाबद्दल टिपूची मध्यस्थी आजपर्यंत व यापुढेंही होळकराकडेच होती. असें असतां ती मध्यस्थी एकीकडे राहून टिपूनें विश्वासघात करून छापा घातला ही गोष्ट होळकराच्या मनास बरीच लागली असावी.

छापा आला त्या वेळीं शत्रूच्या लोकांनीं गर्दी केली त्यांतच होळकराचे पेंढारी मिसळून त्यांनीं आपलेंच लष्कर लुटलें; असा बोभाटा त्या वेळीं फार झाला होता; व त्यांत बरेंच तथ्य होतें. छाप्यानंतर दुसरे दिवशीं भोसले व मोंगल यांच्या लष्करांतलीं उंटें, घोडीं, बैल वगैरे पेंढाऱ्यांकडे सांपडले. हें त्यास प्रत्यक्ष प्रमाण होय, शत्रूकडून आलेला तहाचा संदर्भ कबूल करण्यांत होळकरानीं कांहीं लांच लुचपत घेतली असावी, आणि त्यांच्याच प्रेरणेवरून पेंढाऱ्यांनीं लष्कर लुटलें; व लुटीचा माल टिपूस निम्या किंमतीस विकला, वगैरे अफवा त्या वेळीं मराठी लष्करांत उठल्या होत्या; त्यांत सत्यांचा अंश पाहूं जातां ज्यांनीं या मोहिमेचा बराच बोजा आपल्या शिरावर उचलला होता असे थोर

सरदार तुकोजी होळकर शत्रूस सामील होऊन मराठी राज्याशीं बेइमानी करितील हें मुळींच संभवत नाहीं. पेंढारी ते बोलून चालून पेंढारीच! त्यांनीं पाहिजे तें कुकर्म केलें असलें तरी त्याचा दोष होळकरांवर लादणें वाजवी नाहीं. होळकरांकडे तद्दाप्रकरणीं टिपूचे कागद नेहमीं येत असत व ते कागद वाटेंत धरून त्यांत कांहीं फितुराचें सांपडतें कीं काय, म्हणून पुष्कळ शोध त्या वेळीं झाला. पण तसा लेखी पुरावा कोणास कांहीं एक सांपडला नाहीं. लष्करच्या हालचाली होळकराच्या सल्ल्यानें हरिपंत करीत असत ही गोष्ट पुष्कळ सरदार लोकांस आवडत नव्हती हें मात्र खरें.

यापुढें मराठ्यांनीं वर्धा व तुंगभद्रा या नद्यांच्या तीरापासून पांच सहा कोसांवर मुक्काम करीत करीत पूर्वेकडे हळूहळू सरकण्याचा क्रम सुरू ठेविला. त्या नद्यांच्या तीरीं खडकाळ व अडचणीच्या जाग्यांत टिपू बंदोबस्तानें मुक्काम करून राहतो यामुळें त्यावर आपला इलाज चालत नाहीं, याकरितां त्यास मैदानांत पुढें ओढून आणावें, असा हरिपंत तात्यांचा अभिप्राय होता. परंतु टिपू सावधपणानें वागणारा असल्यामुळें तो मुळीं नदीतीर सोडून पुढेंच येईना! मराठे जालीहाळ परगण्यांत असतां टिपू कोपळाजवळ होता. बहादुरबिंड्याचा किल्ला तोफा लावून त्यानें पुन्हां घेतला.

स० १७८७. त्या किल्ल्यास कुमक पोंचवावी म्हणून मराठी लष्करांत दोन तीनदां तयारी झाली असतां होळकरांनीं फौज जाऊं दिली नाहीं. टिपूस स्नेहाचीं पत्रें लिहून आपण वेढा उठवितों, असें दर खेपेस होळकर सांगत गेले आणि शेवटीं टिपूनें बहादुरबिंडा

१३ जाने०. घेतला! मराठी फौजा नेहमीं त्याच्या गोटावर चालून जात तेव्हां तो त्यांवर तोफांचा भडिमार मात्र करी, पण तो गोट सोडून लढण्याकरितां पुढें कधीं आला नाहीं.

होळकरांच्या मध्यस्थीनें उभयपक्षीं लढाई बंद झाली असतांही टिपूनें दगाबाजी करून बहादुरबिंडा घेतला हें वर आलेंच आहे. डंबळ परगण्यांत जतली येथें मराठी लष्कराचा मुक्काम असतां शंभर स्वार, दीडशें पायदळ, व पांच सहा सांडणी स्वार, याप्रमाणें सरंजाम घेऊन टिपूचा वकील आला तो होळकरांच्या गोटांत उतरला. रास्ते व हरिपंत यांच्या भेटी होऊन तहाचें बोलणें सुरू झालें. त्या वेळीं टिपूचा मुक्काम कोपळ येथें होता. तो तेथून कूच करून मराठ्यांच्या लष्करापासून तीन कोसांवर मुंडरगी परगणे डंबळ येथें आला. तो इतका जवळ आला त्याअर्थी हटकून छापा घालणार हें समजून मराठी सैन्यें रात्रभर तयारीनें होतीं. त्याप्रमाणें तारीख १८ दिसेंबर रोजीं रात्रौ तो तयारी करून गोटाबाहेर पडून पुढें आला. परंतु मराठे सावध आहेत त्याअर्थी या खेपेस आपला कार्यभाग साधण्याजोगा नाहीं हें समजून तो परत गेला. दुसरे दिवशीं हरिपंततात्या तेथून सात कोसांवर कुकनूरच्या मुक्कामीं आले व टिपू कोपळास परत गेला. कुकनूर व कोपळ या स्थळांत पांच सहा कोसांचें अंतर आहे. मराठी फौजेचे तलावे शत्रूच्या गोटापर्यंत दररोज होतच होते. त्यांत एके दिवशीं बेहरे यांच्या फौजेच्या एका लहानशा टोळीस शत्रूनें गांठून तिजपैकीं कांहीं स्वार ठार केले आणि ऐशीं नव्वद घोडे हिसकून घेतले. पुष्कळ वेळां मराठेही टिपूच्या किरकोळ टोळ्या गांठून त्यांचा फन्ना पाडीत.

कित्तुराहून तुकोजी होळकर मागें हुबळीस आले तेव्हां ते दोन अडीच हजार फौज कित्तूर प्रांतीं संगोली येथें ठेवून आले होते. त्या फौजेंत शहाजी भोंसले अक्कलकोटकर यांचे बंधु भवानजी पाटील व बाबूराव अनंत पागे हे मुख्य सरदार होते. तिकडे आतां धारवाड व कित्तूर यांखेरीज कोणचेंही ठाणें शत्रूच्या ताब्यांत राहिलें नव्हतें.

सर्व प्रांत मराठयांनीं व्यापला होता. होळकरांचा डोळा धारवाडावर आहे, व तें घेण्यासाठीं त्यांनीं एकदां यत्न केला तसा ते पुन्हां करितील, ही शंका मनांत आल्यामुळें मराठ्यांशीं तहाचें बोलणें करीत असतां टिपूनें इकडे धारवाडच्या रक्षणाकरितां व त्या प्रांतीं दंगा करण्याकरितां पांच चार हजार फौजही पाठविली होती! त्या फौजेनें येऊन मिश्रीकोटास वेढा घातला. तें वर्तमान येतांच पाटील व पागे संगोलीहून निघून बेटगिऱ्यास बुनगें ठेवून सडया स्वारीनें हुबळीपर्यंत आले. तें वर्तमान येतांच

मार्च. शत्रूनें मिश्रीकोटचा वेढा उठवून धारवाडास पलायन केलें! त्यावरून खुशाल होऊन पाटील व पागे हुबळीस पांच चार दिवस राहिले तों शत्रूनें अकस्मात् बेटगिऱ्यास त्यांचें बुनगें होतें तें लुटलें व तो गांवही संबंध लुटला! मग हे बेटगिऱ्यास जाऊन तेथील ठाण्याचा बंदोबस्त करून संगोलीस परत आले. तों शत्रु पुनः धारवाडांतून फौजेसहित बाहेर पडून अमीन बावीवर उतरला! पाटील व पागे त्यावर चालून गेले तेव्हां तो पुन्हां धारवाडास परत गेला!

जानेवारीमध्यें उभयपक्षीं युद्ध बंद व्हावें असा करार ठरला

स० १७८७. होता. परंतु हरिपंतांस टिपूचा विश्वास येत नसल्यामुळें व तो तहाच्या प्रत्येक कलमांत अतिशय घासाघीस लावीत असल्यामुळें एप्रिल महिन्यापर्यंत तह ठरला नाहीं. त्या महिन्यांत टिपूचें व हरिपंतांचें पक्कें बोलणें होऊन यादी झाल्या. त्यांत असें ठरलें कीं मराठ्यांची पांच सालांची खंडणी पांसष्ट लक्ष रुपये टिपूकडे येणें होती तिची तडजोड होऊन टिपूनें मराठ्यांस अठ्ठेचाळीस लक्ष रुपये द्यावे. त्यापैकीं बत्तीस लक्ष तूर्त रोख द्यावे व बाकीचे सोळा लक्ष सहा महिन्यांनीं द्यावे. शिवाय गजेंद्रगड, बदामी, नरगुंद व कित्तूर

हीं संस्थानें व किल्ले मराठ्यांस देऊन अदवानीचें संस्थान निजाम-अल्लीच्या हवालीं करावें. आणि सावनूरकर नबाबाचा मुलूख व राजधानी टिपूनें घेतली होती ती त्याची त्यास परत द्यावी. नरगुंद व कित्तूर येथील देसाई व इतर लोक टिपूनें धरून नेले होते ती सर्व मंडळी सोडून द्यावी. या तहाच्या शर्ती अमलांत येण्यास आणखी महिना पंधरा दिवस लागले. त्यानंतर टिपू आपल्या सैन्यासह श्रीरंगपट्टणास परत गेला. आणि मोगलांच्या फौजेस निरोप देऊन होळकर, भोसले वगैरे सरदारांसह हरिपंत तात्या यादवाड व तेरदाळ परगण्यांतून कृष्णेवर येऊन कुरुंदवाड, मिरज व तासगांव येथें मेजवान्या घेऊन पुण्यास गेले.

एप्रिल.

या मोहिमेचें आम्हीं एवढा वेळ वर्णन केलें आहे त्यावरून टिपूचें लष्करी सामर्थ्य मोठें होतें व त्याचें शौर्य व धोरण पहिल्या प्रतीचें उत्तम होतें हें सारें वाचकांच्या नजरेस आलेंच असेल. मराठे व मोंगल एकत्र झाले असतांही त्यांस चकवून त्यानें नरगुंद, कित्तूर, अदवानी व सावनूर हीं संस्थानें काबीज केलीं, सहा महिनेपर्यंत त्यांवर वेळोवेळ छापे घालून त्यांची नासाडी केली व सुखाचा आणि स्वस्थतेचा एकही क्षण त्यांस लाभूं दिला नाहीं, हा काय त्याचा सामान्य पराक्रम झाला ? अशी त्याची आजपर्यंत सरशी झाली असतांही तेवढ्यानें धुंद न होतां शत्रूवर आपली छाप बसवून त्यानें त्यांशीं योग्य वेळीं समेट करून घेतला, त्यावरून सुद्धां त्याचें राजकीय चातुर्य उत्तम प्रकारें स्पष्ट होतें. पावसाळा संपल्यामुळें नद्यांचें पाणी ओसरल्या-बरोबर मराठे तुंगभद्रा उतरून आपल्या पिछाडीवर येतील व दाणा वैरण बंद करून उपासमारीनें आपणास हैराण करितील हें त्यास मोठें भय होतें. आपली सरशी यापुढें नांदणार नाहीं, व नांदली तरी पेशवे, भोसले व निजामअल्ली हीं तीन सरकारें आपणाशीं लढण्याकरितां

आली आहेत त्यांस कांहीं दिल्या घेतल्यावांचून तीं खास परत जाणार नाहींत; असें जर आहे तर आपल्या राज्याचा सत्यानास करून घेऊन मागून तह करावा हें ठीक नाहीं, त्या पक्षीं आतांच तह झालेला बरा, हे त्याचे विचार पोक्तपणाचे होते. सहा महिनेपर्यंत एक लक्ष फौज लढाईकरितां एकत्र बाळगण्यांत त्यास कोट सव्वाकोट रुपये खर्च निदान आला असेल. यापुढें हा खर्च फार महिनेपर्यंत सोसण्याची त्यास ऐपत नव्हती. इंग्रजांचा वकील मालीटसाहेब नुकताच पुण्याच्या दरबारीं आला होता त्याचा टिपूस बागुलबोवा दाखविण्याकरितां नानांनीं त्या मालीटसाहेबास बदामीपर्यंत स्वारींत आणिलें होतें. टिपू त्या वेळीं त्या बागुलबावास मुळींच भ्याला नाहीं. पण अलीकडे विलायतेहून गव्हर्नर जनरलच्या जागीं लॉर्ड कॉर्नवालीस यांची नवीनच नेमणूक झाली होती त्या साहेबानीं अधिकारावर येतांच मुंबई, मद्रास व बंगाला या तिन्ही ठिकाणीं लष्कराची साफसफाई व तयारी जारीनें सुरू केली होती. त्यामुळें इंग्रजही याच संधीस आपणाशीं बिघाड करितात कीं काय अशी टिपूस शंका आली होती. या सर्व गोष्टींचा परिणाम टिपूच्या मनावर होऊन तो मराठे व मोंगल यांशीं तह करून घेण्यास आतुर झाला होता. तरी फार लगट करावी तर शत्रु जरबेचीं कलमें कबूल करावयास सांगेल या भयानें त्यानें आपली आतुरता गुप्त ठेवून तहाचें बोलणें धिम्मेपणानें चालविलें, व त्या स्थितींत आपला जितका फायदा होण्याजोगा होता तितका सर्व करून घेतला.

या मोहिमेचें काम चालू असतां परशुरामभाऊ घरीं स्वस्थ बसून होते हें मागें सांगितलेंच आहे. आतां शत्रूशीं पक्का तह ठरून मोहीम संपणार हें पहातांच ते या म्हणजे स० १७८७च्या फेब्रुवारींत कोंकणांत देवदर्शनाकरितां गेले होते त. प.

ळ्याच्या गणपतीस जाऊन तेथून राजापुरच्या गंगेस जाऊन हीं कोंकणची यात्रा एक महिन्यांत उरकून परत आले. मिरजेस कृष्णा नदीस घांट बांधण्याचें काम गंगाधरराव गोविंद यानीं सुरू केलें होतें तें काम चार पांच वर्षें चाललें होतें. तें काम यंदां पुरें झाल्यामुळें फाल्गुन शु० ११ (श० १७०८) या दिवशीं त्यानीं घांटाचा उत्सर्ग केला. दुसरे दिवशीं पांच सहस्र ब्राह्मण भोजनास घालून भूयसी वांटली. कुरुंदवाडास रामचंद्र दीक्षित वाटवे यानीं यज्ञ केला त्याचें फाल्गुन शु० १४ स महाव्रत होऊन पौर्णिमेस यज्ञसमाप्ति झाली. प्रतिपदेस अवभृतस्नान झालें. मिरज व कुरुंदवाड येथें झालेल्या दोन्ही समारंभांस येण्याचा कोंकणांत जातांना परशुरामभाऊनीं संकेत केला होता, परंतु वेळेवर त्यांचें येणें झालें नाहीं.

---

नं. २९१६. श्रीगणपतिर्जयति. ( १६ आगस्ट. )

पै॥ छ० १५ सवाल सन सीत समानीन श्रावण मास.

तीर्थस्वरूप राजश्री काका
वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। श्रावण शुद्ध एकादशी भौमवारपवेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळोन संतोष जाहला. " चांदखान बोहरी याचे नांवचा लाखोटा पाठविला आहे व कामाठी असामी पांच पाठविले आहेत. बोहरी याची व कामाठी याची गांठ घालून देणें व लाखोटाही देणें. जिन्नस आणावयाचा आहे. "

१ चिंतामणराव व विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें लाखोटा बोहरी यास पावता केला व त्याची व कामाठी याची गांठ घालून दिली. चांदखान याणें कामाठी याजबरोबर बिलोरी वगैरे जिन्नस पाठविला आहे. येऊन पावेल. अलीकडे नरगुंदाकडील वर्तमान कळत नाहीं. तरी ल्याहावयास आज्ञा असावी. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

सेवेशीं बाजी नारायण व गंगाधर नारायण दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रावण मासचे दक्षिणेचे ब्राह्मण रमण्यांतील व वाड्यांतील मिळोन चाळीस हजार जाहले. दक्षिणेस रुपये दीड लक्ष लागले. श्रीमंत राजश्री आप्पा साहेब व बापू यांस श्रीमंत ज्या दरवाजास बसले होते तेथें घेऊन गेलों होतों. श्रीमंत दोन घटका दक्षिणा देत होते तोंपर्यंत बसलों होतों. श्रीमंत उठोन श्रीपर्वतीस गेले नंतर ब्राह्मणांस प्रदक्षणा करून घरीं आलों. राजश्री होळकर व भोंसलेही तेथें आले होते. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९१७. श्री. (श्रावण शु० १०—१५ आगस्ट.)

पै॥ छ० ११ सवाल सन सीत समानीन. श्रावण मास.

[1]सेवेशीं विसाजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ९ सवालपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं, तरी सविस्तर ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. सालमजकुरीं मातबर मसलत कर्नाटकची करावयाची, त्याचा मनसबा वगैरे कितेक बोलण्याचे मजकूर आहेत; यास्तव श्रीमंत राजश्री भाऊंनीं व दादानीं व आपण पुणियास यावें म्हणोन पत्र गेलें, त्याचें उत्तर आपल्याकडून कांहींच आलें नाहीं हें ठीक नाहीं. समर्पक

---

१ पत्र पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

उत्तर यावें. काल मजला बोलावून नेऊन पुसत होते जे, तुमचे सरदार पुण्यास यावयास अद्यापि निघाले की नाहीं, कधीं येणार, काय उत्तर आलें, म्हणोन पुसेत होते. मीं उत्तर केलें जे, उत्तर आलें नाहीं, व अद्यापि निघाल्याची बातमी कांहींच आली नाहीं, म्हणोन सांगितलें. त्याजवरून सेवेशीं विनंती लिहिली आहे. तरी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व आपण एका जागां होऊन पुण्यास येण्याचा निश्चय कधींचा तें ठरून उत्तर पाठवावें म्हणजे त्याप्रमाणें सांगेन. श्रावण वद्य पंचमीस तात्यांनीं बाहेर डेरेदाखल व्हावयाचा मुहूर्त आहे. मग दसऱ्यापर्यंत मुहूर्त नाहीं. यास्तव बाहेर निघण्याचा निश्चय ठरत आहे. दोहों चोंरोजांत ठरेल. ठरलें म्हणजे लिहितों. भोंसले यांस बरें वाटत नाहीं, यास्तव निरोप घेऊन जाणार. श्रावण शुद्ध त्रयोदशीस जाणार असें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९१८. श्री. ( आषाढ व० ३—२४ आगस्ट. )

पै॥ छ० २४ रमजान. सन सीत समानीन. श्रावण मास.

सेवेशीं विसाजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १७ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपा व बापू यांची भेट स्वामींचे आज्ञेप्रमाणें श्रीमंतांची आषाढ वद्य तृतीया रविवारीं प्रातःकाळीं जाली. व तैसीच श्रीमंत राजश्री नाना व हरिपंततात्या यांची जाली. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहिजेसें नाहीं. स्वामीस सरकारचे बोलावण्याचीं पत्रें आजच डांकेसमागमें रवाना जालीं आहेत. भोंसले अद्याप येथेच आहेत. आज उद्यां जातों जातों म्हणतात. जातील तेव्हां खरे

१ नाना फडनवीस विचारीत होते. २ हरिपंत फडक्यांनीं. ३ मुधोजी भोंसले नागपूरकर. ४ पत्र पुण्याहून गंगाधरराव गोविंद यांस मिरजेस.

पुण्याकडे पर्जन्य नव्हता, त्यास पुण्याचा आठ रोज पर्जन्य चांगला पडला. त्याजमुळें पेरण्या होऊं लागल्या. भोंसल्यांचे लष्करामुळें व पर्जन्यानें ताण दिल्यामुळें पुण्यांत वैरण बहुत महाग जाली आहे. कडबा चाळीस रुपये हजार व गवत वीस रुपये हजार याप्रमाणें जालें आहे. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९१९. श्रीगणपतिर्जयति.( श्रावण व० ७–२६ आगस्ट.)

पै॥ छ० २३ सवाल सन सीत समानीन. श्रावण मास.
तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २० सवाल भृगुवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० ५ सवालचीं पत्रें शेटी खिजमतगार व जासुदासमागमें पाठविलीं तीं छ० १० मिनहूस पावोन लिहिला मजकूर सविस्तर कळला. " तीर्थस्वरूप मातुश्री यमुनाबाई बया व सगुणा आक्का यांचे नांवचे लाखोटे पाठविले आहेत. हे चास व तळेगांवास पावते करून उत्तरें आणून पाठवावीं " म्हणोन आज्ञा, त्यास दोनीं पत्रें पावतीं करून उत्तरें आणून सेवेशीं पाठविलीं आहेत. त्याजवरून सर्व वृत्त निवेदन होईल. " तीर्थस्वरूप मातुश्री काशी काकीस पत्रें लिहून लाखोटे पाठविले आहेत; व राजश्री धोंडो बापूजी जोशी यांस पत्र लिहिलें आहे हें व लाखोटे मशारनिल्हेजवळ द्यावे " म्हणोन आज्ञा, त्याप्रमाणें लाखोटे पंतमजकूर यांस पावते केले. राजश्री मुधोजी भोंसले याणीं श्रीमंतांस मेजवानी श्रावण शु॥ पौर्णिमा मंदवारीं केली. बहुमोल जवाहीर पन्नास हजारांचें व हत्ती एक व घोडे दोन व वस्त्रें याप्रमाणें दिलें. इंदुवारीं श्री-

---

१ चिंतामणराव पांडुरंग यांचें गंगाधरराव यांस पत्र पुण्याहून मिरजेस.

मंतानीं भोंसले यांस मेजवानी केली. वस्त्रें व हत्ती एक व घोडा एक व जवाहीर याप्रमाणें दिलें. राजश्री मन्याबा बापू—भोंसले यांचे पुत्र यांस दोन हजार फौजेनिशीं येथें ठेवून मुधोजी भोंसले यांणीं नागपुरास जाऊन दहा हजार फौज घेऊन लवकर यावें, याप्रमाणें ठरोन निरोप दिल्हा आहे. येथून कूच करून लवकर जाणार. वरकड सविस्तर वृत्त तीर्थरूप मातुश्री बाईनीं लिहिलें आहे त्याजवरून निवेदन होईल. ती॥ सौ॥ आवडाबाई आक्कास आणावयास रा॥ बाजीपंत काळे पाठविले होते. सौ॥ आवडाबाईस घेऊन काल दोन प्रहरां येथें आले. रा॥ कोन्हेर व्यंकोजी याजबरोबर पालख्या दोन वांईस ती॥ सौ॥ कुसाबाईस व सौ॥ मनाबाईस आणावयास पाठविल्या होत्या. त्यास तीं मिरजेस गेलीं नाहीं. पालख्या रिकाम्या होत्या. त्यापैकीं एक पालखी राजश्री गोविंदपंत मामाची तीर्थस्वरूप सौभाग्यवती आवडाबाईस बसावयास पुणेंपर्यंत आणिली होती ती माघारी मिरजेस पाठविली आहे. ओझ्यास तट्टू पागेचा होता तोही पाठविला आहे. येऊन पोंहचतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. २९२०. श्रीगणपतिर्जयति (८ सप्टेंबर.)

पै॥ छ० ७ जिल्काद सन सीत समानीन. भाद्रपद.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत भाद्रपद शुद्ध पंचमी गुरु-

१ पत्र लिहिणाराची आई लक्ष्मीबाई. २ कोल्टकर पांडववाडीचे. ३ वैद्य वांईचे. ४ मिरजकरांच्या पागेवरचा सरदार गोविंद सखदेव यास सरकारांतून मिळालेली. पदरच्या लोकांस बहुमानार्थ मिळालेल्या पालख्यांचा हा असा स्वतःचे कामाकरितां उपयोग हमेषा करून घेण्यांत येत असे. ५ चिंतामणराव पांडुरंग यांचें गंगाधरराव यांस पत्र पुण्याहून मिरजेस.

वार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण छ० २९ सवालचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. " हत्तीची किंमत भारी, घ्यावयाचा नाहीं; म्हणून रसूलखान यास सांगावें " म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें रसूलखानास सांगितलें. दुसरीं पत्रें छ० २७ सवालचीं पाठविलीं तीं पावोन लिहिलें वृत्त सविस्तर कळलें. " नरगुंद शत्रूनें घेतलें. राजश्री काळोपंत वगैरे मंडळी कौलानें खालीं उतरून पहाऱ्यांत ठेविले आहेत. पट्टणाहून हुकूम येईल त्याप्रमाणें पुढें करणार. पर्जन्य हिकडे अद्यापि बिंदु नाहीं. चिरंजीव राजश्री जनोबा भाऊ मंगळवेढेकर यांस श्रावण शुद्ध दशमीस पुत्र जाहला. चिरंजीव सौ॥ मथाबाई सासऱ्यांस रहिमतपुरास गेली. चिरंजीव सौ॥ कुसाबाई व सौ॥ मनाबाईस आणावयास पाठविलें होतें, परंतु चिरंजीव सौ॥ आली नाहीं. पालख्या माघाऱ्या आल्या, " म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. " पागेकडील व पयकाकडील लोक आहेत[1] त्यांचे रोजमुरेच्या यादी दोन पाठविल्या आहेत. राजश्री धोंडो बापूजी जोशी यास पत्र लिहिलें आहे. ऐवज देतील. यादीप्रमाणें पाव लोक वगैरे यांस व बारांगिरांस रोजमरा बट्टा शिरस्तेचा वजा करून जे रोख होतील तेही चलणीचेच द्यावे; " म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें मशारनिल्हेकडून ऐवज घेऊन माहे जिल्कादचा रोजमरा यादीप्रमाणें बट्टा वजा करून देवितों. राजश्री हरिपंततात्यानीं श्रीमंतांस मेजवानी केली. आम्हास बोलावणें आलें होतें. परंतु मी गेलों नाहीं. चिरंजीव राजश्री बापूस पाठविलें होतें. येथें आम्हाजवळ पागेचीं घोडीं रास चवदा आहेत. त्यांस खर्चास दरमहा दाणा वैरण वगैरे मिळोन अजमासें रुपये सवादोनशेंपर्यंत

---

१ तुम्हांबरोबर पुण्यास आहेत.

लागतात. हशमाकडील लोक आहेत त्यांस खर्चास रुपये हुकेरी शंभर हशमाकडून दिले होते ते रमजान व सवालपर्यंत बेगमी जाहली. जिल्कादच्या रोजमरेपैकीं खर्चास रुपये पन्नास पावेतों लागती ल. आजपर्यंत सात आठशें रुपये हशमसुद्धां अजमासें लागले. ऐवज देण्याविशीं राजश्री धोंडो बापूजी जोशी यांस पत्र पाठवावयाची आज्ञा असावी. वरकड सविस्तर वृत्त राजश्री बापूजी केशव जोशी जबानी सांगतां निवेदन होईल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

सेवेशीं बाजी नारायण व गंगाधर नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. कल्याणसिंग चोपदार नेहमीं चाकरीवर येत असतात. स्वामींनीं रोजमरेची याद पाठविली त्याप्रमाणें ऐवज आणून रोजमरे देतों. राजश्री भोंसले वानवडीहून आज कूच करून जेजुरीस गेले. दोन हजार फौजेनिशीं येथें चिरंजीवांस ठेविलें आहे. आपणही दोन तीन महिन्रेंत फौज घेऊन येणार आहेत. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९२१. श्रीपांडुरंग. ( ११ सप्तंबर. )

पै॥ छ० १५ जिल्काद. सन सीत समानीन. भाद्रपद.

सेवेशीं आनंदराव शेषगीर मुक्काम पुणें साष्टांग नमस्कार विनंती ऐसीजे. तागायत भाद्रपद शु॥ ७ रविवार जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे. विशेष. स्वामीचे निरोप घेऊन आबांचे सालीं श्रीमंत राजश्री नाना फडणीस श्रीपंढरपुरावरी मोकाम केले होते तेथें येऊन भेट घेतली. तेथचे शिवाजी पवार हिंगणीकर यांचे पुत्र राजश्री सदा शिवराव पवार वडील सरदारी करीत होते, धाकटे पुत्र राजश्री आनंद-

---

१ मिरज किल्ल्याच्या हशमखात्यापैकीं पायदळाचे शिपाई. २ मुधोजी भोंसले नागपूरकर.

राव पवार राजश्री महादजी शिंदे यांजकडेस जाऊन सदाशिवरावें पवार यांचे महाल माळव्यांतील दोन तीन लाखांचे होते त्यांपैकीं एक महाल परगणे देवासें—भारी परगणा चांगला—तो जप्ती करून वसूल परभारें घेऊं लागले. त्याजमुळें सदाशिवरावजींचे सरदारीस धक्का बसिला. सबब राजश्री आनंदराव पवार यांसीं हुजूर घेऊन यावें, याविशीं शिंद्यांशीं पत्रें व परगणे देवासें याची जप्ती सेवकाचे नांवें सनदा करून बराबरी जासूद वगैरे सरंजाम देऊन आमची रवानगी सरकारांतून जाहली. आज्ञेप्रमाणें शिंद्याकडेस जाऊन कामकाज उरकोन शुद्ध चतुर्थीस पुण्यासीं येऊन दाखल जाहलों. शिंद्याकडील हिंदुस्तानचें वर्तमान-अलीगोहर बादशाहा दिल्लींतला तो यांचे स्वाधीन. त्याची सर्व दौलतीची, फौजेची व महालांची बंदोबस्ती शिंद्यानीं केली आहे. स्वारीबराबरी पादशाहास घेऊन मथुरेवरी छावणी केली. आम्हीं मथुरेवरून ज्येष्ठ वद्यास निघोन तेथून मजल दरमजल पुण्यांसीं आलों. आगरेंचा किल्ला व डीग हे दोनी मातबर स्थळें पादशाहाचीं ठाणीं होतीं ते ठाणीं आपलीं बसविलीं. भरतपुर व कुंभेरी हे दोनी स्थळें सुरजमल्ल जाटाची बाइको किशोरी आहे तिचे हवालीं केलीं आहेत. पादशाहाचें मुलूख एकंदर यांचे. शिंद्याचे हस्तबूद अंमल चालूं लागले. अंतरवेदींत एकच पैलतीरीं रामगड किल्ला राहिला आहे त्यासीं मोर्चेबंदी केली आहे. तोही हस्तगत होईल. शीक व इंग्रेज यांचेही तह ठराऊन घेतले आहे कीं, आपल्या महालासीं उपद्रव नसावे. तूर्त चातुर्मास छावणीचे दिवस, याजकरितां गोष्ट करारांत ठरविले आहेत. बाद बरसात जाहालेवरी पुढें मनसुब्याप्रमाणें घडणें तें घडेल. लिंगाईत बुंदेले यांचे महालाखेरीज मोठे संवस्थानीक होते त्यांचे पारिपत्यास खंडेराव हरी पंचवीस हजार फौज व तोफा देऊन रवानगी केली आहे. तिकडीलही कामकाज यथास्थित जाहलें म्हणून

पत्रें आलीं होतीं. तूर्त आजच्या प्रसंगीं शिंद्यांचें काम बनून आलें असे. स्वामीस कळावें याजकरितां संकलित विनंती लिहिलें असे. स्वकीय मजकूर तीर्थरूप वैकुंठवासी ऐशीं वर्षांचे पुरुष. तेथील मुश्रीफीखेरीज दुसरीकडेस गेले नाहींत. प्रस्तुत दोन तर्पे स्वामींचे शीतल छाया, तेथें चिरंजीव रा॥ तिमरावजींचे हातून सेवा घेत असतां; तेणेकडून कुटुंबाचें पोषण करून स्वस्थ आहेत. सर्व भरभार स्वामींच्या चरणाचा. दुसरा आधार नाहीं. ती॥ सौ॥ मातुश्री गेल्यावरी तीर्थरूपांसीं अवलोकन करून होतों. ईश्वराचे करणीस मनुष्य उपाय नाहीं. तूर्त मायबाप दोनी स्वामींचे पाय आहेत. सेवक लोकांचे अपराध क्षमा करणार धणी समर्थ. कुटुंबाचें पोषण आपल्याखेरीज दुसरा त्राता नाहीं. सुज्ञाप्रती विशेष लिहिणेस शक्ति नाहीं. लोभ कीजे हे विज्ञापना.

पादशहानीं शिंद्यांसीं शिक्का करून दिला आहे त्याचे मतलब—

“ वकील मुतलक उमदेतुल उमराव मुखत्यारुल मुमालक फर्जंद अल्ली महाराजाधिराजश्री माधोराव शिंदेबहादर मनसूर जहां श्रीनाथ फिदवी शहाअलम पादशा गाजी. ”

नं. २९२२. श्रीगणपति. (आश्विन शु० ८–११ अक्टो.)

चिरंजीव बळवंतराव यांसीं परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. राजमंडळाकडे चाकरीस जाणें तें शिलेदार वगैरे याणीं विचारून जावें, सरकार आज्ञेशिवाय जाऊं नये, याप्रमाणें पेशजी ताकिद असतां हल्लीं मिरज प्रांतांतील लोक तिकडे चाकरीस जातात म्हणोन कळलें. ऐशियास आपण येविशींचें मनास आणून जे तिकडे चाकरीस गेले असतील त्यांचीं घरें जप्त करवून पुढें दुसरे कोणी न जात तें करावें. रवाना छ० ७ जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पा॥ छ० ९ जिल्हेज. सीत समानीन. आश्विन मास.

नं. २९२३. श्री. (कार्तिक शु० ६–८ नोव्हेंबर. )[+]

विज्ञापना. " राजश्री नानानीं व राजश्री तात्यांनीं येण्याविषयीं पत्रें पाठविलीं, त्यास हा मजकूर तासगांवास लिहून पाठविला परंतु उत्तरें चांगलीं येत नाहींत. ' तुम्ही निघालिया आम्ही तयारी करवितों, ' अशीं उत्तरें येत गेलीं. वडिलांच्याही लिहिण्यांत तीच गोष्ट आली. त्यास आमचा गुंता कांहीं नाहीं. आजपावेतों जी गोष्ट वडिलीं सरकारांतून कवूल केली ती आज्ञेप्रमाणें करीत असतां आज हें लिहिण्यांत येतें, याचा भाव समजत नाहीं. नानाचे समजण्यांत येईल जे, रघुनाथराव यांस आम्हीं पत्रें लिहिलीं असतां न आले. त्यास, दरबारचा जाबसाल जो करणें तो आजपावेतों वडील करीत होते. आतां हें असें लिहिण्यांत येतें, यास्तव सूचना लिहिली आहे. तुम्हीं पत्र वाचून माघारें पाठविणें. " म्हणोन आज्ञा, ऐशास आपण लिहिले अंदेशे येथें उभयतानीं घेतले तेव्हां त्यांची खातरजमा केली जे, " जो जाबसाल अगर भाऊ ' निघा ' म्हटल्यास दादा राहणार नाहीं, हीं खातरजमा असावी. कसेंही झालें तरी भाऊंचे आज्ञेखेरीज नाहींत. सालगुदस्त भाऊंस हिसके देऊन फसविलें, याजकारितां पुण्यास येत नाहींत. तुम्हांस मसलत करावयाची खचीत असल्यास बाहेर निघोन मजल दरमजल चलावें. मी भाऊंस घेऊन येतों. गुंता नाहीं. तुम्ही घरांत, आणि येथें बोलावून मसलतीखालींच ( दिवस ) घालविणार. बाहेर मात्र लौकिक व्हावा जे, मिरजकर पुण्यास येऊन

---

+ तारीख पैवस्तीची.

१ हें पत्र विसाजी नारायण वाडदेकर, पटवर्धनांचा पुण्यांतील वकील, यानें रघुनाथराव दादा कुरुंदवाडकर यांस लिहिलें आहे. २ नाना व तात्या = नाना फडनवीस व हरिपंत फडके. ३ रघुनाथरावांचे परशुरामभाऊ हे चुलते. ४ सर्व पटवर्धन सरदार.

कर्नाटकची मसलत करवून कजिया वाढवितात. यांत जीव काय ? ” असे भाव बोलण्यांत दाखविले आहेत. आपल्याविषयीं संशय नाहीं. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ५ मोहोरम सु॥ सीत समानीन. कार्तिक मास.

नं. २९२४. श्री. (कार्तिक व० १३–१४ नोव्हेंबर.)

पै॥ छ० १५ मोहरम. सन सीत समानीन. कार्तिक मास.

सेवेशीं विसाजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ० ११ मोहरमपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. तेथें आज्ञा जे, “ तीर्थस्वरूप मातुश्री लक्ष्मी वहिनीस समाधान नाहीं म्हणोन कळलें. त्याजवरून चिंता लागली आहे. तरी त्यांस पत्र लिहिलें आहे हें पावतें करून उत्तर पाठवणें. वरचेवर समाचार घेऊन डांकेसमागमें लेहून पाठवणें ” म्हणोन आज्ञा, त्यास पत्र पावतें करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. वहिनीस दहा बारा रोज ज्वर फारच आला. चार पांच रोज आरोग्य जाहलें. स्वामीस कळावें. राजश्री माधवराव फडके, राजश्री हरीपंत तात्यांचे चिरंजीव, यांची स्त्री प्रसूत होऊन दोन तीन महिने समाधान नव्हतें. ती कार्तिक शु॥ एकादशी शनिवारीं देवाज्ञा जाहली. तात्यांस सुतक आलें याजमुळें कूच सूतकनिवृत्ति होईपर्यंत राहिलें. राजश्री शिवाजीपंत म्हैसकर काल येथें आले. कांहीं खासगत कार्याकरितां आलों म्हणोन सांगितलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९२५. श्रीगणपति. (मार्गशीर्ष शु० ६–७ दिसेंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. हणमंतराव भोरे गोटखिंडीकर यांणीं सांगितलें कीं,

---

१ पत्र गंगाधरराव यांस मिरजेस.

" आपण हैदरखानाकडे चाकरीस गेलों होतों तेव्हां त्यांणा आपणाकडून बापू मान्या आंधळीकर यास जामीन घेऊन चाकरीस ठेविलें. पुढें सालगुदस्तां नरगुंदच्या स्वारीस सरकारची फौज तिकडे आली होती तेव्हां आम्ही श्रीमंत राजश्री रघुनाथरावदादा यांचें अभय घेऊन तिकडून शेंदोनशें असामी निघोन आलों असतां बापू मान्या याचा भाऊ गोसजी मान्या घरीं होता तो आमचे घरीं येऊन ' आपले भावास जामीनगतीबद्दल तगादा लागला आहे ' म्हणोन बोलोन रात्रीस आमचा घोडा चोरून नेला. त्यास आम्ही अभय घेऊन तिकडून आलों आहों. याकरितां घोडा माने याजकडून देविला पाहिजे. " म्हणोन. त्यास शेंदोनशें माणूस तिकडून आलें आहे त्याची वाट काय होईल त्याप्रमाणें हेही आपले तर्फेचा जाबसाल करितील. तरी हणमंतराव मोरे याचा घोडा मान्यास ताकीद करून देवावा. रा॥ छ० ६ सफर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ८ सफर. सन सीत समानीन. मार्गशीर्ष.

नं. २९२६. श्री.

पुण्याहून धोंडो बापूजी जोशी यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र मार्ग० व० ६ चें—

" पुण्यांत जिन्नस किराणा तूर्त महाग आहे. दाणे सवंग आहेत. हरभरे कैली ८॥ जाले आहेत. आणि बाजरी साडेपांच पावणेसहा प्रमाणें आहे. "

नं. २९२७.

धोंडो बापूजी जोशी यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र पौष शु० १ चें—

१ हें व मागच्या नंबरचें अशीं दोन्हीं पत्रें पुढच्या वर्षाचीं असून येथें चुकून लागलीं आहेत.

" पुण्यांत तूर्त दाणे हरभरे केली ८॥· बाजरी साडेपांच. जोरी सहा. गहूं पांच पायली. तांदूळ आंबेमोहोर चार पायली. कोंकणचे तांदूळ पांच पायली. तूप चांगलें सवा दोनशेर. राशी अडीच शेर. साखर राशी सवातीन शेर. चांगली तीन शेर. काशीची साखर पावणे-तीन शेर. याप्रमाणें भाव आहे. "

नं. २९२८. श्री. ( मार्ग० शु० ११–१२ दिसेंबर.)

पै॥ छ० ११ सफर. सन सीत समानीन प्रातः काल.

सेवेशीं विसाजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ० ९ सफरपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री नाना मार्गशीर्ष शुद्ध दशमी रविवारीं प्रातः कालीं तीन घटका दिवसास मुहूर्तें डेरेदाखल जाले. तैसेंच राजश्री हरिपंत तात्या वानवडीवर होते त्यांस मुहूर्त चांगला लागला नाहीं, यास्तव घरीं येऊन याच मुहूर्तें वानवडीवर गेले. तेथें एक मुक्काम आहे. नंतर कूच दरकूच जाणार. नानांचा चार पांच दिवस मुक्काम आहे. उपरांतीक कूच दरकूच जाणार. पंढरपुरचे सुमारें जाणार. नबाब छ० २३ मोहरमीं डेरे दाखल होऊन दहा पंधरा कोस अलीकडे आल्याचीं पत्रें आलीं. राजश्री मुधोजी भोंसले गायल-गडाहून निघाले. मजल दर मजल निघोन येतों म्हणोन त्यांचींहीं पत्रें आलीं. रास्ते यांचा व पठाणांचा कजिया जाल्यापासून रास्ते उभयतां कारभारी यांजवर रुसून होते. त्यास परवांचे दिवशीं श्रीमंत व उभयतां कारभारी जाऊन समजावीस जाली. रास्ते याणीं श्रीमंतांस पोशाख व जवाहीर शिरपेंच व कंठी चार पांच हजार रुपयांची दिल्ही व घोडी एक दिली. उभयतां कारभारी यांस पोशाख, याप्रमाणें दिलें. स्वामींस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९२९. श्रीगणपतिर्जयति. (मार्ग० शु० १२-१३ दिसें.)

पै॥ छ० १२ सफर. सन सीत समानीन. मार्गशीर्ष.

तीर्थस्वरूप राजश्री काका वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें चिंतामणीनें व विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० १० सफर भौमवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं छ० ५. सफरचें आशीर्वाद पत्र पाठविलें तें छ० ८ मिनहूस पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. 'खाशा पालखीची दांडी चांगली किंमतीस ठीक पडे अशी खरेदी करून पाठवावी' म्हणोन लिहिलें, त्यास आज्ञेप्रमाणें ठीक पडे अशी पाहून घेतों. राजश्री नाना फडणीस व राजश्री हरिपंततात्या शुद्ध दशमीस रविवारीं मुहूर्ते डेऱ्यास गेले. पुढें दरमजल जावें असें आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. २९३०. श्री. (१५ दिसेंबर.)

पै॥ छ० १३ सफर सन सीत समानीन. मार्गशीर्ष मास.

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस. प्रती सदाशिव विश्वनाथ व राघो विश्वनाथ नातू आशीर्वाद विनंती उपरी येथील क्षेम तागायत मार्गेश्वर शुद्ध चतोर्दशीपर्यंत समस्त सुखरूप असों. विशेष. आपण लग्नपत्र पाठविलें तें पावलें. "चिरंजीव राजश्री केशवराव यांच्या लग्नाचा निश्चय मार्गेश्वर वद्य सप्तमी युक्त अष्टमीचा केला आहे. शरीरसंबंध राजश्री हरीपंततात्यांसी केला." म्हणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. कार्यसिद्धि करावी. आम्ही समयास येतों कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. २९३१. श्रीगणराज.(मार्ग० व० ११-१६ दिसें.)

राजश्री नारो बाबाजी व वासुदेव सदाशिव स्वामी गोसावी यांस.

विनंती उपरी. बडेखान ढोपरे कुडचीकर यास मोहिदिन हाड्या याचे रुजवातीकरितां आणून कैदेंत ठेविलें होतें त्याची हल्लीं मोकळीक केली असे. तरी बाहेर जाऊं देणें. दरवाजास अलाहिदा परवानगीची चिठी आहे. छ० २४ सफर. सु॥ सव्वां समानीन मया व अल्लफ हे विनंती.

नं. २९३२. श्री. (१७ दिसेंबर.)

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११२ विश्वासवसुनाम संवत्सरे. मार्गशीर्ष बहुल द्वितीया मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपति स्वामी यांणीं राजमान्य राजश्री गंगाधरराव गोविंद यांस आज्ञा केली ऐसीजे, स्वामीचे सेवेशीं तुम्ही विनंतीपत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला. " राजश्री केशवराव व चिंतामणराव यांचे लग्नाचा निश्चय वद्य सप्तमीसह अष्टमीस केला आहे. शरीरसंबंध राजश्री हरि बल्लाळ यांची कन्या व नात वधू योजिल्या आहेत." म्हणोन विनंतीपत्रीं विनंती लिहिली ते विदित जाहली. ऐसियासीं योजिले सुमुहूर्तें कार्य सिद्धीस पावणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें.

मर्यादेयं विराजते.

बार, सुरु, सूद, बार, संमत, सूद, बार.

पै॥ छ० १८ सफर. सन सीत समानीन. मार्गशीर्ष मास. वद्य दशमी. बुधवार.

नं. २९३३. श्री. ( मार्ग० व० ५-१० दिसेंबर.)

यादी जबानी. चिकू व येलू कामाठी. पट्टणचें वर्तमान हैदरनाईक याचा पालक लेक अयाज बेग हा बदलोन टिपूच्या मुलूकांत

१ हें पत्र येथें चुकून एक वर्ष आधीं लागलें आहे.

दंगा करीत होता. त्याजवर गाजीखान बेद दोन हजार फौजेनिशीं रवाना केला. त्याचें याचें युद्ध जालें. गाजीखान याची फौज लुटून घेतली. जिवानिशीं पळोन आला. त्याजवर खासा स्वारी उभयतां भाऊ टिपू व करीमखान फौजसुद्धां गेले. अयाज बेग याची फौज लुटून घेतली. तो जिवानिशीं पळोन महमद अलीकडे गेला. उपरांत स्वारी पट्टणास आली. आज वीस रोज जाले. फिरंग्याचा व टिपूचा विघाड तूर्त नाहीं. मिराचा लेक थोरला शिऱ्यांत पांच सहा हजार फौजेनिशीं आहे.

छ० १७ सफर. सीत समानीन. मार्गशीर्ष मास. भौमवार.

नं. २९३४. श्रीगणपति. (मार्ग० व० ६–२१ डिसेंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव दादा यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. बातमीचीं पत्रें पाठविलीं आहेत. पाहून पुणियास चिरंजीवांकडे पाठवावीं. शाहापूरचे पत्राचें उत्तर कसें द्यावें, सरकारच्या फौजा कोणे ठिकाणीं आहेत, हें ल्याहावें म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशियास बातमीचीं पत्रें डांकेवरून चिरंजीवांकडे रवाना केलीं. शाहापुरचे पत्राचें उत्तर 'थोडया बहुतांस गडबडूं नये. दोन चार प्यादे आल्यास धरून ठेवावे ' याप्रमाणें लेहून द्यावें. राजश्री हरिपततात्या यांचा मुक्काम लोणीवर आहे; याउपर दरकूच महादेवावरून पंढरपुरचे रोखें येणार. राजश्री नाना यांचेंही कूच रविवारीं जालें. तेही जलदीनें क्षेत्रास येतील असें आहे. रवाना छ० १८ सफर. राजश्री नानाचें कूच

१ अर्काटकर. २ बळवंतराव कृष्ण मंगळवेढेकर यांस मिरजेस ठेवून गंगाधरराव पुतण्या व मुलगा यांच्या लग्नाकरितां पुण्यास गेले होते. या व पुढच्या एक दोन महिन्यांत बळवंतराव यांस आलेलीं पत्रें आहेत तीं मंगळवेढेकर यांस आलेलीं असें समजावें.

होऊन अमुक मुक्कामीं आले हें लिहिलें नाहीं. रविवारीं कूच जाहालें इतकें मात्र लिहिलें आहे. राजश्री हरिपंत तात्याचें कूच वानवडीहून जाहलें ते लोणीवर आले. पुढें आल्याचें पत्र आलें नाहीं. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १८ सफर. सीत समानीन. मार्गशीर्ष मास. बुधवार. अकरावा तास. रात्र.

नं. २९३५. श्रीगणराज. (मार्गशीर्ष व० १०—२६ दिसें.)

पै॥ छ० २७ सफर. शुक्रवार.

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा
वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरराव गोविंद. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २३ सफर इंदुवार दोन प्रहर दिवस. यथास्थित असे. विशेष. आपण छ० १८ व छ० १९ व छ० २० व छ० २१ अशीं चार पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बातमीचीं पत्रें आपण तासगांवास पाठविलीं तीं वडिलीं येथें पाठविलीं; त्यावरून सविस्तर मजकूर कळला. वरचेवर येईल तें वर्तमान कळवीत जावें. चौकी पाहाऱ्याचा बंदोबस्त आहे म्हणोन लिहिलें, उत्तम. वरचेवर सावध करीत जावें. लग्नें जाल्याचें कळवावें म्हणोन लिहिलें, त्यास चिरंजीव राजश्री दाजीचें लग्न भृगुवारीं रात्रौ जाल्यानंतर दुसरे दिवशीं पत्रें पाठविलीं आहेत. पावलींच असतील. शनवारीं रात्रौ दिवस चांगला होता. यास्तव घरभरणी ते दिवशीं आणिली. काल आवशीचे नऊ घटका रात्रीस साडे जाले. आज देवक उठवून चिरंजीव राजश्री आप्पाचे लग्नाचें सीमंतपूजन होऊन देवकप्रतिष्टा जाली. अकरा घटका रात्रौ लग्न होईल. लग्नसिद्धि

जाल्यावर उदईक पत्रें पाठवितों. चिरंजीव राजश्री दाजीस राजश्री हरीपंत तात्या यांची कन्या दिली. चिरंजीव राजश्री आप्पास राजश्री बाबांची[1] कन्या देणार. काल श्रीमंतानीं केळवणास बोलाविलें होतें. खाशी मंडळीसह भोजनास गेलों होतों. कळावें. राजश्री नानांचा मुक्काम बारामतीजवळ होता. पुढें दर मजल क्षेत्राकडे जाणार. लौकर यावयाचें करावें म्हणोन लिहिलें, त्यास येथील समारंभ श्रीमंतांस व इत्यादिकांच्या मेजवान्या आटपल्यानंतर निघोन येतों. तेरदाळकर कुलकर्णी याचे लेकीचें लग्न जाल्याचें लिहिलें तें कळलें. नागपूरकर भोसले राजश्री मन्याबा बापू येथें आहेत. त्यांची भेट सोयऱ्यांचे मंडपांत जाली. त्यांस आमंत्रण केलें. ते अहेरास आले होते. उभयतां चिरंजीवांस बादली सनगें व दोन शिरपेच दिले. ते कूच करून जाणार यास्तव आम्ही त्यांस बोलावून त्यांजबरोबर दहावीस मंडळी सुद्धां वस्त्रें दिलीं. खाशास शिरपेच एक दिला. कळावें. तीर्थस्वरूप राजश्री भास्करपंत आप्पा यांस पत्र लिहिलें आहे. प्रविष्ट करावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २९३६. श्री. ( २७ दिसेंबर. )

पै॥ छ० २७ सफर. शुक्रवार.

तीर्थस्वरूप राजश्री दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें जिवाजी रामचंद्र व दाजी त्रिंबक कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत मार्गशीर्ष वद्य ११ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं तीर्थस्वरूपांचे पत्रीं आशीर्वाद लिहिला तो पावोन परमानंद जाहला. ऐसेंच सदैव आशीर्वादपत्रीं सांभाळावें. श्रीमंत राजश्री केशवराव यांचें लग्न व॥[2] ७

---

१ हरिपंत फडक्यांचे पुत्र बाबा फडके यांची. २ अनुक्रमें जोशी व परचुरे.

भृगुवारीं आवसींचे बारा घटका रात्रीस जालें. साडे रविवारीं रात्रौ दहा घटकांत जाले. व श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपांचें लग्न काल दशमी इंदुवारीं आवसींचे बारा घटका रात्रीस जालें. कार्यें उत्तम प्रकारचीं श्रीकृपेंकरून जालीं. विदित होय. आपण जातेसमईं कांहीं कार्य सांगितलें होतें, त्यास राजश्री हरिपंत तात्या स्वारींत आहेत. वडिलांची[१] गांठ पडली नाहीं, मग कशास सूचना करावी ? लगामाविशीं लिहिलें त्याप्रमाणें लगाम घेऊन येत आहों. वरकड इकडील मजकूर सर्व वडिलानीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २९३७. श्री. ( २९ दिसेंबर. )

राजश्री नारोपंत नानासाहिबांचे सेवेशीं.

सकल गुणालं–करण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य.

सो॥ मानसिंग जमातदार ठाणें कसबे रहिमतपूर. दंडवत विनंती येथील कुशल जाणोन लेखन करीत जावें. विशेष. वाई देशांत सध्यां दरवडयांचा दंगा जाहला आहे. लिहितां पुरवत नाहीं. येथें पौष शुद्ध १ मंदवारीं मध्यान रात्रीस जकातदार यांजवर दरवडा आला. शंभर सवाशें माणूस होतें. त्यांचे घराजवळ येतांच आम्हांस चवकीवर वर्तमान कळतांच जमावानिशीं तयार होऊन ठाणें यांतील प्यादे सुद्धां जाऊन गांठ घातली. दरवडेकरी याणीं काढतें घेऊन पळों लागले. पाठलाग केला. सात आठ असामी चोर जखमी जाहले. आम्हाकडील गांवचा जमाव यापैकीं दोन असामी जखमी जाहले. आमचा नेट भारी हें जाणोन दरवडा उधळला. आपणास कळावें. सर्व यश मिळविणें धन्याचा पुण्यप्रताप. मी शेर अन्नाचा चाकर

---

१ गंगाधरराव गोविंद यांची व हरिपंतांची गांठ पडली नाहीं.

आहे. मागें साहेबकामावर आलों न आलों ध्यानांतच आहे. उर्जित करणें अगत्य आपणास. सरकारांतून दारूगोळी मजरा देत नाहींत. कालचे दंग्यास पांच सहा शेर दारू लागली. जुन्या असाम्या पंचेताळीस आहेत. पन्नास असाम्या करोन द्यावा. पांच असाम्या नव्या लागू केल्या पाहिजेत. येविसीं श्रीमंत राजश्री बाळासाहेबांस विनंती करोन करार करोन द्याव्या. इंग्रजाकडील पांच असाम्या चाकरीस रहावयाच्या आल्या आहेत. चांगले मर्द असाम्या आहेत. आज्ञा केल्यास सेवेशीं घेऊन येतों. सर्व आधार आपले चरणावर आहे. येविसीं राजश्री धोंडोपंत दादास लिहिलेंच आहे. या समयीं अनमान नसावा. विशेष काय ल्याहावें. सेवेशीं कळावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. २९३८. श्री. ( मार्ग० व० ३०–३१ दिसें.)

पै॥ छ० २ राबिलावल. सीत समानीन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवशीं.

पोष्य बाळंभट फणसळकर. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २८ सफर. मंदवार सायंकाळ पावेतों आपले कृपे करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. हुसेन प्यादा यासीं पेशजी पट्टणास बातमी करितां तेरदळकर कासार तेथें आहेत त्यांचे घरचा कागद देऊन पाठविला होता. पट्टणास जाऊन कासार मजकूर यास भेटोन तिकडील बातमी तोंडजबानी घेऊन आला. मिरजेस श्रीमंत राजश्री बाळासाहेबांजवळ जाऊन बातमी विदित केली. मागती तिकडे पाठवून बातमी आणवणेंविसीं आज्ञापत्र आलें होतें. मागती येथून छ० १ सफरीं रवाना केला तो

भृगुवारीं आवसींचे बारा घटका रात्रीस जालें. साडे रविवारीं रा
दहा घटकांत जाले. व श्रीमंत राजश्री चिंतामणराव आपांचें र
काल दशमी इंदुवारीं आवसींचे बारा घटका रात्रीस जालें. क
उत्तम प्रकारचीं श्रीकृपेंकरून जालीं. विदित होय. आपण जा
समई कांहीं कार्य सांगितलें होतें, त्यास राजश्री हरिपंत तात्या स
रींत आहेत. वडिलांची गांठ पडली नाहीं, मग कशास सूच
करावी ! लगामाविशीं लिहिलें त्याप्रमाणें लगाम घेऊन येत आह
वरकड इकडील मजकूर सर्व वडिलानीं लिहिला आहे त्यावरून विदि
होईल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २९३७. श्री. ( २९ दिसेंबर.

राजश्री नारोपंत नानासाहिबांचे सेवेशीं.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य.

स्ने॥ मानसिंग जमातदार ठाणें कसबे रहिमतपूर. दंडव
विनंती येथील कुशल जाणोन लेखन करीत जावें. विशेष. वाई देशां
सध्यां दरवडयांचा दंगा जाहला आहे. लिहितां पुरवत नाहीं. ये
पौष शुद्ध १ मंदवारीं मध्यान रात्रीस जकातदार यांजवर दरवडा आल
शंभर सवाशें माणूस होतें. त्यांचे घराजवळ येतांच आम्हांस चत्रकी
वर वर्तमान कळतांच जमावानिशीं तयार होऊन ठाणें यांतील प्या
सुद्धां जाऊन गांठ घातली. दरवडेकरी याणीं कादतें घेऊन पळ
लागले. पाठलाग केला. सात आठ असामी चोर जखमी जाहले
आम्हाकडील गांवचा जमाव यापैकीं दोन असामी जखमी जाहले
आमचा नेट भारी हें जाणोन दरवडा उधळला. आपणास कळावें
सर्व यश मिळविणें धन्याचा पुण्यप्रताप. मी शेर अन्नाचा चाक

१ गंगाधरराव गोविंद यांची व हरिपंतांची गांठ पडली नाहीं.

ाहे. मागें साहेबकामावर आलों न आलों ध्यानांतच आहे. उ-
ात करणें अगत्य आपणास. सरकारांतून दारूगोळी मजरा देत
ाहींत. कालचे दंग्यास पांच सहा शेर दारू लागली. जुन्या असाम्या
चेताळीस आहेत. पन्नास असाम्या करोन द्यावा. पांच असाम्या
ाया लागू केल्या पाहिजेत. येविसीं श्रीमंत राजश्री बाळासाहेबांस
नंती करोन करार करोन द्याव्या. इंग्रजाकडील पांच असाम्या
ाकरीस रहावयाच्या आल्या आहेत. चांगले मर्द असाम्या आहेत.
ाज्ञा केल्यास सेवेशीं घेऊन येतों. सर्व आधार आपले चरणावर
ाहे. येविसीं राजश्री धोंडोपंत दादास लिहिलेंच आहे. या समयीं
नमान नसावा. विशेष काय ल्याहावें. सेवेशीं कळावें. बहुत काय
िहिणें हे विज्ञापना.

नं. २९३८. श्री. ( मार्ग० व० ३०–३१ दिसें. )

पै॥ छ० २ राबिलावल. सीत समानीन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवशीं.

पोष्य बाळंभट फणसळकर. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती
ील कुशल तागायत छ० २८ सफर. मंदवार सायंकाळ पावेतों
पले कृपे करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. हुसेन प्यादा
र्सी पेशजीं पट्टणास बातमी करितां तेरदळकर कासार तेथें आहेत
ाचे घरचा कागद देऊन पाठविला होता. पट्टणास जाऊन
सार मजकूर यास भेटोन तिकडील बातमी तोंडजबानी
ऊन आला. मिरजेस श्रीमंत राजश्री बाळासाहेबांजवळ जाऊन
तमी विदित केली. मागती तिकडे पाठवून बातमी आणवणेंविसीं
ज्ञापत्र आलें होतें. मागती येथून छ० १ सफरीं रवाना केला तो

कालच छ० २७ सफरीं आला. ज्या कासाराकडे गेला होता तो कासार पट्टणाअलीकडे चार कोसांवर भेटला. त्याजवळ वर्तमान पुसोन माघारा आला. त्याचे सांगण्यांतील सारांश टिपू घाटाखालीं कालिकोटास आहे. इंग्रजाची व त्याची लढाई मातबर जाली. टिपूचा मोड जाहला म्हणोन बोलतात. तह रह अद्याप जाहला नाहीं. याप्रमाणें वर्तमान सांगतो. हुसेन मजकूर यासच सेवेशीं पाठविला आहे. मुक्तो विनंती करितां विदित होईल. कळावें बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा. श्रीमंत यजमानाकडील कागद पत्र आले असतील तरी सविस्तर लिहून कळवावें. कळावें हे विनंती.

नं. २९३९. श्री.

+स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११२ श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं राजश्री माधवराव नारायण प्रधान यांसीं आज्ञा केली ऐसी जे, सालमजकुरीं कर्नाटक प्रांतीं टिपूसुलतान याणीं देव ब्राह्मण प्रजेस उपद्रव बहुत केला आहे. त्यास त्यांजकडील वकील तुम्हांकडे आले आहेत त्यांस ताकीद करून ब्राह्मणांचीं कुटुंबें अटकेमध्यें आहेत त्यांस लौकर आणवावें. न ऐकिलें तर सालमजकुरीं शत्रूवर मोहीम करून शत्रु लयास नेऊन प्रजा संरक्षण करावी. सर्व प्रजेची सुटका जाहली तरी मग खंडणीचा जाबसाल. नाहीं तरी परिछिन्न पारिपत्य केलेंच पाहिजे. राजश्री भोंसले यांजकडे पत्र लिहून रवाना केलें. पंचवीस हजार फौजेनिशीं तेही येतील. तर याजउपर अंदेशा न धरितां स्वारीची तरतूद करून त्वरा करणें. शत्रूनें कांहीं हिंदुधर्म राखिला नाहीं. तिकडील बहुतेक ( संस्थानिक ) कैद करून पट्टणास

---

१ तोंडजबानी.

+ ही सातारच्या छत्रपतींच्या आज्ञापत्राची नक्कल इतकीच अपुरी सांपडली.

कैदेंत ठेविले. ऐसें दुर्घट कर्म आरंभिलें. तस्मात् नाश पावणार. समयीं त्या—

नं. २९४०. श्रीगणपति. (पौष शु० ९–२ जाने०.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव दादास आशीर्वाद. उपरी पुण्याहून चिरंजीवाकडील लखोटे आले ते पाठविले आहेत. मीही आतांच घराहून निघालों. चिरंजीव राजश्री पांडोबा बाबाच्या घरीं भोजन करून पुढें बेताप्रमाणें प्रहर दहा घटका रात्र पावेतों तेथें[1] जातों. चिरंजीव राजश्री बाबाही पुण्याहून निघून काल येथें आला. दिवस चांगला नव्हता यास्तव बाहेर राहिला; आज घरास आला. छ० ७ रबिलावल. प्रातःकाल हे आशीर्वाद.

पै॥ छ० ७ रबिलावल रविवार प्रातःकाल दोत तास दिवस.

नं. २९४१. श्री.

\+ याद. शागीर्द पेशा

| | |
|---|---|
| २७ जासूद. | ६ ढालाईत. |
| ३० खिजमतगार. | २ खासबारदार. |
| ३ दिवटे. | ३ जामदार. |
| २ अबदागिरे. | २ कामाठी. |



१ नाना फडनवीस वगैरे पंढरपुरास आहेत तेथें जातों असा भाव. स्थलनिर्देश न करितां 'तेथें' हा मोघम शब्द लिहिण्यांत भाऊंचा सावधपणा दिसून येतो. या खेपेस ते दोन प्रहरचें जेवण आटपून तासगांवाहून निघून आवशीच्या दहा घटका रात्रीस पंढरपुरास पोंचणार होते. त्यांबरोबर फौज नसून जुजबी शेंपन्नास स्वार असणार, पत्रांतली बातमी फुटल्यास दगा होण्याचें भय, याकरितां हा सावधपणा.

\+ ही व पुढच्या नंबरची याद याच सालच्या म्हणून येथें छापल्या असें नाहीं. कोठें तरी छापावयाच्या त्या येथें छापल्या आहेत. पहिलींत मिरजकरांचे सरदारीस शागीर्दपेशा किती लागत होता, हें सांगितलें आहे व दुसरींत ३२ स्वारांच्या नालबंदीचा हिशेब दाखविला आहे.

नं. २९४२. श्री.

आमचे मंडळीचे रु० १४२० स्वार ३२ वजा बट्टा दर रुपयास ८ प्रा। रुपये. २६६।

बाकी ———————————————— रुपये.

११९३॥।

वजा कारकुनी बत्तीस स्वारांस दर राउतीं रुपये ६ प्र॥। १९२ रुपये. पैकीं पेशजी वजा करून घेतले रु० ३२ हल्लीं (घेतले) १६०

बाकी ———————————————— रुपये.

९९३॥।

पैकीं पावले.

१०० घेतले.

३२ कित्ता. वि॥ बाळाजी वामन.

१३२

तूर्त पदरीं घालावे.

८६१॥।

नं. २९४३. श्रीगणपति. (पौष शु० ११–१० जाने०.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव दादा यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. 'येथून पत्रे चिरंजीव राजश्री आप्पा याजकडे पाठवितों, ते आपणाकडे रवाना करतील,' म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशियास वरचेवर वर्तमान कळवीत जाणें. आम्ही रविवारीं तासगांवीं चिरंजीव राजश्री पांडोबा

१ ही कारकुनीची रकम स्वतः सरदार, त्याचा मुजुमदार व फडणीस हे आपसांत वांटून घेत. ही त्यांची खासगी किफायत होती. २ पत्र पंढरपुराहून.

बाबा यांचे घरीं भोजन करून निघालों ते मध्यरात्रीस येथें आलों. राजश्री नाना यांची भेट जाली. त्यांचा मुक्काम गोपाळपुरानजीक आहे. राजश्री हरिपंततात्या यांचे लष्करचें कूच आम्ही यावयाचे पूर्वीच जालें होतें. आम्ही येतों असें कळल्यानंतर तात्या सडे राहिले. त्यांची भेट नाना यांचे डेऱ्यांत जाली. तात्या राजश्री चिंतापंत लिमये यांचे घरीं राहिले आहेत. रवाना छ० ९ रबिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १० रबिलावल. सीत समानीन. पौष मास. बुधवार. सहा तास रात्र.

नं. २९४४. श्रीगणराज. ( पौष वं० ३–१७ जान. )

पै॥ छ० १८ रबिलावल. गुरुवार. अकरातास दिवस.

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरराव गोविंद. साष्टांग नमस्कार विनंती ता॥ छ० १६ रबिलावल भौमवासर मुक्काम पंढरपुर यथास्थित असे. विशेष. आपण छ० १३ रबिलावलचीं दोन पत्रें पाठविलीं तीं काल पावलीं. छ० १४ रबिलावलचें पाठविलें तें आज प्रातःकालींच पावोन लिहिला मजकूर कळला. बातमीचीं पत्रें दुकित्ते पाठविलीं तीं वडिलांकडे आलीं, त्यांतील वर्तमानही सविस्तर कळलें. 'राजश्री कृष्णापा नाईक नरगुंदे व हरिभक्ती यांचा ऐवज वरातेप्रमाणें देविला;' म्हणोन लिहिलें, उत्तम आहे. 'तीर्थस्वरूप मातुश्री वहिनी येऊन पावल्यानंतर जास्ती शिबंदीचीं माणसें दूर करितों' म्हणोनं लिहिलें तें कळलें. तीर्थस्वरूप मातुश्री आज उद्यां येऊन पावतीलच.] इकडील वर्तमान

१ पत्र पंढरपुराहून मिरजेस.

तेर भोंसले काल येथें मुक्कामास आले. आज साऱ्या लष्करचें कूच भीमातीरानेंच पांच कोस जालें. आम्हीही समागमें जात आहों. अद्याप जाबसाल कांहींच ठरला नाहीं. मागाहून सविस्तर लिहोन पाठवितों. भीमाउत्तरतीरानेंच कूच जाहलें. नबाब यादगिरीचे सुमारें आले अशी बातमी आहे. राजश्री नानाची भेट काल राजश्री चिंतोपंताचे घरीं आम्ही सर्व भोजनास गेलों होतों, राजश्री तात्याही भोजनास आले होते,—तेथेंच त्यांची स्वारी श्रीदेवास आली तेथून तेथें आले. भोजनोत्तर बोलणेंही जाहलें. नंतर स्वारी पैल तीरीं मुक्कामीं गेली. तीर्थस्वरूपांचें त्यांचें बोलणें अद्यापि ठरलें नाहीं. नबाबाच्या भेटी वाघिणागिऱ्याचे सुमारें व्हाव्या असें आहे. मग कोठें होतात पहावें! माझी प्रकृत लिहिलीच आहे. आज उद्यां वडिलांस विनंती करतों. त्याणींही प्रकृत पाहिलीच आहे. आज्ञा जाहली म्हणजे क्षेत्रास येऊन देवास नैवेद्य करून येतों. अथवा पुढें निरोप जाहल्यास परस्परें येतों. आपणाकडून जासूद तेल घेऊन आला. तेल पावलें. दोना जासूद व प्यादा माघारी पाठविला आहे. पावेल. ती॥ मा॥ वहिनी कधीं आली हें ल्याहावें. बहुत काय लिहिणें लाभ करावा हे विनंती. तपोनिधि काशीदास बाबा बैरागी यांसीं जय गोपाळ. विनंती उपरी. आपली प्रकृत कशी आहे ल्याहावें. हे विनंती.

नं. २९४९. श्रीगणपति. (पौष व० ५–१९ जानेवारी.)

विज्ञापना. छ० १८ रबिलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. रामाजी भरमाजी व नरसो रामाजी यांचीं पत्रें पाठविलीं तीं व तीर्थस्वरूपांचा लाखोटा पाठविला आहे हें पाहून वडिलांकडे रवाना करणेविसीं लिहिलें त्याप्रमाणें रवाना केले. राजश्री गणेशपंत बेहरे

१ रामचंद्रपंत आपाचें तासगांवाहून पत्र मिरजेस.

येडूर मांजरीवरच आहेत म्हणोन लिहिलें, व राजश्री शहाजी भोंसले यांची फौज अक्कलकोटाकडे गेली, व राजश्री अमृतराव पेठे यांचें पथक पुण्यासीं गेलें, म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडून डांक उठली. कळावें. तीर्यरूप राजश्री भाऊंकडून कालचे दिवसांत पत्र आलें नाहीं. सेवेशीं कळावें. हे विज्ञापना.

नं. २९१६. श्री. ( पौष—जाने. )

यादी. लष्करपायमल्ली. मौजे रांजणी[1] कर्यात कवठेमहांकाळ.
सु॥ ११९५ (फसली.) सन सीत समानीन. मय्या व अल्लफ.

८ श्रीमंत राजश्री गणेशपंत बेहरे यांस खर्च.
१ भेटी.
७ स्वार वाडीचे रखवालीस आणिले होते त्यांस रुपये दिले

——

८

सरकार पागा पांडेगांवावर मुक्काम जाहला. सबब.

शेकोजी भोंसले याचे शेतांतील गव्हांची रास भरून नेली. कलम.

वाडीचे रानांतील कणसांसुद्धां शाळू झाडून न्हेला. कलम.

बापू होळकर यांस खर्च.

१९ गांवाजवळ स्वारी आली ते वेळेस.

२० पाटलाचे पुत्र धरून हिंगणगांवास घेऊन गेले तेव्हां रुपये दिल्हे.

---

१ प्रांत मिरज.

सटवाजी पोवार याची हरभेरेची रास भरून न्हेली. कलम. १

सुलतानजी पोवार याची हरभेरेची रास भरून न्हेली. कलम. १

याशिवाय बकरीं दिलीं. ६

महिपतराव कवडे यांचा मुक्काम जाहला तेव्हां कडबा व घोंगडीं झाडून रानांतील न्हेलीं.

याशिवाय रानांतील कडबा व गवत झाडून घेऊन गेले. व उसाचे फड दोन लुटून नेले.

नं. २९४७. श्रीगणराज. (पौष व० ८–२२ जानं.)

पै॥ छ० २४ रबिलावल. बुधवार. सात तास दिवस.

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरानें साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० २१ रबिलावल रविवार मु॥ तेलगांव परगणे मंदरूप भीमा उत्तर तीर येथें क्षेमरूप असों. विशेष. श्री पंढरीहून पत्रें डांकेवरून व जासुदाबराबर पाठविलीं आहेत, पावलींच असतील. भौमवारीं क्षेत्राहून कूच होऊन टाकळी पाटकुळेचे दरम्यान मुक्काम जाहला. दुसरे दिवशीं बुधवारीं तेथेंच मुक्काम जाहला. ते दिवशीं राजश्री हरिपंततात्या वडिलांचे डेरेस आले. बोलणें जाहलें. भोजनास

---

१ पत्र गंगाधरराव गोविंद यांचें लष्करांतून मिरजेस. याच तारखेचें आणखी एक पत्र त्यानीं मिरजेस लिहिलें आहे त्यांत घरगुती मजकूर सविस्तर लिहिला असल्यामुळें तें येथें छापलें नाहीं. 'नाना फडनवीस यांस तोंडलीं परवारीं या भाजा आवडतात, सबब सदरहू जिन्नस व कोंवळी कोथिंबीर व गुलाबाचीं फुलें मिळवून दररोज भोयांचे डाकेबरोबर नानांकडे लष्करास पोंचतीं करीत जावीं;' एवढा मात्र ह्यां पत्रांतला मजकूर वाचकांचें मनोरंजन करणारा आहे.

वडिलांच्या डेऱ्यास राहिले. चिरंजीव राजश्री दादा व आम्ही सर्व भोजनास वडिलांचे डेरेसच गेलों होतों. भोजनोत्तर सायंकाळपर्यंत तेथेंच होतों. आपण छ० १९ रोजचें पत्र डांकेवरून पाठविलें तें छ० १७ दिवशीं तेथेंच पावलें. सायंकाळीं राजश्री नाना राजश्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर यांचे डेरेस गेले. इकडून राजश्री तात्याही गेले. तेथून राजश्री नाना आपले डेरेस गेले. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब माझे डेरेस भोजनास राहिले. तों राजश्री तात्याही मागुती आले तेही फलाहारास राहिले. भोजनोत्तर बोलणें होऊन राजश्री तात्या गेले. तेथून गुरुवारीं कूच होऊन वाघोली परगणे मंद्रूप येथें सात कोस मुक्कामीं आलों. ते दिवशीं राजश्री नाना व तात्या आमचे डेरेस आले. घटकाभर बसले. विडा घेऊन गेले. मागून वडील दरबारास गेले होते. तेथून शुक्रवारीं कूच होऊन पांच कोस मुक्काम मजकुरीं आलों. तेच दिवशीं वडापुरानजीक पुढील लष्करचा मुक्काम होता तो कूच होऊन चार कोस तेथून पुढें गेले. काल मंदवारीं येथें मुक्काम जाहला. आज कूच होऊन धुळखेड टाकळीचे मुक्कामीं सहा कोसांचें कूच जाहलें. आजचे मजलीहून मला निरोप देवितों म्हणून वडिलांनीं[1] आज्ञा केली आहे. निरोप घेऊन निघालों म्हणजे सांडणीस्वार आपणाकडे पाठवितों. आज पुढील लष्कर व हें लष्कर एके जागां मिसळबंदीनें उतरणार. नबाब निजामन अल्लीखान अद्याप यादगिरीचे अलीकडे आलेची बातमी नाहीं. भागानगर सोडून वीस कोस आले आहेत. जवळ आले अशा लटक्या अफवा उठवितात ! पक्की बातमी अशी आहे. माझी प्रकृत लष्करचे राहण्यानें बिघडली आहे. अंग फारच दुखतें. स्नान करीत नाहीं. आज निरोप दिला म्हणजे येतों. वडिलांचे व कारभारी यांचे बोलणें

१ परशुरामभाऊंनीं.

ठरलें नाहीं. सविस्तर भेटीअंतीं कळेल. अलीकडे आपणाकडील पत्र छ० १५ तेरिखेचे अलीकडे आलें नाहीं. तीर्थस्वरूप मातुश्री वहिनी इंदुवारीं मिरजेस गेली, असें बाळाजी हरी सहस्त्रबुद्धे याणीं सांगितलेवरून कळलें. कधीं आली, काय वर्तमान, तें लिहिलेंच असेल. पत्रें पावतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २९४८. श्री. ( पौष व० १०–२४ जाने. )

श्रीमंत राजश्री बळवंतराव दादा स्वामीचे सेवेसीं.

पोष्य त्रिंबकराव आबाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील तागायत पौष वद्य दशमीपर्यंत मुक्काम अथणी सुखरूप जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. इकडे राजकी वर्तमान बाजारी वदंता कीं, टिपू समाप्त जाहला. पट्टणाकडून ब्राह्मण आले त्याणीं व तिकडून कोणी येतात ते सत्य म्हणोन सांगतात. आपणाकडे कांहीं बातमी आलीच असेल. वरकड अधिकोत्तर कांहीं लिहिणेंसें नाहीं. राजश्री शेषगीर नाईक यांस मिरजेस तांदूळखरेदीस पाठविले आहेत. ते बाजारांत तांदूळ खरेदी करून किल्यांत घेऊन येतील. त्यांस परवानगी दरवाजेवर आंत यावयाची दिली पाहिजे. विहिरीजवळील खोलींत ठेवतील. सेवेसीं श्रुत होय. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. २९४९. श्रीगणराज. (पौष व० १०–२५ जाने. )

पै॥ छ० २७ रबिलावल. मंदवार. दहा तास दिवस.

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें गंगाधरराव गोविंद. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० २४ रबिलावल बुधवार मुक्काम आकोली परगणे

---

१ टकले, व्याही मिरजकरांचे. २ पत्र लष्करांतून गंगाधरराव यांचें मिरजेस.

अक्कलकोट यथास्थित असे. विशेष. आपण छ० २० रबिलावलचीं पत्रें राघू खिजमतगार याजबरोबर पाठविलीं तीं कालच नजीक धुळखेड येथील मुक्कामीं पावोन लिहिला मजकूर कळला. बातमीचे पत्रांतील वर्तमानही सविस्तर कळलें. कुरुंदवाडचा लाखोटा पाठविला तो चिरंजीव राजश्री दादास प्रविष्ट केला. इमारतीचा मजकूर परवां राजश्री मोरो हरी याणीं लिहिल्यावरून कळला. इकडील वर्तमान तर अद्याप वडिलांचें बोलणें कारभारी यांसीं होऊन निश्चयात जाबसाऊ आला नाहीं. आज ठराव व्हावा असें आहे. मागाहून लिहोन पाठवितों. काल मुक्काम येथें जाला. आज कूच जालें. मणूर माशालचा मुक्काम नेमिला आहे. शेटी जासूद घरास गेला होता. हल्लीं तेथें आला आहे. त्यास ठेवून घेऊन त्याचा भाऊ कृष्णा तेथें आहे त्यास घरास जावयास निरोप द्यावा. बजाबा पुरंधरे यांस छ० १५ रबिलावलीं देवाज्ञा जाहली, अशीं पत्रें सरकारांत पुण्याहून आलीं. श्रीसत्ता प्रमाण ! मागाहून सविस्तर लिहितों. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. २९५०. श्रीगणपति. (पौष व० ११–२६ जाने.)

पै॥ छ० २५ रबिलावल. गुरुवार. नऊ तास दिवस.

अपत्यें रामचंद्रानें साष्टांग नमस्कार विज्ञापना. आज दोन चार दिवसांत शहापुराकडील बातमी येत नाहीं, तर लिहिलें पाहिजे. वडिलांचीं पत्रें काल आलीं. धुळखेडावर मुक्काम. ‘ नबाब येदगिरीचे सुमारे आले आहेत. भेटी कोणत्या जाग्यावर होणार याचा निश्चय नाहीं ’ म्हणोन लिहिलें आहे. यांजकडील बोलण्याचा प्रथम दिवस आहे. अद्याप निश्चय ठरला नाहीं. कळावें विदित होय हे विज्ञापना.

---

१ परशुरामभाऊंचें. २ पत्र तासगांवाहून मिरजेस. ३ लष्करांतन परशुरामभाऊंचीं.

नं. २९५१. श्रीगणराज. (पौष व० १४–२९ जाने.)

तीर्थस्वरूप राजश्री बळवंतराव दादा वडिलांचे सेवसीं.

अपत्यें गंगाधरराव गोविंद साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० २८ रबिलावल रविवासर मुकाम मढेहळ्ळी नजीक अलमेलें दोन कोस भीमा दक्षिणतीर. यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान आम्हास निरोप काल मंदवारीं प्रथम प्रहर रात्रीस नजीक अबजलपूर येथील मुकामाहून जाला. आज थोरलें लष्कर तेथून कूच होऊन आठ कोस सगर तालुकियांत गेलें. तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब व चिरंजीव राजश्री दादा लष्कराबरोबर गेले. अद्याप मसलतीविसींचें बोलणें ठरावांत आलें नाहीं. नबाब यादगिरीजवळ आले. थोरले लष्करास व यादगिरीस आजचे मजलीहून सात गांवें[1] आहे. नबाबाच्या व कारभारी यांच्या भेटी अतःपर लौकरच होतील असें दिसतें. उदईक इंदुवारीं ग्रहण आहे. भोजनोत्तर पांच चार कोस कूच होईल. विजापुराकडून दर मजल येत आहों. आम्ही आज दोन कोस मुकाम मजकुरास आलों. राजश्री बाळाजीपंत भिडे इकडे येणार होते. अद्याप निघाले नसल्यास मशारनिल्हेनीं येऊं नये. मंगळवेढयांच्या माणसाबरोबर छ० २४ रबिलावलचीं पत्रें पाठविलीं तीं आजच आवशीचे दोन घटका रात्रीस पावलीं. बातमीचीं पत्रेंही पावोन मजकूर सविस्तर कळला. "कामाठी पट्टणास बातमीकरितां पाठविला होता तो आला. त्याची जबानी लिहिल्यावरून तेंही वर्तमान कळलें. फिरोन बातमीस पाठवावा किंवा नाहीं" म्हणान लिहिलें, त्यास आम्ही तेथ आल्यावर रवाना करावयास येईल. गवताचा मजकूर लिहिला तो कळला. "वे॥ राजश्री मोरभट वाटवे याच्या वस्ता गेलेल्या सापडल्या. ब्राह्मण कर्डीकलाहून धरून आणि-

[1] सात गांवें म्हणजे २८ कोस.

त्याचें " लिहिलें तें कळलें. वस्ता सांपडल्या, उत्तम गोष्ट जाली. आपला लाखोटा तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेब यांजकडे रवाना केला. बातमीचीं पत्रेंही वडिलांकडे पाठविलीं. कळावें. आपण सावध आहेतच. मीही लौकरच येऊन पोंहचतों. सूतरस्वाराबरोबरही पत्रें पाठविलीं आहेत. चिरंजीव राजश्री आपास पत्र लिहिलें आहे. तासगांवास पाठवावें. माझी प्रकृत लष्करचे निभावणीची नाहीं. भोगास यत्न काय ? कारभारी याणींही व वडिलानीं निरोप देविला. अतःपर गुंता नाहीं; येत आहों. फौजा तों बहुत मिळाल्या आहेत; नबाब येणार. या जमावास शत्रूचे पारिपत्यास अगाध नाहीं ! श्रीसत्तेनें जें घडेल तें प्रमाण. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती. माघ शुद्ध पंचमी शुक्रवारीं आटपल्यास येतों; अथवा शनवारीं. त्यास कोणे समयीं यावें हे वे॥ राजश्री पुराणिकांस पुसोन सूतरस्वांराबरोबर लिहून पाठवावें. शनवारीं रात्रौ सप्तमी लागलेवर यावें किंवा काय सांगतात त्याहावें. हलके हलके येतों. लोभ करावा हे विनंती.

पैवस्ती छ० १ रबिलाखर. सन सीत समानीन. बुधवार. प्रातःकालचा प्रहर.

नं. २९९२. श्रीगणराज. ( माघ शु० ६–४ फेब्रुवारी. )

पै॥ छ० ४ रबिलाखर. मंदवार. दहा तास दिवस.

अपत्यें साष्टांग नमस्कार विनंती. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. बातमीचीं पत्रेंही पावोन भाव कळला. मुहूर्तीचें पत्रही

---

१ गंगाधरराव यांचें बळवंतराव मंगळवेढेकर यांस पत्र. लष्करांतून आपण खुद्द यजमान घरीं आलों, यास्तव किल्ल्याचे लोक बेफाम राहतील, रात्रीची वेळ, किल्ल्याचा बंदोबस्त राहिला नाहीं तर दगाफटका होण्याचें भय, याकरितां या पत्रांत गंगाधररावानीं सावधपणाविषयीं कशी ताकीद दिली आहे, ती वाचकांनीं ध्यानांत घेण्याजोगी आहे.

पावलें. राजश्री पुराणीकबावानीं लिहिल्या वेळेवर निघोन येत आहों. आपण बाहेर येऊं नये. चौकीचे लोक बारगीर वगैरे यानींही कोणी येऊं नये, आपलाले चौकीवर असावें; येविशीं ताकीद करावी. जिभी-पुढें व मध्यें सांकूवर[1] व दोन्ही दरवाजांजवळ हिलाल लावले असावे. स्वारी जिभींत आलेवर दरवाजे उघडावें. नित्यवत् कुलपें संध्याकाळीं पक्कीं व्हावीं. स्वारी आलेवर लिहिलेप्रमाणें उघडावीं. राजश्री नारो-पंत व वासुदेवपंत व आपाजी दामोदर सर्वांनीं दरवाजेंत असावें. वासुदेवपंतांनीं जिभीपुढें असावें. मोतीबा कदम यानीं पायउतारा गंडळीसुद्धां जिभीपुढें वासुदेवपंताजवळ असावें. स्वारी किल्लेंत येऊन दरवाजे पक्के जालेवर गोटास जावें. स्वारी किल्लेंत आलेवर पाठी-मागून उंटें ओझेचीं कार्याकारण येतील. चौक्यांवरून चांगली ताकीद करावी. आपलाले चौकीवर असावें. दरवाजेकडे येऊं नये. लोभ करावा. दहा नारळ पाठवावे. हे विनंती.

नं. २९५३. ( माघ शु० ८–६ फेब्रु. )

परशुरामभाऊंचें गंगाधररावास पत्र लष्करांतून मिरजेस छ० ६ रबिलाखरचें-मुक्काम बेळूर परगणे सगर भीमा दक्षिण तीर येथून.–

शत्रूनें सडच्याचें ठाणें घेतल्याचें लिहिलें तें कळलें. लष्करचा मुक्काम छ० १ रबिलाखरपासून काल पावेतों येथें होता. याचें कारण रा॥ हरिपंततात्या यांस उसण भरून फारच वाखा आहे. काहिली होत होती ती मात्र कालपासून राहिली. आज येथून कूच जालें. हरवाल तालुके सुरापूर येथें मुक्काम नेमिला आहे. नबाबाच्या भेटी तिगस्तां जाल्या त्याच ठिकाणीं होणार. रा॥ गणेशपंत बेहरे यांज-कडे पागा सात आठ व सरंजामी व शिलेदार मिळून पांच हजार

१ खंदकावरचा लाकडी पूल.

रवाना होणार. हरिपंततात्यानीं ग्रहणाचें स्नान केल्यापासून वायूची तिडीक पाठींत निघाली आहे, त्यानें फारच हैराण आहेत. अद्यापि कांहीं उपशम नाहीं. ”

नं. २९५४. (माघ शु० १३–११ फेब्रु.)

परशुरामभाऊंचें गंगाधररावांस पत्र छ० ११ रबिलाखरचें—

“ टिपू मेल्याची वार्ता येथेंही दाट आहे. पट्टणाहून सरकारचे वकिलाकडून हीच बातमी पक्की सरकारांत आली ! नबाबाची भेट माघ वद्य द्वितीयेस होणार. कित्तुराकडे होळकराची रवानगी करावी असें घाटत आहे. ”

नं. २९५५. (माघ व०—फेब्रु० दु० पंधरवडा.)

पंढरपुरास गेले. आम्हीही परभारें पुण्याहून पंढरपुरास गेलों. लष्करासमागमें × × × पर्यंत गेलों. तेथून आम्ही निरोप घेऊन माघ शु॥ षष्ठी मंदवारीं मिरजेस आलों. आमची सरंजामी फौज मिरजेनजीकच आहे. राजश्री गणेशपंत बेहरे सात आठ हजार फौजेनिशीं भोजेवर आहेत. टिपूची फौज कित्तुरानजीक आहे. कित्तूर घेऊन ठाणें घातलें. देसाई व बायका कारभारी कैदेंत लष्करांत ठेविले आहेत. सडेही घतलें. श्रीमंतांचीही फौज बहुतच मिळाली आहे. पेरोजाबादेंचे मुक्कामचीं पत्रें तीर्थस्वरूपांचीं आलीं होतीं. नबाबही फौजसुद्धां तिगस्तां भेटी जाहल्या त्या ठिकाणास आले. माघ वद्य द्वितीयेस भेटी होणार होत्या त्या जाहल्या असतील. भेटी होऊन टिपूवर मसलत होणार. टिपू मृत्यु पावला असेंही वर्तमान महिनाभर उठलें आहे........ सर्व मंडळी आजपावेतों........ तच होतीं.

---

१ हें पत्र गंगाधरराव याणीं दूर राहणाऱ्या कोणा निकटसंबंधीं मनुष्यास लिहिलेलें आहे. याचा हा दुसरा बंद मात्र मिळाला. २ परशुरामभाऊंचीं.

तीर्थस्वरूप मातुश्री काशीकाकींही काशीयात्रा संपादून पुण्यास आलीं. त्या सर्वांस मिरजेस आणावयासीं पाठविलें आहे. दो चहूं दिवशीं मिरजेस येतील. तीा राजश्री बळवंतराव दादा मिरजेंतच आहेत. त्यांचेंही पत्र तुम्हास आहे त्यावरून सविस्तर कळेल. कुरुंद-वाड तासगांव मिरजेंतील मंगळवेढ्याचीं सर्व सुखरूप आहेत. काशी-राव पंडित भिरडीकर पौषमासीं मृत्यु पावले. राजश्री कान्हो माणके-श्वर याचे चिरंजीव गिरमाजीही पौषमासीं मृत्यु पावले. ईश्वरसत्ता प्रमाण.

नं. २९५६. श्रीगणपति. (माघ शु० १४–१२ फे.)

पै॥ छ० १२ रा॥ खर. सन सीत समानीन. माघमास.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ पर्यंत सुखरूप असों. विशेष. वडिलीं लष्करचें वर्तमान लिहिलें त्याचप्रमाणें तीर्थरूपानीं मलाही लिहिलें होतें. कृष्णाबाईचे खेड्याचा मजकूर लिहिला, त्यास कृष्णाबाईचेंही पत्र मला येक होतें, व तीर्थ-रूपांस होतें तें वडीलांकडे पाठविलें. किचुरावर शत्रूचा मुकाम आहे म्हणोन लिहिलें, व शहापूरचें पत्र बजिन्नस पाठविलें तें पावलें. टिपूचें वर्तमान बोलतात हें खरें, पट्टणाहून माणसें आपणाकडे आलीं, म्हणोन लोक सांगतात. तर हें वर्तमान खरें किंवा खोटें तें लिहिलें पाहिजे. चिरंजीव बापूस बरें वाटत नाहीं म्हणोन अल्लीसाहेब यांसीं येथें आणिला होता. त्याणें 'विशेष नाहीं. रानघटवाईचा फेरा आहे. गुण करून देतों' म्हणून सांगून गुण करून देऊन गेला होता. त्यास गुण कांहींसा दिसतो. तर अल्लीसाहेब यासीं पाठवून द्यावा. तीर्थ-

१ रामचंद्र परशुराम यांचें पत्र तासगांवाहून मिरजेस गंगाधररावांस. २ शिंदे मनोळीकर. ३ धाकटा भाऊ गणपतराव परशुराम.

स्वरूप सौ॥ मातुश्री सावित्रीकाकू व ती॥ मातुश्री सखूआत्या येथें आहे तर त्यांस पाठवावयास तट्टू माणूस द्यावयासीं आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना.

नं. २९९७. श्रीगणपति. ( माघ शु० १५–१३ फे. )

पै॥ छ० १३ रा॥ खर. सन सीत समानीन. माघ मास.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १३ राखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. अल्लीसाहेबांस रवानगी करून दिलें आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. शाहापूरचें बातमीचें पत्र पाठविलें तें पावलें. अलीकडे दोन रोज लष्करचीं पत्रेंही आलीं नाहींत. आल्यावर सेवेशीं लिहितों. टिपूचें वर्तमान लोक इकडे अनेक प्रकारें खराच मेला ऐसें म्हणत आहेत. परंतु दिवस बहुत जाले याजमुळें प्रमाणांत येत नाहीं. तर वडिलीं तिकडे माणसें बातमीस पाठविलीं आहेत किंवा नाहीं तें लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २९९८. ( फाल्गुन व० २–१५ फे. )

रघुनाथराव नीलकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र लष्करांतून छ० १५ रबिलाखरचें—

" ती॥ रा॥ भाऊसाहेबांचा पुत्र विनूनाना निवर्तल्याचें लिहिलें तें कळलें. परम खेद जाला. होणारास उपाय नाहीं. "

---

१ रामचंद्र परशुराम यांचें पत्र तासगांवाहून मिरजेस. २ रघुनाथराव नीळकंठ यांचीं या स्वारींतील आणखी २०।२५ पत्रें आहेत, परंतु त्यांतील मजकूर आपाजी गोविंद वगैरेच्या पत्रांत आलाच आहे, सबब घेतलीं नाहींत.

नं. ९९५९. श्री. ( माघ वद्य १२-२६ फे. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री बाळाजीपंत दादा स्वामिचे सेवेशीं.

पोष्य रामाजी अनंत साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० २६ रबिलाखर तीन प्रहर दिवस पावेतों यथास्थित असे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री होळकर यांचे लष्करचा मुक्काम परवां बिदरीस होता. काल कोठें आले, आज मुक्काम किंवा कूच, हे ल्याहावें म्हणोन लिहिलें, त्यास परवां बिदरीस आलें. कालचा दिवस मुक्कामच होता. काल कांहीं चोरटे राऊत येऊन जमखेंडी परगण्यांत आलगूर कुंचनूर वगैरे खेडीयास लुटालूट केली. आज कूच करून शूर्पालीचे मुक्कामास येणार होते. परंतु अद्याप बातमी आली नाहीं. रास्ते यांकडील कारकून व श्रीमंत राजश्री यजमानांकडून कारकून त्यांचे लष्करास गेले आहेत. गलगल्यांजवळ कृष्णापार करून मुधोळ मुलखांतून वाट काढून यावी या योजनेंत आहेत. कोणते मार्गें जावयाचा ठर होतो हें पहावें. याप्रमाणें काल रात्रीस राजश्री भास्करपंत नाना यांचें पत्र आलें. थोरलें लष्कर मोगलांची भेट होऊन वांड्याचे मठास (?) आलें आहे. आज कूडलसंगमचा मुकाम. तेथें शिवरात्र झाल्यावर कृष्णापार होऊन होनगुंद प्रांतांतून पुढें जाणार. याप्रमाणें बातमी बागलकोटची आली आहे. कळावें. होळकरांची फौज वीस हजार व पेंढार दहा हजार व तोफखाना याप्रमाणें आहे. लष्करांत कैद नाहीं याप्रमाणें सांगतात. कळावें. आमचीं माणसें काल लष्करा[स] गेलीं आहेत. उदईक दोन प्रहर पावेतों येतील. आल्यावर सविस्तर लिहितों. कळावें.

१ फडणीस परगणे तेरदाळ.

बहुत काय लिहिणें लोभ करावा. श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांस पत्र लिहिलें आहे. मिरजेस प्रविष्ट करावें. कळावें. पत्र बातमीचें आहे. रातोरात मिरजेस पोंचतें करावें. कळावें हे विनंती.

नं. २९९०. श्री. ( माघ व० १३-२६ फे. )

पै॥ छ० २६ राखर. सन सीत समानीन. माघमास.

श्रीमंत राजश्री—बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० २६ राखर तीन प्रहर दिवस पावेतों यथास्थित असे विशेष. राजश्री होळकर यांचें लष्कर परवां बिदरीचे मुक्कामास आलें. राजश्री आपाजीपंत यांजकडे लष्करांत पत्रें पाठविलीं आहेत त्याचें उत्तर आलें नाहीं. जमखंडीहून राजश्री भास्करपंतनाना यांचें पत्र आलें तेंच बजिन्नस पाठविलें आहे, त्या-वरून विदित होईल. आज लष्कर कूच होऊन शूर्पालीस यावयाची आवई होती. परंतु अद्याप कूच जालेची बातमी आली नाहीं. आलि-यावर सेवेशीं लिहितों. राजश्री नारोमल्हार यास उदईक प्रातःकाळीं लष्करास पाठवून देतों. येईल बातमी ते वरच्यावर सेवेशीं लिहून पाठवितों. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २९९१. श्री. ( माघ व० १३–२६ फे. )

पै॥ छ० २६ रबिलाखर. सन सीत समानीन. माघमास.

सेवेशीं विज्ञापना. स्वामींनीं काल रात्रीं जासुदाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. होळकराकडे सूतर स्वार पाठविला होता तो आला. 'महमदापुरचे मुक्कामास आलों; पुढें कृष्णातीरानेंच येत

१ फडणीस तेरदाळकर यांचें पत्र मिरजेस. २ कोणा कारकुनाचें बाळासाहेबांस पत्र.

आहों; म्हणोन होळकरानीं लिहिलें होतें. व तेरदळकरांचें पत्र शूर्पालीस आले म्हणोन आलें. राजश्री आपाजी दामोदरही लष्करास जाऊन पावले असतील म्हणून लिहिलें तें कळलें. कृष्णातीरानेंच आल्यास प्रांताची बहुत खराबी होईल. राजश्री आपाजी दामोदर तेथें गेल्यानंतर कृष्णापार होऊन पलीकडून गेल्यास उत्तम आहे. घडेल तें प्रमाण. राजश्री धोंडोबा दादाची स्त्री प्रसूत जाहली होती त्यास काल देवाज्ञा जाहली म्हणोन लिहिलें तें कळलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९६२. श्री. ( माघ व० १३–२६ फेब्रु.)

पै॥ छ० ५ जमादिलावल. सन सीत समानीन. फाल्गुनमास.

सेवेशीं विसाजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ रबिलाखर मुक्काम नायकल नजीक येदगिरीपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तरी सविस्तर ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तरी नबाबाची भेट जाल्यापासून मुक्काम येथेंच आहे. मेनुदौले कारभारी यांचे येथें डेऱ्यास आले. याचीं त्यांचीं बोलणीं जालीं व उभयतां कारभारीही दोन वेळ नबाबाचे डेऱ्यास जाऊन बोलणीं होत आहेत. नबाबही एक वेळ यांचे डेऱ्यास येणार. ते आले म्हणजे येयून कूच होईल. फाल्गुन शु॥ द्वितीयेस कूच होणार. भोसले यांची भेट नबाबाचे डेऱ्यासच जाऊन जाली. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचें फौज ठेवावयाचें ठरत नाहीं. बोलणें होत आहे, परंतु अद्यापि कोणतेंही ठरावांत येत नाहीं. ' होळकर त्या प्रांतीं गेले;

१ पत्र लष्करांतून मिरजेस. २ खर्ड्याच्या स्वारींत प्रसिद्धीस आलेला कारभारी मशीरउल्मुल्क.

आतां सरंजामी फौज इकडे चाकरीस यावी; म्हणोन सरकारांत बोलणें निघालें होतें. मागाहून सरकारचीं व भाऊसाहेबांचीं पत्रें येतील.' सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९६३ श्रीगणपति. ( माघ व० ४–१७ फे.)

पै॥ छ० १७ राखर सनसीत समानीन उजाडतां रविवासर.

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १७ राखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. लष्कराहून राजश्री नानाकडून रा॥ जिवाजी गोपाळ घांटाखालीं ज्ञावथास निघोन आले. आज बाहेर मोकाम करून राहिले आहेत. टिपूकडील कोकण-बंदरींची मसलत सांगितली असें लोकांजवळ सांगतात. अद्याप त्यांची आमची गांठ पडली नाहीं. रा॥ भृगुवासर प्रथम प्रहररात्र आवशीची. बहुत काय लिहिणें, विदित होय हे विज्ञापना.

नं. २९६४. श्रीगणपति. ( माघ व० ४–१७ फेब्रु.)

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १७ राखरपर्यंत सुखरूप असों. विशेष. वडिलीं लष्करांतून पत्रें तीर्थरूपांचीं आलेलीं पाठविलीं तीं पावलीं. त्यांत तीर्थस्वरूप मातुश्री सखू आत्याचा लाखोटा एक होता तो माघारा पाठविला आहे. वडिलीं टिपूचें वर्तमान तहकीकच म्हणोन लिहिलें. सेवेशीं कळावें. चिरंजीव बापूस समाधान जालें. विस्तारें वर्तमान तीर्थस्वरूप मातुश्री आत्याबाईस पुसावें म्हणजे सांगतील. तीर्थस्वरूप मातुश्री काशीकाकी

१ टिपूच्या दंग्यामुळें तुम्हीं आपलें पथक मिरजेनजीक ठेवून घेतलें आहे तें. २ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. ३ सांप्रतचा कारवार जिल्हा. ४ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस पत्र. ५ टिपू मेल्याचें वर्तमान खरें असें परशुरामभाऊनीं लष्करांतून लिहिलें.

महायात्रा करून पुण्यास आल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. उत्तम जालें. सडेकरांनीं सडे मागती माघारे घेतलें म्हणोन लिहिलें, त्यास पक्की बातमी आणवावी. बहुत काय लिहिणें विदित होय हे विज्ञापना.

नं. २९६५. श्रीगणपति. ( चैत्र श० ८-६ एप्रिल.)

पै॥ छ० ६ जाखर सन सीत समानीन. मास चैत्र.

अपत्यें रामचंद्रानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ६ जाखर पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. तीर्थरूपांकडील लाखोटा पाठविला तो पावला. आपले पत्रीं ' कपिलासंगम दक्षिणतीर येथून कूच होऊन बदामीचे सुमारें जाणार म्हणोन ( परशुरामभाऊनीं ) लिहिलें होतें, म्हणोन लिहिलें तें कळलें. होळकरांचे लष्करचें वर्तमान लिहिलें तें कळलें. कुंडलेस तोफखान्याचे बैलांचा उपद्रव फार होतो म्हणोन आज्ञा, त्यास बैल कांहीं अम्हाकडील नव्हते. वडिलीं कोणाचे आहेत त्याचा शोध करवावा. गरनाळ मिरजेत आहे ती स्वारींत जाणार त्याचे बैल असतील. वडिलीं शोध करवावा. आपल्या तालुक्यांतून लाऊन द्यावे. दारू उडाली म्हणोन लिहिलें, त्यास अग्निसंपर्क नसतां एकाएकींच असें कसें जालें? वीस माणसें जायां जालीं त्याजपैकीं कांहीं मरतील किंवा खेर आहेत तें लिहिलें पाहिजे. वड्डांचा मजकूर मागोन लिहितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. २९६६. श्री. ( फाल्गुन शु० ९-८ मार्च. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. सन सीत समानीन. फाल्गुन मास.

सेवेसीं विसोजी नारायण. साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ यत छ० ७ जमादिलावलपर्यंत यथास्थित असे.. विशेष. स्वामींनीं

---

१ रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ पटवर्धनांचा वकील वाडदेकर यांचें दरबारांतून मिरजेस पत्र बाळासाहेबांस.

छ० २७ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तरी सालगुदस्तां जेथें मुक्काम जाला होता त्याच ठिकाणीं नायकलावर मुक्काम जाला आहे. आजच वीस रोज येथें आलियास जाले. माशाचा उपद्रव बहुत. भोजनसमयीं जखमी बहुत होतात! नबाबाची भेट जाल्यापासून मसलतीचीं बोलणीं होत आहेत. शेवटीं नानांचें बोलणें पडलें जे, "आम्ही पुणियास जातों. तात्या व नबाबानीं पुढें जावें." त्यास नबाबांचें म्हणणें, "तुम्ही जातां तेव्हां आम्हीही जातों! आज चाळीस वर्षे त्यांच आमचा बिघाड नाहीं, तो तुम्हामुळें करणें प्राप्त जाला. तुम्ही जातां त्याअर्थीं आमचें (राहण्याचें) कारण काय? आम्हीही माघारे जातों." या मनसब्यास इतके दिवस लागले. शेवटीं मनसबा बुडतो, लौकिक वाईट होतो; यास्तव नानांनीं रहावयाची मसलत केली. उदईक येथून कूच होऊन कृष्णातीरास जाणार. पलीकडील मुलूक सुटेल त्यापैकीं निमे निमेप्रमाणें अलीकडील पलीकडील झाडून वांटून घ्यावा, याप्रमाणें करार यांचा व नबाबाचा ठरला. भाऊसाहेबांकडील जाबसाल अद्यापि कांहीं ठरत नाहीं. नबाबाची आणि आमच्या वरकड सरदारांची भेट जाली नाहीं. नाना व तात्या मात्र भेटले. त्याप्रमाणेंच भोसले त्यांचे डेऱ्यास जाऊन भेटले. नबाब एक वेळ सरकारचे डेऱ्यास आले ते समयीं पोशाख व जवाहीर, शिरपेच, कंठी, कलगी दिल्ही. दहा हजार रुपयांचें जवाहीर दिलें. टिपू जिवंत आहे ऐश

१ हैमूरसरकारचा. २ पण जिंकलेल्या मुलखाच्या सहा वांटण्या करून दोन निजाम अल्लीस, दोन पेशव्यांस, आणि एक एक शिंदे होळकर यांस याप्रमाणें देण्यांत याव्या असें ठरल्याचें डफ् साहेब लिहितात तें खरें असेल तर मराठ्यांचा हिस्सा जास्त होतो. ३ भाऊनीं मोहिमेकरितां नवी फौज चाकरीस ठेवावी कीं न ठेवावी यासंबंधें. ४ नबाबाचे. ५ जवाहीर फार थोडें दिसतें. मग लिहिणाराचीच कांहीं चूक असल्यास न कळे.

बातम्या अदवानीकडून येतात व मुकुंद जोशीही जिवंत आहे ह्मणोन सांगतात. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० २९६७. श्री. ( फाल्गुन शु० १४-१३ मार्च. )

पे॥ छ० १३ जमादिलावल. सन सीत समानीन. फाल्गुन मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० १२ जमादिलावल ईदुवार पावेतों स्वामीचें कृपेकरून सेवकाचें यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री तुकोजीबावा होळकर सुभेदार यांची स्वारी फौजसुद्धां आली. मुक्काम भंडवाडावर जाला. रखवालीकरितां राजश्री धोंडो नरसिंह व रामाजी नाईक मोरबेच्या तळावर जाऊन स्वार घेऊन दर गांवास ठेविले. पेंढारी व लुटारू कईने स्वारांचे न आईकतां गांव अगदीं लुटले. पेंवें काढून नेलीं. कांहीं गांवांस आग लाविली. वडरहटी येथील एक दोन बाइका नासल्या. फार अनाहूत केलें. रयतांचीं गुरें नेलीं. पेंवें काढलीं. थाळा, तांब्या सर्व लुटलें. गांवचें माणुस सांपडलें ह्मणजे धरून मारहाण करून पेंवें दाखवून घेऊन काढलीं. परगण्यांत बाकी ठेविली नाहीं. भंडवाड परगणे कंकणवाडी येथें तीन रोज मुक्काम! हुकेरी प्रांतांतून गणेशपंत आले त्याणीं आणखी लुटलें! मुक्काम कल्होळावर खासा डेरा होता तेथें खासे असतां ( गांव ) लुटले! लष्करांत अगदीं कैद नाहीं. सरकारची फौज, रखवालीस स्वार आले ह्मणजे चिंता नाहीं, या विश्वासावर रयता मुलेंमाणसें, गुरेंढोरेंसुद्धां होत्या त्यांची गत या प्रकारची! रखवालीस स्वार होते त्यांचीं हत्यारें वगैरे गेलीं त्यांचा तगादा! कल्होळावरून कूच

१ पत्र गोकाकेहून. २ बेहरे. ३ आमचीं हत्यारें लुटलीं गेलीं तीं भरून द्या ह्मणून!

करून नदीवर उदगट्टें, मळेवाकी, चिकडोली येथें मुक्काम नदीवर जाला. पूर्णिमा प्रतिपदा होळी करून कूच करणार. तीन चार मुकामे परगण्यांत नदीवर, तेव्हां कांहीं राहिलें नाहीं व रहात नाहीं! कोणूर नांदगाव घुरधाल मुर्तनाल गांव व सुणधोली आरबावी ममदापूर या गांवीं दहा दहा स्वार ठेऊन हा काल पावेतों राखलें. रानांतील बेरण व हंगामाचे दिवस. खळ्यांतील दाणे दुगे नेले! पिकें ओलींच कापून नेलीं! गांव जाळले नाहींत, परंतु तीन मुक्कामें, तेव्हां तेही रहात नाहींत! पेठेच्या रखवालीस पन्नास स्वार व गाडदी प्यादे पांच सातशें घेऊन करीत आहों. याप्रमाणें गोकाक परगण्याची अवस्था जाली. शत्रूकडील वर्तमान कितुरावरील बुणगें मुगदच्या तळावर लाऊन देऊन सडी फौज होती ती छ० ९ जमादिलावलीं रामनहाळ परगणे मिश्रिकोटें येथें वोढ्यावर उतरले. धारवाडांत हजार बार ठेविले. वरकड झाडून प्रांतांतील बार व स्वार नेले. धारवाडच्या पेठेंतील कडबे दाणे वगैरे जिन्नस होता तो किल्लयांत घातला. वरकड ठाणीं बेटगिरें येकोडी अमीनबाव मारडगी रिकामीं! कितूरचीं ठाणीं वण्णूर देसनूर सुद्धां रिकामीं! कितुरांत कानडे प्यादे तीनशें आहेत ते भांडावयाचे नाहींत. पैसाभर दारू खर्च न होतां ठाणीं पडतात. वण्णुरांत राजश्री गणेशपंत बेहरे याणीं ठाणें घातलें. सरकारची फौज शत्रूचे फौजेची दहशत खातात! वारीपार जात नाहींत. बुणगें गोकाकेचे नदीवर ठेवून सडी स्वारी जाणार याप्रमाणें मसलत. आतां शत्रु मिश्रिकोटास गेला. बुणगे ठेवतात किंवा नेतात पहावें. होईल वर्तमान तें मागाहून सेवेशीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. डाकें पाठविलीं आहेत. घेऊन पावल्याचें उत्तर द्यावयास आज्ञा करावी. हे विज्ञापना.

नं. २९६८. श्री. ( फाल्गुन शु० १४–१३ मार्च. )

पै॥ छ० १५ जमादिलावल. सनसीत समानीन. फाल्गुन मास

विज्ञापना. रघुनाथराव गद्रे देवाज्ञा पुण्यांत जाले. थोरली स्त्री समागमें गेली; धाकटी स्त्री अकरा वर्षांची आहे. पहिले स्त्रीचा मूल आहे तो स्वामीस ठाऊकच आहे. केशवभट साठे पंडित होते ते व हरीपंत नातू तुळसीबागचे फडणीस देवाज्ञा जाले. हे विज्ञापना.

नं. २९६९. श्रीगणपति. ( फाल्गुन व० १–१५ मार्च. )

अपत्यें रामचंद्रानें शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १४जमादिलावलपर्यंत वडिलांचे आशीर्वादें क्षेम असों. विशेष. वडिलीं हुणशाळ परगणे गोकाक येथील मुकामास होळकर व बेहरे सुद्धां गेले ह्मणून लिहिलें, व शत्रूचे फौजेचें वर्तमान लिहिल्याप्रमाणें कळलें. त्यास होळकर व बेहरे यांच्या वर्दळीमुळें प॥ गोकाक व प॥ यादवाड दोन्ही परगणे खराब जाले. चिकोडी तो पहिली जाली होती. हल्लीं हेही दोन्ही जाले! ईश्वर सत्ता प्रमाण! 'वडिलांकडे पत्रें पाठवावयाचीं असतील तीं पाठवणें. रवाना करूं' म्हणून लिहिलें, त्यास पत्रें आजच रवाना केलीं. सेवेशीं कळावें. नबाब सुद्धां कपाटसंगमावर फौजा आल्या, अशी बाजारी अवाई आहे. सेवेशीं कळावें. शत्रूची फौज कांहीं कलघटगीकडे गेली, बाकी मुगदाचे तळावर जी आहे ती सडी आहे, याप्रमाणें वर्तमान आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

१ पत्र विसाजीपंत वाडदेकर यांचें लष्करांतून. पुण्यांतल्या बातम्या लष्करांत कळल्या त्या त्यानें मिरजेस लिहून पाठविल्या. २ सदरहु पंडितांचें नांव नं. २५१९ मध्यें आलें आहे तें पहा. ३ पत्र रामचंद्र परशुराम यांचें तासगांवाहून मिरजेस बाळासाहेबांस. ४ लष्करास भाऊंकडे.

नं. २९७०. श्री. ( चैत्र शुं० १३–३ एप्रिल. )
शके १७०६ इ. स. १७८४.

सेवेशीं विनंती बाहिरो पांडुरंग. सा॥ नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागाईत छ० १२ जमादिलावल मुक्काम म्हैसाळ येथें स्वामीचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री विठ्ठलराव यांचा व्रतबंध चैत्र वद्य ५ पंचमीचा आहे त्यास यावयाविशीं आज्ञा, त्याप्रमाणें लग्नसमयीं येऊन पोचतों. आपण पुणियास गेलां होतां, कारखाना तासगांवीं होता तेथें मजलाही रहावयाविशीं आज्ञा होती. तों राजश्री विसाजीपंत बिनीवाले यांजकडील पाछापूर परगणेचीं ठाणीं बदलून होतीं. त्याजनिमित्य सरकार सनद आली कीं तोफा घेऊन काटकानीं ठाणीं बळकाविलीं आहेत त्यांचें पारिपत्य करून सरकारचीं ठाणीं बैसवावीं. त्याजवरून छ० २० जमादिलावलीं कारखाना व गाड्दी घेऊन गेलों आणि पुणियाहून राजश्री खंडेराव त्रिंबक वोढेकर यांचें पथक तोफांबरोबर नेमणूक होती ते अगोदरच एक महिना पांचशें स्वार येडूर मांजरीवर मुक्काम करून दक्षिणतीरास राहिले होते. मग मजल दरमजल पाछापुरास गेला. छ० ३० रबिलाखरीं येंदळगुडास तोफा लावून हल्ला करून ठाणें कापून काढिलें. त्या धास्तीमुळें वरकड गांव बेबदल होते आणि काटकाई करून राहिले होते ते पळाले. मग ठाणीं बैसलीं. छ० ३ जमादिलावलीं चिकलदनीस गेलों. तोफा लागू केल्या. त्यानें गोळे लागू चांगले जाहले. गोळागोळीनें त्याजकडील चार माणसें ठार जालीं, व आह्मांकडीलही तीन चार जखमी जाले. गोळे फार लागू जाले. दुसरे दिवशीं हल्ला करून ठाणें घेतील हे धास्तीमुळें रात्रीं पळोन मलनाईक बेरड गेला. मग दुसरे

१ मेहंदळे यांचें हें गंगाधररा पत्र. हें मागेंच छापावयाचें तें चुकून राहिलें, सबब येथें छापलें.

दिवशीं चिकलदिर्नीचें ठाणें अगदीं झाडून पाडिलें. एक बुरूज मात्र ठेविला. मग निरोप घेऊन आलों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९७१. श्रीगणपति. ( चैत्र व० १-१४ एप्रिल. )

+चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. पहिले नबाबाच्या भेटीस गेलों होतों हा मजकूर लिहिलाच होता. त्याजवर दुसऱ्यानें नबाबानीं रा॥ नानांकडे सांगून पाठविलें जे, फिरोन रा॥ हरीपंत व परशुराम पाडत यांचा भट जाहली पाहिजे. त्याजवरून त्यांचे डेऱ्यास जावयासीं निघालों. त्यांचे लष्कराजवळ गेलों तों ' नबाब निजावयासीं गेले. आतां गांठ पडावयाची नाहीं. ' म्हणून वकिलानीं सांगून पाठविलें ! त्याजवरून माघारे आलों. फिरोन नबाबाचे निरोप आले तेव्हां राजश्री नानानीं सांगून पाठविलें जे, ते[1] रुसले आहेत. ज्ञाबसाल वकील बोलतच आहे. त्याजवर मैनुद्दौला परवांचे दिवशीं राजश्री हरिपंततात्यांचे डेऱ्यास आले. आम्हांकडे येतात म्हणून सांगून पाठविलें. सर्व साहित्य त्यांशीं देण्याचीं वस्त्रें जवाहीर आदिकरून रा॥ हरिपंततात्या घेऊन आले. सहा घटका रात्रीस आले. दोन घटका बसले होते. एक घोडा आम्ही दिल्हा. वरकड सरकारचा सरंजाम आला होता त्याप्रमाणें नेगा व शिरपेंच दिला. त्यांचे चिरंजीव समागमें होते त्यांस शिरपेंच वस्त्रें दिलीं. दहा घटका रात्रीस गेले. त्याजवर काल आम्ही व रा॥ तात्या मिळोन नबाबाचे डेऱ्यास गेलों. त्यांचें आमचें बोलणें बहुत जाहलें. त्यांतील हांशील—"जर छावणीस बाळाजी पंडित राहतात तर आम्ही राहतों;

---

+ लष्करांतून परशुरामभाऊंचें पत्र मिरजेस.

१ हरिपंत व परशुरामभाऊ. २ बोलणें करावयाला आमचे वकील आहेतच. सरदारच यायला कशाला हवेत ? असा भाव.

ते राहत नाहींत तर आम्ही राहत नाहीं. छावणी किंवा जाणें हें आधीं ठरवावें त्यासारखी चाल धरूं. चार संस्थानिकांकडील राजकारणें येतात तीं विना छावणी जाल्यावांचून साधत नाहींत. त्यांस वचन द्यावें तर मसलतीचा ठराव नाहीं. आम्ही काय करितों हें आमचें आम्हांस न समजे. तेव्हां दुसऱ्यास काय सांगावें ? दोनही लष्करांत माघारे जातात हीच बोलवा, तेव्हां कोणास खरें वाटत नाहीं. हें चांगलें नाहीं. बदामीस बसावें म्हणतां, त्यास बदामी घेऊन टाकून जावें ? फौज छावणीस ठेवावी तर शत्रु जबरदस्त. ते फौज आजच बुडाली म्हणून ठेवावी हेंही ठीक नाहीं. तर छावणीचा ठराव कीं माघारे जाणार याचा ठराव व्हावा. मग कोणत्याही कामास लागावें. येविशींचीं बहुत प्रकारचीं बोलणीं जाहलीं. अद्यापि ठराव जाला नाहीं. आज पांच कोसांचें कूच आहे. दोन चार दिवसांत ठराव होऊन ठरेल तें मागाहून लिहितों. कांहीं नबाबाकडील फौज व रा॥ बाजीपंत जोशी असे मिळोन कनकगिरीस रवाना केले. तेथें सावकार वगैरे आहेत ते धरावे, पैका घ्यावा, परंतु तें साधत नाहीं. संस्थानिक पळून गेले. फिरोन बोली लागली आहे. ठरेल तें मागाहून लिहितों. टिपू पट्टणाहून निघून दोन चार मजली अलीकडे आला. पन्नास साठ हजार पायदळ व पंधरा सोळा हजार फौज व दोनशें तोफा येणेंप्रमाणें सरंजाम आहे म्हणतात. परंतु कोणतीही तहकीक बातमी नाहीं. सरंजामी यांची रवानगी केलीच असेल. नसल्यास लौकर करावी. बदामी येथून चार कोस आहे. रवाना छ० १४ जमादिलाखर लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. २९७२. श्री. ( चैत्र व० ७–२० एप्रिल. )

पै॥ छ० २१ जमादिलाखर. सन सीत समानीन. चैत्रमास.

सेवेशीं गोविंद सखदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २० जमादिलाखर गुरुवार मुक्कामनजीक कवदलगी परगणे यादवाड स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० १८ मिनहूचें पत्र पाठविलें तें काल अस्तमानीं मुक्काम मजकुरीं पावलें. मनोळी व तोरगल तालुकियाचीं ठाणीं बसवावयाची यादी श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडून आलेली पाठविली ती पावली. सविस्तर कळलें. " ठाणीं बसतील तीं राजश्री सदाशिव कृष्ण याजकडील कारकून येतील त्यांचे स्वाधीन करावीं " म्हणोन आज्ञा, उत्तम. ठाणीं येतील तीं मशारनिल्हेकडील कारकून आलेवरी त्यांचे स्वाधीन करूं. आजी येयून कूच करून पुढें सतीगिऱ्याचे समीप जावें, त्यास काल मुक्काममजकुरास आल्यापासून पर्जन्य प्रारंभ जाहला तो चार प्रहर रात्र पर्यंत पडला. याजकरितां आजी येथें मुक्काम जाहला. पर्जन्यानें लष्करची फार तारंबळा जाहाली. पागेतील घोडीयांचीं तमाम सामानें भिजलीं. वैरण तों कोठें मिळत नाहीं. होळकराचे लष्करचे कहीनें झाडून वैरणी नेल्या. वैरणी विकत देखील मिळत नाहींत. याप्रमाणें वर्तमान आहे. ' भले लोक नेमणुकीचे राहिले त्यांस ताकीद केली आहे. येऊन पोंहचतील ' म्हणोन आज्ञा, याउपरी येतील. आलेवरी सेवशीं लिहून पाठवूं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. बाळासाहेबांनीं गोविंद सखदेव यास बरोबर पागा देऊन मनोळी व तोर्गल तालुक्यांतलीं ठाणीं घेण्याकरितां पाठविलें होतें व होळकर त्या प्रांतीं आले होते त्यांस हीं ठाणीं घेऊन देण्याविषयीं लिहिलें होतें. २ मनोळीकर. यांचे वंशज सांप्रत तासगांवास रहातात.

नं. २९७३. श्री. ( चैत्र व० ७—२० एप्रिल. )

पै॥ छ० २१ जमादिलाखर. सन सीत समानीन.

पु॥ सेवेशीं विज्ञापना. मनोळी वगैरे मातबर ठाणीं घ्यावयासीं परभारें पत्रें होळकर यांस श्रीमंतांचीं गेलीं आहेत, ते घेऊन देतील; ह्मणोन आज्ञा, उत्तम. होळकराकडील वर्तमान—येथें बाजारी वर्तमान आहे—कित्तुरास देशकाकडील प्यादे जमाव होऊन मोर्चे दिल्हे होते व होळकराकडील सडी फौज तलाव्यास गेली होती. त्यास शत्रूकडील जमाव येऊन कित्तुरांत कुमक पोंहचली याजमुळें होळकराकडील फौज माघारीं गोटास आली. तळावरील फौजेंत आवाई फार. असें असतां होळकर मातबर ठाणीं घेऊन देतील हें समजलेंच आहे! तूर्त त्यांजकडील फौज व तोफा आमच्या मतदीस येणें दिसत नाहीं. तोरगलकरानीं तमाम ठाण्यांत प्यादे घालून बंदोबस्त केला आहे. आह्मांसमागमें फौज किती आहे ती स्वामीस विदितच आहे! त्यांचा बंदोबस्त असतां आम्ही खेड्यावर जाऊन भ्रम जाईल! राजश्री सदाशिवपंत याजकडील कारकून येथें आले असते, कांहीं प्यादे जमा करते, तरी लहान ठाणीं बसतीं. तोही प्रकार नाहीं. याप्रकारचें वर्तमान आहे. यमाजी शिंदे कवठेंकर यांचे कांहीं स्वार व कारकून काल आले. खासा आले नाहींत. याप्रमाणें वर्तमान. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९७४. श्री. ( चैत्र व० ८—२१ एप्रिल. )

पै॥ छ० २१ जा॥खर. सन सीत समानीन. चैत्र मास.

राजश्री गंगाधरराव. गोसावी यांस.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ तुकोजी होळकर. दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल

---

१ मागच्या नंबरचें पत्र गोविंद सखदेव याचें आहे त्याचीच ही पुरवणी. २ कित्तूरच्या देसायाचें. ३ शत्रूचें भय. ४ तोर्गलकरांचा.

लिहीत जावें. विशेष. मायणीहून दारू व शिस लष्करांत आणविलें होतें त्याचे छकडे भरून राजश्री अमृतराव होनकर्दे व शेकजी पटाईत उभयतां मिरजेपावेतों आले आहेत. पुढें मुलूख उजाड, बिगार मिळणार नाहीं, यास्तव छकडे सरंजामसुद्धां मिरजेस ठेववून उभयतांतून एकजणास लष्करांत बोलाविलें आहे. त्याप्रमाणें ते येतील. येथून उंट पाठवून तो सरंजाम आणविला जाईल. तोंपर्यंत मिरजेस दारू वगैरे सरंजाम ठेवावयास निवाऱ्याची जागा देवावी. चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त करवावा. रवाना छ० जा॥खर सुर्मा-सीत समानीन मय्या अल्लफ. बहुत काय लिहिणें हे विनंती.

श्री
म्हाळसाकांतचरणीं
तत्पर मल्हारजी सुत
तुकोजी होळ.

मोर्तब
सुद[1]

नं. २९७५. ( चैत्र व० ११–२४ एप्रिल. )

परशुरामभाऊंचें गोविंदपंत मामा सखदेव यांस पत्र छ० २४ जमादिलाखरचें—

"ठाणीं घ्यावयाची यादी मिरजेहून आली. त्यास इतक्या फौजेनें ठाणीं यावयाचीं नाहींत. त्यास काय आज्ञा," म्हणून लिहिलें, त्यास तुम्ही सतीगिरेचे मुक्कामीं यावें म्हणजे ठाणीं घ्यावयाचा मजकूर लिहून पाठवूं. नबाब पटदकलचे मुक्कामाहून कूच करून माघारे कमतीच्या मुकामास गेले. त्यांजकडे रा॥ नाना व हरिपंततात्या गेले आहेत. अद्यापि कांहीं ठराव झाला नाहीं. नाना व

---

१ येथें पत्र फाटल्यामुळें तारीख उमगत नाहीं. पत्रांत 'हे विनंती' या अक्षरावर मोर्तब आहे. आम्हीं निराळें घातलें आहे.

ताल्या परत आल्यावर ठाणीं घ्यावयाजोगा सरंजाम रवाना करावयास येईल. नबाब तर गेले. त्यांस राजश्री नानांनीं काल निरोप दिला. आज नाना नबाबाचे घरीं निरोपास गेले. उदईक माघारे येतील. नबाबाकडील तहवारजंग दहा हजार फौजेनिशीं राहणार. गाडद दहा पंधरा हजार व पंचवीस तोफा मोगलांकडील राहणार."

नं. २९७६. श्री. (वैशाख शु० ३–१ मे.)

पै॥ छ० ६ रज्जब. सन सीत समानीन.

राजश्री नारोपंत दाजी दामले स्वामींचे सेवेशीं.

पोष्य पांडुरंग कृष्ण गोडबोले साष्टांग नमस्कार विनंती. अक्षय्य-तृतीयेस मोर्चेबंदी जाहली. मोगल फौजा ठेवून आपण भागानगरास गेला. पांच चार दिवसांत बदामी घ्यावी ऐसेंच दिसतें. फार दिवसगत लागत नाहीं. (नवे) लोक (चाकरीस) ठेवितात. नित्यानित्य नवे लोक. आम्ही चार दिवस नवेच ठेवून पाहिले. तुम्ही लोकांविशीं कोणी गृहस्थाविशीं निरविलें होत. या समयीं असते तर दोन चारशें लोक लागते. पुढ ठाणीं सुटत जातात. लोक पाहिजेत. ऐसा प्रसंग आहे. कळावें बहुत काय लिहिणें. वरकड मोर्चेबंदीचा मजकूर श्रीमंतांचे पत्रीं लिहिला आहे. कळों येईल. बहुत काय लिहिणें. रवाना छ० २ रज्जब. प्रातःकाळ हे विनंती.

नं. २९७७. (वैशाख शु० १०–७ मे.)

निळकंठ आप्पाजी पोंक्षे यांचें बाळासाहेबांस पत्र छ० ८ रज्जबचें. बदामीहून मिरजेस[1]—

"बाजीपंत अण्णास फौजसुद्धां येण्याविशीं पत्रें सरकारचीं गेलीं आहेत. केंचनगुडचें ठाणें त्यांणीं हल्ला करून घेतलें. ठाण्यांत शत्रूकडील चार अधिकारी होते ते धरून कैद केले आहेत."

---

१ पत्र बदामीहून मिरजेस.

नं. २९७८. (वैशाख शु० १२–९ मे.)

रामाजी भरमाजी निसबत धोंडो अनंत याजकडून शहापुराहून पत्र गंगाधररावांस आलेलें. छ० १० रज्जबचें.

" होळकर व बेहरे यांचा मुक्काम कोरविकोप वकुंदावर आहे. तेथून ते संगोलीस येणार आहेत. रास्त्यांचें पथक बेहरे यांजपाशीं होतें तें बदामीस गेलें. कित्तुरांत अमित्राचा जमाव तीन हजार बार आहेत. ठाण्याची उस्तवारी करितात. दारूगोळी वगैरे सामानाचे हजार बैल पट्टणाहून भरून आले आहेत. "

नं. २९७९. (वैशाख शु० १२–९ मे.)

निळकंठ आप्पाजी पोंक्षे यांचें बाळासाहेबांस पत्र छ० १० रज्जबचें बदामीहून मिरजेस—

" किल्यांतील दोघे जमातदार पळून आले त्याणीं सांगितलें कीं, आतील पांच तोफा बाहेरील गोळ्यानीं जायां जाल्या. तथापि लढण्याची हिंमत किल्लेकऱ्यांची आहे. मोर्चे शहरपन्न्यास सात आठशें हाताच्या अंतरानें आहेत. सारंयांचे मोर्च्यांपेक्षां श्रीमंत भाऊसाहेब यांचा मोर्चा पुढें आहे. सामानाची तरतूद चांगली आपण स्वतः जाऊन पहात असतात. वैशाख शु॥ त्रयोदशीस हल्ला करावयाचा निश्चय घाटतो. शिड्या वगैरे तयारी जाली आहे. "

नं. २९८०. श्री. (वैशाख व० ५–१८ मे.)

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामींचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी भरमाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १९ रज्जबपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. " राजश्री गिरमाजी जिवाजी याजसमागमें

---

१ पत्र शहापुराहून.

दोडवाडचें पत्र राजश्री गणेशपंत यांस पाठविलें आहे. कारकून व प्यादे देऊन लष्करास पाठवून देणें. ठाणें बसलियाचें वर्तमान लिहिणें " विशीं आज्ञा, आज्ञेप्रमाणें मशारनिल्हेसमागमें कारकून व तीस प्यादे तूर्त देऊन लष्करास पाठविले आहेत. होळकर व बेहरे यांचा मुक्काम वकुंद प्रांत कित्तूर येथें होता. तेथून रविवारीं कूच करून वटनहाळ प्रांत मनोळी येथें जाऊन उतरले आहेत. लष्करास कारकून गेला आहे त्याचें पत्र आज तिसरे प्रहरीं आतांच आलें. त्याणीं लिहिलें आहे कीं, राजश्री गणेशपंतदादा सडे स्वारीस मोरबे-पर्यंत भौमवारीं काल गेले आहेत. गिरमाजीपंतानीं भेटून पत्रें दिलीं परंतु जाबसाल जाहाला नाहीं. सडे स्वारीसमागमें मोरबेपर्यंत गेले आहेत. ठाणें स्वाधीन करितात कीं नाहीं (हें) उत्तर आलें म्हणजे सेवेशीं लिहून पाठवितों. होळकर वटनहाळावरच आहेत. धारवाडास व कित्तुरास शत्रूचीं ठाणीं आहेत तेव्हां दोडवाडचें ठाणें स्वाधीन झाल्यावर लोक तूर्त भारी ठेविले पाहिजेत. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितों. शत्रूकडील कित्तुरास दोन तीन हजार बार आहेत. वरकड हल्याळ सांबराणी मिश्रीकोटें येथें उतरले आहेत. बेंदावीकडील वर्तमान ल्याहावयास आज्ञा करावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९८१. (वैशाख व० ८–२१ मे.)

नीलकंठ आप्पाजी पोंक्षे यांचें बाळासाहेबांस पत्र छ० २२ रज्जबचें बदामीहून मिरजेस—

" श्रीमंत राजश्री नाना माघारे जावयाची योजना करूं लागले. सर्वांचे विचारें किल्ला फत्ते जाल्याशिवाय जाऊं नये. तरी त्याणीं जावयाचा आग्रह अतिशय केला. दोन तीन दिवस हाच घोळ पडला. त्याजवरून यजमान स्वामी याणीं श्रीमंत राजश्री आप्पासाहेब

---

१ बेहरे. २ बदामीकडील. ३ हा परशुरामभाऊंचा कारकून. ४ परशुरामभाऊ.

यांस, मुहूर्तेकरून बाहेर मुक्काम करून रहावें, तूर्त येण्याचें करूं नये' असें सांडणी स्वारासमागमें ( तासगांवास ) पत्र रवाना केलें. उपरांतिक किल्ल्यास हल्ला करावा असा ठराव जाहला. शिडया वगैरे तरतूद पहिल्यापासूनच करावयास लाविलें होतें. छ० २१ रज्जबीं मंदवारीं अरूणोदयास हल्ला जाहली. किल्ल्याचे पश्चिमेस एक बातेरी होती त्या सुमारें व शहरपन्ह्याचे दरवाजामध्यें व रेवणीजवळ दारवेचे बुधले किल्लेकऱ्यानीं पुरले होते. हल्ला येतांच बत्ती दिली. त्यांत लोक फार ठार जाले. अद्यापि कोणकोणाचें ठिकाण लागत नाहीं. अजमासें शेंदीडशें माणूस मेलें. खेरीज जखमी दोन अडीचशें. जेर जखमी शेंपन्नास आहे. शहरपन्ह्याचा दरवाजा यजमान स्वामीकडील लोकांनीं अगोदर घेतला. यजमान स्वामी पाठोपाठ होते. गांवांत किल्याचे खडप्यालागत आणखी एक वाडा होता त्यासही हल्ला याच हिरिरींत चढली. यजमान स्वामी अस्तमानपर्यंत गांवच्या दरवाजांत उपवासी बसले होते. अस्तमानीं माघारे आले. रणमंडळचें व किल्याचें बोलणें लागलें आहे जे, 'जिवानिशीं हत्यार सुद्धां पार करून द्यावें; त्यास भोसले यांस दरम्यान द्यावें.' असें बोलणें येतांच सरकारच्या तोफा बंद जाल्या. परंतु वरील लोक अद्यापि उतरले नाहींत. यजमान स्वामींनीं हरीपंतांस सांगून पाठविलें जे, ही गोष्ट पसंत नाहीं. तोफा लागू कराव्या. आंतील लोक आपोआप बाहेर पडतात! उतरावावयाचे असल्यास लौकर उतरावें; नसल्यास कस्त करावी. परंतु 'बरें, बरें,' म्हणतात! कालच्याच दिवसांत गुंता उरकावयाचा, परंतु बोलण्यामुळें विलंब लागला आहे. "किल्यांत गुलाम हैदर मुख्य आहे त्यानें नरगुंदकरांची मध्यस्थी करून फसविलें. त्यास धरावें. सोडूं नये. आणखी कारणीक मनुष्य असेल तें देखील. बाकीचीं सोडावीं." असें यजमान स्वामीचें म्हणणें आहे.

त्यास उभयतां कारभारी यांचें म्हणणें जे, " वचन गुंतलें आहे पार करून देण्याविशीं; त्यास कसें करावें ? " असा मजकूर आहे. डौल पाहतां लोकही आज जरूर उतरतील. वर पाणी नाहीं, यास्तव आंतील लोकांचा दम नाहीं. गांवांत गुळें फार भरलें होतें. लूट माफ केली. किल्याचे लढाऊ व गांवांतील लोक मनस्वी मारिले. बायकाही थोड्या बहुत मेल्या. तशींच लहान लहान मुलेंही मेलीं. कांहीं मनुष्य सरकारांतून पाहऱ्यांत दिले आहेत. वळख पाहून सुटका होत्ये. बनशंकरीच्या वस्ता गांवांत पुरल्या होत्या त्या पुजारी याणें दाखविल्या. सरकारांत आणून ठेविल्या आहेत. आणखी चवकशी करावयाकरितां पुजारी अटकेंत ठेविले आहेत. गांवांत ब्राह्मण समुदाय फार होता तितकाही बाहेर आला. सरकारांतून झाडून पोटास दिलें."

नं. २९८२. ( वैशाख व० १०—२३ मे. )

गोविंद सखदेव यांचें बाळासाहेबांस पत्र बदामीहून मिरजेस—

" गांवांतील दरवाजापुढील मार्गावर खंदकाबाहेर बातेरींत गांवकरानीं दारवेचे बुधले पुरले होते. हल्ला जवळ जातांच दारवेस बत्ती दिली. बुधले उडाले ते समयीं श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजकडील शिलेदार मंडळी व रोहिले लोक व ब्राह्मण मिळून शंभरपर्यंत माणूस ठार झालें. हुजरातीकडीलही लोक उठले होते. तिकडेही बुधलें पुरले होते, परंतु तिकडे साठ माणूस उडालें. फार खराबी जाली नाहीं. एकंदर भोसल्यांकडील व हुजरातीकडील व नबाबाकडील व भाऊसाहेबांकडील मिळून आठशेंपर्यंत माणूस ठार झालें !

१ नाना व हरीपंत. २ सारें लुटून घेतल्या संवरल्यावर उदारपणा केला तो काय, म्हणे लुटलेल्या ब्राह्मणांस एकदां सारभाताचें जेवण घालून छावणीच्या हद्दीबाहेर ' सुरक्षित ' पोंचतें करून दिलें ! पहा पहा हा ब्राह्मणी राज्यकारभाराचा पक्षपात !!!

गांवांतील माणूस हल्याचे समयीं चार पांचशेंपर्यंत मारिलें. पेठेस खंदक भालाभर खोल. रेवणी बांधीव चुन्याची, दरजगी रुंदी वीस पंचवीस हात पर्यंत, भिंताड मजबूत, याजप्रमाणें जागा फार अवघड. परंतु श्रीमंतांचे प्रतापें साध्य जाली. "

नं. २९८३. ( वैशाख व० १०-२३ मे. )

निळकंठ आप्पाजी पोंक्षे याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० २४ रज्जबचें बदामीहून—

" रणमंडळ व बालेकिल्ला येथील लोक परवां उतरले ते शहरपन्ह्यांत कोंडून ठेविले होते. काल झाडा घेऊन बाहेर मैदानांत हत्यारसुद्धां पाहऱ्यांत दिले आहेत. गुलाम हैदर किल्लेदार व कुमदान व आणखी कारणीक मनुष्यें वेगळींच ठेविलीं आहेत. पार करून द्यावयाचा करार. काय ठरतें पहावें. श्रीमंत राजश्री नाना परवां अगर प्रतिपदेस माघारे निघून जाणार. यजमानं स्वामीही येणार. "

नं. २९८४. ( वैशाख व० १३-२५ मे. )

निळकंठ आप्पाजी पोंक्षे याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० २६ रज्जबचें बदामीहून—

" श्रीमंत राजश्री नाना यांणीं काल प्रहर रात्रीस यजमान स्वामीस बोलावणें पाठविलें होतें. त्यास ' कपाळ दुखत, येणें होत नाहीं, ' म्हणून सांगून पाठविलें; त्याजवरून नाना व तात्या मध्यरात्र जाल्यानंतर यजमान स्वामीकडे डेऱ्यास आले. सा चार घटका बसून बोलणें जालें. " नानानीं आज चौदा घटका दिवसानंतर निघून

---

१ परशुरामभाऊ. २ परशुरामभाऊंस.

केरूरच्या मुक्कामास जाऊन रहावें, यजमान स्वामींनीं प्रतिपदेस निघावें," असें ठरून माघारे गेले. नाना व तात्या व यजमान-स्वामी छ० २३ रज्जबीं किल्ला पहावयास गेले होते. भोंसले यांज-कडील वकील बळवंतराव याचे कारकून तानकोपंत[1] सरकारांत जाब-सालास येत होते. ते स्वारींसभागमें किल्यांत आले होते. तोफेचा बार सोडावयास परवानगी जाहली. त्यास तोफ सुटते असें तानको-पंतास कळलें नाहीं. ते व बाबूराव केशव एका बाजूस उभे होते. ते अलीकडे येऊं लागले हें फिरंग्यानीं[2] पाहिलें नाहीं. बत्ती दिली. तानकोपंतास बार लागून तत्क्षणींच ठार जाले. बाबूराव केशव किंचित अंतऱ्यानें मागें होते ते खैर आहेत. शत्रूची फौज वडदरूंजीस आल्याची बातमी काल चोहींकडून आली आहे. अनेगुंदी व कनक-गिरी संस्यानिक यानीं मुलेंमाणसें गुळ्यांस लावून दिलीं. कनकगिरी अगदीं ओस. गजेंद्रगडांतील ( शत्रूचे ) कांहीं प्यादे पळाले अशी बातमी आहे.

नं. २९८९. ( ज्येष्ठ शु० ४-३१ मे. )

*निळकंठराव गोविंद खासगीवाले यांचें पत्र मिरजेस. पै॥ छ० ३ साबानचें. नानाफडनवीस यांच्या स्वारींतून.—

"आपण येथून निघून गेल्यानंतर मनसबा जाला कीं, मेणवलीस न जातां आजपासून पांचवे दिवशीं पुण्यास जावें. तेव्हां

---

१ हे पेशवाईतले एक प्रसिद्ध मुत्सद्दी असून पुणें दरबाराकडून वकिलातीच्या वगैरे नाजूक कामावर यांची योजना कित्येकदां झालेली आहे. यांचें उपनांव ठाकूर व रहाण्याचें गांव लिंब नजीक सातारा. ज्यांनीं कोल्हापुरांत कात्यायनाचा नळ आणिला ते हेच गृहस्थ होत. यांनीं आणखीही कांहीं धर्मकृत्यें केलेलीं आहेत. लिंबास यांचा वाडा अद्यापि आहे. २ युरोपियन गोलंदाजानीं. ३ तुंगभद्रेपलीकडे.

* बदामी फत्ते झाल्यावर नानाफडणीस मिरजेवरून पुण्यास गेले त्या वेळचें हें पत्र नानांच्या स्वारींतला कोणी कारकून मिरजेस आला होता त्यास लिहिलेलें आहे.

एक दिवस येथें लागतो तो लावूं नये. आजच बुधवारीं सायंकाळीं कुरुंदवाडास जावें. रात्रीं तेथें भोजन करून लष्करांत रहावयासीं मागती यावें. उदईक गुरुवारीं लष्कर तासगांवास लावून देऊन आपण पहांटेस भोजनास मिरजेस यावें. मिरजेची मेजवानी उरकोन सायंकाळीं तासगांवास रहावयास जावें. तेथून लांब मजली करून पुण्यास जावें." ( याप्रमाणें नानांचा बेत ठरला आहे. ) आम्ही भोजन करून लौकरच आपणापाशीं येतों. हें पत्र पावतांच कुरुंदवाडास जावें. तेथून राजश्री नानाबरोबर लष्करांत यावें. यादीप्रमाणें आवशीस रात्रीस गृहस्थांस आमंत्रण करून जेवावयास मिरजेस यावें. मिरजेची तरतूद ब्राह्मणसमुदाय शिवाय करून दोनशें मराठे जेऊं घालावयाचे. पांचशें शागीर्दपेशाचे माणसांस डाळभाकरी करवाव्या."

नं. २९८६. ( ज्येष्ठ शु० १२–८ जून. )

नीळकंठ आप्पाजी पोंक्षे यांचें बाळासाहेबांस पत्र छ० ११ साबानचें गजेंद्रगडाहून मिरजेस.

" गजेंद्रगडच्या पश्चिमेस दोन कोसांच्या तफावतीनें लष्करचा मुक्काम आला. दुसरे दिवशीं कांहीं पूर्वेस किल्ला डावा टाकून गेली होती. समागमें पांढरे वगैरे पथकें होती. शत्रूकडील कानडे प्यादे तीनशें गजेंद्रगडच्या कुमकेस येत होते. इतक्यांत किल्यापासून दोन कोसांवर शीदबनच्या ओढ्यावर उजाडलें, सबब ओढ्यांत दबून राहिले. हें वर्तमान इकडील लोकांस कळतांच प्याद्यांस गांठलें. हत्यारें घेऊन प्यादे सोडिले. कांहीं मारिले. प्याद्यांच्या सांगण्यांत खर्चाबद्दल आठ माणसांजवळ होनांच्या गांठोड्या होत्या त्यांस गजेंद्रगडास पोंचवावें म्हणोन प्यादे बरोबर दिले होते. तेव्हां श्रीमंत राजश्री दादा साहेब यांणीं ऐवजाच्या चवकशीकरितां कांहीं स्वार व कारकून

ओढ्यावर पाठविले होते. परंतु ठिकाण लागलें नाहीं. पांढरे यांस एवज सांपडला असें बहुतांच्या बोलण्यांत आहे. पांढरे कांहीं थांग लागों देत नाहींत. दुसरे दिवशीं ही कांहीं कानडे प्यादे असेच किल्याच्या कुमकेस येत होते ते मारले गेले. किल्यावर रजबखान म्हणून मुख्य आहे त्यानें तीन गृहस्थ विश्वासू संधानास घोरपडे यांचे विद्यमानें पाठविले आहेत. बोलण्यांत निखालसता चांगली दिसती. श्रीमंत राजश्री दादासाहेब यांची मध्यस्थांची भेट करविली. बोलणें ठरून त्यांतील एक गृहस्थ मागती बोलून येतों म्हणून किल्यावर गेला आहे. मध्यरात्रीस यावें असा करार आहे. हें संधान आल्यामुळें गजेंद्रगडानजीक साऱ्या लष्करचा मुक्काम जाला आहे. साधल्यास साधून पुढें सडे स्वारीस जावें असा बेत आहे. किल्लेदारास अबरूनें पार करून द्यावें अशी खातरजमा दाद्रा यांणीं करून बेलभंडार दिला. मध्यस्थास साडे पांच हजार होन एकेरी व शंभर होनांचा गांव इनाम द्यावा असा करार घोरपडे यांणीं केला आहे."

नं. २९८७. श्रीगणराज. ( ज्येष्ठ शु॥ १२–८ जून. )

अपत्यें रघुनाथरायानें[1] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ साबान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं ऐनापुरचे मुक्कामाहून व राजश्री नानांस मेजवानी जाहल्यानंतर पत्रें पाठविलीं तीं पावून सविस्तर कळलें. इकडील वर्तमान तर शत्रूनें अदवानीस शह दिला आहे. परस्पर मारागिरी होते. शत्रूनें हल्ला केली होती. आंतल्यानीं मोठ्या कस्तीनें मारून काढिली. 'लवकर कुमकेस येऊन पोहोंचावें' म्हणोन अदवानीहून व नबाबाकडून[3] पत्रें

---

१ रघुनाथराव कुंरुंदवाडकर. २ पत्र कुरुंदवाडकरांचें गजेंद्रगडाहून मिरजेस बाळासाहेबांस. ३ हैदराबादेहून निजामअल्लीकडून.

वरचेवर येतात. त्याजवरून कुमकेस जावयाचा निश्चय होऊन आज कूच जाहलें. गजेंद्रगडच्या पूर्वेस कोस दीड कोसाच्या अंतरानें मुक्काम जाहला. तीर्थस्वरूप राजश्री आपासाहेब व आम्ही मिळोन जात आहों. नबाबाकडील फौजही येत आहे. भोसले देशास जावयाकरितां काल कूच करून तीन कोसांवर वेगळे जाऊन उतरले. राजश्री चिमणाजी राजे फौजेंत राहणार, परंतु त्यांस समाधान नाहीं. त्यांचेंही ( राहण्याचें ) मळमळितच आहे ! कोण राहतें पहावें ! नबाबानीं भागानगराहून जोरावरजंग वगैरे लहान मोठे सरदार पोक्तया सरंजामानिशीं रवाना केले ते दाखल जाहले. याखेरीज मोंगलअल्लीसमागमें वीस हजार फौज, शिवाय पायचें माणूस, व सरंजामाची नेमणूक होऊन डेरेदाखल करविले. भागानगरासमीप सिध· बनांत मुक्काम आहे. मजल दरमजल मुदगलच्या सुमारें येतात अशी बातमी आली. नबाबाचे चित्तांतील भाव–आपण घरास माघारे आलों. प्रधानांचे फौजेनें बदामीचा किल्ला जोरबेजोर फत्ते केला, शत्रूवर जरब बसली, पुढें काय करतील हें कळत नाहीं, असें समजून फौजा रवाना जाहल्या. प्रधानांचे फौजेनें कुमक करावी याप्रमाणें राजश्री गोविंदराव पिंगळे यांचे पत्रीं लिहिलें आहे; तींच बजिन्नस पत्रें राजश्री हरिपंततात्यानीं आम्हास दाखविलीं. श्रीमंतांचें दैव विचित्र ! नबाबांस रहावयास आग्रह होत असतां निघून गेले. हल्लीं आपोआप फौजा रवाना करितात, मागती कुमक करावी असें लिहितात; मोठी गोष्ट आहे ! बुनग्यांत राजश्री हरीपंततात्या राहिले. सडी स्वारी पुढें गेल्यानंतर वरचेवर वर्तमान वडिलांस कळलें पाहिजे, त्यास दरम्यान शत्रूचीं ठाणीं कोठें कोठें आहेत; एक दुसरा माणूस जाऊं पावणार नाहीं; यास्तव वडिलीं राजश्री तात्या यांचे लष्करा-

---

१ आपा बळवंत मेहेंदळे.

पावेतों डांक बसवावी म्हणजे ठीक पडेल. यांत मर्जीस येईल तसें करावें. " असें वेंडिलांस लिहिलें आहे. नबाबाकडील फौज मात्र स्वारीबरोबर आहे. तहवारजंग तात्यांजवळ राहिले. नबा[illegible] कांहीं खासा यावयाचे दिसत नाहीं. सरंजाम मात्र अ[illegible]मस्तकरून आलेला आहे. सोबत नव्हती ती जाहली इतकें मात्र जाहलें! खासा नबाबही डेरेदाखल होणार असें लिहिण्यांत आहे; मग पहावें. दहा पंधरा हजार फौज गाडदी मोगलअल्लीसमागमें मुदगलास येतात यांत गुंता नाहीं. विदित होय हे विज्ञापना.

चिरंजीव राजश्री श्रीपतराव भाऊ यांसीं आशीर्वाद. सदैव स्मरणपूर्वक पत्र पाठवीत जावें. लोभ असों देणें हे आशीर्वाद..

चिरंजीव राजश्री जिऊबा अण्णा व दाजीबा परचुरे यांसीं आशीर्वाद. राजश्री रामचंद्रपंत दातार व राजश्री नारोपंत पोंक्षे यांस साष्टांग नमस्कार.

पै॥ १४ साबान. सब्बा समानीन, ज्येष्ठ मास.

नं. २९८८. (ज्येष्ठ शु० १०–९ जून.)

गोविंद सखदेव यांचें पत्र पै॥ छ० १२ साबानचें हरीपंतांच्या लष्करांतून मिरजेस—

" अदवानीस शत्रूकडील मोर्चे बसले आहेत, याजकरितां येथील फौज रा॥ आप्पा बळवंत व बाजीपंत अण्णा व श्रीमंत राजश्री दादा व नबाबाकडील फौज जमाव पंधरा वीस हजार, याप्रमाणें फौज सडी होऊन अदवानीचे सुमारें आजच निघोन चालले आहेत. खासा नबाबाचीं पत्रें छ० २९ रज्जबचीं येथें रा॥ हरीपंत तात्या

---

1 तासगांवास परशुरामभाऊंस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर.

यांस आलीं आहेत जे, " अद्वानीचे कुमकेस आपणाकडील फौज आलिजाबहादर वडील पुत्र यांजसमागमें देऊन त्यांची रवानगी छ॰१ साबानीं करून अदवानीकडे पाठवून देतों. तुम्हीही फौज पाठवावी; ". ह्मणून पत्रें आलीं. त्यावरून फौजांची रवानगी जाहली. राजश्री हरीपंत तात्या मागें राहणार. "

नं. २९८९. ( ज्येष्ठ-जून. )

वेरून विदित होईल. श्रीमंत राजश्री हरिपंततात्यांचा मुक्काम गजेंद्रगडावर आहे. गजेंद्रगडास सरकारचें निशाण चढलें; किल्ला हस्तगत जाहला; म्हणून वर्तमान आलें आहे. स्वामीकडेही आलेंच असेल. याप्रमाणें जाहलेलें वर्तमान लिहिलें आहे. आणखी स्वारींतून वर्तमान येईल तें लिहून पाठवितों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस हें वर्तमान लिहून पाठवाव. आमचे फौजेस खर्चास नाहीं. तेव्हां श्रीमंत राजश्री दादांपासून दोन हजार रुपये घेऊन लोकांस मोघम मोघम खर्चास दिलें आहे. रोजमुरा लोकांस द्यावा लागतो व जखमी खर्च व किरकोळ लोकांस दहा पांच रुपये राहुट्या व पालें घ्यावयाबद्दल द्यावे लागतात. यास्तव स्वामीनीं खर्चाची बेगमी होय अशी ऐवजाची तरतूद करून ऐवज राजश्री हरिपंततात्यांच्या लष्करास पाठवून द्यावा, आणि तात्यांस लिहून सांडणीस्वारांबरोबर ऐवज येऊन पोंहचेसा करावा. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विज्ञापना.

विनंती सेवेशीं सखो रंगनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना. सदैव आज्ञापत्रीं सांभाळ करावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ गोविंद सखदेव यानीं लष्करांतून मिरजेस बाळसाहेबांस लिहिलेल्या पत्राचा हा एकच बंद मिळाला. २ मिरजकरांच्या पथकास.

नं. २९९०. श्री. (ज्येष्ठ—जून.)

सांगून[1] पाठविलें कीं, ' तुम्ही फौज घेऊन येणें, म्हणजे हुबळीचें ठाणें स्वाधीन करून देतों. ' म्हणोन. त्याजवरून रा॥ बापूजी बावा होळकर व रा॥ पाराशरपंत होळकराकडील व राजश्री महादाजीपंत बेहरे– राजश्री गणेशपंत यांचे पुतणे–पेंढारीसुद्धां दहा हजार व तीन तोफांसुद्धां गेले. नवे हुबळीस ठाणें घातलें. जुने हुबळीस ठाणें पडावें तों कैंचनगौडा याचा लेक धारवाडीं किल्यांत ओलीस आहे, त्यास हें वर्तमान हुबळीस फौज कैंचनगौडानें आणिली (असें) कळोन गौडाच्या पुत्रास तोफेच्या तोंडीं आणून बांधिला. ' हुबळी दिली तरी तोफ उडवून देतों. ' त्याचा निरोप बापास आलेवरून भ्रांतींत पडून ठाणें दिलें नाहीं. हे नित्य जाऊन तोफा मारून येतात. अद्यापवरी काट होत नाहीं. हल्लीं दोन चार दिवस पाऊस लागतो त्याजमुळें मुक्काम करून आहेत. बुराणुद्दिन मुडगोडास होता तो हुबळीस फौज आली म्हणोन कूच करून सडा कळघटगीस आला आहे. यांजवरी येऊन पडावें म्हणोन रात्री निघोन आला. यांस बातमी होती. हे तळ सोडून माघारे सुळबेहट्टीस आले. तो माघारा कलघटगीस जातांच मागती हुबळीवरी गेले. रा॥ गणेशपंत यांचा मुक्काम येथें आहे. पाऊस उघडला म्हणजे शत्रूवरी एक वेळ जावें म्हणोम घाटतात. पुढें घडेल तें पहावें. इकडे आलेवरी सरकारांत ठाण्यीं येणेंप्रमाणें पडलीं. लक्ष्मेश्वर परगणे पैकीं शिरहट्टी, येळवंती, श्रीमंतगड, षडवट्टी, बालेहोसूर खेरीज करून कसबेसुद्धां वरकड गांवगन्ना अंमल

---

1 या पत्राचा पहिला बंद मिळाला नाहीं. हें पटवर्धनांच्या कोणा कारकुनानें बंकापुरास गणेशपंत बेहरे यांचें लष्कर होतें, तेथून मिरजेस बाळासाहेबांस पत्र लिहिलें आहे. २ धारवाडच्या किल्लेदारा केल्यावरून.

बसला. सांवशीस ठाणें बसलें. तैसेंच मुळगुंदास ठाणें बसलें. तैसेंच गदगास ठाणें राजश्री सखारामपंत आप्पाकडून आनंदराव गोपाळ आले त्याणीं घातलें. तडसास ठाणें पडलें. सुळबेहट्टीस ठाणें बसलें. नवलगुंद तालुकेस ठाणें बसलें. हुलीगडास ठाणें घातलें. बाकी राहतां हुबळी व कुंदगोळ राहिलें त्यांसही ठाणीं घालितात. मिश्रीकोटें व कलघटगी येथील संधानें आलीं आहेत. परंतु शत्रूचा आवर्त आहे म्हणोन अनमान आहे. स्वामीच्या सरंजामापैकीं ठाणीं बसलीं त्याचा घांसदाणेचा कारभार राजश्री शेषगीरराव माधव नि॥ राजश्री कृष्णापानाईक कलकेरे यांजकडून सालगुदस्तां व तिगस्तां सर्तांगिरेस होते त्याणीं लक्ष्मेश्वर, सावशी, मुळगुंद, सुळबेहट्टी, याचा अंमल केला आहे. आपणाकडून कारकून पत्रें घेऊन आल्यावरी ठाणीं स्वाधीन होतील. सेवेशीं कळावें. धारवाड तालुका रा॥ त्रिंबकरावं अण्णाकडे पूर्ववत् प्रमाणें जाहला. सरकारच्या सनदा सरदारांस आल्या. 'तालुकामजकुरचीं ठाणीं बसलीं आहेत तीं मशारनिल्हेच्या स्वाधीन करणें' म्हणोन. त्याजवरून चिठ्या घेतल्या आहेत. नवलगुंद तालुक्यास होळकर यांचें ठाणें बसलें आहे त्याची मात्र अप्रेसिका[1] आहे कीं, नवलगुंद तूर्त आम्ही देत नाहीं. रा॥ हरिपंततात्यांची आमची गांठ पडली म्हणजे काय तें सांगूं म्हणतात[2]. वरकड कांहीं गुंता नाहीं. राजश्री जिवाजीपंत अण्णा जोग सरसुभा कोंकणपट्टी हे जमावसुद्धां सावनूरच्या मुक्कामीं होते त्यांस राजश्री हरिपंततात्याचीं पत्रें आलीं; 'भेटीस लष्करांत येणें.' त्याजवरून सावनूरच्या मुक्कामींहून निघोन गजेंद्रगडास जावयासीं गेले होते. पंधरा दिवस जाहले. ते कालीं माघारे येथें आले. त्याणीं वर्तमान सांगितलें कीं... हरीपंततात्यानीं गजेंद्रगड घेतला. ( अपूर्ण )

---

१ शंका. २ तुकोजी होळकर म्हणतात.

दोन हजार माणूस व दारूगोळीचें सामान पोक्त होतें. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापें ( हातीं ) आला ! सरकारचें ठाणें बसवून पुढें कूच करून ( गेले. ) बाजीपंतअण्णा अगोदर अदवानीचा वेढा शत्रूचा बसला आहे त्याच्या उपराळ्यास गेले आहेत. ते तुंगभद्रेपर्यंत गेले. निजामअल्लीखान यांजकडून पोलादजंग तेजगंज वगैरे सरदार मिळोन फौजसुद्धां आले. त्यांच्या यांच्या भेटी होऊन तुंगभद्रापार जाहले. हें वर्तमान शत्रूस कळतांच तीन कोस माघारे वेढा उठवोन सडा राहिला आहे. बुणगें गुत्तीस पाठविलें. म्हणोन वर्तमान आहे. त्याचे पिछावरी तात्या फौजसुद्धां गेले आहेत. जर करितां तुंगभद्रेस पाणी न आलें तरी बुणगें अलीकडे ठेवून सडे होऊन पार व्हावें, असा मनसबा आहे. परंतु तुंगभद्रेस व वाळानदीस पाणी आर्द्रांच्या पावसानें आलें म्हणोन बातमी आली. तेव्हां पलीकडे जाणें होत नाहीं. अगोदर फौज पार जाहली ती तीस चाळीस हजारपर्यंत आहे. त्यांची छावणी तिकडे होईल असा मनसबा आहे. टिपू आहे म्हणतात, कोणी नाहीं म्हणतात, हें समजत नाहीं. सावनूरकर नबाब याणीं सावनूर सोडून लष्करांत यावें; कबिले परसगडास पाठवावे, म्हणोन मनसबा अगोदरच होता. त्यास राजश्री हरिपंततात्यांचीं पत्रें आलीं कीं, " सावनूर व ( पेशवे ) सरकार दोन नाहीं ! तुम्ही शहरांत स्वार गाडदी सरकारचे ठेवून सावनुरास छावणी करून राहणें व शत्रु अवसानांत आलेवरी पारिपत्य करणें; " म्हणोन पत्रें आहेत. राजश्री सुभेदार होळकर मलापहारीहून कूच करून बुणगेंसुद्धां मोरबावरी मुक्काम करून आहेत. गांव झाडून लुटितात. घरें मोडितात. बाकी कांहीं राहत नाहीं. लावणी होतां दुस्तर आहे ! राजश्री जिवाजीपंत अण्णा जोग पुण्यास आठ चार दिवशीं जाणार आहेत. मिरजेवरून भेटून जातील. शत्रूच्या लष्करांत महर्गता फार

आहे. फैलमास शेर तांदूळ जाहले आहेत. ( त्याचे लष्करास ) रस्त सोंधेंकडून चालती. वैरण नाहीं. घोडयांस दाणा मिळत नाहीं. घोडीं बैल मरतात. याप्रमाणें वर्तमान सेवेशीं कळावें म्हणोन लिहिलें आहे. पुढें होईल तें कळवीत जाईन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. २९९१. श्री. ( ज्येष्ठ व० ११-२२ जून. )

राजश्री रामचंद्र रुद्र व सखो रंगनाथ स्वामी गोसावी यांसः-

सेवक रघुनाथराव नीलकंठ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. तुम्हीं भनूच्या मुक्कामाहून छ० २४ साबानचें पत्र पाठविलें तें अदवानीनजीक मुक्कामीं पावलें. लिहिलें ते कळलें. ऐसीयास काल छ० २४ रोजीं टिपूचा मुक्काम येथून सहा कोसांवर आहे त्यासुमारें तलाव्याकरितां आम्हीं व राजश्री बाजीपंत अण्णा व तीर्थस्वरूप राजश्री आपा मिळोन गेलों होतों. त्याजकडील हजार बाराशें स्वार पुढें चौकीस होत. त्यांची व इकडील लोकांची लढाई जाली. शें दीडशें घोडे त्यांजकडील पाडून आणिले. मागती त्याजकडील पायचें माणूस व फौज व तोफा पुढें वाढून आल्या होत्या. तोफांची मारगिरी ( शत्रूनें ) बरीच केली. माघारें अस्तमानीं गेले. आम्ही गोटांत आलों. दहा वीस माणूस तरवारेचें जखमी जालें. राजश्री रामाजी अनंत याची एक घोडी बरचींच्या जखमेनें पडली. खेरीज शिलेदारांचीं दोन चार घोडीं पडलीं. इतकेंही जाहलें असतां नबाबाकडील फौज तयार होऊन आली नाहीं ! येती तर आणखी कामकाज बरेंच होतें. शत्रूचा दम विशेष नाहीं. त्याची फौज पुढें वाढून आली होती ती आम्हीं माघारी

---

१ हें रुप्याचें नाणें. याची किंमत सद्दा आणे धरलेली पद्माण्यांत आहे. २ हे दोघे कारकून कुरुंदवाडकरांच्या बुनग्याबरोबर हरिपंत तात्यांच्या लष्करांत भनूच्या मुक्कामीं होते त्यांस हें अदवानीहून पत्र. ३ कुरुंदवाडकर. ४ आपा बळवंत मेहेंदळे.

गोटापर्यंत फिराऊन दिली. हें वर्तमान कुरुंदवाडास लिहोन पाठ- विणें. रवाना छ० २५ साबान. बहुत काय लिहिणें हे विनंती. येथें खर्चाची ओढ. ऐवज मिळत नाहीं. फौजेचा गवगवा भारी. यास्तव सावकास ( ? ) ऐवजाविशीं लिहिलें आहे. तर पन्नास हजार रुपयें पत्र पावतांच आणवून घ्यावे, आणखी इकडे लिहोन पाठवावें. ह्मणजे आगं वयाची तरतूद करूं. रवाना छ० मजकूर. हे विनंती.

पैा छ० २६ साबान. भृगुवार. तृतीय प्रहर. मुक्काम भनू.[1]

पैा छ० ५ रमजान. रविवार.[2]

नं. २९९२. श्रीगणराज. ( ज्येष्ठ व० १४—२५ जून. )

राजश्री वासुदेवपंत स्वामी गोसावी यांसीं.[3]

विनंती उपरी. चनबसाप्पा कित्तूरकर याचे दारीं मिरजेंत फिरंग्याचे[4] कर्जाबदल माणसें बसविलीं आहेत तीं उठवणेंविशीं तीर्थ- स्वरूप राजश्री भाऊसाहेबांचें पत्र आलें. याकरितां लिहिलें आहे. तरी चिठी पावतांच चवकी उठवणें. रवाना छ० २८ साबान सब्बा समानीन. हे विनंती.[5]

नं. २९९३. श्री. ( ज्येष्ठ व० १४—२५ जून. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामोजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २८ साबान रविवार तिसरा प्रहरपर्यंत यथास्थित असें. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. होळकर व बेहरे व शत्रूकडील वर्तमान लिहून पाठवणेंविशीं आज्ञा, त्यास इकडील वर्तमान राजश्री तुकोजी होळकर हे एकोडीहून

---

१ ही पैवस्ती भनूची. २ ही पैवस्ती कुरुंदवाडची. ३ चिठी गंगाधरराव गोविंद याची दिवाणजीस. ४ कोणा युरोपियन व्यापाऱ्याच्या. ५ पत्र शहापुराहून मिरजेस.

कूच करून मोरबेस गेले. तेथून बुणगेंसुद्धां बेहट्टीवर जाऊन उतरले आहेत. राजश्री बापू होळकर जुने हुबळीस मोर्चेबंदी करून राहिले होते. त्यास शत्रूकडील जमाव तयार होऊन यांजवर छापा घालावयास आला हें वर्तमान यांस कळतांच मोर्चे उठवून बेहट्टीवर येऊन उतरले आहेत. शत्रूकडील दोन हजार बार जुने हुबळीस घालून सैदबुरान मिश्रीकोटेवर येऊन सडे फौजेनिशीं राहिला आहे. राजश्री गणेशपंत बेहरे बंकापुरानजीक आहेत तेथेंच आहेत. शत्रूकडील सैदबुरान मिश्रीकोटेजवळ येऊन राहिला आहे. बुणगे मुडगोडाकडे आहे. कित्तुरास आणखी हजार बार पाठविले आहेत. पहिले लोक त्याजकडील होते त्याशिवाय आणखी हजार बार आला आहे. आज्ञेप्रमाणें वरचेवर तिकडे माणसें पाठवून वर्तमान आणवून सेवेशीं लिहून पाठवितों. गोमंतकाहून आंबे आणावयास माणसें पाठविलीं आहेत. दोन खेपा आणखी आणविले आहेत. त्यास पर्जन्य घांटाखालीं फार लागतो. कालपासून झड बसली आहे. आंबे येथें येतांच रवाना करून देतों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

पै॥ छ० २ रमजान सन सब्बां समानीन. आषाढ मास.

नं. २९९४. श्री. ( आषाढ शु० ५–३० जून. )

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी भरमाजी नि॥ राजश्री धोंडो अनंत. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० ३ रमजानपर्यंत यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. होळकर व बेहरे व शत्रूकडील वर्तमान आणवून लिहून पाठवणेंविसीं आज्ञा, त्यास राजश्री तुकोजी होळकर बेहट्टीवर जाऊन उतरले होते. तेथून

---

१ पत्र शहापुराहून मिरजेस.

कूच करून हुबळीस गेले. राजश्री बापू होळकर यांणीं जुने हुबळीस मोर्चे दिले होते. शत्रूकडील सडी फौज मुडगोडाकडून मिश्रीकोटेस आली यास्तव मोर्चे काढून बेहट्टीस आले होते. तुकोजी होळकर बेहट्टीस जाऊन उभयतां मिळोन मागती हुबळीस जाऊन तोफा लाविल्या आहेत. शत्रूकडील फौज मिश्रीकोटेजवळ येऊन सडे झाडीच्या आसऱ्यानें राहिले आहेत. राजश्री गणेशपंत बेहरे सावनुराजवळ आहेत तेथेंच आहेत. आज्ञेप्रमाणें वरचेवर वर्तमान आणवून सेवेशीं लिहून पाठवितों. राजश्री धोंडोपंत आपा गोकाककर यांजकडे माणसें पाठविलीं आहेत. पत्रें येतांच पाठवितों. गोमंतकास आंबे आणावयास माणसें पाठविलीं आहेत, अद्याप आलीं नाहींत. पर्जन्य फार, याजकरितां आलीं नाहींत. आंबे येतांच रवाना करितों. येथेंही पर्जन्य आठ दिवस फार लागला आहे. झड बसली आहे. याजमुळें पेरण्या स्वल्प जाहल्या आहेत; व्हावयाची जमीन फार राहिली आहे. सेवेशीं कळावें याजकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ८ रमजान. सन सब्बां समानीन. आषाढ.

नं. २९९५. **श्रीगणराज.** ( आषाढ शु० ७—२ जुलई. )

पुरवणी. आशीर्वाद. उपरी राजश्री मुधोजी भोंसले [1] घेरडीवरून श्रीक्षेत्र पंढरपुरास गेले. फौज चिरंजीवासमागमें [2] देशास रवाना करून सडे पुलावरून पुण्यास जावया गेले. मार्गीं जातां मंगळवेढें-परगणेचे दो ती खेड्यांच्या वोली नेल्या होत्या. पत्र देऊन कारकून

१ मंगळवेढ्याचे मामलेदार मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. २ कोणचे चिरंजीव ? खंडोजी भोंसले सेनाबहादर तर लष्करांत हरीपंतांबरोबर होते.

पाठविलेवरून सोडून दिल्या. कांहींसा खर्च लांकूड फांटे वगैरे पंचवीस रुपयेपर्यंत पडला. चिरंजीव राजश्री भाऊसाहेबीं तालुक्याविशीं सैन्यांत सांगितलें होतें असें म्हणत होते. एवंच कांहीं खराबी न करितां गेले आपणास कळावें यास्तव लिहिलें असे. यानंतर पर्जन्य आमचेकडे ओढला आहे. या उपरी पुनर्वसूचा लागेल तरी राहिले पेरे पेरतील. कळावें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ७ रमजान. सन सब्बा समानीन. आषाढ मास.

नं. २९९६. श्री. ( आषाढ शु० ७—२ जुलई. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामीचे सेवेशीं:—

पोष्य हरि बल्लाळ. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " पथकाचे खर्चाबद्दल ऐवज राजश्री गणेश बाजीराव यांजबरोबर पाठविला आहे. चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा पुढें सडे स्वारींत गेले आहेत; त्यांजपाशीं ऐवज जाऊन पोहचे अशी सोबत चांगली पाहून पाठवावी; " म्हणोन विस्तारें लिहिलें, त्यास दादा पुढें अदवानीस गेले. गणपतराव ऐवज घेऊन येथें आले. पाठीस मार्गी ठीक नव्हता, याकारितां ऐवजसुद्धां आपलेजवळ मशारनिल्हे यांस ठेवून घेतलें. आपल्या फौजा अदवानीहून तुंगभद्रा उतरून अलीकडे आल्या. दादाही आले. त्यांची यांची गांठ घातली. ऐवज त्यांजपाशीं सुरक्षित पोहचला. इकडील वर्तमान दोन्ही फौजा पलीकडे जाऊन अदवानीचे मोर्चे उठवून अदवानीवाल्याची मुलें

१ फडके. २ कुर्लेकर. यांची पागा पेशवे सरकारांतून पटवर्धनांच्या दिमतीस दिलेली होती. ३ आमची व मोंगलांची.

माणसें चीजवस्त व दोन्ही फौजा अलीकडे आल्या, तेच दिवशीं नदी पुरानें भरून चालली ! श्रीमंतांचे प्रतापेंकरून फौज सुरक्षित आली. आह्मी भनूजवळ होतों तेथून पुढें आलों. दोन्ही लष्करें एक जालीं. याउपरी ठरेल तें लिहून पाठवूं. वरकड वर्तमान गणपतराव सांगतां कळेल. सदैव पत्रीं कुशलवृत्त लिहीत जावें. रवाना छ० ५ रमजान. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. २९९७. श्रीगणराज. ( आषाढ शु० ८—३ जुलई. )

पै॥ छ० ७ रमजान. सन सब्बा समानीन. आषाढ मास.

अपत्यें शिवरामानें साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० ६ रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. काली संध्याकाळीं लष्करचीं पत्रें आलीं. सडे स्वारींतून तीर्थस्वरूप राजश्री दादाकडून राजश्री रामचंद्र रुद्र यास पत्रें आलें होतें. त्याची नक्कल आलेली वडिलांकडे पाठविली आहे, व लखोटा आपले नांवचा आलेला पाठविला आहे, त्याजवरून सर्व वर्तमान कळेल. सडच्या फौजा तुंगभद्रेपलीकडे आहेत. बुणगें झाडून भनूवर आहे. तुंगभद्रेस पाणी उराबरोबर आहे म्हणोन लिहिलें आहे. उतार आहे तों फौजा अलीकडे आल्यास उत्तम आहे. उतार मोडल्यानंतर कठीण. व फौजेच्या खर्चीचीही वोढ आहे. काय करितात पहावें. राजश्री रामचंद्र रुद्र यांचें पत्र वाचून पाहोन तासगांवास तीर्थस्वरूप राजश्री भाऊसाहेबांकडे रवाना करावें. वाटेस काटकाई फार, यास्तव माणसें येत नाहींत. एकटद्या दुकटद्यास वाट चालत नाहीं. वडिलांकडेही पत्रें आलींच असतील. अधिकोत्तर वर्तमान आलें असेल तर लेहून कळवावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ शिवराव नीलकंठ यांचें कुरुंदवाडाहून मिरजेस पत्र. २ तें पत्र नं. २९९१ स छापलें आहे. ३ काटक म्हणजे कानडे लुटारू यांचा दंगा.

नं. २९९८. श्री. ( आषाढ शु० ११—७ जुलई. )

पै॥ छ० १३ रमजान. सन सब्बा समानीन. आषाढ मास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी भरमाजी निा राजश्री धोंडो अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० १० रमजान भृगुवारपर्यंत यथास्थित असे. विशेष. गोमंतकी आंबे सुमार १५० दीडशें पाठविले आहेत. तपशील सुमार.

७५ फर्नांदीज.

७५ मुसारत.

———

१५०

दीडशें आंबे पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. उत्तर पाठवावयास आज्ञा करावी. गोंव्याहून माणसें आलीं. आंबे तेथें मिळत नाहीं. आंब्याचा झाडा जाहला. पर्जन्य अतिशय लागला आहे. वाटेंत पर्जन्यामुळें शहापुरास यावयास सहा दिवस लागले. पाउणशें आंबे अगदीं कुजले. याजउपर आंबे यावयाचे राहिले. सेवेशीं कळावें याजकरितां लिहिलें आहे. होळकर व बेहरे व शत्रूकडील वर्तमान अधिकोत्तर नाहीं. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. २९९९. श्रीशंकर. ( आषाढ व० १३—९ जुलई. )

पै॥ छ० १२ रमजान. सन सब्बा समानीन. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक महादजी अनंत गोडबोले साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत माघ वद्य द्वितीयापावेतों स्वामीचे कृपेंकरून श्री-

---

१ पत्र शहापुराहून मिरजेस.

प्रयाग येथें क्षेम असों. विशेष. आज्ञा घेऊन आलों तो श्रीक्षेत्रीं पौष वद्य अष्टमीस रविवारीं पावलों. पंचमीअलीकडे श्रीवाराणसीस जाऊं. सालमजकुरीं यात्रा बहुत जमा जाहली. दाटी होत्ये याजकरितां येथील अंमलदार याणीं नौका बंद केल्या. एक दिवस यात्रा पलीकड अटकोन राहिली. दुसरे दिवशीं श्रीभागीरथीस व यमुनेस पायउतार होऊन बायकामुलें उतरून आलीं. ग्रहण, मकर, अर्धोदय; याजमुळें दोन लाख माणूस जमा जाहलें. सर्वही त्रिवेणीसंगमीं स्नान करणार. दाटी भारी होऊन दोन अडीचशें माणूस मृत्यु पावलें! शेंपन्नास वर्षांत यात्रा ऐशी कधींही मिळाली नाहीं. कळावें. माझी शरीप्रकृत ठीक नाहीं. राजश्री घोरपडे यांजकडील कराराप्रमाणें ऐवज वसूल पडोन कर्ज निर्मुक्त होय तें स्वामीनीं केलें पाहिजे. स्वामीकारणें श्रीगंगाजल एक कावड पाठविली आहे. अंगीकार केला पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०००. श्री. ( आषाढ शु० १४–१० जुलई. )

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं.

परशुराम[1] रामचंद्र. आशीर्वाद उपरी. चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा याजकडून व राजश्री हरिपंततात्या यांजकडून लष्करांतून काल आज पत्रें आलीं, तीं तुम्हांकडे पहाण्याकरितां पाठविलीं आहेत. पाहून, माघारीं पाठवावीं. रवाना छ० १३ रमजान. बहुत काय लिहिणें. अदवानी टाकून आले हें ठाक न जाहलें. होणार भावी! हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ रमजान सन सब्बा समानीन. आषाढ.

---

१ पत्र तासगांवाहून मिरजेस.

नं. ३००१. श्रीगणराज. ( आषाढ शु० १४-१० जुलई. )

पै॥ छ० १४ रमजान. सन सब्बा समानीन. आषाढ मास.

अपत्यें शिवरामानें[1] विज्ञापना तागायत छ० १३ माहे रमजान-पावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें पावलें. ती॥ रखमाकाकूचें वर्तमान लिहिलें तें कळलें. लष्करचें वर्तमान लिहिलें तेंही कळलें. आम्हांकडील जासूद व वडिलांकडील जासूद मिळूनच आले. त्यांतं[2] याप्रमाणेंच वर्तमान लिहिलें होतें. मुख्य गोष्ट तुंगभद्रापार गेले होते तेव्हां पूर येता तर दगा होता. श्रीकृपेंकरून उतार असतांच आले. नंतर पूर आला ! अदवानी शत्रूनें घेतली असेल. टिपू खुद्द पायदळ व तोफखाना सामान भारीच आणिलें आहे. याजउपर आमचे[3] मसलत काय करितात पहावें. तुंगभद्रापार होते तेव्हां मोठी चिंता होती ! श्रीकृपेनें अलीकडे आले. याजउपरी श्रीसत्तेनुरूप घडेल तें प्रमाण. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३००२. श्री. ( आषाढ व० १-१२ जुलई. )

पै॥ छ० २० रमजान. सन सब्बां समानीन. आषाढ.

अपत्यें रघुनाथानें[4] साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० १५ रमजान मुक्काम बनिगन्नूर तालुके भनू नजीक शिन्नूर पांच कोस. वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं छ० २४ साबानचें पत्र पाठविलें तें पावोन लिहिलें सविस्तर कळलें. इकडील वर्तमान जासुदाबरोबर लिहिलेंच आहे त्याजवरून विदित होईल. लष्करांत महागाई विशेष. अविंधाचे[5] फौजेचा समागम आहे ! काय घडतें पहावें. विदित होय हे विज्ञापना.

---

१ शिवराव नीलकंठ यांचें पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस. २ आमच्या पत्रांत. ३ आमचे सरदार. ४ लष्करांतून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. ५ मोंगलांच्या.

नं. ३००३. श्री. ( श्रावण शु० १--२६ जुलई. )

श्री
जोती स्वरूप चरणीं
तत्पर राणोजी सुत
माहादजी शिंदे
निरंतर.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी.

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नो॥ महादजी शिंदे दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " अक्षतृतीयेचे मुहूर्ते करून किल्ले बदामीस मोर्चेबंदी केली. किल्ला बहुत बांका, खंदक पंधरा वीस हात खोल व रुंदही फार, रेवण मोठी, याजमुळें तोफांची मारागिरी लागू न होय. रणमंडळ व बालेकिल्ला व कंबरग्याचे बुरूज व पेठेंतील मार एकूण चहूंकडून त्याची मारागिरी चालतच होती. मोर्चे रेवणीपावेतों जाऊन पोहोंचले. किल्लेकरी याणीं जमावर्दीनें पंधरा वीस दिवस किल्ला लढविला. तोफांचे मारागिरीनें रणमंडळचा बुरूज व कंबरग्याचे बुरूज पाडून त्याचे तोफांचा मार बंद केला. छ० २१ रज्जबीं प्रातःकाळीं हल्ला केली. लोकानीं एकच लगट करून जाऊन किल्ल्याचे दरवाजे जाळिले. तेव्हां इकडील व तिकडील लोक ठार व जखमी जाहले. किल्ला हस्तगत जाहला. छ० २२ रज्जबीं सरकारचें निशाण किल्यावर चढविलें;" म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशीयास बदामीची जागा अलीकडे टिपूनें नवघारून मजबूद केली होती. जागा बांकी असतां आपण मोर्चे तरतुदीनें चालवावयाची ताकीद लोकांस करून

रेवणीपर्यंत मोर्चे चालवून किल्याचा मार चहूंकडून असतां हल्ला करून किल्ला हस्तगत केला, हें ऐकोन परम संतोष जाहला. हुजरातचे लोक मोठीं मोठीं कामें करून सरकारनक्ष करीतच आले आहेत. चहूंकडून किल्याचा मार याजकरितां माणूस जाया जाहलें; त्यास लढाईच आहे. आपण मेहनत केली त्याप्रमाणें यशही श्रीमंतांचे प्रतापानें आलें. रा। छ० २९ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

मोर्तब सुद

नं. ३००४. श्री. (श्रावण शु० १–२६ जुलई.)

पै॥ छ० १२ जिल्काद. सब्बां समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस.

दंडवत. विनंती उपरी. आपण छ० २ साबानचें पत्र पाठविलें तें पावलें. कलकत्तेकरांचें पत्र पलटणें मदतीस पाठवावयाविशीं आपणास पारसी आलें त्याची नक्कल पाठविली ते पावली. आपले पत्रीं 'पलटणें येतील तीं सरकारचे मुलखाचे हद्देवरी राहतील' असें लिहिलें, त्यास येविशींचा मजकूर पूर्वीं आपणास लिहिला आहे त्यावरून सविस्तर कळलेंच असेल. दुसरें, ' मालीट पुण्याहून लष्करांत येणार आहे त्याचें बोलणें काय होतें तें लिहून पाठवूं ' म्हणून ( आपण

१ येथें हें असें लिहिलें आहे. परंतु याच तारखेच्या दुसऱ्या एका पत्रांत बदामीच्या लढाईत फार शिपाई ठार झाल्याबद्दल शिंद्यांनीं नाना फडनविसांस दोष दिला आहे, व या मोहिमेंत अजून आणखी पुष्कळ लढाया व्हावयाच्या आहेत, पहिल्याच लढाईत इतकें माणूस गमावल्यावर पुढें निभावणी कशी होईल, अशी चिंता प्रकट केली आहे. इतर मजकूर महत्वाचा न वाटल्यामुळें तें पत्र येथें छापलें नाहीं. २ नाना फडनविस यांस महादजी शिंद्यांचें पत्र.

पूर्वी ) लिहिलें होतें. त्यास. "मालीट बदामीचे मुक्कामीं येऊन भेटला त्याचें बोलणें जालें. 'सरकारचा आपला स्नेह, तशाच टिपूचा आमचा स्नेह, तेव्हां टिपूचे शत्रूची मदत आम्ही कशी करावी?' असें तो म्हणाला. त्यासीं आम्ही उत्तर केलें, 'कलकत्त्याहून एक लिहिलें, तुम्हीं एक बोलतां, हें काय ! कलकत्त्याचें पत्रांत 'टिपूचा आमचा स्नेह आहे, परंतु रावपंतप्रधान यांचा स्नेह आम्हांस अधिक मंजूर. त्यापक्षीं पलटणें येतील. कर्नाटक, बालाघाट, लाहोर, जेथें प्रसंग पडेल तेथें हजर आहों. ' असें कलकत्त्याहून फारशी लिहिलें आहे. त्यासीं तो म्हणाला, आपणास इंग्रजी लिहिलें आहे त्यांत 'हद्देवर राहतील. टिपू सरकारचे मुलुखवरी चालून आल्यास लढाई करितील, ' असें लिहिलें आहे. पलटणांचा दरमहांचा करार लिहून आला नाहीं ' म्हणोन सांगितलें. त्यावरून त्यासीं बोललों कीं, 'सरकारचे मुलखावर टिपू चालून आल्यास तुम्ही लढाई करणार. त्यास टिपू आपण होऊन चालून येऊन सरकार तालुका नरगुंद व कित्तूर येऊन घेतलें. तेव्हां हें जाहिराणा आहे. हद्दीची दिकत राहिली नाहीं व नसावी. ' मालीट म्हणाला, हें बरें आहे. याअन्वयें कलकत्तेकरांच्या पत्राच्या उत्तरांत ल्याहावें. त्यावरून कलकत्तेकरांस पत्र लिहिलें त्याची नक्कल पाठविली आहे. या अन्वयें आपलेंही पत्र कलकत्तेकरांस पाठवावें. " म्हणोन वगैरे लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐसीयास कलकत्यास मदतीविशीं येथून टिपूचें मसलतीचा ऊह निघतांच लिहिण्यांत आलें त्यावरून त्याणीं मालीट याची रवानगी आपणाकडे केली. मागाहून मुंबईस मदतीविशीं पत्रेंही पाठवीत गेलें. हल्लीं मालीट याचें आपलें बोलणें जाहलें त्यांत मालीट यानें 'सरकारचा आमचा स्नेह असाच टिपूचा आमचा स्नेह, तेव्हां टिपूचे शत्रची कुमक कशी करावी,

व पलटणें आमचीं हद्दीवर राहतील;' म्हणोन उत्तर केलें! त्यास हैदर-नाइकाच्या व इंग्रजाच्या लढाया बहुत जाहल्या त्यांत हैदरनाइकाचीच जरब इंग्रजावर बसत गेली. यामुळें टिपूचे लढाईस इंग्रज कचे पडले आहेत. त्याच जरबेनें हार खाऊन ( इंग्रजांनीं ) टिपूशीं परभारां सलुख केला. सलुख केला असतांही इंग्रजाचे मातबर ( लोक ) लढाईंत पाडाव टिपूकडे आले होते ते ( टिपूनें ) सोडले नाहींत ! इंग्रजी पलटणें येऊन टिपूचे लढाईंत आपले उपयोगीं पडावीं असा अर्थ नाहीं. फरांसीसाचें सूत्र टिपूकडे, हेही निराळे राहिल्यास कुचेष्टा करावयासीं चुकणार नाहींत, याकरितां जसें कळेल तसें आणून गोवून टाकावे म्हणजे कुचेष्टा करणार नाहींत; फरांसीस तिकडे, तेव्हां यांसही इरे आल्यास न कळे, असें जाणोन हरतऱ्हा कलकत्त्यास लिहून येथें इंद्रसेनासीं बोलवून त्यास लाजवून ( मसलतीस ) उभे केले आहेत ! आपण कलकत्यास पत्र लिहिलें त्याची नकल पाठविली ती पावली. याप्रमाणें येथूनही लिहिलें जाईल. रा। छ० २९ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ३००५. श्री. ( श्रावण शु० १–२६ जुलई. )

(शिक्का)

पै॥ छ० १२ जिल्काद. सन सब्बा समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांसी.

दंडवत. विनंती उपरी. आपण छ० १ रज्जबचें पत्र पाठविलें तें पावलें. " नबाब व आम्ही कपिलासंगमाजवळ कृष्णा उतरोन

---

१ आम्हांस म्हणजे पुणें दरबारास न विचारतां इंग्रजांनीं ता. ११ मार्च स० १७८४ रोजीं टिपूशीं मंगलोरचा तह ठरविला. २ मि. अंडरसन् हा शिंद्यांच्या दरबारीं इंग्रजांचा वकील. ३ हें व पुढच्या नंबरचें अशीं दोन्ही पत्रें महादजी शिंद्यांचीं नाना फडनवीस यांस.

दक्षिणतीरीं आलों. त्यावरी टिपूकडील बातम्या येत गेल्या कीं, (तो) भारी सरंजामानिशीं येत आहे. तेव्हां बदामी वगैरे मातबर जागे यांस लागलें असतां दुरोख शह बसेल तें ठीक नाहीं. यास्तव वरकड गड्या व टाणीं घेतलीं. नंतर बातम्या आल्या कीं, ' टिपूस कांहीं अपशकुन जाहला याकरितां फिरोन श्रीरंगपट्टणास गेला. लौकरच येणार. ' या गोष्टीस चैत्रअखेर आला. तेव्हां नबाबानीं विचार केला कीं, ' बरसात जवळ आली. याकरितां आम्ही भागानगरास जातों. वीस पंचवीस हजार फौज व गारदी मिळोन तहव्वारजंग याजबराबर ठेऊं. ' तेव्हां मसलतीचे अन्वयें बोलणेंही जालें. तथापि त्याणीं हाच निश्चय केला, तेव्हां कबूल केलें. परस्परें निरोप होऊन नबाब भागानगरास गेले. फौज लिहिल्याअन्वयें व तोफखाना तहव्वारजंग याजबराबर ठेविला आहे. राजश्री तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे कित्तुराकडे टिपूचा सरदार बुऱ्हाणुद्दीन पंचवीस हजार जमीयत व पंचवीस तोफांसुद्धां झाडीचे आश्रयानें आहे त्याचे तोंडावर आहेत. त्याणीं कित्तूर प्रांतांतील गड्या व टाणीं घेऊन अंमल बसविला. धारवाड तालुक्यांतीलही टाणीं घेत आहेत. पुढें होईल तें लिहून पाठवूं; " म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐसीयास प्रथम नबाबाची आपली भेटी जाहली. दोहींकडील फौजांचा जमाव भारी, यावरून टिपूवर जरब चांगली बसली होती. त्याचसमयीं एक विचार होऊन दिवसगत न लागतां कूच दरकूच तुंगभद्रेपर्यंत जाणें जालें असतें तरी मुलूख टाणीं सुटोन टिपूचें पारिपत्य होऊन नक्ष अधिकोत्तर जाहला असता. भेटी जाहल्यावर एक जागां मुक्काम बहुत जाहले यामुळें शत्रूस फुरसत पडली, तशांत नबाबानीं भागानगरास जावयाचा विचार केला! प्रथम मसलत पक्केपणें टिपूवर करावी असा विचार नबाबाचा आपला ठरून मोहिमेस निघाले असतां मध्येंच हा विचार केला, हें सविस्तर आपले लिहिल्यावरून

समजलें. हैदरनाइकाचें पारिपत्य आजपर्यंत एक सरकारचीच फौज करीत आली आहे व पुढेंही श्रीमंतांचे प्रतापें टिपूचें पारिपत्य सरकारचे फौजेनेंच होईल. नबाबानीं आपलेकडील तहवारजंग ठेविलेच आहेत. नबाब गेल्यावर आपण बदामीस मोर्चे लावून जागा घेतली. पुढें छावणी जाहलीच आहे. श्रीमंतांचें दैव समर्थ आहे! शत्रु पादाक्रांत होतील. राजश्री हरिपंततात्या व होळकर वगैरे सरदार मोहीमशीर आहेत. त्यांस आपलीं पत्रें मजबुदीनें राहून टिपूकडील मुलूख घेऊन त्याचें पारिपत्य करीत येविशीं जातच असतील. त्यांची पुस्तपन्हा आपणाकडूनही वरचेवर व्हावी. तिकडील वर्तमान वरचेवर लिहून संतोषवावें. रवाना छ० २९ रमजान. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ३००६. श्री. ( श्रावण शु० १–२६ जुलई. )

पै॥ छ० १२ जिल्काद. सब्बां समानीन.

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यांस.—

दंडवत. विनंती उपरी. दहा पलटणें इंग्रजी मुंबईहून आणविलीं आहेत त्यांत निमे पलटणाचा दरमहा निजामअलीखान याणीं द्यावा अर्से[1] करारांत नबाबासीं आहे. येविशींचें राजश्री सदाशिव दिनकर यांचें पत्रीं लिहिलें तें कळलें. पलटणें आलींच असतील. लिहून कळवावें. रा॥ छ० २९ रमजान हे विनंती.

नं. ३००७. ( श्रावण शु० ९–३ आगस्ट. )

गोविंद सखदेव यांचें पत्र छ० ८ सवालचें बनीकोप परगणे लक्ष्मेश्वर येथून—

" रा॥ हरिपंत व भोंसले व तहवारजंग वगैरे झाडून फौजसुद्धां दहा वीस तोफा बरोबर घेऊन तलाव्यास शत्रूचे गोटावर जाऊन

१ हें वाक्य उपरोधक आहेसें वाटतें.

उभे राहिले. कांहीं फौज गोटाचे पश्चिमेस वाळानदीपर्यंत गेली. तिकडे त्याची कही गेली होती त्यापैकीं तीन चारशेंपर्यंत बैल व शंभर दीडशें तट्टू आणिलें. बाकी कही वाळानदीपार होऊन गेली. नदीस उतार जाला आहे. इकडील कांहीं लोक कहीपाठोपाठ नदीपार गेले होते; परंतु शत्रूचा जमाव तिकडून मोठाच आला, यामुळें परत आले. ते दिवशीं आम्हांकडील फौज श्रीमंत राजश्री दादासुद्धां छबिन्यास होती, याजकरितां आमची फौज ते दिवशीं गेली नव्हती. श्रीमंत राजश्री दादा मात्र चार पांचशें स्वार घेऊन गेले होते. इकडील फौजा गेल्या, परंतु शत्रु गोटाबाहेर तयार होऊन आला नाहीं. अघाडीपासून तोफा मारीत होता. इकडीलही तोफा त्याचे तोफांवर लागू केल्या होत्या. याप्रमाणें शेंपन्नास गोळे मारून मग माघारे फिरून गोटास आले."

नं. ३००८. श्रीगणराज. ( श्रावण वद्य ८–१७ आगस्ट. )
पै॥ छ० २७ सवाल.

अपत्यें शिवरामानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २२ सवाल गुरुवारपर्यंत वडिलांचे आशीर्वादेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं छ० १५ सवालचीं पत्रें कनकागिरीच्या मुक्कामाचीं मिरजेस पाठविलीं तीं पावलीं. " राजश्री हरीपंततात्या व मोगल मागें होते तेही कनकागिरीच्या सुमारें दोन कोसांवरी आले. शत्रूची फौज परतीरास गलगनाथाचे सुमारें आहे. ( त्यानें ) टोकरे जमा केले आहेत. तेथें नदीं उतरावी, अगर हरिहरचे सुमारें उतरावी, अशी त्याची मसलत आहे. एक दोन रोजांत आमची फौज सारी गलगनाथाचे सुमारानें जाणार. बुरान-

१ लष्करांत थोरले बंधु रघुनाथराव नीलकंठ होते त्यांस हें शिवराव सुभेदारांचें पत्र कुरुंदवाडाहून.

उद्दीन कलघटगी मिश्रीकोटाजवळ आहे. होळकर हुबळीवरी आहेत." म्हणोन लिहिले तें सविस्तर कळों आलें. गणेशपंत बेहरे यांस समाधान नव्हतें. देवाज्ञा जाहले. चांगला मनुष्य होता. अनुचित जाहलें. उपाय काय ? श्रीगणेशपूरच्या नवबागेंत हरजिनसी झाडें वरचेवरी आणून लावून देतों. इकडे पर्जन्य मातबर अद्याप जाहला नाहीं. पकिपाऊस मात्र आहे. पेरण्या जाहल्या. जोंधळे चांगले उगवून आले. कोळपे धरिले आहेत. मघा नक्षत्राचा पर्जन्य मातबर जाहला तरी उत्तम आहे. पहावें. कस्तुरी चांगली तोळाभर पाठवून द्यावयाविशीं आज्ञा केली, आज्ञेप्रमाणें कस्तुरी एक तोळाभर पाठविली आहे. सेवेशीं पावेल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३००९. श्री. ( श्रावण व० ३०–२३ आगस्ट. )

पै।। छ० २८ सवाल. श्रावण.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं –

विनंती सेवक दादो लक्ष्मण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता।। छ० २८ सवाल बुधवार जाणोन स्वकीय लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों ते मंगळवारीं संध्याकाळीं सडे स्वारींत पावोन प्रातःकाळीं श्रीमंत राजश्री तात्या व राजश्री बापू यांची भेट घेतली. नंतरी राजश्री विसाजी बापूचें वर्तमान तर पत्र मी अलाहिदा लिहिलें आहे त्यावरून कळेल. स्वामीचीही फौज (कोपळाहून) बोलाविली म्हणून श्रीमंत राजश्री तात्यानीं व बापूनीं सांगितलें. वरकड मजकूर तरी काली फौजा गेल्या होत्या त्यांची यांची गोळागोळी जाली. इकडील एक दोन भले लोक गोळीने जायां जाले.

१ गणशवाडीच्या. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर कोपळास वेढा घालून बसले होते त्यांस त्यांच्या कारकुनानें हें व पुढच्या नंबरचें अशीं दोन पत्रें हरिपंतांच्या लष्करांतून लिहिलीं आहेत. ३ तात्या बापू=हरिपंत फडके व विसाजीपंत आटवले.

त्यावर रात्रीं छाप्याची आवई होती म्हणून खांसा स्वारी सर्व बुनगें सोडोन दोन कोसांवर गेले ते रात्री राहून चार घटका दिवसा आज आले. यापूर्वींचें वर्तमान परस्परें समजोन घेतलेंच असेल. खासा शत्रु कांहीं अद्यापि उतरला नाहीं. सरंजाम बारसुद्धां चाळीस हजार, तोफा चाळीस पन्नास, ऐसा वाळा नदी पाठीशी घेऊन उतरला आहे. इकडील फौजेचा व शत्रूचे फौजेचा मोकाबला काली जाहला. त्याजकडील + +[२] + + + सायंकाल जाहल्यानंतर माघारे सरोन आले. पुढें दिवसा तोंडावर आज गावडे वगैरे पागा पाठविल्या आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. अलीकडे कांहीं वर्तमान जाल्यास सेवेशीं लिहून कळवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०१०. श्री. ( भाद्रपद शु० १–२४ आगस्ट. )

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक दादो लक्ष्मण. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ सवाल गुरुवार प्रातःकाळपावेतों मुक्काम सडी स्वारीची फौज वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडून आल्यापासून पत्रें येऊन सांभाळ होत नाहीं. इकडील वर्तमान तरी काली जासूद जोडी रवाना केली त्याजवरून कळलें असेल. अलीकडे वर्तमान तरी रात्रीस शत्रूची फौज चालू जाली म्हणोन आवाई आली. त्याजवरून श्रीमंत राजश्री तात्यांची स्वारी गोटापुढें तयार होऊन आज प्रातःकाळीं आली. फौजेंत आवाई फार आहे. स्वामीची फौज येण्याविषयीं काली दोन वेळ श्रीमंत राजश्री तात्यानीं विचारिलें. कोण आले, काय वर्तमान, त्यास कधीं येतात, याप्रमाणें ( विचारणें )

१ स्वतः हरिपंत. २ येथें पत्र फाटून मजकूर गेला आहे.

आहे. येथें जासूद जोड्या होत्या त्या स्वामीकडे गेल्या त्याचें उत्तर आलें नाहीं. हल्लीं एक जोडी होती त्यांजबरोबर पत्र पाठविलें आहे. तेथें मुक्काम दोन आहेत. शिरटीचे मैदानीं येथून कूच करून जाणार. तेथें आसपास डोंगर आहेत. राऊत समागमें दिल्हे ते मंगळवारीं न विचारितां निघोन गेले. जासूद जोड्या दोन येथून गेल्या त्या पाठवावयासीं आज्ञा व्हावी. हरपनहल्लीकडील कारकून पाडाव आले, त्यासीं राजश्री बाजीपंत अण्णा तयार होऊन सडे स्वारीस होते, त्यांनीं पायचें माणूस कापून कारकून धरून आणिला आहे. शत्रु रिपु खासा उतरला आहे असें म्हणत आहे. मोगलाची कही पाडून थोडी बहुत काली ( शत्रूनें ) नेली. साऱ्या फौजा मोगल व भोसलेसुद्धां आहेत. आपले येणेंविसीं कोठें आले हें राजश्री तात्या व बापू विचारितात. पत्राचें उत्तर द्यावयाविसीं आज्ञा संपूर्ण करीत जावी. सेवेशीं श्रुत होय. राजश्री विसाजीपंत बापू याचे येथें श्राद्ध आहे म्हणोन बुनग्यांत गेले. तिसरे प्रहरीं येतील. वरकड विशेष झाल्यास सेवेशीं लिहून कळवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. आज दिवसा पागा वगैरे पुढें तोंडावर पाठविल्या आहेत. सेवेशीं कळावें हे विज्ञापना.

नं. ३०११. श्रीगणपति. ( श्रावण—आगस्ट. )

विनंती उपरी. तुमची चिठी व बातमीची चिठी पाठविली ती पावली. वर्तमान कळलें. छबिन्यास व लोकांस व गोटांत तोफखान्याकडे हुशारी करविली. परंतु ज्यापक्षीं तेथें[२] स्वारींची ताकीद जाली येविशींची बातमी आली; त्यापक्षीं छबिन्यास फौज मातबर, फौजेंत कोणी सरदार असावा. त्यास राजश्री व्यंकटराव घोरपडे किंवा तुम्हीं जावें तेव्हां खातरजमा होईल. नाहीं तरी शें दोनशें राऊत सांगितले

१ ही चिठ्ठी रामचंद्र परशुराम पटवर्धन यानीं कोणा सरदारास लिहिली हें समजत नाहीं. २ टिपूच्या गोटांत. ३ सोंडूरकर.

तरी त्यांतील निम्मे जातील ऐसें आहे. तरी याचा विचार करावा, आणि प्रातः तलावा जाऊन करावा. नाहीं त्यापक्षीं कूच करावें. त्यास काय तें उत्तर पाठवावें. आपण अथवा व्यंकटराव आतांच निघून जावें म्हणजे खातरजमा आमची होईल. हे विनंती.

नं. ३०१२. श्रीगणपति. (भाद्र० शु० २–२५ आगष्ट.)

आशीर्वाद उपरी........तात्यांचा हेतु कीं, तुम्हीं येथें येऊन बसावें असा आहे. तरी लवकर यावें. आम्ही ऐकितों कीं, आपण नरगुंदकरितां मुक्काम करून राहिलां ! थोर आहां ! सरकार लक्ष काय, चाकरीचा प्रसंग कसा पडला आहे, तें सोडून नरगुंदाकरितां अडून बसावें हें आमचे विचारें ठीक दिसत नाहीं. हे चाकरी जाल्यावर नरगुंद कोठें जात नाहीं ! मग अडणें, रूसणें केल्यास सोयीचें पडेल, वं जसें म्हटलें तसें चालेल. तर या समयीं तेथें राहणें यथास्थित नसे. देखत चिठी रात्र होऊ अगर दिवस असतां येथें येऊन पोंचणें. अनमान केल्यास मी परिछिन्न तुम्हांशीं बोलणार नाहीं. तरी आर्धीं आर्धीं कूच करून येणें. अगर तुम्हीं ( सडे ) येणें. प्रातःकाळीं सर्व लष्कर येईल. झुजाचा समय असतां तुम्हीं ऐकतांच यावें हे तो तुमची चाल. ऐसें असतां त्यांची चिठी जाऊन आज पांच दिवस राहिलां, यावरून आम्हांस ठाऊक, आम्हीं तो न हसूं. परंतु सर्व लोक हसतात याचें मजला फार वाईट

---

१ नरगुंदकरांच्या सुटकेच्या जाबसालाबद्दल रघुनाथराव कुरुंदवाडकर अडून बसले होते त्यांच्या समजुतीकरितां हें पत्र लिहिलेलें आहे. पण तें कोणीं लिहिलें हें समजत नाहीं. पत्र परशुरामभाऊंचें म्हणावें तर ते लष्करांत नव्हते. रामचंद्रपंत आपाचें म्हणावें तर ते रघुनाथरावांपेक्षां लहान असल्यामुळें ' आशीर्वाद ' लिहिणार नाहींत. आशीर्वादाचा मायना लिहिणारे हरिपंततात्यांच्या लष्करांत एक आपा बळवंत मेहेंदळे मात्र होते. परंतु त्यांच्या पत्रावर ' श्रीगणपति ' हें निशाण नसतेंसें वाटतें. पत्रावर तारीख आहे ती पत्राची नकल घेणाऱ्याच्या हातून चुकून पडली व मूळ पत्रांत जमादिलाखर अगर रज्जब महिना असावा, असें मानल्यास मात्र हें पत्र परशुरामभाऊंनीं बदामीच्या वेढ्यांत लिहिलें असें सिद्ध होईल.

वाटतें. तरी पत्र पावतांच स्वार होऊन येणें. नरगुंदचें काम करून घ्यावयास गुंता पडणार नाहीं. परंतु प्रसंगाप्रमाणें चालावें. सरकारचाकरी असतां अडणें हें ठीक नाहीं. रवाना छ० ३० सवाल लोभ कीजे हे आशीर्वाद.

पैवस्ती छ० १ जिल्काद. सन सब्बा समानीन.

नं. ३०१३. (भाद्र० शु० १३—६ सप्टंबर.)

मिरजेस बाळासाहेबांस लष्करांतून गोविंद सखदेव यांचें पत्र. पै॥ छ० १५ जिल्कादचें.

" कनकगिरीचे मुक्कामावरून पत्र पाठविलेंच आहे. त्या अलीकडील वर्तमान तरी राजश्री हरिपंततात्या यांणीं मोगलअलीस निरोप दिला. ते हैदराबादेस गेले. त्यांजकडील तहवारजंग पेशजी बदामीवर होते त्याप्रमाणें येथें राहिले आहेत. कनकगिरीवरून कूच होऊन कोपळानजीक उतरले. बहादूरबिंडा संधानें करून हस्तगत जाला. कोपळचें संधान नव्हतें. परंतु आठ पंधरा दिवस तेथें मुक्काम होता तर संधान यावयाचें होतें. इतक्यांत शत्रु गलगनाथावरून टोकरे जमा करून नदी उतरून अलीकडे उत्तरतीरास आल्याचें वर्तमान आलें. तेव्हां श्रीमंत राजश्री दादांस फौजसुद्धां कोपळानजीक ठेवून राजश्री तात्या फौजसुद्धां कळीकरेचे बारीनें येऊन येथें मुक्काम केला. शत्रु येथून पांच कोसांवर आहे. शत्रु तोफांसुद्धां तुंगभद्रा व वाळा नदीच्या संगमास उतरून राहिला. पाठीमागें नदी, पुढें मातबर ओढा आहे. जागा अडचण पाहून राहिला. येथें रा॥ हरिपंततात्या आले. नंतर दुसरे दिवशीं झाडून फौजसुद्धां तयार होऊन शत्रूकडे गेले. गोटाजवळ फौजा जातांच शत्रूकडील तोफांची मारागिरी फारच जाली. तेव्हां तेथें ठराव न होय याजकरितां माघारे सरकून उभे राहिले. मग गोटास आले. राजश्री

बाजीपंत अण्णा हुजरात बरोबर घेऊन पुढें गेले होत त्यांजकडील दहा बारा घोडीं व दहा बारा माणूस ठार पडलें. याप्रमाणें वर्तमान जाहलें. मग श्रीमंत राजश्री दादांस येण्याविशीं पत्र गेलें. त्याजवरून बहादूरबिंडयाहून कूच करून येथें आले. होळकरांसही येण्याविसीं पत्रें गेलीं आहेत. दोन चार दिवसांत येणार आहेत. इकडे पर्जन्य अगदीं नाहीं. वैरण अगदीं मिळत नाहीं."

नं. ३०१४. ( भाद्र० शु० १२–९ सप्टेंबर. )

बाळासाहेबांस मिरजेस लष्करांतून गोविंद सखदेव यांचें पत्र. पै॥ छ० १४ जिल्कादचें.

"रा॥ हरिपंततात्यासुद्धां काल झाडून फौजा तयार होऊन तलाव्यास गेल्या होत्या. शत्रूचे गोटापासून कोसावर तात्या उभे होते. वरकड फौजा राजश्री बाजीपंत अण्णा व श्रीमंत राजश्री दादा पुढें गोटापासून आदकोसावर गेले होते. तेथें शत्रूकडील तोफांचे गोळे येत होते. ते समयीं आम्हांकडील फौजेंतील व हुजरातीचे पांढरे यांचे पथकांतील दोन चार घोडीं माणसें ठार जालीं. तेथें प्रहरपर्यंत उभे राहून माघारे गोटास फौजा आल्या. शत्रु आपले गोटाबाहेर तयार होऊन उभा राहिला होता. तेथून पुढें आला नाहीं. गोटाचे अघाडीस टेंकडया आहेत त्यांजवर बातेऱ्या बांधून वर तोफा चढवून मजबुतीनें बसला आहे. जागा लौकर सोडीत नाहीं असा सुमार दिसतो."

नं. ३०१५. ( भाद्र० व० २–१० सप्टेंबर. )

मिरजेस बाळासाहेबांस लष्करांतून गोविंद सखदेव यांचं पत्र छ० १६ जिल्कादचें. नजीक कपतगड बनीकोप परगणे लक्ष्मेश्वर येथून—

" शत्रु गलगनाथानजीक उत्तरतीरास आहे तेथेंच आहे. इकडील फौजा दोन वेळ त्याचे गोटापर्यंत तलाण्यास गेल्या होत्या, परंतु बाहेर निघून आला नाहीं. जाग्यावरून तोफांची मारागिरी करितो. गोटाचे अघाडीस चार बातेऱ्या त्यानें बांधल्या आहेत. छ० ३ जिल्कादीं रात्रौ शत्रु दहा पंधरा हजार बार व तोफा घेऊन इकडील छबिन्यापर्यंत येऊन छबिन्याचे लोकांवर दहा पंधरा गोळे टाकून लागलाच माघारा गेला. त्यानंतर आठा दिवशीं छ० ११ जिल्कादीं रात्रौ खासा फौज व बार व तोफा घेऊन छापा घालावयासीं आला. इकडील छबिन्याचे लोकांवर तोफा लागू केल्या. ते दिवशीं छबिना राजश्री त्रिंबकजीपंत आठवले यांचा होता. तेव्हां बाण सोडीत माघारे निघाले. तों गोटांतील फौजही झाडून तयार होऊन पुढें गेली. रात्रीचा समय याजमुळें गोटाचे अघाडीस रा॥ हरिपंततात्या उभे राहिले. शत्रु नीट तोफा मारीत गोटाजवळ येऊन तोफा मारूं लागला. तेव्हां गोटाचे अघाडीपर्यंत गोळे येऊन पडले. तेथें उभा राहून दहावीस गोळे मारून माघारा फिरला. आणि एक कोस माघारा जाऊन तेथें तोफांचे बार केले. ते समयीं माघारा फिरून गेला असें समजलें. तेव्हांच पाठीवर फौजा गेल्या, परंतु काळोखी रात्र याजमुळें गांठ पडली नाहीं. याप्रमाणें वर्तमान जाहलें. शत्रूची धमक भारी. परंतु इकडील फौजा फार यामुळें दिवसा चालून येत नाहीं. ही [1]॥ सोडवावी ह्मणून दोन वेळ आला होता. पुढें काय घडतें पहावें छाप्याचे दिवशीं इकडील फौजेंतील पांच चार माणूस व पांच सा. घोडे ठार व जखमी जाले. काल येथून कूच होणार होतें. परंतु नबाबाकडील कांहीं जिनसी सामान व तोफा व गाडद दोन चार हजार येथून आठ कोसांवर आले ह्मणून वर्तमान आलें.

---

१ तोफखान्याकडचें. यावरूनच आडनांव जिनसीवाले.

याजकरितां मुक्काम जाहला. तें सामान आल्यानंतर येथून कूच होऊन सुरणगी नजीक शिरहट्टी येथून पांच कोस आहे तेथें जाणार. तुंगभद्रा नदीस उतार दाटका[1] जाला म्हणून वर्तमान आहे."

नं. ३०१६. ( भाद्र० व० ३–११ सप्टेंबर. )

पुण्याहून नाना फडनवीस यांचे लष्करांत रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पत्र—

"राजश्री परशुरामपंत भाऊ चिरंजीवाच्या मुंजीकरितां तासगांवास आले. मुंज जालियावर लष्करांत जावें असें निश्चयांत आलें असतां अद्यापि तासगांवासच राहिले आहेत! आम्हीं येथून बहुता प्रकारें लिहिलें त्याचीं उत्तरें आलीं कीं, "डेरे राहुटया जुन्या जाहल्या याकरितां खारवे व खाद्या पुण्याहून आणिल्या आहेत. डेरे राहुट्या तयार जाहल्यावर निघून जाऊं." अलीकडे ऐकिलें कीं पुण्यास यावें असा त्यांचा विचार आहे. त्यास मसलतीची सर्व भिस्त भाऊंवर असतां तासगांवास राहणें त्यांस कसें विहित दिसतें? पुण्यांत यावयाचा विचार चित्तांत आणिला हें तर लौकिकास एक[2] प्रकार, असें जाणोन मागती लष्करांत लवकर जावें याकरितां लिहिलें आहे. आपणही याविषयीं उद्योग करीत असतीलच. करावा. टिपू तुंगभद्रा उतरोन आला आहे. सावध असत जावें. रवाना छ० १७ जिल्काद."

नं. ३०१७. श्री. ( भाद्र०–सप्टेंबर. )

विनंती[3] उपरी. दह्यांची शिंकाळी प्रातःकाळीं येथून यावयाची नाहीं. आजच दोन शिंकाळ्या पाठविल्या. गौळी याजकडील दूध

१ दाटका उतार=जेमतेम उतार. २ चमत्कारिक. ३ अघाडीस सड्या स्वारींत रघुनाथराव कुरुंदवाडकर होते त्याबरोबरच्या कोणा कारकुनास बुनग्यांतल्या कारकुनाचें पत्र गेलें तें उत्तरासुद्धां.

आणवावें तर गौळी तेथेंच आहेत. सडी स्वारीस येथून शिंकाळी नित्याप्रमाणें पोहोंचणार नाहीं. येथून सडी स्वारी तीन कोस, तशांत झाडी. असा प्रकार आहे. गौळी याच्या म्हैशी कांहीं नेल्यास उत्तम. नाहीं तर शिंकाळी लावून द्यावयाचा बेत कसा करावा तें लिहून पाठवावें त्याप्रमाणें करूं. शिंकाळीचा बोभाट होईल यास्तव लिहिलें आहे. याचें उत्तर यावें हे विनंती.

उ०—तुम्ही इकडून बुनगें ठेविलें असतां गौळी कसा येईल ? यास्तव नित्य शिंकाळी तेथून यावी. गौळी यास ताकीद येण्याविर्सी केलीच आहे. परंतु तथापि न आल्यास दिवसामध्यें सायंकाळची एक तरी येत जावी. पहांटेस कांहीं पोहोंचणार नाहीं, परंतु प्रहर दिवसास येत जाईल. कळावें. उदईक स्नानसंध्या उरकून ( तला-व्यास ) जावें असें आहे. घडेल तें खरें ! हे विनंती.

नं. ३०१८ ( भाद्र० व० ५–१२ सप्तं. )

कोन्हेर नरसिंह यांचें पत्र १८ जिल्कादचें लष्करांतून मिरजेस—

“ काल मंगळवारीं लष्करचें कूच होऊन बडणी लक्ष्मेश्वर व नारायणपूर येथें आले. उपरांतीक त्याची फौज इटगी तेरदहळ्ळी येथें नदीअलीकडे होती तिनें येऊन मुकाबला दिला. पांच सहा घटका झूज जाहलें. परंतु लढाईंत कोणी कोणास हार न जातां संध्याकाळीं दोनी फौजा आपापल्या गोटास गेल्या. त्यांच्या राउ-तांचीं तोंडें पहातांच छबिन्याचे राउतांनीं गोटांत खबर कळविली.

* कोन्हेर नरसिंह यांचीं पत्रें दोन असून त्यांत पुष्कळ पाल्हाळ लिहिला आहे. परंतु त्याची लिपी वाईट व भाषा अर्धवट कानडी मराठी अशी असल्यामुळें त्याच्या लिहिण्याचा चांगलासा बोध होत नाहीं. एका पत्रांतून समजला तसा सारांश मात्र येथें उतरून घेतला आहे.

तेव्हां तमाम फौज तयार होऊन येलापूर परगणे लक्ष्मेश्वर येथें जाऊन उभे राहतांच त्याणीं नीट फौजेवरी चालून घेतलें. त्यास मोडून माघारे घालीत जात असतां वाटेंत ओढा आहे तेथें दहा हजार बार शत्रूकडील दबा धरून बसले होते. त्याणीं पन्नास पाउणशें घोडे माणूस जायां जखमी केलें. मग इकडील फौज सावरून उभी राहिली. त्यानंतर चांगलेंच जूज जाहलें. शत्रुस मागें सारून फौज माघारी आली.

नं. ३०१९. ( १४ सप्टेंबर. )

धोंडो नरसी याचें पत्र भाद्रपद वद्य सप्तमीचें मुक्काम बेलगली प्रांत हुबळीनजीक मिश्रीकोट येथून.

" श्रीमंत राजश्री तात्या[1] बनीकोपेहून कूच करून बडणी प्रांत लक्ष्मेश्वर येथें आले. बनीकोपेस असतां मागील भौमवारीं शत्रु रात्रीस छापा घालावयास आला होता. सरकारचा छबिना उभा होता त्याची गांठ पडून गोळागोळी होऊं लागली. ते आवाज ऐकोन तात्या फौजेसह तयार होऊन आले. महताबा[2] लावून रात्रीं परस्परें गोळागोळी जाली. दोन घटका रात्रीपासून सूर्योदयपर्यंत उभे होते. उपरांत आपापले ठिकाणास गेले. शत्रु इटगीहून कूच करून रिती प्रांत हावनूर येथें गेला. तेथून देवगिरी प्रांत सावनूर येथें येणार. येथील उभयतां[3] सरदार रात्रीं छबिने राखून स्वस्थ आहेत. बुराणउद्दीन कलघटगीस आहे. आजपर्यंत शत्रूकडील मराठी स्वार पांचशें पर्यंत व पायींचें माणूस दीडशेंपर्यंत फुटून इकडे येऊन मिळालें. आणखीही येण्याचें संधान आहे. येथील दोन्ही लष्करांत धारण अडीच पायली जाली आहे. थोरल्या लष्करांतही वैरणीचें मोठेंच संकट पडलें आहे. "

---

१ हरिपंत फडके, २ चंद्रजोती, ३ होळकर व बेहेरे.

श. १७०८ . टिपू सावनुराजवळ येतो. इ. स. १७८६

नं. ३०२०. श्री. ( भाद्र० व० ९–१६ सप्तंबर. )

पै॥ छ० ४ जिल्हेज सन सब्बा समानीन आश्विनमास.

सेवेशीं गोविंद सखदेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ० २२ जिल्काद मुक्काम नजीक सावनूर एक कोस येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं श्रीमंत राजश्री दादांचे जासुदासमागमें छ० १३ जिल्कादचें पत्र पाठविलें तें छ० १९ तारिखेस पावलें, 'कबाडाचीं तट्टें व दाणेकरी याचा घोडा मागाहून पाठवून देतों. राहुटया तयार होत आहेत,' ह्मणोन लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. राहुटया तूर्त महिना पंधरा दिवस पाठवूं नये. प्रस्तुत सडी स्वारी आहे. एक महिना जाहला, शह समीप गांठ पडली आहे. येथील वर्तमान बनीकोपचे मुक्कामावरून दोन पत्रें पाठविलीं तीं पावलींच असतील. त्यानंतर तेथून कूच करून बडणी परगणे लक्ष्मेश्वर येथें आले. शत्रुही गलगनाथावर होता तेथून कूच करून वाळानदीतीरानेंच सावनूरचे सुमारें चार कोस आला. तेथून दुसरे दिवशीं कूच करून हत्तीमोतूर सावनुरापासून तीन कोसांवर वाळा नदीतीरीं येऊन छ० १९ तारखेस मुक्काम केला. तेव्हां रा॥ हरिपंततात्या फौजसुद्धां बडणीहून कूच करून येथें परवा छ० २० तारिखेस आले. शत्रूस व यांस दोन कोसांची तफावत आहे. त्यांचे व यांचे छबिन्यास कोस पाऊण कोसांचें अंतर राहतें. शत्रु मुक्काम करून राहिला आहे. याजउपरी घडेल तें प्रमाण. राहुटया तूर्त न पाठवाव्या. लिहून पाठवूं ते समयीं पाठवाव्या. उंटाकरितां गळाठा फारच जाहला आहे. भाद्रपदमास होत आला; आश्विनमासचे बेगमीस ऐवज पाहिजे; येविशीं विनंति लिहिली आहे. पेशजी ऐवज बदामीचे रोखें पाठवावा म्हणून सेवेशीं विनंति लिहिली होती. प्रस्तुत लष्कर इकडे आलें. त्यास ऐवज

रामदुर्गास पाठवावा. तेथून पुढें पत्र यावें. इकडील कूच मुक्कामाचा सुमार पाहून स्वार पाठवून ऐवज आणवूं. आजी चार दिवस घोड्यावरील जीन निघत नाहींत. शत्रूची धमक फार दिसते. यांत ईश्वर इच्छेनें घडेल तें प्रमाण आहे! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०२१. श्री. ( भाद्र०—सप्टेंबर. )

विनंती उपरी. उदईक प्रातःकाळींच चार घटका रात्रीस कूच आहे, यास्तव श्राद्ध उगेच उदक मात्र सोडतील. यास्तव दूध पांचशेर पाठवावें. चार सहा घटका रात्रीस पाठवावें. तांदूळ मोठे व कणीक व बारीक तांदूळ व गूळ व साखर लिहिल्याप्रमाणें पाठवावें. तुम्ही भोजनास न यावें. तेथेंच करावें. जाजती येथें कांहीं जेवणार नाहींत. धोतरजोडे पाठवावे. जानवीं वगैरे लिहिलेप्रमाणें किरकोळ सामान पाठवावें. भाजीही पाठवावी. टिपू आज कूच करून सावनूरचे सुमारें वाळा नदीपलीकडून चालला. आमची फौज उभी होती तेव्हां कूच करून गेला. पंचवीस पात्रांचें सामान पाठवावें. जाजती न पाठवावें. हे विनंती.[1]

नं. ३०२२. ( भाद्र० व० ९—१६ सप्तंबर. )

रघुनाथराव कुरुंवाडकर यांचें पत्र बाळासाहेबांस छ० २२ जिल्कादचें नजीक सावनूर येथून मिरजेस—

" शत्रूस व इकडील फौजांस दोन कोसांची तफावत आहे. बनीकोपेवर मुक्काम होता तेथें वैरण मिळेना. याजकरितां कूच करून सुरणगीच्या मुक्कामास आलों. तों शत्रुही कूच करून सावनूरचा रोख धरून आला. तेव्हां आम्हांसही मुक्काममजकुरास येणें प्राप्त जालें. येथें येऊन आज तीन दिवस जाले. "

---

१ सड्या स्वारींतल्या कारकुनाचें बुनग्यांतल्या कारकुनास पत्र. श्राद्ध करणारे रघुनाथराव कुरुंदवाडकर.

नं. ३०२३. श्री. ( भाद्र० शु० ५–१८ सप्तंबर. )

हरिगुरुभक्तपरायण राजमान्य राजेश्री हनुमंतबावा संस्थान चाफळ स्वामींचे सेवेशीं.

चरणरज गंगाधरराव गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ४ रबिलाखरपर्यंत वर्तमान आपले आशीर्वादें यथास्थित असे. विशेष. आपाजी शंकर व त्याचा पुत्र धोंडो आपाजी कुलकर्णी मौजे हिंगणगांव कर्यात कवठें महांकाळ व मौजे करोली व मौजे म्हैसाळ कर्यांत देशिंग यांनीं सदाशिवभट बिन गोपाळभट याशीं खटला करून हिंगणगांव येथें काठयांखालीं जिवें मारिलें. कुलकर्णीमजकुरांस ब्रह्महत्या घडली. सबब ते देशांतरास गेले. पुढें सन सलास तिस्सैनांत सदाशिवभट यांचे पुत्र लक्ष्मण सदाशिव व सखाराम सदाशिव यांनीं किल्ले मिरजेचे मुक्कामीं येऊन विनंती केली जे, 'आमचे बापाचा खून जाला. येविशीं आम्हांस काय आज्ञा!' म्हणोन, त्यावरून चौकशी करितां उभयतांचे बापाचा खून आपाजी शंकर व त्याचा पुत्र धोंडो आपाजी यांनीं नाहक केला. यास्तव त्यांच्या कुलकर्णाच्या वृत्तीपैकीं निमे वृत्ति लक्ष्मण सदाशिव व सखाराम सदाशिव यांस द्यावी; असें ठरोन येविशीं पत्रेंही जालीं व हिंगणगांव येथील वृत्तीविषयीं आपणास पत्र तपशीलवार लिहिलें आहे. त्या अन्वयें हिंगणगांवकरांस व या उभयतांचे नांवें आपण पत्रें द्यावीं. सन सीत तिस्सैन. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

---

१. ता. १८ सप्टंबर सन १८९५ रोजीं लिहिलेलें हें पत्र येथें चुकून लागलें आहे.

नं. ३०२४. ( आश्विन शु० १--२३ सप्टेंबर. )

रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र लष्करांतून मिरजेस बाळा-साहेबांस छ० २९ जिल्कादचें—

" शत्रूस व आम्हांस दोन कोसांची तफावत आहे. शत्रूच्या तळापासून सावनूर अर्डाच तीन कोस आहे. आज दहा अकरा दिवस जाले. शत्रु जागा धरून उतरला आहे. त्यामुळें आम्हांस कूच करितां येत नाहीं. कूच करून डावें उजवें व्हावें तर साव-नूरच्या गळीं पडेल. याजकरितां येथेंच मुक्काम करून राहिलों आहों. पुण्याहून राजश्री नानाचें पत्र आलें त्याची नक्कल करून पाठ-विली आहे. "

नं. ३०२५. श्रीगणपति. ( २३ सप्टेंबर. )

पै॥ छ० १ जिल्हेज. सन सब्बा समानीन. आश्विन मास.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें विष्णूनें शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता॥ आश्विन शु॥ प्रतिपदापावेतों वडिलांचे आशीर्वादेंकडून सुखरूप असों. विशेष. दिनकरद्योताची पोथी आपणापासून पेशजी अर्चेस नेली होती ती हल्लीं पाठविली आहे, तर वे॥ रा॥ रामभट छत्रे वडिलांपाशीं आणून देतील. घेऊन उत्तर पाठवणेंस आज्ञा करावी. सदैव पत्र पाठवून सांभाळ करावा. बहुत काय लिहिणें लोभ करीत जावें हे विज्ञापना.

नं. ३०२६. ( आश्विन शु० ३--२५ सप्टेंबर. )

पुण्याहून विसाजी नारायण वाडदेकर यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस. छ० २ जिल्हेजचें—

---

१ पत्राचा सारांश नं. ३०१६ स छापला आहे.

" श्रीमंत राजश्री नाना श्रीमंत राजश्री भाऊंस पत्रें वरचेवर लिहितात जे, ' फौजेंत जावें. " भाऊंचीं पत्रें येतात कीं, ' आम्ही पुण्यास येतों ! ' नानांचें म्हणणें कीं, ' तिकडे मसलत पडली असत, इकडे येणें ठीक नाहीं. शत्रूस आवई जाईल कीं, भाऊ पुण्याकडे गेले. येणेंकरून दाब कमी होतो. यास्तव लष्करास लवकर जावें. जीं कामें आहेत तीं करून देतों. परंतु येसमयीं न गेलें असतां मसलतीस कमी पडतें. यास्तव जरूर जावें. पुण्यास येऊं नये. ' ऐसें लिहिण्यांत व बोलण्यांतही आहे. स्वामींनींही विनंती करून भाऊंचें जाणें लष्करास घडल्यास चांगलें. येथें आले असतां ते खट्टे, हे खट्टे, असें होतें. "

नं. ३०२७. ( आश्विन शु० ३-२५ सत. )

लष्करांतून रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस पै॥ छ० ५ जिल्हेजचें.

" टिपूकडील वकील नूरमहमदखान वकील यांचें पत्र कपतगुड्डचे मुक्कामीं रा॥ हरिपंत तात्यांचे नांवें आलें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं, आपणाकडील दोघे भले माणूस पाठवावे. त्याजवरून त्याच्या जासूद जोडया दोन आल्या होत्या; पैकीं एक तात्यांकडे व एक सरकारांत, त्यांत ब्राह्मण एक व जासूद एक याप्रमाणें होते. त्याप्रमाणें यानींही येथून जासूद दोघे पाठविले. त्याजबरोबर त्यांचीं उत्तरें आलीं जे, " दोन्ही दौलती मातबर. लघु गोष्टीविशीं खलष पडले. यास्तव ज्या गोष्टीकडून श्रीमंतांचा व आमचा स्नेह अक्षतमरिष्ट चालेल असें व्हावें. गुदस्तां नरगुंदकराकडे पेशकशीचा पैका येणें असतां ( त्यानें आमचे ) महाल मारूनताराज केले.

१ पुण्यास पेशव्यांकडे जावयाची.

आम्ही इंग्रजाचे मसलतीस गुंतलो. बाजत बरसात तंबी करोन पेशकशीचा ऐवज घ्यावा ह्मणून फौज पाठविली असतां आपली फौज कुमकेस आली. दोहीं फौजेचा मुकाबला जाला. कित्तूर संस्थान यादींत लिहिलेलेंच असतां आम्हांकडून अंतर नसतां तिकडून पेशकदमी जाली. तेव्हां इकडून पेशकदमीची तरतूद करणें प्राप्त जालें. यास्तव ज्या गोष्टीकडून खलष न पडतां स्नेह चालेल ते गोष्ट करावी. " याप्रमाणें पत्रें आल्यावर त्यांचीं उत्तरें यानीं लिहून दिलां कीं, " राजश्री सेनाधुरंधर यांजबरोबर वकील पुण्यास गेलेच होते. त्यांजबरोबर जाबसाल बोलण्यांत आले ते फत्तेअल्लीखान यांच्या जाहिराण्यांत आलेच असतील. त्यास त्यांचीं उत्तरें यावीं तशीं आलीं नाहींत. " याप्रमाणें उत्तरें पाठविलीं. टिपूस व आम्हांस दीड कोसाचें अंतर आहे. वैरण अगदीं मिळत नाहीं. आज महिनाभर घोड्यांवरील जीन उतरले नाहींत. अदवानीस नबाबाकडील व सरकारची फौज जाऊन फत्तेअल्लीखान यांनीं मोर्चे लाविले असतां मोहबतजंग याचे कबिले व चीजबस्त दरोबस्त काढून आणिली. त्याप्रमाणें हल्लीं सावनुरासमीप दोनी फौजा असतां बुराणउद्दीन व आपण एकत्र होऊन सावनूर घेऊन नबाबास कबिले सुद्धां घेऊन जावें, आणि आपण सावनुरास रहावें, असेंही फत्तेअल्लीखान याच्या मनांत आहे असें म्हणतात. शत्रूस व आम्हांस अंतर अगदीं थोडें, याकरितां रात्रंदिवस सावधपणें आहों. "

नं. ३०२८. ( आश्विन शु० ८–३० सपटंबर. )

शहापुराहून रामाजी भरमाजीचें पत्र बाळासाहेबांस छ० ७ जिल्हजचें:–

" श्रीमंत राजश्री हरिपंततात्यांचा मुक्काम सावनुरानजीक पूर्वेस आहे व शत्रूचा मुक्काम वाळानदीच्या उत्तरेस आहे. सैदबुरान

१ टिपूसुलतान.

कलघटगीवरून बंकापुरास गेला. शत्रूस जाऊन मिळणार. होळकर सावनुरापासून चार कोसांवर उतरले आहेत."

नं. ३०२९. (आश्विन शु० ९–१ अक्टो.)

लष्करांतून गोविंद सखदेव यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

"प्रथम प्रहर रात्रीस शत्रु तयार जाला आहे म्हणोन बातमी आली होती. त्यावरून जीन मात्र ठेविले होते. त्यानंतर दोन प्रहर गेले, यामुळें थोडीशी असावधता आली होती. इतक्यांत पहांटेच्या प्रहर रात्रीस इकडील छबिना हुजूरचा पुढें होता त्याजवर शत्रु येऊन चार पांच तोफांचे बार व बाण सोडिले. ते समयीं छाबिन्यांतील लोक जागयास बसले होते त्यांपैकीं कांहींचीं घोडीं उधळोन गोटास आलीं. ते दिवशीं छबिन्याबरोबर रा॥ नारोपंत चक्रदेव होते. शत्रु आपण खासा एक बाजूनें, व सैदबुरान यास सरकारच्या इकडील तोफा गोटाचे अघाडीस टेंकडीवर ठेविल्या होत्या, तिकडील बाजूस, याप्रमाणें करून चालून आला. हुजरातसुद्धां उभे राहून तात्यानीं इकडील तोफा झाडून काढिल्या. शत्रु मारागिरी करीत आला तों प्रातःकाळ जाला. सरकारची फौज टेंकड्यांचा आसरा धरून राहिली. इकडील तोफा चार सुरू केल्या. तेव्हां तिकडून मारागिरी तोफांवर जाहली. तेथें रा॥ हरिपंत खासेच उभे राहून इकडील व तिकडील अडीच प्रहरपर्यंत मारागिरी होत होती. इकडील तोफा थोड्या व लहान, शत्रूची मारागिरी फार, यामुळें तोफा माघाऱ्या काढिल्या. हुजरात व होळकर व बेहरे मिळून दोनशें घोडें ठार पडले व माणूसही जायां जखमी जालें. संध्याकाळचे चार घटका दिवसास शत्रु परत गेला. पाठीमागील दुमदारी अस्तमानचे सुमारास जागा सोडून गेली. तेथपर्यंत इकडील फौजा तेथेंच उभ्या होत्या. नंतर तेथें वीस हजारपर्यंत फौज छबिन्यास ठेवून रा॥ हरिपंततात्या रात्रीस गोटास

सावनूरचे उत्तरेस दीड कोसावर आले. छाप्याचे समयीं होळकराकडील कांहीं पेंढारी व बापू होळकर ऐसे शत्रूचे पाठीमागील बाजूस गेले होते त्यानीं तिकडील एक हत्ती व बैलांच्या माळा तोफेच्या रिकाम्या चार व वीस पंचवीस घोडें ऐसें आणिलें!"

नं. ३०३०. ( आश्विन शु० ११–३ आक्टो. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस छ० १० जिल्हेजचें—

"शत्रु काल कूच करून सावनूरच्या दक्षिणेस कोसावर येऊन राहिला आहे. आम्ही सावनूरच्या पश्चिमेस आहों. शत्रूस व आम्हांस दोन कोसांचें अंतर आहे. छ० ९ रोजीं सावनूरकर नबाब मुलेंमाणसें सुद्धां निघोन लष्करांत आले. येथून अण्णिगिरेस जातील. शत्रूचा आगीचा मार भारी यामुळें इकडील फौज ठरत नाहीं."

नं. ३०३१. श्रीगणराज. ( आश्वि० शु० ११–३ आक्टो. )

राजश्री सखो रंगनाथ स्वामी गोसावी यांसीं.

विनंती उपरी. राजश्री शहाजी खामणे हुजरातीकडील याची घोडी परवांच्या छाप्यांत उधळली ती बिरोजी टकले याजकडे आहे म्हणोन कळलें, त्यावरून लिहिलें आहे. तर बिरोजी टकले यास ताकीद करून घोडी सोडून देविणें. रवाना छ० १० जिल्हेज. हे विनंती.

नं. ३०३२. ( आश्विन शु० ११–३ अक्टो. )

गोकाकेहून रामाजी अनंत यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस छ० १० जिल्हेजचें—

"होळकर सावनूरापासून चार कोसांवर होते ते जाऊन श्रीमंत राजश्री तात्यांस मिळाले. सावनुराजवळ आहेत. सैदबुरान बंकापुरास होता तोही शत्रूत वाळा नदीवर जाऊन मिळाला."

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांची कारकुनास चिठी.

नं. ३०३३. ( आश्विन शु० १२–४ अक्टो. )

गोकाकेहून रामाजी अनंत याचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस—

" बुधवार दोन प्रहरचीं आमचीं पत्रें सावनुराहून आलीं. दोन प्रहरीं शत्रूची स्वारी तयार जाली होती. ही बातमी कळून श्रीमंतांच्या साऱ्या फौजा तयार होऊन गेल्या. माणसें निघोन दोन कोसांवर आल्यानंतर दोहींकडून तोफांची मारगिरी ऐकू येत होती म्हणोन माणसानीं सांगितलें. सावनूरकर नबाब सरकारचे लष्करांत आले आहेत. सावनुरांत सरकारचे लोक घातले आहेत. "

नं. ३०३४ ( आश्विन शु० १२–४ आक्टो. )

लष्करांतून गोविंद सखदेव याचें पत्र छ० ११ जिल्हेज सौम्यवासरचें बाळासाहेबांसः—

शत्रूचा छापा तारिख ७ रोजीं आला. मग येथें सावनूरच्या दक्षिणेस आले. शत्रूंचा मुक्काम सावनुरापासून दोन कोसांवर होता तेथून कूच होऊन हुळीकोपी ह्मणून सावनुरापासून कोसावर खेडें आहे तेथें आला. सावनुरांत आसपासचें गुळें फार भरलें होतें, याजमुळें शहर फार गडबडलें. आणि शत्रु दंगेखोर, रात्रीं निकड करील, याजकरितां सावनूरकर नबाब कुटुंबसुद्धां आंत होते त्यांस परवांचे दिवशीं कबिलेसुद्धां बाहेर काढून आणिलें. शहरांतील गुळें बहुतेक बाहेर निघालें. "

नं. ३०३५ ( आश्विन शु० १२–४ अक्टो. )

चिंतामणराव व विठ्ठलराव यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र छ० ११ जिल्हेजचें:—

" विजयादशमीस श्रीमंतांनीं पोषाख अंगावरील कच्या रंगाचे आम्हां उभयतांस पाठविले. खासा स्वारी निघावयाची ते समयीं

अंबारीचा हत्ती पाठविला होता. आम्हीं अंबारींत बसोन स्वारी बरोबर शिलंगणास गेलों होतों. चार घटका कचेरीस बसोन श्रीमंतांस एक मोहोर नजर करून आज्ञा घेऊन घरीं आलों. "

नं. ३०३६. श्रीगणराज. ( आश्वि० शु० १३—५ आक्टो. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे स्वामीचे सेवेशीं:—

पोष्यं महादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ० १३ जिल्हेज गुरुवासरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. शत्रूनें छापा घालून नासाडी बहुत केली म्हणोन राजश्री बळवंतरावजी यांचें पत्र आलें त्याजवरून मोठी काळजी लागली आहे. सविस्तर वृत्त लिहून पाठवावें. मुख्य गोष्ट रात्रंदिवस लष्कराकडील काळजी लागली आहे. सविस्तर लिहून कुइलगोडास पत्रें पाठवीत जावें ह्मणजे येऊन पावतील. जासूद व इमाम टालाईत पाठविला आहे. सविस्तर लिहिणें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ३०३७. श्रीगणराज. ( आश्विन शु० १४—६ अक्टो. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे व राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेशीं—

पोष्य महादाजी बल्लाळ सा।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता।। छ० १३ जिल्हेज भृगुवार प्रातःकाळ जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. शत्रूकडील सविस्तर वर्तमान छापा आल्याचें सविस्तर लिहिलें तें कळलें. येथेंही दोन तीन रोज बाजारी वर्तमान उठलें होतें. परंतु

---

१ पत्र कुरुंदवाडाहून लष्करांत.

तथ्य कळेना, याजवरून चिंता लागली होती. आतां ( तुमचीं ) पत्रें आलीं त्याजवरून सविस्तर कळलें. ईश्वरें श्रीमंत यजमान सुद्धां आमच्या मंडळीची खैर केली हा मोठा लाभ जाहला वरचेवरी अधिकोत्तर होईल तें लिहून पाठवीत असावें. आम्ही येथून एक दिवस दोन दिवसा आड माणसें पाठवून देतों. शत्रु कांहींसा शेर जाहला आहे. त्याचा विश्वास नाहीं. विना त्यास एकदां जरब चांगली बसल्याशिवाय आंच धरीत नाहीं. सर्व भार श्रीवरी आहे ! श्रीकृपेकरून श्रीमंतांचे पुण्यें करून घडेल तें प्रमाण ! आपल्या घरचीं सर्व सुखरूप आहेत. रात्रंदिवस चिंता आपणाकडील लागली आहे. दुसरा निजध्यास नाहीं. इतक्या फौजा असतां + + + + + चालोन आला, तेव्हां शेर जाहला ! फिरोन त्यास जरब बैसे तों सावध असतां उत्तम आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

पो॥ गोविंद त्रिंबक साष्टांग नमस्कार विनंता उपरी. आपण पत्रीं सांभाळ केलेवरून संतोष जाहला. सडच्या फौजा अवाडीस कोसभर होत्या त्या बुनग्यांत आल्या किंवा आपण सडे फौजेंत गेलां, हें कळलें नाहीं. शत्रूनें दगा केला, गळाठा फार केला, परंतु फौजा जमून राहिल्यानंतर शत्रु माघारा गेला. शेर जाला आहे असें दिसतें. यास्तव सावध असावें. यजमानांसही विनंती वरचेवर करावी. अहोरात्र चिंता लागली आहे. सविस्तर पत्रीं सांभाळावें. लाभ करावा हे विनंती.

नं. ३०३८ ( आश्विन शु० १४–६ अक्टो. )

शिवराव नीळकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस छ० १३ जिल्हेजचें कुरुंदवाडाहून—

" तीर्थस्वरूप राजश्री दादांकडून छ० ८ जिल्हेजचीं पत्रें सावनुरानजिक मुक्कामचीं आलीं तीं आपणाकडे पाठविलींच आहेत. " छ० ६ जिल्हेज रोज भृगुवार या दिवशीं रात्रीं टिपूचा छापा येतो, सरंजाम तयार जाला आहे, म्हणोन एक दोन बातम्या आल्या. त्यावरून फौजा आपापले जागां सावध होत्या. पहांटेच्या प्रहर रात्रीस खासा टिपू आपल्या सरंजामासुद्धां निघोन दोन टोळ्यांनीं नीट चालून येऊन छबिन्यावरून गोटाच्या अघाडीस येऊन तोफांची व बाणांची मारगिरी फार केली. सरकारची फौज सारी तयार होऊन त्याच्या तोंडावर उभी राहिली. सरकारच्या तोफाही लागू केल्या. परंतु रात्रीचा समय, आणि त्याचा आगीचा मार भारी, तेव्हां आपल्या तोफा मागें काढून तळ सोडून मार खात पाऊण कोसपर्यंत सरकत अलीकडे आलों. इतक्यांत सूर्योदय जाला. मग सरकारच्या फौजा साऱ्या जमून राहिल्या. सावनूरच्या अंगें होळकरही राहिले. आणि सरकारच्या तोफा चार पांच लागू करून त्याजला मार देऊं लागले. सूर्योदयापासून दोन प्रहर पावेतों परस्परें तोफांची मारागिरी जाहली. शत्रु तेथून माघारा अस्तमानास गेला. आम्ही साऱ्या फौजा शत्रु गेल्यावर मुक्काम मजकुरास अस्तमानीं आलों. लढाईंत तोफेचे गोळे लागून तीनशेंपर्यंत एकंदर घोडीं ठार पडलीं व लोकही फार जायां जाले. " याप्रमाणें ती॥ रा॥ दादानीं लिहिलें आहे. "

नं. ३०३९. (आश्विन शु० १५—७ आक्टो.)

गोविंद सखदेव यांचें पत्र छ० १४ जिल्हेजचें मुक्काम हुलगूर परगणे कारडगी येथून बाळासाहेबांस—

" शत्रु सावनुराजवळ येऊन राहिला होता; त्यास उपाय नाहीं असें जाणून सावनूरकरानीं टिपूचा कौल छ० १३ रोजीं घेतला।

मग शत्रु कूच करून सावनूरचे पश्चिमेस कोसावर बंकापुरच्या बाजूस येऊन राहिला. इकडील फौजेचा मुक्काम मंत्रवडीवर होता तेथून पावणा कोसाचें अंतर जाहलें. तेव्हां तेथून काल कूच करून ( हरिपंततात्या ) येथें आले. आज येथून कूच करून सांवशीचे सुमारें बेणीहाळावर जाणार. शत्रु फारच शेर जाला. ईश्वरसत्ता प्रमाण ! "

नं. ३०४०. श्रीगणराज. ( आश्विन व० ३–१० आ० )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे व राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्य महादाजी बल्लाळ. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १७ जिल्हेज भौमवार पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. ............शत्रूनें छापा घातल्याचें वर्तमान तपशीलवार लिहिलें तें कळलें. शत्रूचा मोकाबला अतिसंनिध, आगीचा मार बहुत, आणि लष्करांत महर्गताही बहुत, आणि लोकांस खर्चासही पावत नाहीं; असा प्रकार असतां सावनुरानजीक फौजेचा टिकाव होणें कठिण दिसतें. शत्रूच्या पिछाडीस कांहीं लाग भाग या फौजेचा साधावयाचा नाहीं. पिछाडीकडून त्याचा रसत वगैरे सामानाचा पुरावा वरचेवर होतो. त्यास कोणे गोष्टीचें कठीण नाहीं. शत्रूभोंवता यांचे फौजेचा तलावा फिरल्यास मग त्यास जड पडेल. तें कांहीं नाहीं. आणखी महिनाभर दम धरून तेथेंच राहिल्यास खराबी मात्र होईल. परंतु कांहीं काटगिरी चालावयाची नाहीं. संनिध राहिल्यास रोज तो छापा घालील, आणि खराबी करील. यास्तव आठ दहा कोसांच्या अंतरानें राहिल्यास छापा आला तरी खबरदारीनें असल्यास कांहीं लाग भाग साधावयास येईल. यांत

1 पत्र कुंदवाडाहून लष्करांत.

काय घडतें तें पहावें. संनिध शत्रूच्या राहून कांहीं उपयोग नाहीं. निवड माणूस मात्र जायां होतें. रात्रंदिवस काळजी लागली आहे. श्रीकृपेंकरून श्रीमंतांचे पुण्यप्रतापें घडेल तें खरें. ............आपण लिहिल्यावरून अदवानीची गत तीच सावनूरची असेल असें दिसतें ! शर्थ जाली ! पुढें शत्रु शेर जाला. सीमा जाली. पुढें भवितव्य काय असेल तें कळत नाहीं. वरचेवर वर्तमान लिहीत असावें. चिंता लागली आहे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ३०४१. ( आश्विन व० ३—१० अक्टोबर. )

गोकाकेहून रामाजी अनंत यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस छ० १७ जिल्हेजचें—

" सावनूर स्थळ शत्रूच्या हस्तगत जालें. शत्रु शेर जाला. वाईट गोष्ट जाली. सरकारच्या फौजा हुबळीपर्यंत माघाऱ्या आल्या. गुळें[1] येथपर्यंत येईलसें दिसतें. "

नं. ३०४२. ( आश्विन व० १३—१९ अक्टोबर. )

आपाजी गोविंद यांचें पत्र बाळासाहेबांस छ० २६ जिल्हेजचें रामदुर्ग येथून—

" तूर्त मी येथें आलों आहें. शत्रु फार शेर जाला आहे. त्याचें तोफेचें सामान भारी. तूर्त शत्रूजवळ दीडशेंपर्यंत तोफ आहे. यास्तव इकडील फौजेची कारगिरी चालत नाहीं तुंगभद्रेस उतार जाहलेनंतर त्याचे पाठीमागून फौजा हिंडूं लागल्यानंतर माघारा सरकेल तर न कळे. "

---

१ गांव सोडून पळणारी रयत.

नं. ३०४३. ( कार्तिक शु० १—२३ अक्टोबर. )

रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र बाळासाहेबांस छ० ३० जिल्हेजचें मु॥ मागडी (?) नजीक शिरट्टी येथून—

"हल्लीं शत्रूचा मुक्काम बंकापुरानजीक आहे. आम्हांस त्यास नजीक होतें आणि तो पाठीशीं आसरा धरून होता, याजकरितां इकडील काट चालणार नाहीं; याजकरितां थोडे थोडे मागें सरकल्यास मैदानांत येईल ह्मणोन कोस कोस कूच करीत मुक्काममजकूरपर्यंत आलों. परंतु शत्रु पाठीवर न येतां आसरा धरून राहिला आहे. सावनूर रक्षावें हें बहुत होतें, परंतु त्यांणीं[1] लबाडी करून शत्रूवर गोळी न उडवितां त्याचे लोक आंत घेतले, याजमुळें उपाय नाहीं. नबाब कबिलेसुद्धां निघालाच होता. दोघे लेंक मात्र आंत होते त्यांस टिपूनें कैद केलें ह्मणोन ऐकतों. ती॥ रा॥ भाऊसाहेबांचे न येण्यामुळें रा॥ हरिपंत तात्या आपले जागीं बहुतच श्रमी आहेत. आपणास विदितच आहे. येथील स्थिति काय ल्याहावी ?"

नं. ३०४४ ( कार्तिक शु० ५–२७ अक्टोबर. )

मोरो आपाजी परांजपे यांचें पुण्याहून पत्र बाळासाहेबांस मिरजेस—

"यादी. यंदां महायात्रेस पुण्यांतील वगैरे गृहस्थ निघावयाची बोलवा आहे त्यांत कोण कोण निघतील न कळे.

१ नारोपंत पोक्षे नि॥ नीळकंठराव गोविंद.

१ रंगोपंत खाडीलकर नि॥ त्रिंबकराव दीक्षित.

१ राघोपंत गुरुजी यांचा भाऊ महादजीपंत.

१ नारो शंकर यांचा पुत्र.

१ चिंतामण नाईक वोकार.

१ विठ्ठल शिवदेव यांचा पुत्र.

१ रंगराव वोढेकर यांचा भाऊ.

---

[1] सावनुरांतल्या लोकांनीं.

वरकड यात्राही हजार दोन हजार निघेल. श्रीनाशिकाहून लहान मोठे गृहस्थ पांचशें निघतात. "

नं. ३०४५. श्री. ( आश्विन-अक्टोबर. )

विनंती उपरी. दह्यांची शिंकाळी व पोहे मोठे ८८॥ व बारीक ८८। येणेंप्रमाणें पाठवून देणें. आमचा मुक्काम येथेंच आहे, व शत्रूचाही मुक्काम नजीक दोन कोसांवर आहे. मुक्कामच आहे. बेलदार चार असामी खोऱ्यांसुद्धां पाठवून देणें. हरभऱ्यांची दाळ एक पायली पाठवून देणें. आमच्या जासुदांपैकीं येथें स्वारींत असामी चार आहेत त्यांस ताकीद करून पाठवून देणें. शंकरराव आप्पाचीं धोतरें पाठवून देणें. हे विनंती.

नं. ३०४६. ( कार्तिक शु० ५-२७ अक्टो० )

रघुनाथराव नीळकंठ यांचें छ० ४ मोहरमचें पत्र बाळासाहेबांस नजीक शिरट्टी येथून—

" शत्रु बंकापुरानजीक आहे तेथेंच आहे. मोहरमची अकरावी तारीख तेथेंच करणार असें वर्तमान आहे. टिपूकडील बातमी आली आहे कीं, दहा मोहरम अखेर जाल्यानंतर दिवसाचे एकदां चालून येऊन जागा सोडवावी, अथवा यांनीं हटविल्यानंतर तुंगभद्रापार जावें, याप्रमाणें बोलवा आहे. "

नं. ३०४७. ( २७ अक्टोबर. )

मोरो आप्पाजी परांजपे यांचे पुण्याहून पत्र बाळासाहेबांस कार्तिक शु॥ ५ चें. पै॥ छ० ८ मोहरम सब्बां समानीन.

" श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांची फौज घेऊन निघण्याची वार्ताही अद्यापि पुण्यांत नाहीं. व फौजही पुण्याजवळ नाहीं.

---

१ सडे स्वारींतून बुनग्यांत चिठी. २ आमच्या तळावरून आम्हांस हुसकावें. ३ आम्ही.

पुढें फौज ठेवण्याची योजना आहे कीं नाहीं ईश्वर जाणे ! 'तोफखान्यांत बाणांची तरतूद होत आहे, व तोफा थोर रवाना करावयास बाहेर काढिल्या आहेत; म्हणोन ऐकितों ' म्हणून लिहिलें, त्यास बाण मात्र तयार होत आहेत. तोफखान्याचे खर्चाकरितां वराता दिल्या आहेत. तोफा कारखान्यांतून बाहेर काढिल्या नाहींत. चाळीस शेरी तोफ एक मात्र बाहेर काढिली आहे. गुलटेंकडीजवळ एक दोन वेळ निशाणें मारिलीं व गोळ्याचा पल्ला किती आहे तो पाहिला. परंतु रवानगी करावयाचा मार्ग दिसत नाहीं. श्रीमंत राजश्री नानांचे चित्तांत राजकारणविषयीं काय चिंता असेल ती असो; परंतु लौकिकांत कांहींएक दिलगीर नाहीं. दहा घटिका दिवसास भोजन करून नाना प्रकारचे विलास भोगून आनंदरूप आहेत ! आश्विन मासीं श्रीमंत राजश्री नाना निघणार म्हणून वर्तमान दाट होतें, परंतु आत तो कांहींच नाहीं. "

नं. ३०४८. श्रीगणराज. ( कार्तिक शु० १२–३ नोव्हेंबर. )

पैवस्ती छ० ११ मोहरम. कार्तिक. भृगुवार. सन सब्बा समानीन.

आशीर्वाद उपरी. आज छबिना आहे, तर गोटांत ताकीद करावी, म्हणोन चिठी आली. त्यास लोकांस ताकीद केली. त्यास लोक म्हणतात, ' एका दिवसा आड छबिन्याची चाकरी या दिवसांत आमचे हातून होत नाहीं. त्यास आपणच जात असल्यास मी पागेचे बारगीर घेऊन येतों. रवाना छ० ११ मोहरम.

उ. लोकांस ताकीद निक्षून करावी. जर पोटास पुरत नाहीं आणखी चाकरी घेऊन काय करावी ( ? ) त्यांत आपणच निघालेवर किती येतात ! ते वेळेस जे निघतील ते निघतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

नं. ३०४९. ( कार्तिक व० ४–९ नोव्हेंबर. )

रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र नजीक शिरट्टी येयून छ० १७ मोहरमचें—

" शत्रूची फौज धारवाडाकडे गेली नाहीं. बेहरे व कांहीं होळकराची फौज इकडून धारवाडाकडे गेली आहे. "

नं. ३०५०. ( कार्तिक व० ६–११ नोव्हेंबर. )

रघुनाथराव नीळकंठ यांचें छ० १९ मोहरमचें बाळासाहेबांस पत्र—

" शत्रूचा मुक्काम बंकापुरानजीकच आहे. त्यास आम्हांस दहा कोसांचें अंतर आहे. "

नं. ३०५१. ( कार्तिक व० ७–१२ नोव्हेंबर. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र नजीक शिरट्टी येयून मिरजेस बाळासाहेबांस रवाना छ० २० मोहरम.

" शत्रूचा मुक्काम बंकापुरानजीक होता तेथून कूच करून सावनुरानजिक आला आहे. आम्हास त्यास आठ कोसांची तफावत आहे. तेथून इटग्याचे सुमारें जावें असा त्याचा बेत दिसतो. व संधी पाहून इकडेही दगा करावयास चुकणार नाहीं. आम्ही सावध आहों. चिरंजीव राजश्री रामचंद्रपंत आप्पा लष्करांत सुखरूप येऊन पोंचले. रायचुराहून मोहबतजंग यांजकडील जमाव जाऊन अदवानी घेतली म्हणून बापूजी नारायण यांचें पत्र आलें आहे. टिपूनें नबाब निजामअल्लीकडे वकील पाठविले ते कर्नोळास आले आहेत. येथेंही होळकराकडे टिपूनें कारकून पाठविला आहे. " नरगुंद व कित्तूर माघारें द्यावें. मग किंचित् द्रव्य मागाल तर देऊं. " याप्रमाणें त्याचें

बोलणें आहे. चोरून बातमी न्यावी, त्यास वकिलाच्या द्वारें प्रसिद्ध-पणें कां न न्यावी ? असा प्रकार आहे. "

नं. ३०५२. ( कार्तिक व० ९—१४ नोवेंबर. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें छ० २२ मोहरमचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र नजीक शिरट्टी येथून.

" शिरट्टीस दोन दिवस गाडद्यांच्या चौक्या दिल्या होत्या; आज नवमी भौमवारीं प्रातःकाळीं हल्ला करून घेतली. आंतील लोक कांहीं कापून काढिले; कांहीं सोडिले. हल्ला गाडद्यांचीच जाली. विशेष माणूस जायां न होतां श्रीमंतांच्या प्रतापें करून थोडक्यांत ठाणें हस्त-गत जालें. शिरट्टीस चौक्या दिल्याचें वर्तमान ऐकून शत्रु चालून येईलसें वाटलें होतें, परंतु आला नाहीं. "

नं. ३०५३. ( कार्तिक व० ११—१६ नोवेंबर. )

मिरजेस बाळासाहेबांस विसाजी नारायण वाडदेकर यांचें छ० २४ मोहरमचें पुण्याहून पत्र—

" इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस लष्क-रास जावयाविशीं रा॥ नाना वरचेवर लिहितात. भाऊसाहेब जाण्याचा मजकूर गाळून उत्तर लिहितात ! याप्रमाणें चाललें आहे. येथून आणखी फौज पांच सात हजार नवी पाठवितात. नबाबाकडील फौज पंधरा हजार व गाडद पंधरा हजार याप्रमाणें पाठवीत आहेत म्हणून पत्रें येतात. श्रीमंत राजश्री नाना मार्गशीर्षमासीं निघणार म्हणून वदंता आहे. "

नं. ३०५४. ( कार्तिक व० १—१७ नोवेंबर. )

बाळाजी महादेव भिडे यांचें बाळासाहेबांस पत्र छ० १४ मोहरमचें रामदुर्गाहून—

" होळकराकडील पाराजीपंत व बेहरे हे सडे धारवाडाकडे कालच गेले आहेत. "

नं. ३०५५. श्रीगणराज. ( कार्तिक वद्य १२—१७ नोव्हेंबर. )

चिरंजीव राजश्री दादा यांस आशीर्वाद उपरी. तुम्ही चिठ्ठी पाठविली ती पावली. पत्रीं लिहिलें कीं " वडिलीं गाडदी व रोहिले व कानडे प्यादे ठेवून राजश्री आप्पाजी गोविंद याजबरोबर पाठविले, त्यांचा शेरा कसा तें ल्याहावें; म्हणोन लिहिलें," त्यास आप्पाजी गोविंद यांजबरोबर गाडदी व रोहिले माणूस गेलें आहे त्याचा शेरा नक्त सव्वा सहा रुपये, अकरमाही देखील वजा नाहीं, याप्रमाणें आहे. याशिवाय जमातदारांस दरमहा भारी आहेत. कानडे लोक कांहीं ठेवणूक केलीच नाहीं. रवाना छ० २५ मोहरम. शिवाय तोफखान्यासंबंधीं गोलंदाज वगैरेचे दरमहा भारी आहेत. लोभ करावा. उदईक तीन तोफा दुसऱ्या जात आहेत. अष्टमी रविवारीं जगजीवनीस मोर्चे बसले. कळावें हे आशीर्वाद. कांशीचे कागद तुमचे नांवचे होते ते पाठविले आहेत. हे आशीर्वाद.

नं. ३०५६. श्रीगणराज. (मार्गशीर्ष शु० २—२२ नोव्हेंबर.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे व राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्ये महादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० ३० मोहरम पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. शिरटीचें ठाणें हस्तगत जाल्याचें सविस्तर लिहिलें तें कळों आलें. धारवाडचें अनुसंधान आलें होतें

१ मिरजेहून गंगाधरराव गोविंद यांचें पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लष्करांत.
२ पत्र कुरुंदवाडाहून लष्करांत.

यास्तव होळकरांकडील फौज व बेहरे असे फौजसुद्धां धारवाडास गेले आहेत म्हणोन लिहिलें तें कळलें. श्रीमंतांचा पुण्यप्रताप विचित्र आहे. तेंही हस्तगत होईल तर बरें. ही तरतूद फौजा व गाडदी ठेवून पहावयाची होती. कोडयाळ व होनावराकडे इंग्रजांचा दंगा जाहला आहे, यामुळें शत्रूकडील सल्ल्याचें राजकारण लागलें आहे. परंतु सल्ला न करावा असें तर बरेंच बोलणें आहे. काय घडतें तें पहावें. सदैव पत्रीं संतोषवीत असावें. कोंकणांतील समाचारांत आहों. चिंता न करावी. घरचीं सुखरूप आहेत. सध्यां धारण आठ पायलींची आहे. तांदूळ चार पायली आहेत. मुदबखास सामान तांदूळ डाळ काय पाहिजे तें लिहून पाठवावें. कुइलगोडास पाठवून देऊं. तेथून लष्करास पावेल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

नं. ३०५७. (२२ नोव्हेंबर.)

मिरजेस बाळासाहेबांस मोरो आप्पाजी परांजपे यांचें पत्र पुण्याहून मार्गशीर्ष शुद्ध २ चें—

" शत्रूकडील फौज सावनुरास आल्याचें वडिलीं लिहिलें तें कळलें. इकडे श्रीमंत राजश्री नाना फडणीस यांची निघावयाची योजना कांहींएक नाहीं. व फौजही ठेविली नाहीं व पुढेंही ठेवीत नाहींत. नबाबाकडील वकील यांजपाशीं खलबतें एक दोन रोजा आड करून होतात. नबाबाकडील फौज दहा पंधरा हजार व तोफा नबाब याणीं पाठवाव्या म्हणोन पत्रें गेलीं आहेत.. फौजही रवाना होणार म्हणून बाजारबातमी आहे. श्रीमंत राजश्री नाना फडणीस लष्करांतून आल्यापासून गैरराहता बहुत करूं लागले. कोणाचीच गांठ पडत नाहीं. रा।। राघोपंत गोडबोले यांजवर कृपा पूर्ण पेशजी-

पासून आहे तशीच लष्कराहून आल्यापासून. उभयतानीं असोन प्रहर प्रहर खलबत करावें याप्रमाणें तूर्त प्रसंगीं जालें आहे. राघोपंतही शहाणे आहेत. परंतु मातबर श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचे पदरींचे गृहस्थ बाहेर बसतात आणि नाना राघोबाजवळ खलबत करीत असतात; तेव्हां हें चांगलें नव्हे असें कोणाकोणाच्या म्हणण्यामध्यें आहे. असो. तूर्त ज्यापक्षीं राज्याचा सर्व भार त्यांजवर आहे, तेव्हां ते करितात तें उचितच आहे ! ”

नं. ३०५८. **श्रीगणराज.** ( आश्विन व० ९—२६ नोव्हें. )

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सखोपंत देशपांडे व राजश्री बाळाजीपंत स्वामीचे सेवेशीं.

पोष्यें महादाजी बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० २२ जिल्हेजपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष ..... सावनूर शत्रूनें घेतलें ! मोठी वाईट गोष्ट जाली ! दिवसेंदिवस शत्रु शेर होत चालला. भवितव्य काय आहे न कळे ! (आमची) लाखों फौज ( समीप ) असतां सावनूर शत्रूनें घेतलें तेव्हां सीमा जाली ! मोठी चिंता लागली. भवितव्य काय आहे कळत नाहीं. ......हे विनंती.

नं. ३०५९. **श्रीशंकर.** ( ३० नोव्हेंबर. )

विनंती सेवक भगवंतराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना येथील क्षेम तागायत मार्गशीर्ष शुद्ध नवमीपर्यंत श्रीक्षेत्र अविमुक्ति वाराणशी येथें स्वामीचे कृपावलोकनेंकडून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं कृपा करून आज्ञापत्रें राजश्री धोंडोपंत याचे अजुरदाराबरोबर श्रावण वद्य नवमीचें व हल्लीं छ० ८

---

१ पत्र कुरुंदवाडाहून लष्करांत. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस पत्र.

जिल्हेजचें पाठविलीं तीं पावोन परमानंद जाहला. तेथें आज्ञा जे, "जवाहिरी दागिने सवाईनें महाग, त्या पक्षीं प्रयोजन नाहीं. कापडाचा मजकूर लिहिला, त्यास जो पदार्थ नाजूक, स्वस्त, सरकारउपयोगी असेल तो कार्याकारण घेऊन यावा. उगाच महर्ग घेणें ठीक नाहीं." त्यास आज्ञेप्रमाणें जवाहिराच्या खटपटींत पडलों नाहीं. हल्लीं येथें पाचेचे दागिने थोडके. हिऱ्याचे दागिने ताईत व सेलाया (!) चांगल्या आहेत. परंतु महर्ग आहेत. त्याचें कारण सर्व उदीम इंग्रज करितात. बहुतकरून चांगले दागिने त्यांचे येथें जातात. हिऱ्याचे दागिन्याची रीझ त्यांस फार. त्याजमुळें हिरे आहेत परंतु आज्ञेवरून त्या खटपटींत पडलों नाहीं. व आजपर्यंत दागिने पहात होतों, आज्ञेची मार्गप्रतीक्षा करीत होतों. हल्लीं आज्ञापत्र अष्टमीस काल पावलें. सणगांपैकीं पातळ दुरोखी गंगाजमनी व दुपट्टा दोन सणगें मात्र करविलीं तीं आणखी चार दिवशीं तयार होतील. तीं राजश्री आपाबरोबर पाठवून देतों. जाळीच्या चोळ्या करविल्या आहेत त्या आम्ही घेऊन येतों. आणि अखंड चोळ्यांविशीं हल्लीं आज्ञा, त्यास तयार नाहींत, एका महिन्यांत तयार होतशा असल्यास करवून घेऊन येतों. रेशमी गालिचे लहान अडीच गजी तयार आहेत त्यांची किंमत साट पाऊणशेंचे आहेत. परंतु विकाऊ दागिने, रेशीम मोठें आहे, याजकरितां ते घेतले नाहींत. त्यास आतां वर्तमान ऐकिलें जे, राजश्री जिवाजी रुद्र हिसाळकर हे यात्रेस यावयास निघाले ऐसें काकानीं लिहिलें. त्यास गालिचा करवावा म्हणजे मशारनिल्हे घेऊन येतील अशी कल्पना जाहली आहे. त्यास राजश्री धोंडोपंत आपास विचारितां तो त्यांच्या मर्जीस आल्यास करवावा. दागिना उत्तम होईल. रेशीम चांगलें घेऊन द्यावें, आणि मेहनत सात रुपये दर गजी द्यावे, याप्रमाणें दर आहे. यात्रा देशास जावयास शहरावाहेर निघाली आहे

त्यांत दोन पक्ष जाहले आहेत. सगुणाबाई निंबाळकरीण अयोध्येस जाती तिजबरोबर कांहीं जातात. व देशासही कांहीं जाणार. राजश्री केसोपंत काळे व जनार्दनपंत लिमये हे अयोध्येस जातात. पुढें मथुरेस जावें अशी कल्पना आहे. राजश्री आपा देशास जावयाचे डौलांत आहेत. येथें हवेली घ्यावयासीं आज्ञापत्र पाठविलें तें आज पावलें. त्याचें उत्तर आपानीं लिहिलें आहे त्याजवरून श्रुत होईल. रात्रंदिवस स्वामींच्या चरणांचा निजध्यास लागला आहे. श्रीविश्वेश्वराचे कृपेनें श्रीमंतांचा जय आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ० ७ रबिलाखर सन सब्बा.

नं. ३०६०. ( १ दिसेंबर. )

मिरजेस बाळासाहेबांस मोरो आप्पाजी परांजपे यांचें पत्र पुण्याहून मार्गशीर्ष शु॥ १० चें.

“ राजश्री रंगराव वोढेकर पागा व शिलेदार मिळोन सातशें व पुरंदरे यांची पागा तीनशें एकूण हजार उभयतां मिळोन रवानगी सरकारांतून जाहली. वानवडीस मुक्काम आहे. सरकारांत कांहीं लढे आहेत ते उलगडल्यावर लष्करास जातील. जावयास दीड महिना पाहिजे. आणखी फौजेची तयारी नाहीं. नबाबाकडील दहा पंधरा हजार फौज व गाडदी लष्करास जावे याप्रमाणें नाना रा॥ गोविंदराव काळे व पिंगळे यांस वारंवार सांगतात. (नानाजवळ) तूर्त गैरराबता बहुत जाला आहे. “ पुढील सालाच्या मामलती व सालमजकूरच्या मिळोन रसदा घेणार. पुढें हिशेब फाजील निघाल्यास मजुरा द्यावा; दोन सालांचा पैका मामलतदारानीं द्यावा, नाहींतर मामलती सोडाव्या. मागील फाजील राहिलें आहे, त्यास वरकडांचे देण्याचा फडशा होईल तेव्हां मागावें; तोंपावेतों मागूं नये, याप्रमाणें होत आहे ! ” मागील पैकीं

फाजील आणि दुसालां रसद म्हणतां जो पैकेकरी असेल तो मात्र देईल. वरकडांस पैसा कसा मिळतो ? इंग्रजांचे वकील पुण्यांत आहेत त्यांचें एक दोन वेळ बोलणें जाहलें. मौजे भांबवडें ( भांबुर्डें ? ) येथें वखार घालावयास जागा दिली म्हणून बोलवा आहे. वखार घालावी, पेठ बसवावी, याप्रमाणें बोलोन कांहीं नजरही घ्यावी म्हणून बाजारबातमी आहे. "

नं. ३०६१. ( मार्गशीर्ष शु० १५—५ दिसेंबर. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस छ० १३ सफरचें—

"राजश्री हरिपंततात्यांचा मुक्काम बनीकोपनजीक कपोतगुड्ड परगणे लक्ष्मेश्वर येथें होता. शत्रुही पलीकडे तीन कोसांवर होता. सडें बुनगें पाठीमागें कोसावर होतें. थोरलें बुनगें कलकेरीच्या बारीअलीकडे होतें. छ० १० सफरीं मंदवारीं छापा आला. बाणांची अति वृष्टि जाली ती लिहितां न पुरवे ! बारीच्या आंतून बेदडे येऊन बुनगें वाणी वगैरे फार मारले गेले. सरकार कारखान्यापैकीं पागांकडील कांहीं उंट मात्र गेले. वरकड झाडून नौबत जरीपटका वगैरे निभावून आलें. नबाबाची नासाडी बहुत जाली. आम्हांस डंबळाकडे चाकरी आली होती याजकरितां भृगुवारीं बारीच्या अलीकडे बुनग्याजवळ येऊन मुक्काम करून राहिलों. मंदवारीं तयारी करून बुनगें टाकून सडे होऊन बारीआंत दोन कोस गेलों. तों रा॥ हरिपंततात्यांची चिठी आली कीं, ' तुम्ही न यावें; बुनग्याजवळ रहावें. फौजही बुनग्याजवळ ठेऊन तुम्ही मात्र येऊन जावें. ' म्हणोन, त्याजवरून चिरंजीव राजश्री आप्पाबरोबर फौज व सडें बुनगें माघारें पाठविलें; आणि आम्ही शें दोनशें खासे मुद्धां रा॥ तात्यांकडे जाऊन

दोन घटका राहून माघारे बुनग्यांत आलों. इतक्यांत मागें गडबड जाली ! श्रीमंतांचें पुण्य विशेष म्हणोन राजश्री हरिपंततात्या जरी-पटका नौबत तोफखाना सुद्धां झाडून निघोन बारीअलीकडे आले. "

नं. ३०६२. ( मार्गशीर्ष व० ५— १० दिसेंबर. )

पै॥ छ० २१ सफरचें गोविंद सखदेव यांचें लष्करांतून बाळा-साहेबांस पत्र—

" मंदवारीं छापा आला तेव्हां रात्रीच्या फौजा बारीअलीकडे आल्या. उजाडल्यावर रविवारीं मुंडरगीचे मुक्कामीं आले. इंदुवारीं तेथून कूच करून डंबळचे नजीक येथें आले. तेथें दोन मुक्काम होते. मग तेथून कूच करून नजीक उमचलगी नेरगल परगणे जालिहाळ येथील मुक्कामीं झाडून फौजा आल्या. प्रस्तुत मुक्काम तेथेंच आहे. शत्रु कपोतगुड्डावरच आहे. गदग व डंबळ संस्थानची ऐवजाची निशा श्रीमंत रा॥ दादानीं केली होती, याकरितां दादा डंबळास पूर्वीं आले होते. परंतु देसाई हिरेहाळास गेला होता. हल्लीं श्रीमंत रा॥ दादानीं आम्हांस पुनः डंबळ येथें पाठविलें आहे. बरोबर कवडयांचें पथक आहे, देसायास कैद करून आजच लावून दिला. छापा येण्यापूर्वीं शत्रूनें तहाचें बोलणें होळकर व रास्ते यांजकडे लाविलें होतें. हल्लींही पुनः लाविलें आहे. परंतु दगाबाज आहे. विश्वास धरितां येत नाहीं. मंदवारच्या छाप्यांत मोगल व भोसले यांच्या बुनग्याची फार खराबी जाली. सरकारी फौजेंतीलही कांहीं वाणी गवळी लमाण वगैरे दगावले. त्या दिवशीं मोंगल व भोसले यांच्या लष्करचीं घोडीं उंटें वगैरे गेलीं त्यांपैकीं कांहीं होळकर यांचे पेंढारी यांजकडे उमगलीं. यावरून लोक नानाप्रकारें तर्क करितात. याप्रकारचा मजकूर आहे. "

नं. ३०६३ ( मार्ग० व० ५– १० दिसें. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र बाळासाहेबांस छ० १८ सफरचें मुक्काम निरलगी परगणे गदग येथून—

" शत्रूचा मुक्काम बनीकोप नजीक कपोतगुड्ड येथें आहे. होळकराकडील फौज व बेहरे धारवाडाकडे गेले होते. परंतु कांहीं साध्य जालें नाहीं, याकरितां माघारे येऊन फौजेस मिळाले. "

नं. ३०६४. ( मार्ग० शु० १०–१ दिसें. )

गोविंद सखदेव यांचें पत्र लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस—

" सरकारच्या फौजेचा मुक्काम कपोतगुड्डास आहे. बुणगें पिछाडीस ठेविलें होतें. त्यास शत्रूचा मुक्काम काल छ० ८ सफरीं गुरुवारीं इटग्याचे उत्तरेस दोन कोस ओढा आहे तेथें मुक्काम जाला. सरकारच्या फौजांस व शत्रूस तीन कोसांची तफावत आहे. याजमुळें सरकारचें बुणगें पिछाडीस होतें तें बारी उतरून काल रात्रीस कलकेरेच्या वेढ्यावर येऊन उतरलें. श्रीमंत राजश्री दादास लौकर यावें म्हणून चिठी राजश्री तात्यांची आली. त्याजवरून आज डंबळाहून कूच करून छ० ९ सफरीं भृगुवारीं सरकारचें बुनगें कलकेरें येथें आहे तेथेंच मुक्कामास आलों. येथून डंबळ चार कोस आहे. तेथून पुढें बारीपार राजश्री तात्या आहेत त्यांस आम्हांस चार कोसांची तफावत आहे. आज घोड्यांस दाणा चारून सडे होऊन सायंकाळीं निघोन राजश्री तात्यांकडे जातों. शत्रु सडा होऊन तोफा व बाण वगैरे सरंजाम घेऊन आला आहे. त्याची मसलत एक वेळ निकर्ष चांगला करावा अशी आहे. "

नं. ३०६५. ( मार्ग० – दिसेंबर. )

रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र लष्करांतून बाळासाहेबांस मिरजेस—

" शत्रूचें बोलणें सलुखाचें रा॥ तात्यांकडे व रा॥ तुकोजी होळकर यांजकडे लागलेंच होतें व निरोप व पत्रेंही पुण्यास पाठ-

वीतच होते. लष्करांतही उभयतांकडे येतच असतां फौजेस चाऱ्याची व पाण्याची सोय पाहून रा॥ तात्या कूच करून कपतगुड्डास पुनः आले, तों टिपूकडून पत्रांवर पत्रें येतच होतीं कीं, ' वकील रवाना करितों. त्यास कोणते तारखेस रवाना करावें ? ' अशीं पत्रें येत असतां राजश्री तात्यानीं ' बारीचे अलीकडे चाऱ्यापाण्याची सोय चांगली आहे, आज बुनगें आवशीस बारीचे अलीकडे लावून देऊन दोन प्रहर रात्रीच्या सुमारें आपण जाऊं, ' म्हणून बेत करून कूच करून सडे बुनगें थोरले बुणगें ज्या तळावर उभें होतें तेथें लावून देऊन नबाब व भोंसले आदिकरून यांस ताकीद दिली कीं, बुणगें पार लावून देणें. असें सांगून आपण संध्या करून निघावें या बेतानें होते. तों टिपूनें जलदी करून छाप्यास आला. तों बुनगें फौज आदिकरून एकदांच दाटी जाली. सेनाबहादर व नबाब यांकडील विशेष कांहीं निघालें नाहीं. खासे मात्र निघून दुसरे बारीनें आले. राजश्री तात्या आदिकरून कलकेऱ्याचे बारीनें आले. तोफखाना सरकारचा झाडून तोफखानेवाल्यांनीं तशा निकडींतून आणिला. सरकारच्या कारखान्यांपैकीं पागा खेरीजकरून कांहीं गेलें नाहीं. किरकोळ पागयांचीं दोन तीन चार दहा पंधरा पावेतों घोडीं प्रत्येकाचीं गेलीं. तसेंच रा॥ महादाजीपंत बेहरे यांचेंही गेलें असेलसें दिसतें. आपल्या पुण्येंकडून आमच्या फौजेची खैर जाली. छापा आल्याउपर मुसरगीस एक मुक्काम करून दुसरें कूच करून निरलगी परगणे गदग येथें मुक्कामास आलों. छ० १९ सफरीं टिपूकडून दोघे सूतरस्वार आले जे, पेशजी प्रमाणें वकील रवाना करितों. साऱ्या सरदारांस भेटवून-बरोबर गारदी देऊन पुण्यास रवाना करावे. असें पत्र रा॥ गंगाधरराव नाना रास्ते यांस टिपूचें होतें. रा॥ तुकोजी होळकर सुभेदार यांस पत्र होतें जे, ' वकील मातबर पाठविले आहेत, यांचा बहुमान करून ज्या गोष्टी-

कडून दोहींकडील खलष दूर होय तें करावें. ' असें त्यांचे पत्रीं होतें. त्याजवरून येथूनही पत्राचीं उत्तरें रा॥ गंगाधरराव नानानीं लिहिलीं जे, ' आपण वकील पाठवितों असें लिहिलें, त्यास मध्यें छाप्याची गोष्ट अशी जाली. त्यापक्षीं वकील पाठवावा, परंतु सरदारांस भेट-विण्याचें प्रयोजन नाहीं. वकिलाची रवानगी गारदी बरोबर देऊन पुण्यास करून देऊं. " रा॥ होळकर यांनीं उत्तर लिहिलें कीं, ' वकि-लाची रवानगी करितों, कधीं करावी हें उत्तर येतांच रवानगी करितों, म्हणून पत्रें येत असतां दरम्यान छापा आला ' ! ही गोष्ट न व्हावी. त्यास आपण दाना दुरंदेशी आहेत, असें असतां ही गोष्ट घडूं नये. त्यास ज्या समयीं सरकारांत वकिलाचें प्रयोजन लागेल ते समयीं आणविले जातील. ' याप्रमाणें होळकरांचें उत्तर गेलें. यानंतर मध्यें एकदां एक शेणवी आला होता त्याचें पत्र होळकर यांस आलें आहे कीं, ' शंभर राऊत पाठवावे. आम्ही आपणाकडे येणार. मागाहून वकीलही येतील. ' याप्रमाणें पत्र आल्याचें हरिपंत तात्यांनीं सांगितलें. परवां छाप्यामध्यें बुनगें लुटलें गेलें तें कांहीं शत्रूकडील बेदड्यानीं लुटलें व कांहीं आमच्या लष्करच्या पेंढाऱ्यानीं लुटलें असेंही लष्क-रांत बोलतात. "

नं. ३०६६. (११ दिसें.)

मोरो आप्पाजीचें पत्र पुण्याहून मार्गशीर्ष व॥ ६ चें मिरजेस—

" राजश्री रंगराव वोढेकर व पुरंदरे यांची पागा यांचा मुक्काम अद्यापि हडपसरासच आहे. आणखी फौज येथें ठेवीत नाहींत. श्रीमं-तांच्या वाड्यांत पंचमीस जेठी यांच्या लढाया जाहल्या. कर्नाटकांतून पिशजी तीन जेठी आले होते. अडीच महिने रतीब खाऊन बनून गेले. काल कुस्ती जाली. त्यास तिवां जेठ्यांपैकीं दोघे जेठी यांस येथील

शहरांतील तालमेच्या आखाडयांतील गडयानीं चीत केलें. एकास मखवा गौळी यानें व एकास कल्ह्या गौळी यानें. याप्रमाणें दोघानीं दोघांस चीत केलें. एक जेठी कर्नाटकचा त्याची व आबाजी सुतार याची कुस्ती जाली. आबाजीस त्यानें चीत केलें. आणखी येथील तालमींचे आखाडयांतील गडयागडयांच्या कुस्त्या जाल्या. आणखी कर्नाटकचे पहिलवानांस रतीब दिला आहे. मास पक्ष जाहल्यावर आणखी लढाई होईल. रा ॥ यादोबा रणछोड याचें पुण्यांत सराफीचें दुकान होतें, त्यास त्यानें दिवाळें काढिलें. सराफ्यामध्यें तो कोणाएकाचा भरंवसा राहिला नाहीं. मातबर दुकान असतें तें अकस्मात् दीपोत्सव करितें ! याप्रमाणें जालें आहे. पुण्यांत पंचाइतीमध्यें रा॥ राघोपंत गोडबोले एक प्रस्थ. व रा॥ जयरामपंत बापट एक प्रस्थ. व शास्त्रीबुवा[1] एक प्रस्थ. याप्रमाणें तीन प्रस्थें आहेत. लोकांचा सर्वस्व अपहार करावा याप्रमाणें तिघांची एक हातोटी आहे. श्रीमंत रा॥ नानाजवळ दाद लागणें म्हणजे विचार कळतच आहे ! लष्करचें वर्तमान काय आहे तें कळत नाहीं, यास्तव वडिलीं लिहिलें पाहिजे. "

नं. ३०६७. ( पौष शु० ४–२४ दिसेंबर. )

लष्करांतून गोविंद सखदेव यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र पै॥ छ० ५ रबिलावलचें—

" लष्करचा मुक्काम जतलीवर होता तेथें टिपूकडील वकील त्याचे लष्करांतून होळकर याचे गोटास छ० २५ सफरीं आला. समागमें शंभर राऊत व प्यादे वगैरे शेंदीडशें, पांच सहा सुतरस्वार, येणेंप्रमाणें होते. ते होळकराचे गोटांत आहेत. परवां रात्र्यांचे भेटीस गेले. रा॥ हरिपंत तात्यांची भेट जाहली. सल्ला करावा

---

१ रामशास्त्री न्यायाधीश.

याप्रमाणें बोलत आहेत. शत्रूचा मुक्काम तुंगभद्रातीरीं कोपळानजीक होता. त्यास सरकारच्या फौजा जतलींचे मुक्कामी गेल्या. त्या मुक्कामीं वकील आला. दुसरे दिवशीं शत्रु कूच करून मुंडरगी परगणे डंबळ येथें आला. मुंडरगीस व जतलीस तीन कोसांचें अंतर होतें. तेच दिवशीं छ० २६ सफरीं रात्रीं तयार होऊन गोटाबाहेर निघाला. छापा घालावा ही मसलत होती. परंतु मागती गोटास गेला. मुंडरगी मुक्कामीं शत्रु आल्याची बातमी येतांच रात्री झाडून फौजा आंवळून तयार होत्या. सूर्योदय जाहले नंतर तेथून कूच करून सात कोस कुकनूरचे मुक्कामीं छ० २७ रोजीं आले. याउपर शत्रु कोणीकडे येतो पहावें. वकील पाठवून सधान बोलावें, आणि इकडे दगाही करावा, या मनसब्यांत शत्रु आहे ! येथून कोपळ पांच सहा कोस आहे व गजेंद्रगडही सहा कोस आहे. बहादूरबिंड्यांत ठाणें सरकारचें अजून कायम आहे."

नं ३०६८. ( पौष शु० ४–२४ दिसेंबर. )

लष्करांतून गोविंद सखदेव याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० ५ रबिलावलचें—

" छाप्याचे दिवशीं शत्रूकडील ही जमाव आला होता. परंतु फार करून होळकर याचे पेंढारी याणींच लुटालूट करून गडबड केली. नेहमीं सांडणी स्वार व माणसें टिपूकडून कागदपत्र घेऊन होळकर व रास्ते यांजकडे येतच आहेत. दोनचार वेळ सरकारची फौज तलाव्यास जाते त्यांस माणसें व सुतरस्वार सांपडले. पत्रें ही सरकारांत आणिलीं. तीं पत्रें ज्यांचीं त्यांस दिलीं. परंतु भलतें करणें तें पत्रीं कशास लिहितील ! पत्रीं सल्ल्याचेंच लिहितात. लष्करांतही दोन स्थळीं शत्रूचें संधान आहे, त्यापक्षीं त्याचें पारिपत्य होणें कठतच आहे. लष्करांतही सारे असेच बोलतात. व सरकारांतही समजण्यांत

आलेंच असेल. परंतु मातबराची भीड भारी. भिडेमुळें कांहीं काम होत नाहीं. जें होणें तें मुरवतीवरच जातें. कागदीं पत्रीं तर कांहीं सांपडत नाहीं. परंतु पेंढारी यांजकडे घोडीं तट्टें छापा आला त्या रोजींचीं उमगलीं इतकें मात्र खरें. ज्याचीं उमगतात त्याचीं सोडून देतात. भोंसले व मोंगल यांचीं उमगलीं होतीं तीं सोडून दिलीं. "पेंढारी यांचे चौधरी जाऊन टिपूस भेटले आणि बोलून चालून आले. छापा आला त्या दिवशीं पेंढारी याणीं लुटालूट करून सारें नेऊन शत्रूस दिलें. निंमे किंमत शत्रूनें पेंढारी यांस दिली." याप्रमाणें लष्करांत बोलत आहेत!

नं. ३०६९. (पौष शु० ४—२८ दिसेंबर.)

लष्करांतून गोविंद सखदेव याचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस पै॥ छ० ५ रबिलावलचें—

"आज गुरुवारीं बहादूरबिंड्यापर्यंत तलाव्यास जावयास राजश्री हरिपंततात्यानीं श्रीमंत राजश्री दादासाहेब[1] यांस सांगितलें. त्यावरून आज तलाव्यास सारे गेलों. येथून सहा सात कोस आहे."

नं. ३०७०. श्री. (पौष शु० ४—२४ दिसेंबर.)

याद. हैबतनाक मांग वस्ती गांडापूर नि॥ निजामन अल्लीखान. लष्करांत तहवारजंग यांजपाशीं चाकरीस होते. शत्रूचा छापा आला त्या गडबडेंत निघाले ते मिरजेस आले. बाजारांत येऊन बंदुका विकूं लागले. हें वर्तमान सरकारांत दखल जालेनंतर चौकशी करितां बंदुकांवर नांवें निजामनअल्ली यांचीं आहेत. त्याणेंही बंदुका त्यांच्याच म्हणून सांगितलेवरून मोजदाद. छ० २ रबिलावल. सन सब्बां समानीन. नफरमजकूर मुलेंमाणसें सुद्धां निघोन आला त्याची चीजवस्तीची. सदरहू याद. छ० मजकूर.

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर.

हत्यारें.

४ बंदुका. नावें आहेत.
४ निमचे उणाख. आपले म्हणतात.
२ ढाली.
  १ बुदली ढाल. मुलामा रुपेरी. खुबे चार ४.
  १ राइडी (?) पितळीचे खुबे ४.
  —
  २
२ दस्ता.
  १ मुलामा रुपेरी उडाला आहे.
  १ साधी.
  —
  २
१ पिस्तूल साधें. रोंगण दिलें आहे.
१ बांक.
३ सुऱ्या लोखंडी.
२ कुराड.
२ खुरपीं.

किरकोळ भांडीं.

१ घागर कल्याणी. लहान. तांबेची.
२ बहुगुणी. तांबें.
१ पळी पितळीची. लहान.
१ वाटी पितळी. लहान. फुटकी.
१ ताम्हण फुटकें तांबेचें.
२ सुती चिवटें.
१ रुप्याच्या गांठ्या. सुमार वजन ११ रुपये.
१ देव रुपेचे टांक.
१ निरंजन पितळी.
१ चुनाळ पितळीचा.
१ पितळी दिवे लावणें लहान.
४ कंठाळा जुना नाकारी[१].
—
१९

---

[१] निरुपयोगी

१ लगाम कुराडी जुना.
२ खरारा.
१ सुतळी लगाम.
१ तंगाची कडी.
५ किरकोळ लोखंडी दिवे लावणें
व पळ्या वगैरे अदमास वजन
पक्का ८।- सुमारी.
४ तोस्तान.

---

३५

गुरें.

३ बैल मूठसुद्धां.
१ तांबडा फांटाळीं शिंगें.
१ माळवी.
१ जांभळा, मुटकी फाटलेली.

---

३

१ म्हैस. ढोईस टीक. मूठसुद्धां.
१ कालवड बाळी ल्हान.

---

५

त्याचें त्यास फिरोन एकंदर खर्च देऊन बाकी सरकारांत ठेविलें येणेंप्रमाणें दागिने सुमार.

४ बंदुका.
१ पिस्तूल.

---

५

बाकी झाडून त्यास दिलें. छ० मजकूर.

नं. ३०७१. ( पौष शु० ७–२७ दिसेंबर. )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें पत्र मिरजेस बाळासाबांस छ० ५ रबिलावलचें, नजीक मंगरूळ येथून—

" टिपूचे वकील आले आहेत. तहाचें बोलणें बोलत आहेत. "पांच सालां मिळोन अठ्ठेचाळीस लक्ष रुपये देतों " म्हणतात. त्यांपैकीं तूर्त तीस लक्ष देतों. सोळा लक्ष सहा महिन्यानीं देतों. दोन लक्ष पुण्यांत आहेत. येणें प्रमाणें भरणा करून देतों. कृष्णेच्या अलीकडे[1] जीं ठाणीं तुम्ही घेतलीं आहेत तीं सोडून द्यावीं. पेशजीच्या तहाप्रमाणें असावें. " अशीं कैफाचीं ( ? ) बोलणीं बोलतात. सध्यांचा प्रसंग मानाजी शिंद्यांच्या प्रसंगाप्रमाणेंच[2] दिसतो, परंतु प्रसिद्धींत येत नाहीं. सर्व भार श्रीमंताच्या दैवावर आहे. शत्रूचा मुक्काम कोपळापलीकडे तुंगभद्रातीरीं आहे. त्याची चालवा पाहून कनकगिरीच्या सुमारें जावें असें आहे. श्रीमंतांचे प्रतापें मसलत सिद्धीस जावी ! नाहीं तर परिणाम ठीक नाहीं. वकील आले आहेत ते लष्करची हवा पहावयास आले आहेत असें दिसतें. हें लष्कर सुभेदार होळकर यांच्या आज्ञेंत आहे असें आहे. आणि त्याच्या झपाट्यांतून वांचलिया जीव ज्याचे त्याचे, नाहीं तर होळकराचे, असा प्रसंग आहे ! "

नं. ३०७२. ( पौष व० २–५ जाने. )

लष्करांतून गोविंद सखदेव यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस पै॥ छ० १७ रबिलावलचें—

" महादाजीपंत बेहरे यांची फौज कहीबरोबर कांहीं गेली होती. कहीवर बेदडे शत्रूकडील चालून आले. तेव्हां बेहरे यांच्या

---

१ कृष्णेच्या दक्षिणेस. २ मागें मानाजी फांकड्यानें हैदरअल्लीशीं फितूर केला होता या गोष्टीस अनुलक्षून हें लिहिणें.

दोन तीनशें राउतानीं निकड करून पाठलाग केला. तों पलीकडे एका ओढयांत शत्रु दबा धरून भारी जमावानिशीं बसला होता. त्यानें ८०।९० घोडे हिरून घेतले व लोकही कांहीं ठार जाले."

नं. ३०७३. (पौष व० ५–८ जाने०)

लष्करांतून गिरमाजी जिवाजी यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस. पै॥ छ० १७ रबिलांवलचें.

" शत्रूकडील वकील तहाचें बोलणें बोलावयास आले आहेत; परंतु बोलणें कोणतेंही ठरावांत नाहीं. अंतरंगीं बोलणें काय असेल न कळे. बाजारी वर्तमान जे, सरकारचें बोलणें—पेशजी श्रीमंतांचे कारकीर्दींत ठाणीं होतीं तीं सोडून द्यावी—ऐसें इकडील बोलणें. त्याचे बोलणें कीं, तुंगभद्रेपावेतों मुलूख सोडून देतों. कांहीं नक्त खंडणीही देतों. परंतु धारवाडचा किल्ला आपणाकडे असावा. बोलणें एकही ठरत नाहीं. वकील लबाडीनें पाठविले आहेत. जनवार्ता आहे जे, होळकर याणीं त्याजकडील सुवर्णदर्शन घेतलें. सत्य मिथ्या न कळे."

नं. ३०७४. (पौष व० ५–८ जाने०)

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र छ० १७ रबिलावलचें. गुरगुटें तालुके गजेंद्रगड येथून.

" टिपूकडील वकील तहाचें बोलणें बोलावयाशीं आले होते. पहिल्या बोलण्यांतील भाव पेशजी[1] लिहिलेच आहेत. अलीकडे ठरलें आहे कीं, बदामी, गजेंद्रगड, नरगुंद, इतकीं सरकारांत असावीं आणि तह पेशजीप्रमाणें करावा. याप्रमाणें बोलण्यांत येऊन वकील गेले आहेत. टिपूनें याप्रमाणें कबूल केल्यास तह होतो. नाहीं तर होत नाहीं. मसलत कोणत्या थरास जाईल हा सिद्धांत होत नाहीं!"

---

१ माधवराव बल्लाळ पेशवे यांच्या.

नं. ३०७५. श्री. ( पौष व० ७–१० जानेवारी. )

विनंती[1] उपरी. उदईक संक्रांतीचा पर्वकाळ पांच घटिका, यास्तव आज तिलपात्रास ताम्रन व तीळ व साखरेचे तीळ दोन पायलीपर्यंत आणवून पाठवावे. किल्ल्याचे मोर्चे काल उठोन प्रातःकाळींच गेले. तहाचें बोलण्यास वकील येणार. शत्रूनें काल एक कोसाचें कूच मागें केलें. याप्रमाणे वर्तमान आहे. कळावें छ० १९ रबिलावल बुधवार प्रातःकाल. दोन दिवस येथेंच मुक्काम आहे. कर जाहल्यावर कूच करून पुढें दोन कोस जाणार असें आहे. हे विनंति, आज सायंकाळीं शिंकाळ्या दह्याच्या दोन पाठवाव्या. गृहस्थ दहा पांच भोजनास सांगणार. व गवळी यास सांगोन सहा आठ शेर दहीं पाठवावें. हे विनंति.

नं. ३०७६. श्री. ( पौष वद्य १०–१४ जाने० )

विनंती उपरी, आपण दोन चिठ्या पाठविल्या त्या पावल्या. लिहिलें सविस्तर कळलें. निंब्या कामाठी यास गोळी लागली म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास खर्चास वगैरे द्यावें. आज तलाव्यास फौज गेली होती. एकंदर झाडून फौजा गेल्या होत्या. बहादूरबिंडा कालच मंदवारी दोन प्रहरीं त्यांनें घेतला. बाळाजी शिवराम यास तोफेचा गोळा लागोन ठार झाला म्हणतात. कोणी दारूनें उडाला म्हणतात. दोन प्रहर गेल्यावर किल्ल्यावरील माणसानीं पालवून किल्ला दिला याप्रमाणें जाहलें. आज फौजा जाऊन कोपळाजवळ बहादुरबिंड्यानजीक उभ्या राहिल्या. दोन किल्ल्यांपलीकडे आंबराईपर्यंत शत्रु उत-

---

१ कुरुंदवाडकरांच्या कारकुनाचें सख्या स्वारींतून बुनग्यांतल्या कारकुनास पत्र. २ कोणच्या किल्ल्याचे ? बहादुरबिंड्याचे ? ३ सदया स्वारींतून बुनग्यांत पत्र. ४ टिपूनें.

रला आहे. त्यानें गोळे दोन चारशें किल्ल्याजवळून मारिले. सायंकाळच्या सहा घटकापर्यंत उभे होतों. पुढें कांहीं आला नाहीं. मग मागें निघोन प्रहर रात्रीस गोटास आलों. त्यांनीं तोफा लागू केल्या नाहींत. दोन चार घोडीं मात्र जायां ठार जाहलीं. याप्रमाणें जाहलें. गाडदी पाठवावे म्हणोन लिहिलें, त्यास पाठवून देतों. उंटही एक येथें आहे तो पाठवून देतों. पल्याण तेथें तयार करवावे. रायाकडील रुपये उंटाचे यापुढें वजा करून घ्यावयाचे याप्रमाणें आहे. वरकड सामान वगैरे आणवूं त्याप्रमाणें पाठवावें. तूर्त सामान येथें आहे. कळावें. होईल वर्तमान तें मागाहून लिहितों. मरीचा उपद्रव तो लष्करांत फारच जाला आहे. नाइकजी दाभाडे वगैरे चांगलींच माणसें गेलीं. संताजी हेंगाडकरही अत्यावस्थ आहेत. कळावें. ईश्वर सत्ता प्रमाण. राजश्री शामराव आप्पाची प्रकृत कशी आहे ती लिहून कळवावें. वरकड अधिकोत्तर नाहीं. रवाना छ० २३ रबिलावल. रविवार मध्यरात्र. लोभ असावा. हे विनंती. रुद्राक्षांची माळ रावजींची आणवून पाठवावी. हे हे विनंती.

नं. ३०७७. ( माघ शु० २–२१ जाने० )

लष्करांतून रघुनाथराव नीळकंठ यांचें बाळासाहेबांस पत्र. छ० १ रबिलाखरचें. मुक्काम नजीक मरीकंठ ( ! ) येथून—

" बहादूरबिंड्यास शत्रूनें मोर्चे दिले होते. एक दोनदां उपराळा करण्याची तयारीही जाली होती. परंतु होळकर यानीं बोलणें लाविलें कीं, ' तहाचें पक्कें बोलणें ठरवितों व किल्याचे मोर्चेही उठवितों. ' या बोलण्यावरच राहिलें. शेवटीं स्थळही गेलें ! शत्रूचा मुक्काम कोपळानजीक आहे. "

नं. ३०७८. श्री. ( माघ शु० ९–२४ जाने. )

विनंती उपरी. कनकगिरीस श्रीचा उत्सव आहे यास्तव तेथें तोफा होतील. गडबड होऊं नये म्हणोन छबिन्यातून चिठी आली आहे यास्तव आपले गोटांत जामदारखाना व मामाकडे वगैरे सर्वांस कळवावें. चिठी आली यास्तव लिहिलें आहे. परंतु सावध असावें. गडबड मात्र होऊं नये. आज शत्रूकडील वकील आले. होळकराचे अघाडीस उतरले आहेत. मी त्यांचे डेरे पाहून आलों. तोफखान्यांत गेलों होतों तेथें पलीकडेच आहेत. परवांचे वकील तेच आले आहेत. चारशें जमाव आहे. कळावें यास्तव लिहिलें आहे. छ० ४ रबिलाखर हे विनंती.

नं. ३०७९. श्री. ( फाल्गुन—फेब्रु० )

पौ॥ छ० १४ जमादिलावल.

पुं॥ सेवेशीं रामाजी अनंत. साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी. जे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब कोंकणांत गेले आहेत ते आज येणार असें वर्तमान आहे. जातांना श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांशीं करार करून गेले आहेत कीं दशमीस माघारे येतों म्हणून. बहुतकरून येतील. श्रीमंत राजश्री बाळासाहेब घांटाचा उत्सर्ग फाल्गुन शु॥ १२ स करणार. कुंडमंडप नवकुंडी घातला आहे. ब्राह्मणभोजनाचा मंडप पांच सहस्र पात्रें होत असा घातला आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ चिठी लष्करांतन लष्करांतच. २ पत्र गोकाकेहून लष्करांत रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस. ३ परशुरामभाऊ.

नं. ३०८०. श्रीगजानन. ( माघ व० ५—७ फेब्रु० )

राजश्री नारोपंत व वासुदेवपंत स्वामी गोसावी यांशीं.

विनंती उपरी. हंसाजी जाधव व सुभाना नि॥ आको शामजी मल्लेवाडीकर हे दोघे कैदेंत होते; त्यांस आको शामजी याचे हवालीं त्यांचा कागद लिहोन घेऊन केले आहेत. बाहेर जाऊं देण्याविशीं दरवाजास चिठी अलाहिदा सादर आहे. जाऊं देणें. रवाना छ० १८ रबिलाखर सन सब्बां समानीन हे विनंती.

नं. ३०८१. श्री. ( माघ व० ३०—१८ फेब्रु० )

पै॥ ७ जमादिलावल. फाल्गुनमास रविवार.

+पोष्य यशवंत बहिरव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान तागायत छ० २९ रबिलाखर जाणून स्वकीय लिहावें. विशेष......इकडील वर्तमान तर धारवाडास जमाव मिळत आहे हें लिहिलेंच होतें. हल्लीं पांच सातशें स्वांर व चार हजार कर्नाटकी प्यादे व तोफा लांब पल्ल्याच्या येणेंप्रमाणें सरंजाम प्रस्तुत आला, पहिला जमाव किल्ल्याचे नेमणुकीचा व हल्लींचा म्हणतां दहा हजार जमाव झाला. किल्ल्यांतून तोफा पांच चार बाहेर ओढिल्या आहेत. भारी जमाव व तोफा सुद्धां पोक्त जकीरा आणून नरगुंदच्या किल्ल्यास पोंचविणार. धारवाडापासून तीन कोशीं चार कोशीं सरकारचीं ठाणीं बेजरब तोफा लावून घेणार. या तालुक्यांत हंगाम करणार. निश्चयें

१ चिठी गंगाधरराव गोविंद यांची. + हें पत्र यशवंत बहिरव पेठे नरगुंदचे कारभारी काळोपंत पेठे यांचे धाकटे बंधु यानीं रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस लिहिलेलें आहे. सदरहू कारभारी काळोपंत व त्यांचे यजमान नरगुंदकर भावे यांस इतर कांहीं मंडळीसह टिपूनें नरगुंदचा किल्ला घेऊन कैदेंत ठेविलें होतें हें मागें आलेंच आहे. पुढच्या नंबरचें पत्रही यशवंत बहिरव यांचेंच आहे.

वर्तमान आलें. धारवाडास जमाव जमूं लागलिया तागायत आपणांस लिहितों, परंतु उत्तर नाहीं. बंदोबस्ताचें कांहींच नाहीं. आम्ही येथें तीनशें स्वार व दीड हजार पायदळानिशीं आपले धैर्यावर बसलों आहों. या तालुकेंत शत्रूनें हंगाम केलेवर सरकारच्या फौजेनें सत्वर बंदोबस्त होणें कठिण. हल्लीं दोन तीन हजार फौज आल्यानें बंदोबस्त होईल. त्यासही ठिकाण नाहीं ! तेव्हां वारंवार विनंती लिहिण्यांत फळ काय ? परंतु जालें वृत्त वरचेवर लिहितों. राजकी वर्तमान "शत्रूकडील वकील आले. दारमदाराचें बोलणें निश्चयें बोलत आहेत बहुधा दारमदार उरकितों." याप्रमाणें लष्करचें लिहिणेंही आलें. श्रीकृपें दारमदार ठरल्यास यजमान, वडील व समुदायासह सुटकेविषयीं आपण राजश्री तात्या[1] यांस वरचेवर सांगून पाठवीतच असाल. व भेट होतेसमयीं येविशीं मुखतः बोलणें होतच असेल. मी विनंती लिहावी, नंतर आपण सांगावें, यास्तव मी लिहितों असें नाहीं. मजला आपण वडील. माझा अगत्यवाद आपणास अकृत्रिमपणें आहे ही खातरजमा आहे. वडिलांस सूचना लिहिली आहे. तहाचा बनाव असल्यास सांपडले आहेत त्यांचे सुटकेविशीं खंबीर पक्का असून सुटका होणें तें करावें. सूचनार्थ लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ३०८२. श्री. ( फाल्गुन शु० ६—२३ फेब्रुवारी. )

पोष्य यशवंत बहिरव. साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल छ ४ जमादिलाखर जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन परामर्ष होत नाहीं. तर असें नसावें. सदैव पत्र पाठवून संतोषवित्परामर्ष घ्यावा. यानंतर इकडील वर्तमान वरचेवर राजश्री रामचंद्रपंत विदित करीतच आहेत. सांप्रत धारवाड-

---

1 हरीपंत तात्या फडके.

करानीं मिश्रीकोटेस महसरा दिला तो उठवावयास राजश्री भवानराव पाटील आले. बुनगें बेटगिरेवर ठेविलें. आपण हुबळीस गेले. इतक्यांत महसरा धारवाडकरानीं उठवून बेटगिरेवरील बुनगेंत झाबडाझाबड केली ती आपणास विदित जालीच असेल. ... मिश्रीकोटेस टोपेतील लोक ठिकाण नाहीं (?) टिकून राहिल्यास उपराळा नाहीं. टोपेंतून निघोन हुबळीस आले. धारवाडकर मागती नरगुंदास येणार अशी बातमी आली. मध्यें नरगुंदचे किल्लेचे इमारत चालण्याची राहिली ती मागती सुरू झाली. मनसबा कांहीं समजत उमजत नाहीं असें घडलें. दादासाहेब ! आपण पुण्यवंत. आपली कूर्मदृष्टि आम्हांवर; येणेंकरून हे दिवस पाहिले. पुढेंही जेणेंकडून दिवस सुदिन दाखवायाचे अभिमानेंकडून आपणास मिळालें असतां लिहिलेलें सुचवणेसें काय आहे ! वारंवार विनंती राजश्री रामचंद्रपंत करीतच आहेत. आमचा प्रकार वडिलांस वारंवार लिहावेंसें नाहीं. मुख्य यजमान व वडील नेलेली मंडळीसुद्धां सुटून आले म्हणजे आपणास महद्यश आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ३०८३. श्री. ( फाल्गुन—मार्च. )

*विज्ञापना. इकडील विस्तारें मजकूर सूतरस्वारासमागमें लिहिला आहेच त्याजवरून विदित जाहलाच असेल. अलीकडेस वकील गेले होते ते आलेनंतर नजीक सिदपूरचे मुक्कामाहून कूच करून मुक्काममजकुरीं आलों. येथें आलेनंतर आठ दिवसांत ऐवज एक हप्ता पदरीं पडावा असें होतें. परंतु आज बारा दिवस होत आले, अद्यापि ऐवज पदरीं पडला नाहीं. आणि लौकर पडतो असेंही समजण्यांत येत नाहीं ! कराराच्या यादी तयार होतात असें आहे. घडेल तें प्रमाण. शत्रु

१ आमचे यजमान व्यंकटराव भावे व वडील बंधु काळोपंत. * पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

तुंगभद्रा दक्षिणतीराहून कूच करून बल्लारीच्या सुमारें गेले. कांहीं फौज रायचूरचे सुमारें गेली असें बाजारी वर्तमान आहे. दुसरें, वकील आमचे येथें येऊन बहुमान वस्त्रें वगैरे द्यावीं आणि बहुमान करावा असें वर्तमान आहे. त्यास कारभारी यांचेंही मत आहे, म्हणोन परभारी ऐकिलें. त्याजवरून सेवेशीं लिहिलें आहे. तर याचा विचार कसा करावा ते आज्ञा केली पाहिजे. याजमागें तह सरकारांत जाहले परंतु आम्हाकडे कांहीं बहुमानाचा प्रकार नाहीं. ऐसीयास आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं. पत्राचें उत्तर लौकर आलें पाहिजे यास्तव जलद जोडी रवाना केली असे. आम्ही पत्र वडिलांस लिहिलें आणि त्याचें उत्तर आलें असा भाव पत्रांत नसावा. वडिलींच आज्ञा केली असें असावें. म्हणजे पत्र कारभारी यांस दाखवावयास लागल्यास चिंता नाहीं असें दिसतें. मग मर्जी असेल तसें करावें. वकील येतेसमयीं तीन हत्ती आणले होते. होळकर रास्ते व तात्यांस दिले. वस्त्रें वगैर बहुमान जाहला. करार करून गेल्याप्रमाणें निश्चयांत आणिलें म्हणोन वकिलांनीं सांगितलें, परंतु त्याजप्रमाणें कोणीएक गोष्ट निदर्शनास येत नाहीं ! श्रीमंताचे प्रतापें घडेल तें खरें ! विदित होय हे विज्ञापना. होळकरांनीं दोन हजार फौज रोजमुऱ्यावर ठेविली होती तिला निरोप दिला हे विज्ञापना.

नं. ३०८४. श्रीगणराज. (फाल्गुन शु० १०—९ मार्च.)

पै॥ छ० १४ जमादिलावल.

विनंती सेवक महादाजी बल्लाळ. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० ८ माहे जमादिलावलपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं छ० २४ रबिलाखरचीं पत्रें पाठ-

१ तात्पर्य, मोहिमेचें काम संपलें. २ पत्र कुरुंदवाडाहून लष्करांत रघुनाथराव यांस. हें फुल्या दिलेल्या ठिकाणी फाटलें आहे.

विलीं तीं पावलीं. लिहिलें वर्तमान + + + + + + + + ठराव जाहला. करारप्रमाणें ऐवज व टाणीं बसल्यानंतर फौजा देशीं येणार म्हणोन लिहिलें, त्यास प्रस्तुत धारवाडास शत्रूची फौज दोन हजार व चार हजार गाडदी येऊन मोरब मारली, नरगुंद तालुक्याचीं ठाणीं घेतलीं, नरगुंदकराची फौज होती ती निघून गेली, म्हणोन वर्तमान आलें आहे. शत्रूची फौज तुंगापार गेली होती ती माघारी आली म्हणतात. त्यास स्वामींनीं सविस्तर वर्तमान ल्याहावया आज्ञा करावी. वे॥ राजश्री बाबा दीक्षितांचा यज्ञ पौर्णिमेस संपूर्ण होतो. यज्ञाचें साहित्य लागलें तें त्यांचे आज्ञेप्रमाणें सिद्ध करून दिलें आहे. चतुर्दशीस महाव्रत, प्रतिपदेस अवभृत. श्रीमंत राजश्री बाळासाहेब कृष्णातीरच्या घांटाचा उत्सर्ग एकादशीस करितात. द्वादशीस ब्राह्मण भोजन व भूयसी देऊन चतुर्दशीस येथें येणार. श्रीमंत राजश्री भाऊ-साहेब श्रीचे दर्शनास पुण्यांस गेले. तेथून परशुरामास जावें अगर राजापुरचे गंगास्नानास जावें याप्रमाणें त्यांची मसलत आहे. मिरजेस घांटाचे उत्सर्गास व यज्ञाचे समाप्तीस येणार होते, परंतु येणें घडत नाहीं. राजश्री शंकररावतात्या यांचे कन्येचें लग्न काल नवमी इंदुवारीं आठ घटका दिवसा जाहलें. राजश्री भास्कर तानदेव यांचे पुत्रास दिली. आज ब्राह्मणभोजन व देकार होईल. आज्ञेप्रमाणें साहित्य करितों. उणें पडूं देत नाहीं. स्वामीस कळावें यास्तव लिहिलें असे. कृष्णा-तीरच्या वांव्या दक्षणेच्या बुरजासुद्धां दरवाजेच्या वोवरीपावेतों प्राकार तयार जालेला लवुत ( ? ) घालून लादनी लवकरच करवितों. काम जलदीनें चालविलें आहे. वे॥ राजश्री यज्ञेश्वर दीक्षित आठले यांचे पुत्रास अंताजी शंकर तेरदाळकर यांची मुलगी सांगून आली. लग्नाचा निश्चय फाल्गुन व॥ पंचमीचा केला. तेरदाळास जाऊन लग्नाचें कार्य

१ या वेळीं कुरुंदवाडास कृष्णातीरीं घांट बांधण्याचें काम सुरू होतें.

संपवून याच मार्गे येणार. आलेनंतर त्यांची संभावना करून रवाना करितों. करवीरास जाऊन मिरज तासगावास जाऊन सातारेस जातील. वरकड ब्राह्मण शिष्ट मिळाले आहेत त्यांची संभावना व भोजनास सांगून रवाना करितों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब राजापुरास गंगास्नानास जाऊन श्रीपरशुरामास जावें याप्रमाणें बोलवा आहे. मिरजेस घांटाचे उत्सर्गास यावयाचा करार होता, परंतु येणे घडत नाहीं असेंही दिसतें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री आप्पासाहेब स्वामीचे सेवेशीं साष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीनीं आज्ञापत्रीं संभाळ केला, संतोष जाहला. सदैव आज्ञापत्रीं संभाळ करावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेशीं. साष्टांग नमस्कार विनंती सेवक गोविंद त्रिंबक लेले साष्टांग नमस्कार विज्ञापना. वडिलीं लिहिलें आहे त्याजवरून सविस्तर विदित होईल. निरंतर आज्ञापत्रीं सांभाळ करावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०८९. श्री. ( फाल्गुन व० ६–१० मार्च. )

चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा यांसी प्रती गंगाधरराव गोविंद. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ० १९ जमादिलावल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत जावें. विशेष. तुम्ही छ० ९ जमादिलावलचें पत्र पाठविलें तें छ० १४ जमादिलावलीं पावलें. लिहिला मजकूर कळला. “ राजश्री ( हरिपंत ) तात्यांचा मुक्काम कुरवेहाळ परगणें तावरगिरें येथें आहे. वकील टिपूकडील तहाचें बोलणें बोलून गेले होते ते छ० ८ जमादिलावलीं येऊन राजश्री तात्यांच्या डेऱ्यास जाऊन भेटी घेतली. एक नग नजर देऊन ठिका-

१ पत्र मिरजेहून लष्करास.

णास उतरावयास गेले. तहाचें बोलणें बोलून गेले होते त्याप्रमाणें ठरावांत आणून आले" म्हणून लिहिलें तें कळलें. आजपर्यंत सर्व अर्थ समजण्यांत आलाच असेल, त्याप्रमाणें लिहून पाठवावें. शहाजी निंबाळकर पथकांत होते ते समयीं पालखीस सामान काय पावलें आहे तें लिहावें म्हणून लिहिलें, त्यावरून दप्तरांत शोध करून याद पाठविली आहे. पत्र वडिलांस आलें तेंही तासगांवास पाठविलें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ३०८६. (चैत्र शु०—मार्च. दु० पंधरवडा.)

लष्करांतून रघुनायराव नीळकंठ यांचें पत्र बाळासाहेबांस मुक्काम नजीक नवली कृष्णा दक्षिणतीर येथून.

"शत्रूकडील वकील येऊन एक महिनाभर बसले होते. नित्य नूतन दिकती निघत. शेवट परस्परें उलगडयांत येऊन वकील गेले होते. ऐवज घेऊन आले. ऐवजाचें माप सरकार जामदारखान्यास जालें. रा॥ काळोपंत मंडळीसह ऐवजाबरोबर यावे असें ठरावांत असतां अद्यापि आले नाहींत. येतात म्हणोन सांगतात. येतील तेव्हां खरें! छ० १६ रोजीं साऱ्या फौजा मुक्काम मजकुरास आल्या. येथें आठ मुक्काम होतील. नवाबाच्या फौजेस येथूनच निरोप होईल."

नं. ३०८७. श्रीपांडुरंग. (फाल्गुन व० ७–११ मार्च.)

पै॥ छ० १२ जमादिलावल. सन सब्बा समानीन. फाल्गुन मास

वडिलांचे सेवेशीं विनंती विज्ञापना. इकडील वर्तमान तरी राजश्री मल्हारजी बिन तुकोजी होळकर हे फौजसुद्धां लष्करांतून माघारे आले. छ० १३ जमादिलावलीं कूच करून मुक्काम क्षेत्र

---

१ परशुरामभाऊंस. यावरून परशुरामभाऊ शु० १० व वद्य ६ च्या दरम्यान कोंकणांतून परत आले असें दिसतें. २ पत्र मंगळवेढ्याहून मिरजेस.

पंढरपुरीं होता. एक दोन मुक्काम तेथें होते. छ० १९ जमादिलावलीं कूच करून करकंबेचे पेठेंतून मौजे तुळशी परगणे भोसें येथें मुक्काम केला. जातां मार्गीं थोडाबहुत कडबा नेला. मळ्यानीं ऊंस वगैरेस उपसर्ग दिला. तेथून करकंब परगणेंतून मार्ग. तेव्हां तुळशीचे मुक्कामावर राजश्री आपाजीपंत यांस पाठविलें कीं, करकंब परगणेंतील मार्ग सोडून दुसरे मार्गें जावें. ऐकेनात, तेव्हां कारभारी यांस बोलावून टेंभुर्णी परगणेंतून घाऊविलें. पंचवीस चाळीस रुपये खर्च पडले. तह जाल्याचें वर्तमान आहे, तेव्हां नेहमीं मार्ग इकडूनच. पुढें कसें घडतें पहावें. ऐवज परगणे मजकूरचा एक दोन रोजांनीं रवाना करितों. सेवेशीं श्रुत होय कृपा करावी हे विज्ञापना.

नं. ३०८८. श्री. ( चैत्र शु० ३—२२ मार्च. )

पै॥ छ० ९ जा॥खर.

सेवेशीं रामाजी अनंत. कृतातेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागायत छ० २ जा॥खरपर्यंत स्वामींचे कृपेकरून यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं सखोजी जासुदाबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. " बहुतकरून तहाचें बोलणें उरकण्यांत आलें आहे. एक हप्ता व राजश्री काळोपंत नरगुंदकर मंडळीसह वर्तमान व नरगुंदच्या चिळ्या येणेप्रमाणें येथें यावें, नंतर या तळावरून कूच व्हावें, असा ठराव आहे; " म्हणोन लिहिलें, त्याजवरून संतोष जाहला. अलीकडील वर्तमान लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर राजश्री बाबूराव अनंत पागे व राजश्री भोवानजी पाटील उभयतां फौजसुद्धां संगोली प्रांत किचूर येथें होते. त्यास शत्रूकडील जमाव धारवाडास होता त्यानीं जाऊन मिश्रीकोटास वेढा घातला

१ पत्र गोकाकेहून लष्करास रघुनाथराव कुरुंदवाडकरांस.

होता. यास्तव उभयतां संगोलीहून निघोन बेटगिऱ्यास बुनगें ठेऊन सडे मिश्रीकोटचे कुमकेस गेले. हे हुबळीस जातांच त्यांचा वेढा उठला. नंतर यानी हुबळीस मुक्काम केला. दोन चार मुक्काम तेथें होतात तंव छ० २२ जमादिलावलीं धारवाडकरांनीं बेटगिऱ्यास यांचें बुनगें होतें त्याजवर येऊन छापा घातला. बुनग्याची व गांवाची लुटालूट केली. पन्नास घोडे धारवाडकरांनीं नेले. याप्रमाणें करून माघारे गेले. मग हे हुबळीवरून कूच करून बेटगिऱ्यास आले. तेथें दोन तीन मुक्काम केले. मागती धारवाडकर जमाव तोफांसुद्धा अमीनबावीवर येऊन उतरले. हे बेटगिऱ्याहून निघोन संगोलीजवळ आले. धारवाडकर अमीनबावीवर आहेत, पुढें दोडवाड वगैरेस उपद्रव करणार आहेत म्हणोन पत्र दोडवाडचें आलें होतें. सेवेशीं सविस्तर कळावें याजकरितां विनंती लिहिली आहे. सदैव पत्रीं संभाळ केला पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०८९. ( चैत्र व० २–४ एप्रिल. )

लष्करांतून रघुनायराव नीळकंठ यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. मुक्काम नजीक होगरहाळ येथून. पै॥ छ० १५ जमादिलाखरचें—

" टिपूकडील वकील बोलून गेल्याप्रमाणें अमलांतही आलें त्याचें वर्तमान पेशजी लिहिलेंच आहे. वरकड आणखी कांहीं दिकती होत्या त्या दूर जाल्या. वकिलांपैकीं एकजण ऐवज आणावयास गेला होता, तो आजच छ० मजकुरीं दोन प्रहरीं होळकराचे गोटापासून पाव कोसावर येऊन उतरला. काल सायंकाळीं मुहूर्तानें एक तोडा जामदारखान्यास आला. "

नं. ३०९०. श्रीगणराज. (चैत्र शु० ३–२२ मार्च.)

पै॥ छ० ९ जमादिलाखर.

विनंति सेवक महादाजी बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २ जमादिलाखरपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर मिरजेच्या माणसाबरोबर व काली तासगांवच्या सांडणीस्वारासमागमें सविस्तर सेवेशीं लिहिलें आहे, त्याजवरून विदित होईल. आजपर्यंत राजश्री काळाप्पा व ऐवज लष्करांत येऊन फौजा माघाऱ्या फिरल्या असतील. काळाप्पा सुटोन आल्यावर मोठी कीर्ति होईल. परंतु लष्करांत येतील तेव्हां प्रमाण ! सविस्तर लिहावयास आज्ञा केली पाहिजे. राजश्री रामभट मामा मडिलग्यांस कुटुंबासह राहणार म्हणोन आम्हांस पत्र आलें. तेव्हां काल राजश्री बाळाजी विरूपाक्ष यांस पत्र लिहून पाठविलें जे, घोडीं माणसें आजऱ्यांस पाठवून मडिलग्यास घेऊन जाणें म्हणोन लिहिलें आहे. याउपरी मडिलग्यांस रहावयास जातील. राजश्री बाळाजी विरूपाक्ष यांस लिहून फडफर्मास चालवणें म्हणोन लिहिलें आहे. वानगी रसानगी मशारनिल्हेची म्हणोन बंदोबस्त केला आहे. श्रीमंत सौ॥ सीताबाईही मडिलग्यांस येतील. सेवेशीं श्रुत होय. काल तासगांवच्या सांडणीस्वारासमागमें सेवेशीं लिहिलें आहे. स्वामीचें येणें कृष्णातीरास जाल्यावर कळवावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३०९१. श्रीगणराज. (वैशा. शु० २–१९ एप्रि.)

चिरंजीव राजश्री सुभेदार यांसीं प्रति गंगाधरराव गोविंद. उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला.

---

१ पत्र कुरुंदवाडाहून लष्करास रघुनाथराव यांस, २ शिवराव नीलकंठ कुरुंदवाडकर. हें पत्र सुतकांत लिहिलेलें आहे.

"होळकर सवदीवर आले. आज ऐनापुरास येणार म्हणून लोक बोलतात. त्यास आपाजी दामोदर होळकराकडे गेले आहेत. त्यांचें उत्तर काय आलें ? नदी कोठें उतरणार ? कोण मार्गें जाणार ? खेड्यांचे बंदोबस्ताविसीं राजश्री आपाजी दामोदर यांधीं लिहावें," म्हणून लिहिलें, ऐशास ममदापुरचे मुक्कामीं रा॥ आपाजी दामोदर जाऊन पोंहचले. कृष्णा दक्षिणतीरानें जाणेचा मार्ग सांगितला आहे. तत्रापि ममदापुराहून कृष्णा उत्तरतीरानेंच शिरहट्टीनजीक सवदी येथें आले. तेथेंच पार व्हावें, अशीं पत्रें होळकरांस पाठविलीं आहेत व रा॥ आपाजी दामोदरही सांगत आहेत. तेथें पार जाहल्यास तेरदाळ परगणेचीं खेडीं लागतील. रखवालीविसीं लिहिलें आहे. मग घडतां घडेल तें खरें. सैदमिरा पाटील अलासकरही तेरदाळ परगणेचे खेड्यांचे रखवालीविसीं पत्र मागावयासी आला होता. रा. आपाजी दामोदर यांसीं पत्र लिहून दिल्हें व परभारें लिहिलें आहे. शिवरात्रीस सवदीनजीक आले. काल मुक्काम जाहला. आम्ही सांडणीस्वार पाठविला आहे. वर्तमान येईल तें लिहितों. लोभ करावा.

नं. ३०९२. श्री. ( ज्येष्ठ शु० २–२९ मे. )

अपत्यें साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ साबानपर्यंत सुखरूप असों. विशेष. वडिलीं सुलतान याजबरोबर व काल देवजी समागमें ऐशीं दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं. "राजश्री हरिपंततात्या आज मिरजेस आले, उदईक मुक्काम होणार. येथील मेजवानी जालेंनंतर पुढें तासगांवास येणार," म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री होळकर आज येथें येऊन मेजवानी भोजन वस्त्रादिक होऊन पुढें बलवडीचे मुक्कामास गेले. श्रीमंत राजश्री आपासाहेब आज दोन प्रहरास येथें आले. वडिलांस कळावें. शेरींतील कडबा काल रात्रौ तासगांवास आला बितपशील.

१ तासगांवाहून कोणा एकाचें मिरजेस कोणा एकास पत्र.

३०० गाड्यावर. ९३० भाडेकरी याजबरोबर.

० लग.

---

३००

बाराशें तीस पुले घरास आले. बाकीचा कडबा अद्यापि आहे. काल आज दोन दिवस तो लष्करचे हातोन वांचला ! पुढें हरिपंत यांचे हातोन पार पाडणार ईश्वर आहे ! आजचा दिवस पार पडला असें तथ्य नव्हे ! अनुमानेंकडून लिहिलें आहे. अद्यापि शेरींतील कोणीच आलें नाहीं, त्याअर्थी स्वस्थ असेल असें समजून लिहिलें आहे. याउपरी कडबा आणवूं नये; गुरें तासगांवास आणवावीं व कडब्याचे रखवालीकरितां कांहीं राऊत मागोन घेऊन चिरंजीव नरहरीस ठेवणेंविशीं आज्ञा, आज्ञेप्रमाणें कडबा आणावयाची तहकोबी केली. गुरें कालच घरास आलीं. चिरंजीवाचीही रवानगी आज्ञेप्रमाणें उदईक कांहीं स्वार देऊन शेरीकडे करितों. तीर्थस्वरूप राजश्री बाबांचें पत्र आजच आलेलें वडिलांकडे अलाहिदा पाठविलें आहे त्याजवरून विदित होईल. चिरंजीव दाजीचा खोकला स्वरू जो होता तोच अद्यापि आहे. कमी अथवा अधिक नाहीं. उपायही तोच होत आहे. याउपरी श्रीकृपा करील. चिंता नाहीं. चिरंजीव वहिणीसही दूध घालित असों. परंतु तिला उपशम नाहीं. श्रीकृपेकडून तिलाही उपशम होईल. दरवाजे पुढील पेंव काढिलें. त्यांतील दाणे केली सर्वांस मण काढून बाकीचें पेंव झांकोन ठेविलें. विरनाळाकडील वर्तमान तरी अद्यापि माणूस कोणीच आला नाहीं. राजश्री गोपाळबाबा येथें आले आहेत त्यांनीं मात्र सांगितलें जे, लष्करचा उपद्रव काडीमात्र लागला नाहीं. विरनाळचेंही पत्र वडिलांकडे परस्पर मत्तेभाईसमागमें येईल त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.